# विदेश-दर्शन

यशवंतराव चव्हाण

रामभाऊ जोशी
संग्राहक-संपादक

६





The Carlyle
MADISON AVENUE AT 76TH STREET
NEW YORK, N.Y. 10021

ન્યૂ યૉર્ક
2 ઑક્ટોબર [illegible]

પ્રિય [illegible] –

આજ ગાંધીજીના જન્મદિવસે

[illegible]



युनो जनरल असेंब्लीत भाषण

ताश्कंद येथील बैठकीत पंतप्रधान लालबहादूर शास्त्री, यशवंतराव आणि सरदार स्वर्णसिंग



61R
808.8064
CHA



# विदेश-दर्शन

यशवंतराव चव्हाण!

रामभाऊ जोशी
संग्राहक / संपादक

**प्रकाशक :**

सौ. सुमन जोशी,
श्री यशोदा प्रकाशन,
'कृष्णा', पत्रकारनगर,
पुणे ४११ ०१६.

© कॉपीराईट
पुनर्मुद्रण, भाषांतर व इतर सर्व हक्क
रामभाऊ जोशी यांचेकडे.
( पत्ता : 'कृष्णा', पत्रकारनगर,
पुणे ४११ ०१६. )

**प्रथम आवृत्ती**
प्रकाशन, १ जून १९८८

**मुद्रक :**
अ. चिं. रायरीकर,
स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनिवार पेठ, पुणे ३०

**मुखपृष्ठ :**
चित्रकार : ग. ना. जाधव, पुणे.

**मुखपृष्ठ छपाई :**
धोटे प्रिंटस् अॅण्ड आर्टस्,
भायखळा, मुंबई २७.

**किंमत : पन्नास रुपये**

## प्रस्तावना

यशवंतराव चव्हाण यांचे, दीर्घकाल विश्वासात असलेले मित्र व चरित्रकार रामभाऊ जोशी यांच्या हाती 'विदेश-दर्शन' हा पत्रसंग्रह यशवंतरावांनी देऊन ठेवला होता. भारताच्या केंद्रसरकारचे संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री व विदेशमंत्री या अनेक प्रकारच्या नात्यांनी ज्या विदेश-यात्रा यशवंतरावांच्या घडल्या, त्या यात्रांमधील विदेशांतून पाठविलेल्या पत्रांचा हा संग्रह आहे.

ही पत्रे त्यांनी त्यांच्या पत्नी सौ. वेणूताई यांना लिहिलेली आहेत. वेणूताईंची प्रकृती नेहमीच अस्वस्थ होती. यशवंतराव हे केंद्रीयमंत्री म्हणून प्रवासाला निघाले असताना, वेणूताईंनी त्यांच्यासह प्रवासाला निघणे क्रमप्राप्त व उचित झाले असते; परंतु यशवंतरावांच्या कार्य-क्षमतेला ताण पडू नये म्हणून यशवंतरावांची त्यांना बरोबर घेण्याची उत्कट इच्छा असूनही वेणूताईंनी प्रवास नाकारला.

ही स्थिती यशवंतरावांना अस्वस्थ करणारी होती; परंतु नाइलाज होता. वेणूताई आपल्या प्रवासात सहभागी नसल्या, तरी त्यांना पत्रद्वारे विदेश-दर्शन व्हावे अशी त्यांची उत्कट इच्छा या पत्रलेखनाच्या रूपाने सफल झाली. रसिक वाचकही वेणूताईंप्रमाणेच हा पत्रसंग्रह वाचत असताना विदेश-दर्शनात रमतो. भारताचा एक अग्रगण्य, दूरदर्शी, बहुश्रुत, प्रज्ञावंत मुत्सद्दी या रूपात या 'विदेश-दर्शन' पुस्तकात यशवंतरावांचेही दर्शन घडते.

नोव्हेंबर १९६३ ते जानेवारी १९७७ एवढ्या दीर्घ कालखंडात विस्तारलेला हा पत्रसंग्रह आहे. प्रवासवर्णन म्हणून जो ललित

साहित्याचा सुप्रसिद्ध आकृतिबंध आहे, तो आकृतिबंध या पत्रव्यवहारालाही सहज रीतीने प्राप्त झालेला आहे.

आशिया, आफ्रिका, युरोप, अमेरिका आणि अन्य अनेक द्वीपे या पत्रव्यवहाराने व्यापली आहेत. ही एक तऱ्हेची पृथ्वीप्रदक्षिणाच आहे. बहुतेक प्रवास विमानातून केलेला आहे. त्याबद्दल ते म्हणतात, "विमानातून प्रवास करताना सबंध मुलुख डोळ्यांखालून जातो आणि मग त्याचे वैभव मनावर ठसते."

ते जेथे-जेथे जातात, तेथील विशिष्ट समाजजीवन, प्रदेशाचा निसर्ग आणि त्या प्रदेशाचा इतिहास, त्यांच्या मनःचक्षूंपुढे उभा राहतो. त्या त्या प्रदेशाची नैसर्गिक व ऐतिहासिक सगळी महत्त्वाची वैशिष्ट्ये ते या पत्रव्यवहारात बिनचूक रीतीने टिपत जातात. राजकारण आणि अर्थकारण या दृष्टींनी त्या त्या प्रदेशाचा ते सखोल वेध घेतात, कारण विदेशगमनाचे ते मुख्य प्रयोजन असते.

यशवंतराव स्वतः मोठे रसिक, कलाप्रेमी असल्यामुळे वस्तुसंग्रहालयाबरोबरच रंगमंदिरालाही भेट देतात. त्या त्या प्रदेशांतील नृत्य आणि नाट्य या कलांमध्ये ते पूर्ण रंगून जातात. केवळ इंग्लिश भाषिक खेळच ते पाहतात असे नाही. रशियात, मॉस्कोला गेले असताना रशियन रंगभूमीवर चाललेले खेळ पाहण्यात ते दंग होतात. ताश्कंदला गेले असताना तेथे रात्री एक ऑपेरा पाहून आले. त्यासंबंधी ते म्हणतात, "उझबेकी भाषेतील ऐतिहासिक प्रेमकथेवर आधारलेले हे नाट्य भव्य होते. संगीत उत्तम होते. परंतु एक गायिका इतकी जाडजूड होती, की तिला सुंदर कसे म्हणावे हेच समजत नव्हते." मीही अनेक वेळा रशियात गेलो आहे. माझा असा ग्रह झाला की, रशियन तरुणांच्या डोळ्यांना सडपातळ आणि जाडजूड या फरकाचे काही महत्त्व वाटत नाही. तारुण्य व लावण्य असले की खूप खूष होतात.

ज्या ज्या शहरात ते महत्त्वाच्या कामगिरीकरिता जातात, तेथे वेळ नसला तरी वेळात वेळ काढून काही वेळ रंगभूमीवर रंगतातच. ते सांगतात – "लंडनची रंगभूमी हे माझे सर्वांत मोठे आकर्षण आहे. दोन नाटके पाहिली. अगदी वेगवेगळ्या स्वरूपाची, पण रंगतदार होती.

अभिनयातील सहजता, आधुनिक तंत्रामुळे आलेली वास्तवता, कथेतील स्वाभाविकता – नाटकाचे अंक दोन; दोन अंकांत सर्व मिळून चार प्रवेश. दोन-अडीच तासांत सर्व काही संपते. एक नवा आनंद घेऊन प्रेक्षक बाहेर पडतो. कित्येक नाटके दोन-दोन वर्षे सतत चालली आहेत. या रंगभूमीला पल्लेदार इतिहास आहे. काळाने आलेली परिपक्वता आहे. कलाकारांची जाणीव आणि व्यासंग या सर्व गोष्टींनी नाटचकला येथे सदा बहरलेली असते." लंडनहून वॉशिंग्टनला आल्यावर त्यांनी हे पत्र लिहिले आहे.

न्यूयॉर्क येथे विदेशमंत्र्यांची परिषद होती. यूनो. मध्ये आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर मुक्त चर्चा होती. रात्री "Same time new year" हे नाटक पाहिले. त्यासंबंधी म्हणतात : "केवलसिंग, जयपाल पतिपत्नी आणि शरद काळे असे गेलो होतो. हे एक नमुनेदार अमेरिकन नाटक आहे. पात्रे फक्त दोन; उत्कृष्ट कामे केली. दोन-अडीच तास फक्त दोन पात्रांनी नाटक असे रंगविले की सांगता सोय नाही. नाटकाचा विषय, मांडणी, कलाकारांनी जीव ओतून केलेला अभिनय, यांमुळे नाटक फारच परिणामकारक होते. विनोद भरपूर आहे. पण सर्व विनोद मूलत: जीवनातील गंभीर अनुभूतीतून निर्माण होतो.

एका जोडप्याची विवाहबाह्य मैत्री अकस्मात् आपापल्या गावापासून दूरच्या शहरी होते. दरवर्षी याच महिन्यात एका वीकएन्डला ते सतत पंचवीस वर्षे भेटत राहिले. सहा दृश्ये आहेत. दर पाच वर्षांनी होणारी भेट प्रत्येक प्रवेशामध्ये दाखविली आहे. पंचवीस वर्षांतले, परिस्थितीत, वयात, स्वभावात, मनात झालेले फरक दाखविले आहेत. पण मैत्री अतूट आहे. शेवटी त्यांतले गृहस्थ वृद्धपणी लग्नाची इच्छा व्यक्त करतात आणि स्त्री म्हणते, "I cannot". कुटुंबाविषयीचा जिव्हाळा, नवऱ्याबद्दल आदर ही कारणे सांगते आणि ती खरी असतात. तो रागावतो व निघून जातो पण लगेचच परततो आणि मैत्री संथपणे पुन्हा सुरू राहते. म्हटले तर मजा, म्हटले तर एका गंभीर प्रश्नाचे चित्रण होते." (न्यूयॉर्क, १२ ऑक्टोबर १९७५).

यशवंतराव आपल्या विशिष्ट मंत्रिपदाच्या गरजांप्रमाणे विदेशांतील उच्चपदस्थ, प्रथितयश व्यक्तींशी संधान बांधणे, हे पहिले कर्तव्य समजतात.

भारताच्या हितसंबंधाशी उदासीन कोण, विरोधी कोण, सहानुभूतीचे कोण आणि प्रत्यक्ष मदत करण्यास तयार कोण, याची ते बारकाईने तपासणी करतात. बहुतेक सगळा परिचय आणि संवाद, सुसंस्कृत शिष्टाचाराच्या पातळीवर चालत असल्याने त्यातील औपचारिक भाग वगळून तथ्य कशात आहे आणि वैय्यर्थ कशात आहे, याची ते विलक्षण तटस्थतेने समीक्षा करीत असतात आणि ही समीक्षा त्यांच्या विदेशदर्शनात सुरेख रीतीने नोंदवली आहे.

उदा., जागतिक बँकेचे व अमेरिकेचे एकवेळचे अर्थसचिव मॅक्नामारा यांच्याशी त्यांनी परिचय करून घेतला. वारंवार भेटी होऊन त्याचे मैत्रीत रूपांतर झाले. हीच गोष्ट अमेरिकेचे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे पट्टीचे मुत्सद्दी किसिंजर यांच्या संबंधात लक्षात येते.

आशिया, आफ्रिका, विकसनशील देश व विकसित देश यांचे मौलिक प्रश्न सुटण्यासारखे कोणते आणि न सुटण्यासारखे कोणते, याच्या चिकित्सेत यशवंतराव गढून जातात, आणि त्याचे सखोल विवेचन करतात. निकोशियाच्या कॉमनवेल्थ अर्थमंत्र्यांच्या परिषदेसंबंधी यशवंतरावांनी जे विवेचन केले आहे ते या संदर्भात अत्यंत वाचनीय झाले आहे.

ऐतिहासिक महत्त्व असलेल्या स्थलांचे दर्शन यशवंतराव घेतात तेव्हा समोर जे त्यांना दिसत असते, त्यापेक्षा भूतकाळात जे घडलेले असते, ते उठावदारपणे त्यांच्या मनःचक्षूंपुढे त्याच वेळी उभे राहते. उदा., त्यांनी भेट दिलेली, आठव्या हेन्रीचा राजवाडा आणि पॅरिसजवळील व्हर्सायचा राजमहाल ही प्रवाशांची अत्यंत महत्त्वाची आकर्षणे होत.

हेन्रीच्या राजवाडयासंबंधी यशवंतराव लिहितात, "पंधराव्या शतकातील आठवे हेन्री म्हणजे एक विलक्षण प्रकरण होते. अनेक लग्ने केली, अनेकांच्या मिळकती हडपल्या, हॅम्पटन कोर्ट त्यांपैकीच. या राजाची लहर लागली की जो मनुष्य मर्जीतून उतरे, त्याची वास्तू आपलीशी करीत असे. मोठमोठी आणि लागोपाठ अशी तीन प्रांगणे. एक कलापूर्ण दिवाणखाना, जुनी पाचशे वर्षांपूर्वीची अजूनही रेखीवपणे राखलेली सुंदर बाग, जुन्या चित्रकारांनी काढलेल्या कलाकृती व जुन्या शस्त्रांनी सजवलेल्या राजवाडयाच्या भिंती, ही सर्व मला वैशिष्टयपूर्ण वाटली."

ज्या विदेशातील नगरीशी भारतीय संस्कृतीचा इतिहास निगडित झालेला असतो, त्या नगरीबद्दल त्यांचे विवेचन वास्तववादी असले तरी अत्यंत भावपूर्ण असे असते. याची अनेक उदाहरणे या पत्रसंग्रहात मिळतात. इंडोनेशिया आणि काबूल यांची माहिती भावनांनी भरलेली आणि इतिहासाने परिणामकारक व उठावदार बनली आहे.

काबूलबद्दल त्यांची भावना अधिक गंभीर आणि उत्कट बनते. ते लिहितात – " दहा लाख वस्तीचे हे शहर विस्तृत पसरले आहे. नवे विभाग आधुनिक बनत आहेत. जुने काबूल तसेच जुने आहे. संध्याकाळी इंटरकॉन्टिनेन्टलच्या खैबर सूटमधून काबूल शहर पाहिले. एक विलक्षण शांत, सुंदर, मनोहारी दृश्य दिसते.

"भारतीय क्लासिकल संगीत येथे लोकप्रिय आहे. आपल्यासारख्या बैठकी येथे रंगतात. अफगाण गायक श्री. सारंग याचे गायन मी आलो त्या रात्रीच्या जेवणानंतर विदेश-मंत्रालयाने ठेवले होते. बडे गुलाम अलीची आठवण झाली. सुरावट तीच, आरोह – अवरोहाचे नखरे तेच, देहयष्टीही तशीच. "

" आज सकाळी सरकारी छोटया विमानाने ' बामीयान 'ला गेलो होतो. तेथे पंधराशे ते सोळाशे वर्षांपूर्वीचे भगवान बुद्धाचे दोन भव्य पुतळे डोंगरकपारीत कोरलेले आहेत. कुशाण राजवंशाने बुद्ध धर्माचा येथे प्रसार केला. तेव्हाचे हे सांस्कृतिक लेणे आहे. दोन मूर्ती आहेत. एक १५० ते १६० फूट उंचीची व दुसरी असेल शंभर फूट उंचीची.

त्या डोंगरकपारीत असंख्य लेणी आहेत. अजिंठा – वेरूळची आठवण येते. भारत - अफगाण - सरकारांच्या साहाय्याने हे अवशेष सुरक्षित राहिले पाहिजेत म्हणून गेली काही वर्षे तज्ज्ञांमार्फत प्रयत्न चालू आहेत. मोगल साम्राज्याचे संस्थापक बाबर यांची कबर येथे आहे. तीच मी पाहणार आहे. अफगाणिस्तानच्या उत्तरेकडील विभागात राहणाऱ्या एका जमातीचे लोक उत्तम घोडेस्वार आहेत. ते अनेक धाडसी प्रयोग करतात. त्यांची येथे स्पर्धा आहे, तीही पाहणार आहे. "

" बामीयानच्या खोऱ्यात चेंगीझखानाच्या क्रौर्यांचे काही अवशेष पाहिले. बुद्धमूर्तीच्या खालच्या बाजूला एका उंच टेकडीवर एक शहर

होते. चेंगीझखानाने त्या शहराचा संपूर्ण विध्वंस केला. स्त्री, पुरुष, मुले, या सर्वांचा संहार केला. आताही हे शहर उद्‌ध्वस्त स्वरूपात अमानुष क्रौर्याची साक्ष देत उभे आहे.

करुणेची मूर्ती भगवान बुद्धही उभे आहेत आणि चेंगीझखानाचे क्रौर्यही शेजारीच उभे आहे. इतिहासात क्रौर्य आणि करुणा यांची जणूकाही स्पर्धाच चालू आहे. कुणाचा विजय होत आहे? करुणेचा की क्रौर्याचा? मन कधीकधी साशंक होते. आजच्या जगाकडे पाहिले की हा प्रश्न भेडसावू लागतो. मानवाची प्रगती होत आहे, असा आमचा दावा आहे. हा खरा असेल तर करुणेचाच विजय होतो आहे असे मानावे लागेल. पण अण्वस्त्रांच्या रूपाने आधुनिक चेंगीझखानाचे क्रौर्य उभे आहे याची जाणीव झाली की मग पुन्हा मन अस्वस्थ होते आणि साशंक बनते. अर्थात् पुरुषार्थ करणारांनी करुणेचा मार्ग पत्करला पाहिजे. याच श्रद्धेने मी आज बामीयानहून परतलो" (काबूल, ३१ ऑक्टोबर, १९७५) – हॉटेल इन्टरकॉन्टिनेन्टल ).

इंडोनेशियातील बाली बेटाला यशवंतरावांनी भेट दिली होती. या बेटावर पंधराशे वर्षांपूर्वी हिंदू संस्कृती अवतरली. ती संस्कृती आजही आपल्यापरी परंपरेचे सामर्थ्य सांभाळून तेथे नांदत आहे.

यशवंतराव लिहितात – " वर्षानुवर्षे ज्यासंबंधी वाचले. ऐकले ते बाली बेट आज पाहिले. दुपारी सव्वाअकराला जकार्ताहून निघालो. दुपारचे जेवण विमानतच घेतले. दीड तासात येथे पोचलो. विदेशमंत्री - डॉ. आदम मलीक, आज त्यांचा वाढदिवस असतानाही या ट्रीपवर आमच्या बरोबर आलेले आहेत. मी बाली बेटावर हिंदू संस्कृती पहावी, असा त्यांचा आग्रह गेल्या वर्षांपासून होता. विमानतळावर उतरताना अगदी बाली - हिंदू पद्धतीप्रमाणे स्वागत झाले.

दोन तरुण, महाभारतकालीन हिंदूंचा पेहराव असावा, तसा अंगावर धारण करून आगतस्वागत करण्यासाठी हातात छत्रचामरे घेऊन आले. त्याचप्रमाणे दोन प्रौढ तरुणी पुष्पमाला हाती धरून सामोऱ्या आल्या. कपाळावर कुंकू, गौरवर्णाकडे झुकणारी कांती, हिंदू विनम्रता – क्षणभर सर्व काही अगदी महाभारतकालीन वातावरण असल्यासारखे वाटले. या

बाली स्टाइल स्वागतानंतर बाली बीच हॉटेलात आलो. सुरेख बीच आहे.

माझ्या खोलीच्या गच्चीत गेल्यावर पूर्व दिशेला पसरलेला जावा समुद्र दिसला. क्षितिजावर अंधुकसे एक बेट व त्याच्यावरचे डोंगररांगांचे आकार दिसत होते. समुद्राचे पाणी शांत व स्वच्छ दिसले. उद्या सकाळी सूर्योदयाचे आत या समुद्रकाठच्या चौपाटीवर अनवाणी चालण्याचा विचार आहे. बाली बेटावरची समुद्राची रेती उघडया पायतळाला लागावी, अशी इच्छा आहे. या भूमीवर नम्रतापूर्वक असेच चालले पाहिजे. हा हिंदूंचा मुलुख आहे. मी हे हिंदुत्ववादाच्या भावनेने नाही म्हणत – पण अजूनही येथे लाखो हिंदू, परंपरागत कथांच्या आधारे चालत आलेली हिंदू संस्कृती जपत आहेत हे पाहिले. चारच्या सुमारास बाहेर पडून एका हिंदू कुटुंबाचे, कुटुंबाने चालवलेले हॅण्डिक्राफ्ट्स्चे कार्य पाहिले. त्याने घराची आखणी दाखवली. ही परंपरागत आहे. घराला दरवाजा आहे. आत जाताच मोकळे अंगण. ईशान्येच्या बाजूला मंदिर. सामान्यत: सुखवस्तु हिंदू तसेच आहेत. हिंदू संस्कृती जातपातीचा वारसा येथेही घेऊन आली.

" पण बेट फार सुंदर आहे. केरळ कोकणासारखी गर्द झाडी. जमीन उत्तम म्हणून शेती उत्तम. हे लोक अतिशय उद्योगी आहेत. नटलेला निसर्ग इतका विपुल की, नृत्य, नाटच, चित्रकला या कला शतकानुशतके पोसल्या गेल्या त्यात काय आश्चर्य ! " (बाली. इंडोनेशिया, २२ जुलै १९७६.)

" सकाळी बालीहून निघण्यापूर्वी एक कलाकेंद्र पाहिले. नानाविध लाकडांच्या कोरलेल्या मूर्ती होत्या. पारंपरिक व आधुनिक यांचे मिश्रण या संग्रहात आहे. उभ्या नाचणाऱ्या श्रीगणेशाची मूर्ती ही मला नवीन वाटली. मूर्ती आकर्षक होती. आणखी एक नवेपण या मूर्तीत पाहिले. शंकराच्या गळचात जसा सर्प असतो तसा सर्प या गणेशाच्या कमरेला वेटाळून होता.

बाली हिंदूंमध्ये त्याच कथा – रामायणातल्या व महाभारतातील – काहीशा फरकाने सांगतात. कर्मसिद्धांत व गीतेवर फार विश्वास. बाली-तील हिंदू कर्मयोगाचे तत्त्व आचरणात आणतो, असे एक वरिष्ठ हिंदू

अधिकारी सांगत होता. लोक उद्योगी व आनंदी आहेत त्याचे रहस्य त्यात आहे, असे त्याचे मत. गाईचे स्थान येथील हिंदूंच्यात, विचार–आचारात काय आहे, हे मी मुद्दाम समजून घेण्यासाठी विचारले. त्या गृहस्थाने सांगितले की आम्ही गायी पाळतो, पण ते त्यांच्या दुभत्यासाठी आणि बैलांसाठी. ब्राह्मण सोडून बाकी सर्व हिंदू गोमांसभक्षक आहेत व त्यात काही गैर वा अधार्मिक आहे, असे ते मानत नाहीत."

"दुपारी साडेअकराला जोगी आकार्ता या शहरात पोचलो. दोन-नंतर येथून ३० मैलांवर बोरोबुदुर हे विश्वविख्यात बुद्धमंदिर आहे, ते पाहण्यासाठी गेलो. हे मंदिर जगातील सर्वांत मोठे बुद्धमंदिर आहे. नवव्या शतकात, म्हणजे एक सहस्र वर्षांपूर्वी हे मंदिर बांधले. मंदिराची रचना शिल्प म्हणून व बुद्धतत्त्वज्ञानाचे प्रतीक म्हणूनसुद्धा अपूर्व आहे. एकशे-वीस गज लांब, रुंद व तितकेच उंच ही लांबीरुंदी पायाशी आहे. पण पुढे ती निमुळती होत जाते. शिखराचे जागी मोठे गोल स्तूप आहेत.

पूर्वेकडील प्रवेशद्वार प्रमुख आहे. त्यातून प्रवेश करावयाचा. जस-जसे आपण वर जातो, तसे प्रदक्षिणा घालता येईल अशी व्यवस्था वेगवेगळ्या उंचीच्या स्तरांवर केलेली आहे, असे आढळून येते. जसजशी मंदिराची उंची चढत जाते, तसतशी आध्यात्मिक अनुभवाचीही उंची वाढते, असे दिग्दर्शित केले आहे. हे व्यक्त करण्यासाठी भगवान बुद्धाच्या मूर्तींच्या मुद्रांचा उपयोग केला आहे. अशा तऱ्हेने बुद्धाच्या पाचशेसाठ मूर्ती सर्व मंदिरावर प्रतिष्ठित केल्या आहेत. मूर्तींच्या ओठांवरील नित्य ओळखीचे ते सौम्य हास्य व ज्ञानी पुरुषाचे शालीन डोळे आजही तसेच दिसतात. मनाला कसल्यातरी तृप्तीचा आनंद होतो.

आज दिवसभर या मंदिराने भारून गेलो आहे. आशियाखंडातील पुरातन संस्कृतीचे हे अवशेष पाहिले म्हणजे माणूस भारून गेला नाही, तरच आश्चर्य ! वेरूळ–अजिंठ्याची आठवण झाली. तेथील रूपसंपन्न चित्रकला, शिल्प व विविध भव्य भाव दाखविणारी बुद्धाची अविस्मर-णीय मूर्ती यांच्या संगतीला बोरोबुदुरची जोड मिळाली."

(जोगी अकार्ता– २३ जुलै १९७६.)

संयुक्त राष्ट्रे या जागतिक संस्थेशी यशवंतरावांचे वारंवार संबंध आले. या संस्थेत जगातील शेकडो राष्ट्रांच्या प्रतिनिधींसमोर त्यांची सगळीच भाषणे मुद्देसूद व आंतरराराष्ट्रीय राजकारणामध्ये सामंजस्य स्थापन करण्याच्या उदात्त उद्देशाने प्रेरित अशी झाली.

भारताच्या तटस्थतेचे सूत्र अधिक अर्थपूर्ण रीतीने विशद करून त्यांनी या जागतिक संस्थेमध्ये मांडले. महत्त्वाच्या व्यक्तींच्यावर प्रभाव पाडणे, त्यांच्या विरोधाची धार कमी करणे, त्यांचे मतपरिवर्तन करण्याकरता मोठ्या ध्येयवादी दृष्टीने झटत राहणे, असा यशवंतरावांचा प्रयत्न सतत चालू राहिला.

राष्ट्राची मते बदलणे किंवा राष्ट्राच्या मतावर प्रभाव पाडणे ही गोष्ट पुष्कळ वेळा अशक्य असते; परंतु राष्ट्राच्या प्रतिनिधीभूत व्यक्तीच्या मतांमध्ये बदल करणे ही पुष्कळ वेळा शक्य कोटीतील गोष्ट असते, हे तत्त्व लक्षात घेऊन यशवंतराव प्रयत्नशील असत. या संदर्भात ब्रिटनचे मजूरपक्षाचे नेते आणि प्रधानमंत्री याबद्दल यशवंतराव मार्मिकपणे म्हणतात: " एकोणीसशे ४५-४६ मध्ये अॅटली नसते, तर इतिहासाची पावले कदाचित वेगळी पडली असती, असे वाटू लागते. व्यक्तीव्यक्तीचा फरक इतिहासाच्या दिशा बदलू शकतो, हे काही प्रमाणात, किंबहुना बऱ्याच प्रमाणात खरे आहे. "(न्यूयॉर्क ते जिनिव्हा, पृ. १७३).

भारताचे उच्चपदस्थ केंद्रमंत्री या नात्याने यशवंतरावांनी जेथे जातील तेथे राजकारणी, पत्रकार, सत्ताधारी, कलाकार, इत्यादिकांना मेजवान्या दिल्या. त्याप्रमाणे शेकडो मेजवान्यांना आणि समारंभांना ते उपस्थित राहिले. खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था होतीच. या संदर्भात यशवंतराव म्हणतात, " आम्ही पिणारे नाही, हे पाहून आमची व्यवस्था ठेवण्यासाठी येथे हजर असलेल्या लोकांची फारच निराशा झाली. "

त्या त्या राष्ट्रातील प्रधानमंत्री किंवा अन्य मंत्री सपत्नीक हजर असायचे. गप्पांचा कलकलाट व अधूनमधून हास्याची उडणारी कारंजी, अशा तऱ्हेचे मोहक वातावरण असायचे. हातात हात घालून आणि गळ्यात गळा घालून मोकळेपणाने नाचत व हिंडत असणारी जोडपी त्यांना भेटायची. असा आनंदसमारोह रात्री अकरापर्यंत चालू असायचा.

त्यात यशवंतराव एकाकी पडायचे आणि सलगी करणारे उच्चपदस्थ त्यांच्या एकाकीपणावर नेमके बोट ठेवत असत.

कोणत्याही शहरात गेले, की तेथे न चुकता तीन स्थलांना ते भेट देत असत. वस्तुसंग्रहालय, पुस्तकांचे दुकान आणि नाटयमंदिर. कंटाळा आला म्हणजे आपल्या निवासस्थानी विश्रांति घेत. सभासंमेलनांच्या उपस्थितीची तयारी करीत. त्यांचे निवासस्थान म्हणजे त्या त्या नगरीतील भव्य व अद्ययावत शैलीची सगळ्यात महाग अशी हॉटेलची इमारत बहुतेक असायची. एकांतपणे कामाची कागदपत्रे वाचीत आणि टिपणे करीत वेळ निघून जायचा. गरमगरम चहा हे त्यांचे प्रसन्न करणारे पेय होय. त्याचा ते या पत्रसंग्रहात वारंवार उल्लेख करतात.

या विदेश-यात्रांमध्ये राजकारणाबरोबरच तत्त्वचिंतनालाही धार येत असे. या पत्रव्यवहाराच्या शेवटी त्यांच्या मनात गर्दी केलेल्या अनेक प्रश्नांचा आढावा ते घेत आहेत. या प्रश्नासंबंधी ते म्हणतात की, " गेले अनेक महिने व काही वर्षे म्हटले तरी चालेल, हे प्रश्न मनात जमलेले आहेत. काही प्रश्न उभे रहात गेले आणि त्या त्या वेळी उत्तरे मिळत गेली. परंतु उत्तरांची सुसंगत आखणी झालेली नाही. पुढल्या वर्षी तीस वर्षे होतील, मी पहिली निवडणूक जिंकून सरकारमध्ये आलो. सत्ता हस्तगत करण्याकरता लोक प्रयत्न करतात, सत्ता माझ्या हातात आपोआप आल्या. समाजाच्या परिवर्तनासाठी मी त्या वापरल्या. दलितांबद्दल कणव ठेवून सामाजिक न्याय प्रस्थापित केला पाहिजे ही माझी प्रेरणा प्रथमपासूनची होती. सत्तेच्या केंद्रस्थानी असताना उच्च उद्दिष्टांसाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न केला. पण आज मी जेव्हा राजकारणातले चित्र पाहतो, तेव्हा माझे मन अस्वस्थ होते.

खरोखरीच आपण काही नव्या कामाचा पाया घातला होता का ? खरी जिव्हाळ्याची माणसे अवतीभोवती होती का ? झाले हे पुरे नाही का ? असाच खेळ पुढे किती दिवस, कुणासाठी आणि काय म्हणून चालू ठेवायचा, असा प्रश्न माझ्यापुढे आहे. मी काही राजकारण-संन्यास घेण्याचा विचार करीत नाही. विचार येतो निवडणुकांचा आणि सत्तास्थानांचा. आज सत्तास्थानांवर राहण्याची अनेकांची धडपड चालू आहे.

आहेत ते तेथेच कसे राहता येईल यासाठी साधनशुचितेचा कसलाही विचार न करता, अगदी क्रूरपणे कारस्थाने करताहेत. त्या कारस्थानाचे बळी होण्यापूर्वीच योग्य वेळी, योग्य निर्णय घेऊन बाजूला झाले, तर बरे नाही का ? असा प्रश्न मनात घोळत आहे." ( माटेंगो बे-जमेका – दि. ४ मे १९७५ ). हे प्रश्न लिहून झाल्यावर दहा वर्षांनी निसर्गानेच यशवंतरावांना बाजूला केले.

अशा तऱ्हेचे लेखन यशवंतरावांनी जी सत्तास्थाने भूषविली त्या सत्तास्थानांवरील कोणत्याही भारतीय व्यक्तींनी केलेले नाही याचे कारण इतका उच्च दर्जाचा ध्येयवाद, तात्त्विक चिंतन, साहित्य कुशलता, यांचा त्यांच्या ठिकाणी अभावच होता हे सूचित होते.

हा पत्रसंग्रह भारताच्या गेल्या ४० वर्षांतील राजकीय इतिहासामध्ये एक महत्त्वाची अशी देणगी आहे. ही देणगी यशवंतरावांच्या कायमच्या, अत्यंत विश्वासातील श्री. रामभाऊ जोशी यांनी जनतेला प्राप्त करून दिली यात त्यांचे ऋण जनतेने लक्षात घेणे आवश्यक आहे.

हा पत्रसंग्रह – ' विदेश-दर्शन ' – मराठी साहित्यातील एक उच्च दर्जाची साहित्यकृती म्हणून विराजमान होईल यात शंका नाही.

वाई : **लक्ष्मणशास्त्री जोशी**

दिनांक १८ मे, १९८८

## त्याचं असं झालं की —

एक-दोन पावसाळे उलटले असतील !

मार्च-एप्रिलचा सुमार असावा. मोकळा वेळ होता. दुपारी माझं कपाट आवरत बसलो होतो. अवचित ती भेट माझ्या हाती आली !

क्षणभरच विचार करावा लागला. यशवंतराव चव्हाण – त्यांना आम्ही मंडळी साहेब म्हणत असू – यांनी माझ्या षष्टयब्दिपूर्तीनिमित्त मला ती भेट दिली होती. भेट देताना म्हणाले होते, " रामभाऊ, अभिष्टचिंतन वगैरे बाकीचं सारं लौकिक होतं ते झालं. आता ही माझी वैयक्तिक भेट घ्या. तुम्हाला आवडेल. घरी गेल्यावर सावकाशीनं पहा. "

भेटीचा मी स्वीकार केला. घरी आल्यावर कपाटात ठेवली. त्या वेळी मी एका महत्त्वाच्या कामात स्वतःला गुंतवून घेतलं होतं. कुटुंबियांसमवेत भेट सावकाशीनं पाहावी म्हणून कपाटात ठेवली. पण अशी सावकाशी लगोलग मिळाली नाही. मी एका अपघातात सापडलो. महिनाभर हॉस्पिटलमध्ये रहावं लागलं. नित्यक्रम सुरू होण्यास दोन-तीन महिने लागले. भेट कपाटात राहिली. काही पावसाळे गेले !

आता कपाट आवरताना भेट हाती येताच स्मृति जागी झाली. भेट तरी काय आहे असा विचार करीत वेष्टण सोडले. पहातो तो समोर यशवंतरावांचे हस्ताक्षर ! ' प्रिय सौ. वेणूबाईस ' असा मायना असलेलं यशवंतरावांनी लिहिलेलं पत्र-वाङ्मय !

' अरेरे ! ......, उद्गार अनाहूतपणे बाहेर पडले. प्रसंग आठवला. मन गहिवरले. तो प्रसंग मला जसाच्या तसा दिसू लागला.

सौ. वेणूताई चव्हाण यांचं १९८३ च्या जूनच्या प्रारंभी देहावसान झालं. त्यानंतर दोन-तीन महिन्यांनी त्यांचं चरित्र लिहिण्याविषयी चर्चा सुरू झाली. चरित्र-लेखनाची अवघड जबाबदारी माझ्याकडे देण्यात आली.

सौ. वेणूताईंच्या जीवनाचा तपशील मिळवावा, यासाठी १९८३ च्या डिसेंबरअखेरीस दिल्लीस गेलो. तीन आठवडे राहिलो. ' १ रेसकोर्स रोड ' या त्यांच्या निवासस्थानी यशवंतराव व मी दोघेच होतो. वेणूताईंचे निधन आणि त्यातून निर्माण झालेला एकाकीपणा... ते मनानं हलले होते.

त्या तीन आठवड्यांत खूप खूप बोललो – म्हणजे चर्चा केली. तपशील जमा झाला. तरीपण वेणूताईंचा काही पत्रव्यवहार असेल तर तो अभ्यासावा अशी मी इच्छा प्रदर्शित केली. त्या वेळचा तो प्रसंग...

" तसा काही पत्रव्यवहार असण्याची शक्यता नाही. कोणाशी पत्रव्यवहार करण्याच्या फंदापासून वेणूबाईंनी स्वतःला कटाक्षानं दूर ठेवलं होतं. त्यामुळं पत्रं... अशक्य आहे. " यशवंतरावांनी सांगितलं.

आणि ते सत्य होतं. वेणूताई या दर्जेदार संसार करणारी आदर्श स्त्री हे चित्र स्वच्छ होतं. यशवंतरावांशी झालेल्या चर्चेतून हेच ध्वनित झालेलं होतं. परंतु माझ्यातला लेखक आणखी विधायक तपशील हस्तगत करण्याचा विचार करीत होता.

एके दिवशी, रात्री आम्ही बोलत असताना पुन्हा मी तोच आग्रह धरला. त्यावर पूर्वीचेच उत्तर मिळाले. पण, ' ठीक आहे, पाहू या तुमचा आग्रह आहे तर ' असं म्हणून यशवंतराव कोचावरून उठले.

त्यांच्या बेडरूममध्ये आम्ही बसलो होतो. तिथं दोन कोच. एक त्यांचा, दुसरा वेणूताईंचा. मध्ये टीपॉय. त्यावर काही पुस्तके वगैरे. समोर सोफासेट. बाजूच्या भिंतीशी दोन मोठी कपाटं. ती वेणूताईंची. कुलूपबंद. त्या निघून गेल्यापासून ती तशीच उभी होती. बंद होती.

यशवंतराव कपाटापर्यंत गेले. हातात किल्ल्यांचा जुडगा होता. कपाटांकडे पहात स्तब्ध उभे राहिले. काही क्षण गेले अन् तसेच परतले. कोचावर बसले. डोळ्यांतून अश्रुधारा सुरू झाल्या !

निस्तब्ध शांतता. अस्वस्थता. कपाट उघडण्याचं धाडस त्यांना झालं नाही. मी स्वतः करू शकलो नाही. यशवंतरावांना सावरावं कसं... त्यासाठी शब्द उमटेना. तेवढ्यात बंगल्यातला नोकर – त्याचं नाव गंगा – बेडरूममध्ये आला. त्यानं काही निरोप सांगितला. तो जायला निघताच मी त्याला कपाट उघडण्यास सांगितलं.

त्यानं किल्ली हातात घेतली मात्र, यशवंतराव कपाटाशी पोहोचले. कपाट खुलं झालं. वेणूताईंची अॅटॅची काढून घेऊन ते कोचावर बसले.

" वेणूबाईंनी सर्व जतन करून ठेवलेलं दिसतंय " ते म्हणाले. चेहेऱ्यावर आश्चर्य उमटलं. अॅटॅची उघडली तेव्हा कागदपत्रांची एक फाइल त्यांना मिळाली होती. फाइलीतील कागद ते क्रमानं पहात होते. माझी उत्सुकता शिगेस पोहोचली.

यशवंतरावांनी स्वतःच लिहिलेलं, पण आता काही वर्षांनंतर ते प्रथमच पहात होते. सर्व शाबूत असेल याची त्यांना कल्पना नसावी.

" वाचून पहा, हे काहीसं वेगळंच आहे." यशवंतरावांनी सांगितलं.

दिल्लीतल्या मुक्कामात मी ते सविस्तर वाचलं. काळजीपूर्वक वाचलं. वेणूताईंना समोर ठेवून त्यांनी सर्व लिहिलं होतं. जगातील विविध राष्ट्रांचा प्रवास करीत असतांना सातासमुद्रापलीकडून पत्नीशी पत्ररूपानं त्यांनी जे सविस्तर संभाषण केलं ते हे लेखन. तरी पण केवळ पति-पत्नीमधील पत्रे एवढ्यापुरतेच लेखनाचे स्वरूप मर्यादित नाही. त्यामध्ये जगाचे सूक्ष्म निरीक्षण आणि मूलभूत व्यासंगी चिंतन असल्याची जाणीव प्रत्येक पत्रवाचनाबरोबर होत राहिली. मी माझी प्रतिक्रिया सांगितली. त्यांचीही ऐकली. तो विषय तेवढ्यावरच थांबवला. वेणूताईंना समोर ठेवून ते सर्व लिहिलेलं होतं आणि त्या निघून गेल्याच्या दुःखातून अजून ते सावरले नव्हते. कपाट खुलं करण्याच्या वेळचा प्रसंग माझ्यासमोर घडला होता. ताजा होता. चर्चा थांबवली ती त्यामुळे.

लिहिलेलं सर्व ज्या क्षणाला त्यांनी प्रथम पाहिलं त्याच क्षणाला मलाही दर्शन घडलं. वाचण्याची संधी मिळाली. प्रतिक्रिया व्यक्त करता

आली. त्यांचं भाष्य ऐकायला मिळालं. या समाधानात मी दिल्लीहून परतलो. १९८४ च्या जानेवारीच्या मध्यावर.

त्याच वर्षी, म्हणजे १९८४ च्या ७ फेब्रुवारीला, कराड शहरवासियांनी, तेथील नगरपालिका, शिक्षणसंस्थांनी माझ्या षष्टब्दिपूर्तीनिमित्त अभिष्टचिंतनाचा एक कार्यक्रम आयोजित केला. कराडच्या शिवाजी हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. नारायणराव शिंदे यांना राज्यपुरस्कार मिळाला होता. त्यासाठी त्यांचा गौरव आणि माझे अभिष्टचिंतन असा संयुक्त कार्यक्रम झाला. प्रमुख पाहुणे होते यशवंतराव चव्हाण. कराडकरांनी हा कार्यक्रम मोठा दर्जेदारपणानं केला.

त्यानंतर दिल्लीला परतीच्या वाटेवर यशवंतराव पुणे येथे आले. त्यांनी माझं व्यक्तिगत अभिष्टचिंतन केलं आणि 'वैयक्तिक भेट' दिली.

आता एक–दोन पावसाळे उलटल्यानंतर ती भेट आणि त्यांचं हस्ताक्षर समोर दिसताच सारं सारं आठवलं. यशवंतराव कोचावर बसले आहेत... भेट माझ्या हाती देत आहेत ... त्यांचे ते शब्द... लौकिक होतं ते झालं ... आता ही माझी वैयक्तिक भेट घ्या. तुम्हाला आवडेल ... क्षणभर सारं सारं समोर उभं राहिलं.

त्यांनी 'लौकिक' हा शब्द वापरला होता तो कराड येथे झालेल्या समारंभाला उद्देशून! या लौकिकाच्या पलीकडलं, वैयक्तिक असं भेट देण्यासाठी त्यांनी आपली निवड केली याचं समाधान होतं.

हे समाधान आणि त्याचा आनंद व्यक्त करावा अशी मनःस्थिती मात्र उरली नव्हती. या समाधानाला, आनंदाला दुःखाची किनार होती. दुःख अशासाठी की या अलौकिक भेटीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी यशवंतराव हयात नव्हते! हे सारं मनात सामावून घेणं कठीण झालं!

आनंद दुसऱ्याला सांगितला तर वाढतो आणि दुःख सांगितलं तर कमी होतं असा विचार केला आणि साहेबांच्या विश्वासू परिवारातले, पुणे शहरातील ॲडव्होकेट ग. नी. जोगळेकर यांना फोन केला. शब्द रेटत कशीबशी हकिगत सांगितली. ते म्हणाले, 'मला ते माहीत आहे.'

मी फोन बंद केला. ' त्यांना माहीत आहे ' या विषयी तर्क करीत बसण्याशिवाय गत्यंतर नव्हते. याला सांग, त्याला सांग यात काही दिवस गेले. पण मनाची उलघाल थांबेना. यशवंतरावांनी अकृत्रिम प्रेमाने, आपुलकीने, विश्वासाने जे दिले ते इथेच थांबता कामा नये असे सतत मनात येत राहिले.

यशवंतरावांचं हे सर्व लेखन पत्ररूप आहे. त्यांनी हे लेखनमाध्यम स्वीकारलं त्याला विशिष्ट कारण आहे. त्यांनी साऱ्या जगाचा प्रवास केला पण तो एकाकी. वेणूताईंची प्रकृती दुर्बल. हजारो मैलांचा धावपळीचा प्रवास त्यांना झेपणारा नव्हता. त्या नित्य दिल्लीत, स्वगृही. यशवंतरावांना याची खंत असावयाची. ही खंत त्यांनी पत्रांतून नमूद केली आहे. एकाकीपणाची ही खंत त्यांच्या या लेखनाची प्रेरणा ठरली असावी.

संरक्षण-मंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर विदेश-दौऱ्यासाठी १९६३ साली त्यांनी भारताची हद्द प्रथम ओलांडली. १९७० ते १९७७ या कालखंडात अर्थमंत्रि, विदेशमंत्रि म्हणून त्यांचे पृथ्वीपर्यटन झाले.

हा क्रम १९७७ च्या जानेवारीनंतर थांबला. कारण त्यानंतर येथे लोकसभेची निवडणुक जाहीर झाली. त्या निवडणुकीने केंद्रातील काँग्रेसची सत्ता संपुष्टात आणली. परदेशवारीचे आता कारण उरले नाही. सर्वच थांबले. पत्रलेखनही थांबले.

जागतिक प्रवासात असतांना जे अनुभवलं ते त्यांनी लिहिलं. विशिष्ट हेतूनं लिहिलं. रोम येथून १९ जानेवारी १९७७ ला त्यांनी प्रवासातलं जे अखेरचं पत्र लिहिलं. त्यांत ते नमूद करतात की, "महत्त्वाच्या जागी काम करीत असलेल्या लोकांच्या विचारांची हे लिहितांना उजळणी होते आणि नोंदही राहते एवढाच हे सर्व लिहिण्याचा उद्देश आहे."

असे असले तरी अर्थमंत्री, विदेशमंत्री म्हणून त्यांनी स्वतंत्र भारताचे, विकसनशील भारताचे प्रवक्ते म्हणून जो तेजस्वी इतिहास घडविला त्याचे दर्शन या लेखनात घडते. आपल्या भूमिकेचे स्पष्टीकरण नमूद करून ठेवणे हा या लेखनाचा प्रधान हेतू असला पाहिजे.

तीस वर्षांहून अधिक काळ राज्यात आणि केंद्रात सत्तेच्या उच्च-स्थानी विराजमान असलेल्या या नेत्याने राजकीय क्षेत्रात काम करीत असताना आपले मनोव्यापार काय चालले आहेत या विषयीही मोकळे-पणाने एका पत्रात नमूद करून ठेवलं आहे.

प्रवास, प्रवासातील घटना, अनुभूती, नियोजित कार्य, त्यातील समस्या आणि उकल, नाना देशांत भेटलेली नाना प्रकारची, स्वभावाची माणसं, त्यांच्याशी झालेल्या चर्चा, त्याचे निष्कर्ष, जागतिक अर्थकारण, राजनीती, भारताची भूमिका हे सर्व या लेखनात समाविष्ट आहे.

त्याचबरोबर ज्या राष्ट्रांना वा शहरांना त्यांनी भेटी दिल्या तेथील इतिहास, भूगोल, ऐतिहासिक स्थानं, शिल्पकला, कलादालनं, वस्तु, संग्रहालये, प्रबोधिका, प्रशिक्षण-संस्था, शिक्षणसंस्था, संशोधन-संस्था-वैज्ञानिक संस्था, कारखानदारी, शेती, विश्वविद्यालये, सांस्कृतिक जीवन, लोकजीवन, रूढी-परंपरा, निसर्ग, वनश्री, नद्या, डोंगर, किल्ले, प्रचार-माध्यमे, भारतीयांच्या संस्था असं त्यांनी पाहिलं आणि शब्दबद्ध केलं.

विकसनशील भारताला सर्वांगिण प्रगतीचं शिखर गाठायचं असेल तर सर्वांगिण प्रगती म्हणजे नेमके काय हे उमजावं, नव्या पिढीनं याचा अभ्यास करावा, प्रगतीची पथ्ये आत्मसात करावीत हेच या सर्व नोंदींचं कारण असलं पाहिजे.

देशातील मुत्सद्दी, विचारवंत म्हणून मान्यता प्राप्त झालेल्या विचारवंत नेत्याचं अभ्यासपूर्ण, अनुभवसंपन्न असं हे विचारधन आहे.

या विचारधनाचं दर्शन घडताच ठरविलं की, माझ्यासारखे यशवंतरावांवर, त्यांच्या विचारावर, कर्तृत्वावर अलोट प्रेम करणारे या देशात हजारो चहाते आहेत. त्यांच्यापर्यंत ही भेट पोहोचली पाहिजे. स्वतंत्र भारतातील नवी पिढी, जी सक्रीय राजकारणात रस घेते आहे, घेणार आहे, त्यांच्यापर्यंत हा विचाराचा वारसा पोहोचला पाहिजे. तो पोहोचवणं माझं कर्तव्य आहे.

यशवंतरावांनी हे सर्व लिहून ठेवलं, मला भेट म्हणून दिलं हे त्यांचं मोठं ऋण. हे ऋण असं आहे की, त्यातून मुक्त होण्याचा उपाय

गवसत नाही. ऋणात निरंतरचं राहावं तर मनाची बेचैनी स्वस्थ बसू देत नाही. ग्रंथरूपानं हे सर्व साहित्य प्रकशित झाले आणि त्यांच्या हजारो चहात्यांनी ते वाचले तर मनाची बेचैनी कमी होण्याची शक्यता वाटली म्हणून यशवंतरावांच्या ‘ विदेश-दर्शन ’ या ग्रंथाचे प्रकाशन करीत आहे.

यशवंतरावांनी जे आणि जसं लिहिलं ते जसेच्या तसे प्रकाशित करीत आहे. यांतील फक्त पहिली दोन पत्रे, भारतातील, आसामच्या दौऱ्यातील आहेत. अन्य सर्व विदेश-दौऱ्यात लिहिलेली आहेत. संरक्षणमंत्री, अर्थमंत्री, विदेशमंत्री असतांना त्यांनी जे लिहिलं ते सर्व वेणूताईंना समोर ठेवून लिहिलं आहे.

तरीपण पति-पत्नीमधील पत्रव्यवहार असा केवळ व्यक्तिगत संदर्भ येथे उरलेला नाही. स्वतंत्र भारताच्या एका विशिष्ट काळातील परी-स्थितीचे, इतिहासाचे, विकसनशील राष्ट्राच्या भूमिकेचे स्पष्टीकरण यात नोंद झालेले आहे. त्याचबरोबर त्या कालखंडातील एक मुत्सद्दी, विचारवंत, साहित्यिक, असं त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं आगळं दर्शन घडतं.

अर्थमंत्री आणि विदेशमंत्री असतांना जागतिक अर्थमंत्रि-परिषदेत आणि नंतर विदेशमंत्री असताना संयुक्त राष्ट्र संघाच्या ( यूनो ) आमसभेत, जगातील ज्येष्ठ विचारवंतांच्या उपस्थितीत त्यांनी भारताची, विकसनशील राष्ट्रांची जी अभ्यासपूर्ण आणि स्पष्ट शब्दांत कैफियत सादर केली ती त्यांची दोन स्वतंत्र भाषणे या ग्रंथाच्या परिशिष्टात समाविष्ट केली आहेत. त्यातून त्यांच्या भूमिकेचं, विचारांचं दर्शन घडतं. एक भाषण १९७१ सालीच त्यांनी माझ्याकडे स्वतःच पाठविले होते. दुसरे विदेशमंत्रिपदाच्या कारकीर्दीतील आहे.

प्रवासी यशवंतरावांचे हे विचारधन प्रवास करीत वेणूताईंपर्यंत पोहोचले. पुन्हा प्रवास करीत माझ्या भेटीला आले. वाचकांच्या भेटी-साठी त्याला पुन्हा प्रवास सुरू करावा लागला आहे ! त्याचं आणि वाचकांचं मनोमीलन घडावं, प्रवास सफल संपूर्ण व्हावा हीच अपेक्षा !

शुभास्ते पंथानः सन्तु !

**– रामभाऊ जोशी**



यशवंतराव - डॉ. किसिंजर स्नेहभेट

कुवेतचे शेख शबाह अल अहमद स्वागत करताना





पश्चिम जर्मनीचे विदेश मंत्री श्री. गेनचर-चव्हाण भेट

रशियाचे डे. मिनिस्टर श्री. बोरिसोव्ह यांच्या समवेत



# दर्शन पहिले

## संरक्षणमंत्री

## (नोव्हेंबर १९६२ ते नोव्हेंबर १९६६)

## १ जोरहाट

१० नोव्हेंबर, १९६३.

प्रिय सौ. वेणूबाईस

आता रात्रीचे दहा वाजले आहेत. सबंध दिवसाचे कार्यक्रम संपवून थोड्याच वेळापूर्वी मोकळा झालो. उद्या सकाळी ७ वाजता पुन्हा प्रवास सुरू होईल.

जोरहाट हा आसामच्या पूर्वेकडील जिल्हा. हे या जिल्ह्याचे प्रमुख स्थान. ५५–६० हजार वस्तीचे गाव आहे.

ब्रह्मपुत्रेच्या दक्षिण किनाऱ्यावर पसरलेला हा जिल्हा नागा-भूमीचा शेजारी आहे. या ठिकाणी आपले वैमानिक-दलाचे एक केंद्र आहे. त्या केंद्रात मी तीन-चार तास काढले. संध्याकाळी नागरिकांची एक जाहीर सभा झाली. त्या सभेत शहर-नगरपालिकेने मानपत्र देऊन सन्मानही केला. कशासाठी कोण जाणे ?

मंत्र्यांना अजूनही मानपत्र देणारे लोक पाहिले की, मला तरी हसायला येते. पण गंभीर मुद्रा करून ते स्वीकारावे लागते. तसे ते मी स्वीकारलेही.

सकाळी दीड तासाच्या प्रवासानंतर प्रथम अलाहाबादला उतरलो. या प्रसिद्ध शहराच्या भूमीस मी तर प्रथमच स्पर्श केला. सर्व वेळ

विमानतळावर काढून तेथूनच पुढचा तीन तासांचा प्रवास करून येथे आलो. अलाहाबाद शहराचे दर्शन आकाशातूनच घेतले. पुन्हा केव्हा तरी शहर पाहण्यासाठी आले पाहिजे.

अलाहाबादच्या विमानतळावर एक फार छानदार कार्यक्रम झाला. तेथे शहरवासीयांची एक यात्राच भरली होती म्हणाना! शाळा-कॉलेजांतील विद्यार्थि-विद्यार्थिनी यांची तर झुंबडच उडाली होती.

अलाहाबाद ते जोरहाट हा प्रवास मात्र फारच सुरेख झाला. आम्ही १७ हजार फूट उंचीवरून चाललो होतो. आकाश अगदी स्वच्छ होते. ऐन दुपारची १२॥ ची वेळ. सूर्यप्रकाशाने अस्मान एकदम उजळून गेले होते. त्या वेळी उत्तरेकडे हिमालयाच्या हिमाच्छादित शिखरांची एक रांगच रांग उभी होती.

जगप्रसिद्ध सर्व उंच शिखरे कवायतीसाठी जणू काय एका ओळीने शिस्तीत उभी आहेत काय असे माझ्या मनात येऊन गेले. विशेषतः धवलगिरी, माउंट एव्हरेस्ट (गौरीशंकर) आणि कांचनगंगा यांचे स्पष्ट दर्शन झाले. विशेष म्हणजे या सर्वांचे एकसमयावच्छेदे—एका नजरेत एकदम दर्शन !

माझे मन तर फुलून गेले. हे सर्व चित्र जवळजवळ अर्धा तास एकसारखे डोळ्यांपुढे होते. हा आनंद मिळवतो म्हटले तरी पुन्हा मिळेलच असे सांगता येणार नाही.

आमचे विमान चालले होते तेथून सुमारे १००-१२५ मैलांवर ही सर्व शिखरांची रांग होती. पण दहा-वीस मैलांवर असावी इतकी ती जवळ वाटत होती.

दुरून रम्य दिसणारे हे दृश्य जवळ गेल्यानंतर किती कठोर होते याचे अनुभव तेथे प्रत्यक्ष गेलेल्यांनी जाहीर केलेलेच आहेत. ही गोष्टही मनात आल्यावाचून राहिली नाही.

या गावात सूर्य ४॥ वाजताच मावळतो. थंडी बेताचीच वाटली.

—तुझा
यशवंतराव

तेझपूर (आसाम)
सर्किटहाउस

११ नोव्हेंबर, १९६३.

हा दौरा पुरा होईतो दररोज लिहिण्याचा मानस आहे. कसे काय जमते पाहू या.

दररोज इतकी ठिकाणे पाहून होतात, इतकी वेगवेगळी माणसे भेटतात की, त्या सर्वांची एक जंत्री ठेवतो म्हटले तरी ते अवघडच. या पत्रांच्या रूपाने त्यांची जी काय अस्पष्टशी का होईना, परंतु स्मृती राहील ती सुद्धा काही कमी नाही.

आज नेफाचा पूर्वेकडील विभाग लोहित ( फ्राँटियर डिव्हिजन ) यामध्ये काही तास काढले. या नेफा-विभागाचे महत्त्वाचे चार विभाग आहेत. १ कॅमेंग, २ सुबानसिरी, ३ सियांग आणि ४ लोहित.

या चारही विभागांची नावे त्याच नावाच्या महत्त्वाच्या नद्या त्या विभागातून वाहतात त्यावरून त्यांना पडलेली आहेत. या माझ्या चार दिवसांच्या प्रवासात यांपैकी कॅमेंग आणि लोहित या दोन विभागांना मी स्पर्श करणार आहे. त्यांपैकी लोहित-विभागाला आज भेट दिली. कॅमेंगमध्ये उद्या प्रवेश करीन.

लोहित-विभागाचे कारभार-केंद्र ‘ तेजू ’ या नावाचे छोटेखानी गाव आहे. या गावाचे नाव व स्थान मी नकाशात एकसारखे पाहात होतो. त्यावरून का कोण जाणे, हे डोंगराळी मुलखातील एक स्थान अशी माझी समजूत झाली होती. आज प्रत्यक्ष गाव पाहून ती माझी गैरसमजूत होती हे स्पष्ट झाले ते बरेच झाले.

सामान्यपणे मैदानी प्रदेशावरच या गावाची बैठक आहे. हा ब्रह्मपुत्रेच्या व लोहित नदीच्या काठचा सखल प्रदेश म्हणजे वनश्रीने नटलेला आणि पाण्याच्या प्रवाहांनी वेढलेला प्रदेश आहे.

विमानातून प्रवास करताना सबंध मुलुख डोळ्यांखालून जातो आणि मग त्याचे वैभव मनावर ठसते. भारीच आकर्षक मुलुख !

एका छोटेखानी नदीच्या काठावर असलेल्या तात्पुरत्या विमानतळावर 'कॅरिबू' जातीच्या वाहतुकी विमानातून आम्ही आलो. हे ठिकाण तेजूपासून आठ मैलांवर असावे.

तेथे स्थानिक वन्य जाती-जमातींच्या स्त्रिया व पुरुष यांनी मोठ्या प्रेमाने स्वागत केले. ते आपली शस्त्रे व वाद्ये सांगाती घेऊन थाटामाटाने आले होते. स्वागतासाठी इतरही अधिकारी, विशेषतः तेथील पोलिटिकल ऑफिसर श्री. डुगल व त्यांची पत्नी सौ. डुगल होत्या.

तेजूच्या वाटेवर नवीन होणारा विमानतळ आहे. त्याची जागा आणि सुरू असलेली प्रगती पाहून आम्ही पोलिटिकल ऑफिसरच्या घरी चहासाठी पोहोचलो. चहा घेऊन जाहीर सभेच्या ठिकाणी आलो.

स्थानिक वन्य जातीचे लोक, व्यापारासाठी आलेले आसामी व इतर लोक, सरकारी नोकर वगैरे मंडळी 'प्रेक्षकां'मध्ये होती. स्थानिक जमातींतील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा एक गटही तेथे मी पाहिला.

या श्रोतृवर्गाला मी 'प्रेक्षक' हेतुपुरस्सर म्हटले आहे. ते सर्वजण पाहण्यासाठी आले होते. त्यांची भाषा मला समजत नव्हती व माझी त्यांना कळत नव्हती. त्यांच्यापैकी हिंदी समजणाऱ्या एका माणसाला मी जवळजवळ वेठीला धरून माझ्या भाषणाच्या वाक्यावाक्याचे त्यांना भाषांतर करून सांगावयास लावले. मी थोडाच वेळ बोललो पण माझे म्हणणे त्यांच्या भाषेत त्यांच्यापर्यंत पोहोचल्याचे मला समाधान झाले.

या सभेनंतर निर्वासित तिबेटी लोकांचे वसलेले एक गाव जवळच आहे, त्या गावी आम्ही गेलो. हे एक छोटेखानी गाव. पुरुष, स्त्रिया व मुले सर्वजणच रस्त्यावर उभे होते. अतिथीच्या सत्कारातील या लोकांची भाविकता पाहिली म्हणजे त्यांच्या आणि आपल्या परंपरा एकच आहेत असा प्रत्यय येतो.

प्रथमतः त्यांची जी गुंफा – म्हणजे बुद्धधर्मीयांचे प्रार्थनामंदिर – असते तेथे सर्व गुंफानिवासी पाहुण्यांना घेऊन जातात. आशीर्वाद देतात व मग बाकीचे कार्यक्रम !

मुला-मुलींचे तिबेटी नाच, गाणी ऐकून तिबेटी लोकजीवनाची एक छटा समजली. हे लोक दलाई लामा यांच्याबरोबर अनंत अडचणी सोसून हिंदुस्थानात आले आहेत.

बर्फाच्या प्रदेशातून प्रवास करीत असताना त्यांच्यापैकी शेकडो लोक थंडी, वारा, भूक व आजार यांना बळी पडले. परंतु त्यांची श्रद्धा अपार आहे.

या देशात आले आहेत खरे, परंतु आपला दलाई लामा परत तिबेटमध्ये जाणार आणि मग त्याच्या बरोबर आपणही जाणार अशी निष्ठा ते मनात बाळगून आहेत. तो दिवस लवकरच म्हणजे दोन वर्षांतच उगवणार आहे असेही ते मानतात म्हणे !

श्रद्धा ठीक आहे. पण हे घडणार कसे ? चीनमधील कम्युनिस्ट राजवटीची उलथापालथ केल्याशिवाय हे कसे शक्य आहे ? हा राजकीय प्रश्न आहे व त्याचे उत्तरही राजकीय असले पाहिजे हा तर्कवाद मी त्यांच्याशी घातला नाही. श्रद्धा म्हणजे श्रद्धा ! तर्काची खटखट त्या क्षेत्रात कशाला ?

तेजू सोडून 'कॅरिबू'मधून आम्ही लोहित नदीच्या काठाने, डोंगराळ भागात प्रवेश करून लोहितच्या खोऱ्यातून १५ मिनिटे प्रवास केला. हियूलँग हे ठिकाण मला पहावयाचे होते. ते पाहून परत फिरलो. वेगवेगळे विमानतळ पहात प्रवास करीत होतो. ४ वाजता तेझपूरला येऊन पोहोचलो. तेथे तास-दीडतास ले. जनरल माणेकशाशी चर्चा करून तेझपूरच्या जाहीर सभेस गेलो.

खूपच मोठी सभा होती. गेल्या डिसेंबरमध्ये पहिल्या प्रथम या गावी मी पंतप्रधानांच्या बरोबर आलो होतो. त्या वेळी येथेच भरलेल्या सभेमध्ये मी प्रथम बोललो होतो. त्याची आठवण झाली. ती आठवण मी माझ्या भाषणात लोकांनाही करून दिली.

गेल्या वर्षीची आठवण या गावाला विशेष आहे. त्या वेळची धावपळ व गडबड यांची आठवण झाली म्हणजे अजूनही मन शरमून जाते.

तेझपूरच्या लोकांनीही, जोरहाटच्या लोकांप्रमाणे मला एक मानपत्र दिले. मात्र त्यांनी या मानपत्राचा उपयोग आपल्या मागण्या मांडण्यासाठी मोठ्या खुबीने केला.

सभा संपवून मी छानदार स्नान केले. एअरफोर्सच्या मेस-मध्ये जेवण केले आणि सर्किट-हाउसवर (घरी) येऊन लिहीत बसलो.

सगळ्या दिवसाचा हिशोब लिहिला. शिलकेच्या बाजूला आता फक्त झोप बाकी आहे. Good night !

*

## ३ लंडन

१३ नोव्हेंबर, १९६४

मुंबईहून निघाल्यानंतर जवळ जवळ साडेचौदा ते पंधरा तासांनी लंडनला पोहोचलो. मुंबईचे दुसऱ्या दिवसाचे ३॥ वाजले होते तेव्हा आम्ही लंडन-विमानतळावर पोहोचलो.

बहरिन, कैरो, रोम, पॅरिस, लंडन असा हा प्रवास झाला. ही सर्व्हिस फार स्टेशने घेत घेत पोहोचते व त्यामुळे काहीसा कंटाळवाणा प्रवास शेवटी शेवटी वाटू लागतो.

सर्व विमानतळ सारखे दिसू लागतात. जसे लांबच्या रेल्वे-प्रवासात सर्वच मोठ्या स्टेशनांवरील वातावरण एकसारखे वाटू लागते तसे. मोठ्या शहरांची फक्त नावे ऐकावयाची.

डॉ. जिवराजभाई मेहता, सौ. हंसा मेहता यांनी तुला घेऊन मी का आलो नाही असा घरी पोहोचताच मोठा अवघड प्रश्न विचारला.

हवामानाच्या दृष्टीने नोव्हेंबर महिना येथे बराच गैरसोयीचा आहे. घरामध्ये असताना खिडक्या दारे बंद करून गरम हवेची व्यवस्था

करतात. घराच्या बाहेर पाऊल ठेवताच झोंबणारे गार वारे व थंडी जीव घाबरवून टाकतात.

गेले दोन दिवस सरकारी गाठी-भेटीत आणि चर्चेत गेले. नवीन (मजूरपक्षाचे) मंत्रिमंडळ उत्साहाने व जोमाने त्यांच्या कठीण प्रश्नांना तोंड देण्याचे कार्य करण्यात गुंतून गेले आहे.

मी ज्या दिवशी पोहोचलो त्याच दिवशी त्यांनी अपूर्व पद्धतीने नव्या करांची घोषणा करणारे बजेट मांडले. सर्व इंग्लंड त्याच गोष्टीची चर्चा करण्यात मश्गुल आहे.

इंग्लंडचे नवे मुख्य प्रधान श्री. विल्सन यांनी लोकमतावर चांगलाच प्रभाव पाडला आहे. स्वतःसंबंधी खूपच नव्या अपेक्षा निर्माण केल्या आहेत.

या मंत्रिमंडळातील प्रमुख लोकांना मी गेल्या दोन दिवसांत भेटलो. मुख्य प्रधानांना आज भेटणार आहे. हिंदुस्थानसंबंधी मैत्रीचे भाव त्यांच्या बोलण्या-वागण्यात दिसून येतात; परंतु प्रत्यक्ष विशेष असे काही ते करतील असा विश्वास मात्र माझ्या मनात अजून त्यांनी निर्माण केलेला नाही.

मजूरपक्षीय असो वा हुजूरपक्षीय असो, पूर्वीच्या काळी ते हिंदुस्थानचे स्वामी होते ही भावना संपूर्णपणे अजून ते विसरू शकत नाहीत असे निदान मला तरी भासले. पाहूया ! अजून एक आठवडाभर प्रयत्न करावयाचे आहेत. एकदम मत बनविणेही बरोबर होणार नाही.

प्रकृती बरी आहे. औषधे नियमाने घेत असतो. डॉ. जिवराजभाई लहान सहान गोष्टीतही माझी जातीने काळजी घेत असतात. त्यांच्या वागण्यातला जिव्हाळा हृदयस्पर्शी आहे.

काल रात्री लंडनच्या एका प्रसिद्ध थिएटरमध्ये ' स्वानलेक ' हा प्रसिद्ध रशियन बॅले पाहिला. रशियात असताना ॲस्ट्राखानच्या गेस्ट-हाउसमध्ये या बॅलेची आपण फिल्म पाहिली होती. मला आठवते, तू मॉस्कोहून येताना या बॅलेच्या संगीताच्या रेकॉर्डस् मुद्दाम खरेदी केल्या आहेस.

रशियात असताना जे पाहू शकलो नाही ते लंडनमध्ये पाहू शकलो. कार्यक्रम फारच उत्कृष्ट झाला.

तुम्हा सर्वांची प्रकृती चांगली असेल असा विश्वास आहे. तीर्थरूप आईस स. नमस्कार.

मी निघण्याचे वेळी तू बरीचशी नाराज होतीस. आता कसा आहे mood ?

※

## ४ लंडन

१५ नोव्हेंबर, १९६४.

दोन दिवस लंडनच्या बाहेर प्रवास करीत होतो. काल सकाळी लंडन-टॉवर पाहण्यासाठी गेलो होतो.

हे लंडन-टॉवर म्हणजे इतिहासकाळी लंडनच्या राजे लोकांचे एका अर्थाने 'क्रेमलिन' होते म्हटले तरी चालेल. एक ऐतिहासिक वास्तू म्हणून तर याला महत्त्व आहेच, पण आजकाल तेथे राजघराण्याशी संबंध असलेल्या अनेक वस्तूंचे संग्रहालयही आहे.

मी विशेष लक्ष देऊन पाहण्याचा प्रयत्न केला म्हणजे तेथे असलेले विविध राजमुकुट. राज्ञीमाता एलिझाबेथच्या मुकुटामध्ये असलेला कोहिनूर हिरा मी पाहिला.

भारतामधून नेलेल्या या हिऱ्यासंबंधी अनेक कथा आपण ऐकत असतो. तो पहावा अशी साहजिकच इच्छा होती.

राज्यकर्त्या राज्ञीच्या मुकुटामध्ये हा हिरा का नाही असा प्रश्न मी येथील प्रमुखांना विचारला. तेव्हा अनेक मोंगल बादशहांच्या जीवनांत हा हिरा अपयशी ठरला आहे तेव्हा तो राज्यकर्त्या राजाच्या वा राज्ञीच्या मुकुटामध्ये वापरू नये अशी येथे भावना आहे.

मी त्यांना विचारले की, ‘ आपण हा हिरा अपयशी मानता तर तो भारताचा भारताला परत का करीत नाही ?’

स्ट्रॅटफर्ड हे, महाकवी व नाटककार शेक्सपियरचे जन्मगाव आहे. तेथे जाण्यासाठी काल दुपारी निघालो. लंडनपासून शंभर मैलांवर हे गाव असावे. २५ हजार वस्तीचे गाव. परंतु तेथे सर्व आधुनिक जीवनाची साधने विपुलतेने आहेत. रात्री Richard III हे ऐतिहासिक नाटक तेथे मुद्दाम बांधलेल्या थिएटरमध्ये पाहिले. अप्रतिम प्रयोग झाला.

रात्री तेथे मुक्काम करून सकाळी स्ट्रॅटफर्ड upon-Avon हून ऑक्स्फर्डला आलो. वाटेत मार्लबरो पार्क व पॅलेस पाहिले.

ऑक्स्फर्डच्या तीन कॉलेजेस्च्या आवारात जाऊन हिंडून फिरून आलो. दुपारचे जेवण ‘ ख्रिस्त-चर्च ’ कॉलेजच्या डीनबरोबर घेतले. या जगप्रसिद्ध विश्वविद्यालयाच्या वातावरणात थोडा वेळ तरी घालविता आला याचे समाधान आहे. संध्याकाळी चार वाजता परत आलो आणि लिहिण्यासाठी बसलो.

शनिवार व रविवार हे दोन दिवस येथे संपूर्ण सुट्टी असते. सर्व जण आपापल्या घरकुलात रममाण होतात. खऱ्या अर्थाने साप्ताहिक विश्रांती घेतात.

संध्याकाळी महाराष्ट्र-समाजात जाणार आहे. रात्री रेल्वेने न्यू कॅसलचा प्रवास करावयाचा आहे. दिल्लीला परतण्यासाठी एअर-इंडियाचे विमान येथून सरळ दिल्लीला जाणार आहे हे ऐकून तर मी चकितच झालो आहे. निश्चित माहिती मिळताच तारेने माझा कार्यक्रम कळवीन. तीर्थरूप आईस नमस्कार.

६ जानेवारी, १९६६

गेले दोन दिवस नित्याप्रमाणे नवीन वातावरणाशी समरस होण्याच्या प्रयत्नात गेले. चर्चा, संमेलने चालूच होती. परंतु त्यांचे बरेच स्वरूप औपचारिक होते.

काल दुपारपासून मूळ मुद्यांना हात घातला गेला आहे. आज आणि उद्या हे या चर्चेतील महत्त्वाचे दिवस आहेत.

प्रेसिडेंट आयूब आणि भूत्तो या दोन्ही व्यक्तींना मी प्रथमच भेटलो. प्रे. आयूबला व्यक्तिमत्व आहे. उंचापुरा पठाण. चेहेऱ्यावर नाटकी हास्य भरपूर. बोलणेही अघळपघळ आणि गोड. माणूस प्रामाणिक नाही वाटत. चलाख वाटतो. त्याच्या शब्दांवर भरवसा ठेवणे अवघड आहे – नव्हे धोक्याचे आहे !

भूत्तोशी काही बोलण्याचा प्रसंग आलेला नव्हता. पहिले दोन दिवस थंड बसून होता. काल दुपारी पहिला सामना झाला. बोलण्यावागण्यात करेक्ट होता. आपले म्हणणे स्पष्ट शब्दांत, काही आडपडदा न ठेवता त्याने मांडले.

पाकिस्तानचे विचार आणि हेतू समजण्यासाठी भूत्तोचे शब्द आणि विचार हेच आम्हाला मार्गदर्शक व उपयोगी ठरतील. प्रे. आयूबच्या insincere शब्दांवर अधिक भरवसा ठेवता येणार नाही.

चेअरमन कोसिजिन किती प्रमाणात स्पष्ट भूमिका घेतील याच्यावर आता या बैठकीचे भविष्य आहे असे माझे मत आहे. पाहू या !

आमचा प्रवास तसा सुखकर झाला. बरोबर ९–४५ ला ( भारत टाइम ) निघालो आणि ४–४५ ला ( ताश्कंद टाइम ) पोहोचलो.

बडोद्यावरून विमान किनाऱ्याकडे वळले. समुद्रावर आल्यावर मात्र विमानाने इतकी आदळ-आपट केली की काही सोय नव्हती ! आकाश निरभ्र होते, वादळ नव्हते आणि विमान तर इतके हलले की विचारू नये ! मला तर नवल वाटत होते.

पायलटला विचारता त्याने सांगितले की, उत्तरेकडील थंड वारे गुजरातच्या गरमशा वाऱ्यात जेथे मिळतात तेथे कदाचित भोवरे निर्माण झाले असतील ! मी मात्र पट्टा बांधून झोपी गेलो. आणि त्याने जेव्हा इराणचे आखात आले म्हणून सांगितले तेव्हा डोळे उघडून बाहेर पाहिले.

सौदी अरेबियाची भूमी पाठीमागे टाकून आखातावरून विमान समोर दिसणाऱ्या इराणच्या किनाऱ्याकडे धावत होते. पाकिस्तानला जोडून असणाऱ्या इराणच्या प्रदेशावरून आम्ही जाणार होतो. हा सर्व प्रदेश म्हणजे एक अफाट पसरलेली मरुभूमी आहे. ना गाव ना वस्ती. पाणीसुद्धा कोठे दिसले नाही.

अफगाणिस्तानच्या प्रदेशात प्रवेश केल्यानंतर मात्र डोंगरी मुलूख, बर्फाच्छादित छोटी छोटी शिखरे, यांचे दर्शन झाले. कंदाहारवरून काबूलवर विमान आले. सुरेख पहाडी प्रदेश वाटला. अर्ध्या तासानंतर सोव्हिएट भूमीवर आलो.

प्रथमतः डोंगर व निर्जनसा भाग लागतो. मग हळूहळू छोट्या-छोट्या वस्त्या व औद्योगिक विकासाचे दर्शन होऊ लागते. व्यवस्थित मशागत केलेले शेतजमीनीचे मोठमोठे पट्टे व त्यात पसरलेले कालव्यांचे जाळे यांचे दर्शन घडताच सामूहिक शेतीच्या सोव्हिएट भूमीवर आल्याची खात्री पटते.

उझबेकिस्तान हे घटक राज्य आणि ताश्कंद ही त्याची राजधानी. मूळ मुसलमानी प्रदेश व संस्कृती. मध्य आशियाचे, ही भूमी केंद्रस्थान. आज येथे शेती व शेतीवर आधारलेले, शेतीसाठी आवश्यक असलेले उद्योगधंदे यावर अधिक भर आहे.

कापूस मोठ्या प्रमाणात पिकतो. कापडाच्या गिरण्या आणि त्यांची यंत्रसामुग्री तयार करणारे कारखाने येथे भरपूर आहेत. पाऊस तसा फारच कमी पडतो. परंतु बर्फातून तयार होणाऱ्या नद्या आणि ओहोळ यांचे मोठे तलाव तयार करून त्यावर बागायती शेती करतात.

या शहरात तसे पाहण्यासारखे काही नाही. ऐतिहासिक इमारती वगैरे फारसे नाहीत म्हणतात. शहर तसे प्राचीन आहे. २००० वर्षांचा इतिहास आहे. परंतु पूर्वीच्या काळी कधी राजधानी होण्याचा मान न मिळाल्यामुळे त्या तऱ्हेचे अवशेष नाहीत. आज तसे मोठे शहर आहे. १२-१३ लाखांची वस्ती आहे. सर्वच मुसलमान नाहीत. बरेच गोरे रशियन येथे आहेत.

काल रात्री एक ऑपेरा पाहण्यासाठी गेलो होतो. उझबेकी भाषेतील ऐतिहासिक प्रेमकथेवर आधारलेले हे नाटच भव्य होते. संगीत उत्तम होते. परंतु Dilorom चे काम करणारी गायिका इतकी जाडजूड होती की तिला सुंदर कसे म्हणावे हेच समजत नव्हते. तास-दीड तास होतो, नंतर निघून आलो.

मार्शल मॉलिनोव्हस्की येथे आले आहेत. काल तासभर त्यांना भेटलो. मॅडम मॉलिनोव्हस्की तुझी आठवण काढतात असे त्यांनी मला अगत्यपूर्वक सांगितले. तेव्हा खरेच बरे वाटले. मीसुद्धा त्यांना आम्हाला आमच्या रशियन भेटींची नित्य आठवण येते, असे सांगून तुझे नमस्कार त्यांच्या पत्नीला कळवण्यास सांगितले.

आज काय घडते त्यावर या भेटीचे भवितव्य ! आम्ही बहुधा ११ किंवा १२ तारखेस येऊ.

भीती घातली होती तशी थंडी येथे नाही. तूर्त तरी नाही. सेंट्रल हीटिंग असल्यामुळे घरे गरम आहेत. माझी तब्येत उत्तम आहे. प्रकृती कशी आहे ? काळजी घे.

*

# दर्शन दुसरे

# अर्थमंत्री

## ( जून १९७० ते ऑक्टोबर १९७४ )

## ६ निकोसिया-सायप्रस

१६ सप्टेंबर, १९७०

आता निकोसियामध्ये ५-४५ वाजलेत. म्हणजे मुंबईचे १६ तारखेचे रात्रीचे ९-१५ वाजले असतील.

काल दुपारी बेरुतमध्ये पोहोचलो. पाच एक तास तेथील एका हॉटेलमध्ये काढले. समुद्रकिनाऱ्यावर असलेले एक आधुनिक थाटाचे राजधानीचे शहर आहे ( लेबनॉन ). येथील राजभाषा अरबी आहे.

किनाऱ्यालगतची घरे सोडली तर इतर सर्व शहर वेगवेगळ्या टेकड्यांवर वसलेले आहे. मी या शहरातून एक तासभर मोटारीतून भटकून आलो. मलबारहिलच्या बाजूला हिंडताना जसे दिसते वा भासते तसाच काहीसा अनुभव येतो. उन्हाळी हवा मुंबईसारखी आहे. परंतु या हवेत या छोटेखानी देशातील श्रीमंत लोक व इतर धनिक देशांतील धनवान प्रवासी येथें चैनीसाठी येतात.

विमाने पळविण्याच्या नव्या तंत्राने वातावरण बरेच अस्वस्थ दिसले. प्रवाशांच्या आवश्यक त्या झडत्या घेताना दिसले. अर्थातच आम्हाला या दिव्यातून जावे लागले नाही हे वेगळे. बेरुत ते निकोसिया या प्रवासात मात्र आमच्या छोट्या बॅग्सही आमच्याजवळ ठेवू दिल्या नाहीत. कारण अशा बॅग्समधून विमानपळवे आपली हत्यारे ठेवीत असतात. आमच्या बाबतीतही ही काळजी घेतली ही मात्र विनोदी बाब होती असे वाटले.

खरा विनोद तर पुढेच होता. विमान निकोसियाच्या विमानतळावर उतरण्यापूर्वी विमान-सुंदरीने आपल्या नाजुक आवाजात ज्या सूचना दिल्या त्यामध्ये तिने आम्हाला आवर्जून सांगितले की तुमच्या हॅण्डबॅग्स हातात घेऊन तयार व्हा ! पण त्या होत्या कोठे आमच्याजवळ ? सगळीकडे त्यामुळे हास्याची चांगलीच खसखस पिकली.

लेबनॉनमध्ये एक अजब गोष्ट ऐकली. हल्ली तेथे सरकारच नाही. परंतु राज्यकारभार मात्र चालू आहे. तेथील पंतप्रधान आणि त्यांचे सहकारी मंत्र्यांनी सात महिन्यांपूर्वीच राजिनामे दिले आहेत. प्रेसिडेंटने ते स्वीकारले नाहीत आणि मंत्रिमंडळाचे सभासद कचेरीत जात नाहीत, किंवा कोणत्याच कागदपत्रावर सह्या करीत नाहीत. मोठी विलक्षण परिस्थिती आहे.

काल संध्याकाळी ६॥ वाजता या शहरातील ' Ledra Palace ' या हॉटेलमध्ये पोहोचलो. उत्तम व्यवस्था आहे. वेळातील अंतरामुळे सर्वच गोंधळ होतो आहे. मात्र काल रात्री भरपूर झोप काढली, त्यामुळे आज मी प्रसन्न आहे.

सकाळी दोन-तीन तास मोटारीतून प्रवास करून ३०-४० मैलांवर असलेला ( समुद्रकिनाऱ्यावरील ) एक पुराणा जलदुर्ग पाहून आलो. या बेटावर जी थोडीफार बरी शेती आहे ती बहुधा उत्तरेला असलेले डोंगर आणि समुद्र यांच्यामधील छोटेखानी पट्ट्यामध्ये आहे. उत्तर किनाऱ्यापासून तुर्कस्तान फक्त ४० मैल दूर आहे. सकाळच्या धूसर सूर्यप्रकाशात तुर्कस्तानच्या पर्वतराजीचे आकार अस्पष्टपणे का होईना दृष्टिमान होत होते.

या बेटावर ६-६॥ लाख वस्ती आहे. त्यातील १८ ते २० टक्के तुर्क लोक आहेत आणि इतर ८० टक्के ग्रीक लोक आहेत. त्यांचा परंपरागत लढा चालू आहे. संबंध बेबनावाचे आहेत. तुर्क, बेटाची विभागणी मागत आहेत. जहाल ग्रीक, येथून ५०० मैल दूर असलेल्या ग्रीसमध्ये सामील होण्याची आकांक्षा धरून आहेत. हल्लीचे सरकार मात्र या दोन्ही मागण्या गैर आहेत असे मानणारे असून यू. एन्. च्या शांति-सैन्याच्या मदतीने शांतता राखून आहेत.

सकाळी समुद्रकिनाऱ्यावरून परत येताना तुर्क लोकांच्या विभागातून आम्ही परतलो. आमच्या गाडीचा ड्रायव्हर म्हणाला की, तुमच्या निशाणामुळे मी प्रथमच बऱ्याच वर्षांनी या विभागात येऊ शकलो. या छोट्या ( किंवा या भागातील बड्या म्हणा हवे तर ) बेटावरील छोटी वस्ती मनाने अशी कडवट झाली आहे की, एकमेकांच्या विभागात जाणे-येणे बंद आहे.

दुपारी या राज्याच्या राष्ट्रपतींच्या राजवाड्यात जेवण झाले. फक्त भारताच्याच प्रतिनिधींना त्यांनी बोलाविले होते. हे राष्ट्रपति पेशाने धर्मगुरु आहेत. ते नित्य राहतात आपल्या धर्मनिवासामध्ये. मात्र सरकारी कामासाठी या राजवाड्यात दररोज जातात.

१९६२ मध्ये मी दिल्लीला जाण्यापूर्वी ते मुंबईला राष्ट्रपति या नात्याने, सरकारी पाहुणे म्हणून आले होते. त्याची जुनी आठवण त्यांनी काढली. माझे दिल्लीस जाण्याचे तेव्हा जाहीर झाले होते त्याचीहि त्यांनी आठवण दिली.

उद्यापासून दोन दिवसांची परिषद सुरू होणार. परिषदेचे कागदपत्र पाहण्यात आज बराच वेळ गेला. कोपनहेगनला पोहोचल्यानंतर पुढचे लिहिणार आहे.

*

## ७ कोपनहेगन

२० सप्टेंबर १९७०

कोपनहेगन येथे काल संध्याकाळी येऊन पोहोचलो. जागतिक बँकेच्या वार्षिक सभेस उद्या सकाळी सुरुवात होईल.

सभेस डेन्मार्कचा राजा हजर राहणार आहे. बहुधा औपचारिक स्वागत वा उद्घाटन असे ते काही करतील. त्यानंतर बँकेचे अध्यक्ष

श्री. मॅक्‌नामारा यांचे व फंडाचे मॅनेजिंग डायरेक्टर, अशी महत्त्वाची भाषणे होतील. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून इतर गव्हर्नरांची भाषणे होतील. मी बहुधा दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवारी बोलेन.

खरे म्हणजे बँकेच्या हजेरीचे महत्त्वाचे काम आम्ही आजच उरकून घेतले. भारताच्या प्रश्नांची चर्चा करून, पुढील कार्यक्रमातील अडचणी मांडून अंदाज घेणे हा महत्त्वाचा उद्देश असतो.

श्री. मॅक्नामाराशी तीन ते चार भेटून आलो. श्री. आय्. जी. पटेल आणि श्री. एस्. जगन्नाथनहि बरोबर होते. श्री. मॅक्नामारास मी दोन वर्षांखाली श्री. मोरारजीभाईंच्या घरी औपचारिक भेटलो होतो. परंतु त्यांची माझी खरी भेट ते यू. एस्. ए. चे संरक्षणमंत्रि असताना, जेव्हा १९६४ च्या मे महिन्यात गेलो होतो, तेव्हा झाली होती. आज त्यांनी त्या भेटीची आठवण दिली. सहा वर्षांत ते बरेच वृद्ध झाल्यासारखे भासले. कदाचित् अधिक सफेत केसांमुळे मीहि त्यांना तसाच भासलो असेन.

निकोसियाची कॉमनवेल्थ अर्थमंत्र्यांची परिषद बऱ्याच अर्थांनी उपयुक्त झाली. माझा हा पहिलाच अनुभव होता. गेली काही वर्षे हजर राहिलेले इतर देशांचे अर्थमंत्रीहि असेच म्हणत होते. या परिषदेत औपचारिक ठराव होत नाहीत. परंतु आशिया आणि आफ्रिका व इतर अविकसित देशांच्या प्रश्नांच्या संदर्भात बरीच महत्त्वाची चर्चा झाली.

ही परिषद म्हणजे एका अर्थाने अठरा धान्यांचे कडबोळे आहे. परंतु खऱ्या अर्थाने जागतिक परिषद अशीच आहे. जागतिक परिषदेत मांडण्यासाठी काही एकमत होते का असा पाहण्याचा हेतू असतो. तो फारसा साधला जात नाही. परंतु दृष्टिकोन समजण्यास मदत होते. अनौपचारिक चर्चा होतात. वैयक्तिक ओळखी होतात. मैत्रीचे लागेबांधे जमण्यास मदत होते.

आशिया व आफ्रिकेतील राष्ट्रांचे मूलत: प्रश्न सारखेच आहेत. त्यामुळे मन त्यांच्यासाठी ओढत असते. परंतु प्रश्नांमध्ये फरकहि तितकाच असल्यामुळे संपूर्ण मनजुळणी होऊ शकत नाही असे मला वाटले.

सधन गोरे देश न सांगता एकमेकांजवळ खेचले जातात. एकमेकांची बाजू घेतात. मदत करीत असतात. हे दोन्ही गट अगदी उघड स्पष्ट होतात. आम्ही बाकीच्या लोकांची बाजू घेत होतो. त्यांचे प्रश्न आमचे मानीत होतो. परंतु इतके करूनही काही अंतर राहातच होते आणि ते स्वाभाविक आहे. आमचा विशाल आकार, प्रचंड लोकसंख्या, असीमित अशी potential साधने यामुळे काही फरक जाणवतो हे मात्र खरे. हळूहळू राजकीय क्षेत्रातही याचे काही पडसाद भविष्यात उठण्याची अशक्यता नाही. या बाबतीत अधिक सखोल विचार व योजना करण्याची जरूरी आहे यात शंका नाही.

निकोसियाच्या तीन दिवसांच्या वास्तव्यात तीन चार ठिकाणी बाहेर जाऊन आलो. ही तिन्ही ठिकाणे समुद्र किनाऱ्यावर तीन दिशांना आहेत. त्यांचे त्यांचे ऐतिहासिक असे आपले स्थान आहे.

या देशात चारही बाजूला समुद्र आहे. परंतु पाऊस मात्र फारच कमी आहे. अधिकात अधिक पाऊस १५ इंच एवढाच पडतो. त्यामुळे दुपारी उन्हाळा चांगलाच जाणवला.

लिमासोल हे बंदर दक्षिण किनाऱ्यावर आहे. येथे ब्रिटिशांचा आरमारी तळ आहे (Base). अजूनही १२००० ब्रिटिश लोक येथे राहतात. स्वातंत्र्यलढ्याच्या काळची कटुता राहिलेली नाही असे येथील लोक सांगत होते.

लिमासोल येथे आम्ही गेलो त्या रात्री 'मदिरोत्सव' चालू होता. आपल्या देशात अशा उत्सवाचे नावही काढले तर केवढे मोठाले डोळे होतील नाही!

परंतु येथे सर्व थरांचे लोक, अधिकारी, तरुण स्त्री-पुरुष सामील होऊन मुक्तकंठ पीत होते. हा उत्सव सायप्रसमध्ये प्रत्येक सप्टेंबरमध्ये १२ ते २० साजरा होतो. ही ग्रीक परंपरा आहे म्हणतात. सर्वांना मुक्तहस्ते मदिरादान केले जात होते. हसत खेळत हिंडतांना प्रौढ दांपत्येहि दिसली. तरुणांची तर आज पौर्णिमाच होती म्हटले तरी चालेल. रंगेलपणा उसळून आला होता. हातात हात घालून युवक फेऱ्या

मारीत होते, गळ्यात गळा घालून नाचत होते. हास्याची व आनंदाची लयलूट चालली होती. त्यात काहीही अश्लीलता दिसली नाही. यात मोकळेपणा होता. निरागसताहि. अशा मदिरोत्सवाचे चांदण्या रात्रीस "यौवन पौर्णिमा" म्हणू नये तर काय म्हणावे !

वेळ होता तो संपला. उद्या पुन्हा लिहीन.

*

## ८ कोपनहेगन

२४ सप्टेंबर, १९७०

कालचं लिहिणं अपुरंच राहिलं. सायप्रसच्या प्रवासातील काही गोष्टी सांगत होतो. लिमासोलच्या भेटीआधी एका सकाळी उत्तर दिशेला असलेल्या कायरेनिया (Kyrenia) या बंदराचे ठिकाणी गेलो होतो.

तेथे (St. Hilarion Castle) या नावाचा जुनापुराणा किल्ला आहे. सिंधुदुर्गासारखा. कित्येक शतके तो तेथे आहे. अधूनमधून पडत राहिला; पुन्हा पुन्हा दुरुस्तही होत आला. अशी ही वास्तू आहे.

गेल्या एक दोन वर्षांखाली येथल्या एका नाविकाने किनाऱ्यापासून थोडे आत बुडालेले एक जुने छोटेखानी जहाज काढले व त्याचे काही भाग प्रदर्शन म्हणून किल्ल्यात ठेवले आहेत. या जहाजाच्यां लाकडी पट्ट्या व त्यांत सापडलेल्या इतर वस्तूंच्या संशोधकीय परीक्षणानंतर असे दिसून आले की, ते जहाज २००० ते २१०० वर्षांपूर्वी अपघाताने तेथे बुडाले असावे.

छोट्या जहाजांतून समुद्रमार्गे युरोपमधून इजिप्त वगैरे देशांशी जो व्यापार चाले त्या मार्गावर सायप्रस असल्यामुळे त्याला अतिशय महत्त्व होते. त्यामुळे त्याचे राजकीय महत्त्वही वाढत गेले. गेल्या तीन

हजार वर्षांत या बेटाची कितीतरी स्थित्यंतरे वा हस्तांतरे झाली; प्रभुत्व गाजविणाऱ्या स्वामींची एका पाठोपाठ एक रांगच आहे. आज सुद्धा हे छोटे बेट बिनापाण्याचे व आधुनिक उद्योगधंद्याविना एक महत्त्वाचे स्वतंत्र राष्ट्र म्हणून वावरत आहे.

कोपनहेगनला जाण्यापूर्वी १९ सप्टेंबरला तीन–चार तासांची एक सहल केली, ती पूर्व दिशेला असलेले काही जुने अवशेष (Ruins) पाहण्यासाठी ! Salamis हे ख्रिस्तकालापूर्वीचे राजधानीचे शहर होते. आज फक्त त्याचे काही भग्न अवशेष आहेत. जुन्या ग्रीककालीन संस्कृतीचे महत्त्वाचे पुरावे आहेत हे.

जुने प्रेक्षकालय वा नाट्यमंदिर कसे होते त्याची संपूर्ण कल्पना यावी अशी एक वास्तू तेथे पडिक अवस्थेत आहे. आजकालच्या स्टेडियम-सारखी त्याची रचना आहे. राजवाड्यातील स्नानगृहाची विशेष कल्पकतापूर्ण अशी रचना आहे.

एका स्नानगृहात ब्रह्मा, विष्णू, महेश या भारतील प्रतिकांसारख्या ग्रीक प्रतिकांच्या मूर्ती आहेत. संगमरवरी मूर्ति इतक्या कलापूर्ण आहेत की बघत रहावं ! पण त्यांत एकच मोठी उणीव आहे व ती म्हणजे त्या सर्व मूर्ति शिरविरहित आहेत !

आम्ही चौकशी केली तेव्हा समजले की, ख्रिश्चन धर्माची पहिली लाट आली तेव्हा काही आक्रमक धर्मवेड्यांनी ती शिरे तोडून फोडून टाकली आहेत !

मला आजपर्यंत वाटत होते की असले विध्वंसक धर्मवेड फक्त इस्लामच्या आक्रमणामध्येच होते. परंतु ख्रिश्चनही काही अपवाद नव्हते असे दिसते. मला वाटते मध्यपूर्वेतील हा व आसपासचा अरब भूखंड व त्यातील मानवसमूह अधिकच आक्रमक व कडवट (fanatic) होता. येथेच आजचे शक्तिशाली दोन धर्म (ख्रिश्चॅनिटी व इस्लाम) अंकुरले. ज्यूंचे मूळ स्थानही येथेच. युरोप व आशिया या दोन प्रचंड भूभागांतील मानवसमाजाच्या शेकडो वर्षांच्या इतिहासावर या छोट्या भूखंडातील लोकजीवनाचे विलक्षण परिणाम झालेले आहेत.

सलामीज नंतर फामागुस्ता या बंदरावर आमचा मोर्चा वळला. हेही फार जुने शहर आहे. ग्रीक व तुर्क यांच्या संघर्षाचे प्रतिबिंब येथील लोकजीवनात स्पष्ट दिसून येते. व्यापार, राहणी व एकंदर शहरातील वातावरण, यावरून ग्रीक वस्ती आधुनिक वाटते. तटबंदीच्या आत असलेल्या जुन्या शहरात मात्र एकदम वेगळेपण जाणवते. आधुनिकतेचा काहीसा स्पर्श आहे, नाही असे नाही, परंतु फरक मात्र लक्षात येण्यासारखा आहे.

दोन्ही शहरांतून आम्ही भटकलो. तुर्की विभागात ६०० वर्षांपूर्वीचे एक जुने चर्च आहे. तुर्कांच्या आक्रमणानंतर ते चर्च मसजिद म्हणून वापरले जात आहे. आतबाहेर सगळी बांधणी चर्चचीच आहे. एका कोपऱ्यावर मात्र एक मिनार चढविला आहे.

नव्या धर्मवेड्यांनी जुन्या धर्मप्रतिकांवर विध्वंसक हल्ले करावेत असा जणू काय नियमच होता. आमच्याबरोबर एक प्रौढ ग्रीक स्त्री मार्गदर्शक म्हणून होती. ती म्हणाली, " धर्माच्या नावाखाली किती शतकापासून मानव अत्याचार सहन करीत आहे ! त्याचे दुःख अजून संपलेले नाही. "

आजच्या मानवाची करुण कहाणीच तिच्या वाणीतून जणू बाहेर पडली.

आणि शेवटी पाहिली या बंदराची समुद्रकाठची तटबंदी !

याला Othello Tower असं म्हणतात. शेक्सपिअरच्या ' ऑथेल्लो ' नाटकाची कहाणी येथे घडली आहे. डेस्डिमोनिया ही गौर सुंदरी आणि ऑथेल्लो हा काळा सरदार यांचे प्रेमप्रकरण या सागरतटाच्या पार्श्वभूमीवर रंगले; आणि याच सागराच्या किनाऱ्यावर, एका उंच तटावर संशयाने वेडा झालेल्या ऑथेल्लोने आपल्या प्रेयसीचा गळा दाबून खून केला.

या तटावर विमनस्क स्थितीत उभा राहून समोर उसळणारा समुद्र मी पहात होतो. मानवी जीवनातील अनंत काल चालणाऱ्या संघर्षाचे जे कलाचित्र या नाटकात शेक्सपिअरने उभे केले आहे त्याला किती विलक्षण आणि रोमांचकारी पार्श्वभूमी त्याने निवडली आहे !

हा तट राहील किंवा जाईल. मशिदी आणि चर्चेसही कदाचित राहतील किंवा जातील. पण माणसाच्या जीवनांतील प्रीति आणि असूया, भक्ति आणि विद्वेष यांचे खेळ असेच अखंड चालू राहतील – जशा या समुद्राच्या लाटा किनाऱ्याला चाटून जात आहेत !

पुढचे उद्या लिहीन.

*

## ९ कोपनहेगन

२५ सप्टेंबर, १९७०

कोपनहेगनला येऊन चार दिवस झाले. या शहराबाबत वा या देशासंबंधी अजून मी काहीच लिहिलेले नाही.

येथे पोहोचलो त्या रात्रीच वेळ होता म्हणून बंदरभागात चक्कर मारली. सुरेख संध्याकाळ होती. रात्री रेस्टारॉंमध्ये ( ॲंबॅसिडर श्री. थडाणीहि बरोबर होते.) जेवण घेतले. दुसरे दिवशी सकाळी २५-३० मैलांवर असलेले (Harl for) हे इंग्रजी नामांतर आहे- एक म्युझियम पाहिले.

व्हायकिंग राजाच्या कारकीर्दीत बंदराच्या तोंडाशी मुद्दाम बुडविलेली पाच जहाजे जवळ-जवळ ८००-९०० वर्षांनी वर काढली आहेत. त्यासंबंधी संशोधन चालू आहे.

डेन्मार्क हा अगदी छोटा देश आहे. परंतु दर्यावर्दी म्हणून फार मशहूर आहे. जगाच्या उत्तरेच्या बाजूला असलेला स्कॅंडेनेव्हियन देशांचा हा पुंजका. भूगोल, हवामान आणि इतर नैसर्गिक साधने यांमुळे काहीसा अडचणीत आहे. परंतु या अडचणींतून व अडचणींमुळेही काही नवी शक्ति-साधना करू शकला आहे. त्यांचा इतिहास यामुळे अनेक पराक्रमांच्या कथांनी भरलेला आहे.

अमेरिका, ९ व्या शतकात या देशातील धाडशी दर्यावर्दींनी प्रथम शोधली. आर्थिक जीवन पूर्वी फक्त शेतीवरच अवलंबून होते. परंतु आज मात्र उत्तम शेती, दुभती व अन्य जनावरे यांची उत्कृष्ट निपज व जोपासना, याच बरोबर त्यांनी उद्योगधंद्याचीही बरीच वाढ केली आहे. जहाज-बांधणीच्या क्षेत्रात त्यांनी उत्तमच प्रगति केली आहे.

६५ वयाच्या वर सर्व लोकांना बांधीव पेन्शन दिले जाते. बेकार तरुणांबाबत तशीच व्यवस्था आहे. हल्ली येथे संमिश्र सरकार आहे. ( Coalition Govt. ) १९६८ पासून हे नवे चित्र निर्माण झाले असून प्रयोग अजून फसलेला नाही.

२० तारखेला ठीक ९ वाजता वर्ल्ड बँकेच्या, वार्षिक सभेच्या कामास सुरुवात झाली. एका मोठ्या साध्या पण आधुनिक सजावटीने सजलेल्या सभागृहामध्ये सर्व देशविदेशांचे प्रतिनिधी हजर होते. डेन्मार्कचे राजे यांनी प्रथम भाषण करून सुरुवात करून दिली व ते निघून गेले. दोघेही राजा-राणी साध्या वेषांत आले होते. सभेच्या अध्यक्षांचे, प्रथम, परिस्थितीचे समालोचन करणारे छान भाषण झाले. भाषण चालू असता इतर भाषांत ( फ्रेंच, इंग्लिश, स्पॅनिश ) त्याचे भाषांतर करण्याची अप्रतिम सोय होती.

खरी महत्त्वाची भाषणे झाली ती श्री. स्वाइट्झर ( मॅनेजिंग डायरेक्टर, आय्. एम्. एफ्. ) आणि बँकेचे अध्यक्ष श्री. मॅक्नामारा यांची. बँकेपुढच्या प्रमुख समस्यांबाबत त्यांचे काय मत आहे याचा काहीसा अंदाज, या भाषणांवरून लागणार असल्याने सर्वजण प्राण कानात ओतून भाषणे ऐकत होते.

श्री. मॅक्नामारा यांचे भाषण बँकेच्या कामाला नवी दिशा द्यावी ही जी त्यांची तळमळ आहे त्याला साक्ष देणारे ठरले. भाषणाच्या शेवटी शेवटी तर ते काहीसे गहिवरले !

त्यांचा प्रमुख मुद्दा असा होता की, निव्वळ आर्थिक विकासाने प्रश्न सुटणार नाहीत असे अनुभवास आले आहे. सामाजिक परिवर्तन करण्याचे सामर्थ्य निव्वळ आर्थिक विकासात आढळत नाही. निव्वळ

विकासाबरोबर विषमताहि वाढत जाते. जागतिक बँकेने भविष्यासाठी आपल्या कामाची दिशा ठरविताना याही प्रश्नाचा सखोल विचार करण्याची गरज आहे. आणि हे विवेचन रास्त आहे.

येथेही प्रगत व समृद्ध देश आणि अविकसित देश असे महत्त्वाचे दोन गट उघडच दिसून येत होते. दोघांनाही चिंतित करणाऱ्या समस्या आहेत. परंतु त्यांचे स्वरूप वेगवेगळे आहे. त्या सोडविण्याचे मार्गही अलग आहेत.

समृद्ध देशांची चिंता त्यांच्या देशांत एकसारखी वाढत राहिलेली चलनवाढ ( Inflation ) आहे. या बाबतीत अमेरिकेची चिंता फार मोठी आहे. त्यांनी मार्ग सुचविला आहे ' Flexible exchange rate ' चा. परंतु त्याला प्रमुख विरोध आहे फ्रान्सचा. युरोपीय सर्व राष्ट्रे – इंग्लंडसुद्धा – फ्रान्सला पाठिंबा देत आहे. अमेरिकेने अंदाज पाहून आपला आग्रह अधिक रेटण्याचा प्रयत्न केला नाही.

अविकसित राष्ट्रांचे प्रश्न ( भारतही त्यात सामील आहे ) जवळ जवळ मूलतः एकसारखेच आहेत. या सर्व प्रश्नांचा उल्लेख माझ्याप्रमाणे इतर गव्हर्नर्सनींही आपापल्या भाषणात आग्रहपूर्वक आणि निर्भीडपणे केला. या प्रश्नांचा काहीसा उल्लेख निकोसिया येथून जे लिहिले त्यात केला आहे.

आज समारोपाची जी भाषणे झाली त्यांत श्री. स्वाइट्झर व श्री. मॅकनामारा या दोघांनींही या प्रश्नांचा आवर्जून उल्लेख करून त्या बाबतीत मार्ग काढण्याची आवश्यकता आहे असे सुचविले. त्या बाबतीत अधिक विस्ताराने विचार करण्याचे अभिवचन दिले. या बाबतीत प्रधानमंत्र्यांना पाठविण्याचा माझा अहवाल आजच पुरा करून घेतला.

उद्या सकाळी येथून निघेन. जवळ-जवळ दोन आठवड्यांनी परत घरी येण्यास मी कसा अगदी उत्सुक आहे. पहिल्या आठवड्यानंतरच परत जावेसे वाटू लागले होते. अगदी एकटे राहणे किती अवघड आहे हे पुन्हा एकदा अनुभवले. तुम्ही सर्वजण माझ्या लहान-सहान गोष्टी इतक्या करत असता की, मी एकटा असलो की अगदी लहान मुलासारखी

माझी परिस्थिती होते. श्री. माधव गोडबोले माझी फारच काळजी घेत आहेत.

येथे आल्यानंतर महत्त्वाची व चांगली बातमी जी ऐकली ती केरळच्या निवडणुक निकालाची. आमचा काँग्रेस पक्ष केरळात विजयी झाला हे भविष्याचे दृष्टीने उत्तम झाले. देशव्यापी व सर्वत्र संघटना असलेला असा ' राष्ट्रीय काँग्रेस ' हाच पक्ष होता. त्याचा खरा वारसा आमच्या पक्षाकडेच आहे असे लोकमतावरून दिसून आले.

केरळात संमिश्र शासन ( Coalition ) किती यशस्वी होईल हे सांगणे आज अवघड आहे. परंतु केरळात तरी ते अपरिहार्य आहे यात मुळीच शंका नाही. कार्यक्रमावर आधारित असे उजव्या कम्युनिस्टांशी सरकारमध्ये सामील होऊन सहकार्य करण्याचा हा पहिला प्रयोग आहे. कठीण प्रयोग आहे. आपल्या पक्षाच्या स्वार्थासाठी संयुक्त आघाडी वापरण्याचे कम्युनिस्टांना बाळकडू आहे. ते तसे केरळमध्ये करणारच नाहीत हे सांगणे अशक्य आहे.

छोटचा राज्याच्या अंतर्गत परिस्थितीमुळे अपरिहार्य झालेले हे पाऊल उद्या कदाचित् ७१ साली केंद्रीय निवडणुकांचे वेळीही उचलावे लागणार काय हा महत्त्वाचा धोरणाचा प्रश्न बनला आहे. केंद्रीय सरकारमध्ये कम्युनिस्टांना सामील करून घेऊन काम चालवायचे की काय या प्रश्नावर बरीच रणधुमाळी माजणार असे दिसते.

या कल्पनेला माझा सक्त विरोध आहे. कदाचित् यातून दुरावाही निर्माण होण्याचे भय आहे. परंतु काय करणार ?

भारताकडे परत निघताना माझ्या मनापुढे अशा अनेक चिंता वाढून ठेवल्या आहेत. परंतु सावधानतेने आणि विचारपूर्वक त्यांना तोंड द्यावेच लागेल.

प्रकृति सामान्यपणे बरी राहिली. बरोबर दिलेल्या औषधांपैकी, एक. ए. पी. सी. आणि दुसरे एक मलम यांचे खेरीज कशाची गरज लागली नाही हे भाग्यच म्हणावयाचे !

*

## पॅरिस

१९ सप्टेंबर, १९७१

मुंबईहून निघाल्यानंतर बरोबर १६॥ तासांनी पॅरिसमध्ये पोहोचलो. येथे येईपर्यंत मी माझे घड्याळ भारतीय वेळेप्रमाणेच ठेवले होते म्हणून लक्षात आले. वाटेत बेरुत, रोम, फ्रँकफर्ट येथे थांबावे लागले. फ्रँकफर्टमध्ये एअर इंडिया बदलून एअर फ्रान्स मधून पॅरिसचा प्रवास केला.

पॅरिसच्या विमानात बसताना ध्यानात आले की, आमच्या सामानांपैकी दोन बॅगा बेपत्ता आहेत. त्या दिल्लीतच राहिल्या, की एअर इंडियाच्या जम्बोमधून लंडन, न्यूयॉर्कला गेल्या याचा काहीच अंदाज येत नव्हता. श्री. माधव गोडबोले यांनी सर्व ठिकाणी निरोप ठेवून शोध करण्यास सांगितले होते. परंतु कोणत्या दोन बॅगा नाहीत याचा काहीच अंदाज नव्हता.

माझ्या कपड्यांच्या दोन्ही बॅगा गेल्या असतील तर अंगावरचे कपडे व हातातील छोट्या बॅगेतील एक दोन शर्टस् खेरीज मजजवळ काहीच नव्हते. नाही म्हटले तरी काहीशी चिंता, काहीसा विनोद अशी संमिश्र भावना मनात येऊन गेली.

पॅरिसमधला कालचा सर्व दिवस मुंबईहून निघताना घातलेल्या कपड्यातच घालविला. रात्री लक्षात आले की, माझी एक कपड्याची बॅग आहे. दुसरी बेपत्ता आहे. (ज्यात सूट्स्, शर्टस्, पायमोजे बूट, टोप्या, बनियन्स वगैरे होते.) मी म्हटले नाही सापडली तरी शेरवाणी व चुरीदारवर आपले काम चालवून नेऊ. पण सुदैवाने सकाळी लंडन-मार्गे दुसरी बॅग परत पॅरिसमध्ये पोहोचली.

या सर्व हवाई सफरीमध्ये सामान सुरक्षित राहणे हे प्राण सुरक्षित राहण्याइतकेच महत्त्वाचे व सोयीचे आहे असे दिसते.

इथपर्यंत प्रवास तर मजेत झाला. जम्बोमधून पहिला प्रवास. अगदीच अगडबंब काम आहे. दुमजली इमारतीत बसल्यासारखे वाटते.

एअर इंडियाने हवेतील राजवाडा असे याचे वर्णन केले आहे. सुखसोयी व इंटिरिअर डेकोरेशन वगैरे उत्तम आहेत. गोपी व कृष्ण-लीलेच्या चित्रमालांनी सर्व काही सजविले आहे. राजस्थानी रंगीबेरंगी पेहेरावातील एक देखणी हवाई सुंदरी राधेशी स्पर्धा करीत होती म्हटले तरी चालेल.

मला एक नवी आणि आवडलेली नवी गोष्ट म्हणजे आपल्याच जागेवर बसून आपल्या कानामध्ये प्लग्ज् घालून भारतीय व पाश्चिमात्य संगीत ऐकण्याची सोय सर्व प्रवासभर आहे. मी निघालो त्या रात्री नाही पण दुसऱ्या दिवशी सकाळी याचा भरपूर आनंद लुटला.

निघालो त्या रात्री झोप मात्र म्हणावी तशी झाली नाही. पाच-एक तास अधूनमधून जाग येत पडून होतो. रात्र असल्यामुळे बाहेर काही दिसत नव्हते. तेव्हा पडून राहण्यातच शहाणपण होते. उजाडल्या-नंतर रोमपासून फ्रँकफर्टपर्यंतचा प्रवास मस्त झाला. अधूनमधून विस्तीर्ण समुद्र दिसत होता. एकाकी 'एल्बा' बेट स्वच्छ आकाशामुळे मधेच दृष्टीस पडले, आणि नेपोलियनचे शेवटचे खडतर दिवस मनापुढे येऊन गेले.

नंतर आम्ही ढगांवर चढलो. पांढऱ्या शुभ्र ढगांनी आसमंत भरून गेले होते. त्यावरून आमचा राजवाडा तरंगत चालला होता. सूर्याच्या कोवळ्या किरणांनी आमच्या विमानाची प्रतिछाया ढगावर फार सुरेख पडली होती. सप्तरंगी वर्तुळाकार व त्याच्यामध्ये माशाच्या आकाराची विमानाची पडछाया, वेगाने पुढे पुढे चालली होती. जणू काही भला मोठा देवमासा समुद्रातून वेगाने पाणी तोडीत चालला होता !

हे हृदयंगम दृश्य मी किती तरी वेळ पाहात राहिलो होतो. त्याच वेळी कानावर पडणारे पं. रविशंकरच्या 'मालकंस 'चे आलाप मन उल्हसित करीत होते. थोडावेळ का होईना, यक्ष-किन्नराचे भूमिकेत गेल्यासारखे वाटले.

ढग मोकळे झाले आणि खाली पुन्हा युरोपची भूमी दिसू लागली. जिनेव्हा आणि आल्प्स्च्या पर्वतराजी, बर्फाच्छादित शिखरे, विस्तीर्ण सरोवरे आणि भोवतालची रेखीव हिरवीगार शेती. घनदाट आखीव

बने. हे सर्व पहात केव्हा वेळ गेला हे कळले सुद्धा नाही. एकाएकी हवाई सुंदरीचा आवाज आला ' पेटिया बांधिजे '. ( Fasten your belts ) चा बोर्ड समोर लखलखला आणि विमान फ्रँकफर्टच्या विमानतळाच्या दिशेने उतरू लागले.

– २ –

आता थोडे पॅरिससंबंधी.

अनेकांच्या मुखांतून, अनेक प्रवासवर्णनांतून, इतिहासाच्या ग्रंथांतून पॅरिससंबंधी ऐकले, वाचले होते. एक ऐतिहासिक व सुंदर शहर. युरोपीय संस्कृतीची एका अर्थाने राजधानी मानले जाणारे हे शहर. खऱ्या अर्थाने मी अजून पाहिले नव्हते ही खंत नाही म्हटले तरी कुठे तरी मनात राहून गेली होती.

शनिवार, रविवार हे दोन दिवस मी या दृष्टीने बरेचसे कारणी लावले. अर्थात् दोन दिवसांत तरी काय पाहणार म्हणा !

ज्या हॉटेलमध्ये मी उतरलो आहे. ( Hotel De Crillon ) हे येथील प्रख्यात व अगदी पारंपरिक फ्रान्सच्या ढंगात चालणारे आहे. पुढच्या महिन्यात इंदिराजीही याच हॉटेलमध्ये उतरणार आहेत. अमेरिकेच्या आधुनिक हॉटेल्सची छाया इतर देशांतील व आपल्या देशातील हॉटेल्सवर पडली आहे. परंतु येथील खोल्यांची आखणी, आतील फर्निचर, भितींवरील चित्रांची निवड संपूर्णत: वैशिष्टचपूर्ण आहे. एक सांगितले पाहिजे, या हॉटेलमध्ये चहा फारच सुंदर देतात.

काल मी येथील म्युझियम्स् पाहिली.

चित्रकलेचे स्वतंत्र म्युझियम आहे. फ्रान्समध्ये या प्रकाराची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. त्या क्षेत्रांतील जगविख्यात चित्रकारांची चित्रे येथे आहेत. विशेषत: एक चित्रमाला फार आवडली. एका कॅथिड्रलचे

एकाच दिवशी एकाच विशिष्ट ठिकाणाहून वेगवेगळ्या पाच वेळी, जसे कलाकाराच्या मनावर परिणाम झाले, ते यात चित्रित केले आहेत. एकच वास्तू एकाच माणसाला कसकशी वेगळी भासते याचे कलापूर्ण दर्शन यात होते.

अनेक मनोवेधक चित्रे येथे पाहिली. सर्व चित्रे पाहून त्यांची सूक्ष्मता समजावून घ्यावयाचे म्हटले तर एक एक म्युझियम काही आठवडे पहावे लागेल.

दुसरे प्रसिद्ध म्युझियम. यात जुन्या शिल्पांचा खच्चून भरणा आहे. अतिशय इतिहासप्रसिद्ध चित्रे आहेत. जगविख्यात मोना-लिसा या म्युझियमचे प्रमुख आकर्षक चित्र आहे. तसेच प्रसिद्ध 'व्हेनिस' चा पुतळाहि येथेच आहे.

संध्याकाळी पॅरिसच्या प्रसिद्ध सीन नदीच्या काठावरून मोटारीतून चक्कर टाकली. ही नदी या शहराच्या रचनेचे व व्यक्तिमत्वाचे खरे केंद्र आहे. कला आणि इतिहास या नदीच्या दोन्ही काठांवर वसली आहेत असे म्हटले तरी चालेल.

पॅरिस हे मूलतः विद्येचे केंद्र म्हणून वसले आणि तसेच ते वाढता वाढता वाढले. मग त्यात राज्यक्रांत्या, साहित्य, कलाविकास यांच्या सोपस्कारांनी या शहराचे व्यक्तिमत्व अनेक शतकांनी घडविले आहे. पॅरिसची जनता हे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व मोठ्या जागरूकतेने राखीत असते असे वाटते.

नवे वाढते पॅरिस – जे मी विमानतळाच्या आसपास पाहिले ते – आधुनिक अमेरिकन संपन्नतेची कृत्रिम नक्कल करीत आहे यात शंका नाही. पण पॅरिसचे मुख्य केंद्र म्हणजे शतकानुशतकाच्या जुन्या इमारती, जुने चौक, जुने शिल्पकाम, इतिहासाची साक्ष देत, फ्रान्सचे वैशिष्ट्य ठेवून जसेच्या तसे आहे.

आज व्हर्सिलचा राजवाडा व आसमंत पाहिले. १४ व्या लुईच्या वेळी हा राजवाडा बांधला गेला. एका अर्थाने राज्यकर्त्या वर्गाची म्हणजे अमीर उमरावांची ती एक वेगळीच वसाहत झाली. त्या राजवाड्याचे

वैभव डोळे दिपण्यासारखे आहे. तेथील मौल्यवान ऐतिहासिक फर्निचर, चित्रकलेचा व वैभवविलासाचा कळस येथे पहावयास मिळतो.

१४ व्या लुईच्या पराक्रमामुळे ते वाढले व शोभलेसुद्धा. परंतु पुढे राज्यकर्ते जनतेपासून दूर राहिले आणि या राजवाड्याच्या आसमंतात विलासात रममाण झाले तसे; फ्रान्समध्ये राज्यक्रांतीची बीजें पेरली गेली. १६ व्या लुईच्या वेळी क्रांतीच्या ज्वाळा या राजवाड्याच्या रोखाने आल्या. जनतेच्या रोषाचे ते लक्ष्य झाले होते.

काळ बदलला आहे. फ्रान्स बदलला आहे. आज जवळ जवळ तीनशे वर्षांनी हा राजवाडा लोकांच्या उत्सुकतेचे एक आकर्षण आहे.

आज रविवार म्हणून मी दुपारी तीन वाजता तेथे गेलो. अक्षरशः हजारो माणसे रीघ करून तेथे होती. परदेशांतून आलेली तर होतीच, शिवाय पॅरिसच्या बाहेरून, फ्रान्समधून आलेल्या लोकांचीही संख्या फार होती. तरुण स्त्री-पुरुष, वृद्ध, मुले जुन्या फ्रान्सचे हे वैभव विस्फारित नेत्रांनी पहात होते. राजवाड्याच्या आवतीभोवती विस्तीर्ण उद्याने आहेत. आपली दिल्लीची राष्ट्रपतिभवनमधील मोगल गार्डन याच्या तुलनेत केवळ केविलवाणी वाटते.

व्हॅर्सिलमध्ये जवळजवळ दोन अडीच तास काढले. तेथून येथील कलाकारांचे केंद्र पाहण्यासाठी गेलो.

शहराच्या मध्यभागी उंचवटयावर एक प्रसिद्ध चर्च आहे. तेथून पॅरिसचा निदान अर्धाअधिक भाग दिसतो. याच चर्चचे शेजारी कलाकारांचे वैशिष्टयपूर्ण केंद्र आहे. बाजारच आहे म्हणाना !

एका लहान चौकात चित्रकार आपली चित्रे काढीत उभे असतात. असंख्य स्त्री-पुरुष ती पाहण्यासाठी भोवताली हिंडत असतात. काहींची विक्रीही तेथे होते. जगातील अनेक चित्रकार मान्यता मिळावी म्हणून या बाजारात येऊन जातातच म्हणे ! मी तासभर या बाजारात भटकत होतो. अगदी मनमोकळे. अशा अनौपचारिक आयुष्याचा आनंद आगळाच आहे, असा अनुभव आला.

आता बहामातून लिहीन

*

२४ / २५ सप्टेंबर, १९७१

२० सप्टेंबरला माझी येथील बँकिंगच्या क्षेत्रातील प्रमुखांशी जी बोलणी होती ती पुरी करून तारीख २१ ला सकाळी लंडनला निघालो. लंडनच्या विमानतळावरच थोडा वेळ थांबून लगेच पुढे न्यूयॉर्कला निघावयाचा पहिला विचार सोडून द्यावा लागला. कारण एअर इंडियाचे विमानच मुळी मुंबईहून उशीरा निघाले. त्यामुळे तीन चार तास मोकळे सापडले.

श्री. अप्पासाहेब पंत (हायकमिशनर) विमानतळावर आले होते. ते म्हणाले, 'घरीच चला आणि जेवण करून परत या.' बरेच दिवसांनी त्यांची भेट झाली होती. या घरी मी १९६४ साली १०–१२ दिवस राहिलो होतो. सौ. नलीनीबाई पंत – तुझी त्यांची एकच वेळ भेट झाली होती असं त्या म्हणाल्या – तुला बरोबर का आणले नाही असे विचारीत होत्या.

दुपारी ३ वाजता लंडनहून निघून न्यूयॉर्कला ५ वाजता पोहोचलो. (न्यूयॉर्क टाइम) वेळेचा एवढा गोंधळ आणि जेवणे किती याला मर्यादा नाही. परत आल्यानंतर मला ओळीने आठ दिवस उपवास केले पाहिजेत. बरेच महिने प्रयत्न करून उतरलेले वजन बरेच वाढेल असे दिसते.

एक रात्र न्यूयॉर्कला काढून दुसरे दिवशी सकाळी बहामा बेटांची राजधानी नॅसॉ येथे पोहोचलो. पॅरॉडाइझ बेटावरील पॅरॉडाइझ हॉटेलमध्ये आमची व्यवस्था आहे. कॉन्फरन्सही याच हॉटेलमध्ये आहे.

बहामा हा एक नवा देश बनला आहे. जवळ जवळ लहान-मोठ्या ७०० बेटांची शेकडो मैलांवर पसरलेली ही एक बेटांची रांगच आहे. अमेरिका व क्युबाच्या दरम्यानच्या अटलांटिक सागरामध्ये यांचे महत्त्वाचे स्थान आहे.

या देशाची एकूण लोकसंख्या एक लाख पासष्ट हजार आहे. म्हणजे अहमदनगर शहराची कदाचित जेवढी लोकसंख्या असेल तेवढीच

या देशाची आहे. या बेटांचा इतिहासही अगदी नवा. पाश्चिमात्य देशांच्या धाडसी व आक्रमक इतिहासाचे एक पान म्हणजे या देशाचा इतिहास आहे म्हटले तरी चालेल.

कोलंबस अमेरिकेच्या शोधात, वाटेवर येथे थांबला. मूळचे काही आदीवासी येथे होते. पण त्यांची वासलात नेहमीप्रमाणे लागली. पुढे स्पॅनिश आले व गेले. नंतर वसाहतीसाठी काही आयरिश व इंग्लिश आले. अमेरिकन स्वातंत्र्यलढ्याच्या वेळी काही परस्थ कुटुंबे येथे आली व कापसाची लागवड आणि इतर मळे त्यांनी येथे केले. या सर्व कामासाठी पश्चिम आफ्रिकेतून अनेक काळे लोक गुलाम म्हणून आले. याच काळ्या लोकांचा आज हा खरा देश झाला आहे.

अमेरिकेमध्ये प्रोहिबिशन सुरू होते तेव्हा या देशामध्ये चोरीच्या दारूच्या धंद्यामुळे व त्याचप्रमाणे समुद्रावरील चाचेगिरीमुळे बरीच सुबत्ता आली होती. खऱ्या अर्थाने येथे अराजकच होते. ब्रिटिशांनी येथे शांतता प्रस्थापित करून आपले वर्चस्व प्रस्थापित केले. आता हळूहळू स्वायत्तता व स्वातंत्र्य असे त्याचे मार्गक्रमण सुरू आहे. या छोटेखानी देशाला नॅशनल असेंब्ली आहे. पूर्ण मंत्रिमंडळ आहे. सर्व जामानिमा मोठ्या देशांचा आहे.

अवतीभोवती असलेल्या श्रीमंत देशांच्या कडक थंडीचे हवामान हे या देशाचे भांडवल आहे. येथे शेती फारशी नाहीच. फळफळावळ मात्र बरीच आणि विविध आहे. परंतु अर्थशास्त्र अवलंबून आहे ते अमेरिका, कॅनडा, युरोपमधून येणाऱ्या १५ लाख हौसी प्रवासी धनिकांवर.

स्वच्छ आकाश, निळाभोर सागर आणि दिवसभर असणारा सूर्यप्रकाश यांवर थंडीच्या मुलुखातून आलेले हे लोक एकदम खूष असतात. खूप पैसे उडवतात. खातात, पितात, नाचतात, खेळतात. येथे परदेशियां-साठी फक्त कॅसिनोज् आहेत. लक्षावधी डॉलर्सचा जुगार येथे होतो.

काल आम्ही न्यू प्रॉव्हिड्सन्स ( म्हणजे नॅसॉ ) बेट सर्व फिरून पाहिले. खरे म्हणजे त्यात फारसे सौंदर्य दिसले नाही. मुंबईसारखी हवा. कोकण त्या मानाने अधिक सुंदर. या बेटांची प्रसिद्धी फार व महत्त्वाचे म्हणजे धनिक देशांचा निकटवर्ति शेजार. नाहीतर, अंदमान–निकोबार

यांच्या शतपटीने आकर्षक आहेत. विशेषत: निकोबार बेटाची तुलना तर माझ्या मनाशी फार आली. ते बेट सुंदर आहे पण विचारे हिंदी महासागरात आहे !

येथे काही भारतीय भेटले. टूरीझमचे प्रमुख श्री. सोमनाथ चिन हे आपल्या सरकारचे निवृत्त अधिकारी आहेत. त्यांनी आमचे फार मनापासून घरगुती स्वागत केले. त्यांच्या घरी बोलाविले. येथील गव्हर्नरचे खाजगी सेक्रेटरी यांची पत्नी भारतीय बंगाली महिला आहे. तिचा भाऊ मुजुमदार आमच्याच मिनिस्ट्रीमध्ये होता. त्यांनीही फार अगत्य दाखविले.

परिषद* काल संपली. उत्तम चर्चा झाल्या. पाकिस्तानचे प्रतिनिधी माझ्या भाषणावर उगीचच रागावले. परंतु इतरांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले.

मी वादग्रस्त राजकीय प्रश्न आर्थिक परिषदेमध्ये उपस्थित करतो आहे अशी त्यांची तक्रार. पण ९० लाख निर्वासितांनी** निर्माण केलेला बिकट आर्थिक प्रश्न हा आमच्या आर्थिक परिस्थितीचे समालोचन करताना महत्त्वाचा भाग ठरतो. त्याबाबत आंतरराष्ट्रीय जबाबदारीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न अशा परिषदेतून आम्ही न केला तर आम्ही फक्त टूरिस्ट म्हणून या परिषदांना आलो होतो असाच निष्कर्ष नाही का निघणार ?

येथून वॉशिंग्टनला निघणार आहे.

※

---

* बहामा येथे कॉमनवेल्थ फायनान्स मिनिस्टर्स यांची वार्षिक बैठक-परिषद झाली. तेथे अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी केलेले भाषण –. परिशिष्ट पहावे.

** बांगला देशातून भारतात ( कलकत्ता येथे ) ९० लाख निर्वासित आले होते. – संदर्भ.

१९ एप्रिल, १९७२

मुंबईहून बरोबर एक वाजता ( रात्री ) निघालो. श्री. वसंतराव. नाईक सहकुटुंब, श्री. वसंतरावदादा, दादासाहेब जगताप, शरद पवार, बाबासाहेब मोरे आदि विमानतळावर हजर होते.

रात्री ८ तास झोप मिळाली. इथल्या वेळेप्रमाणे ७-१० वाजता ( म्हणजे आपले ११-११॥ असावेत ) पोहोचलो. श्री. राम प्रधान व श्री. बॅनर्जी–ॲम्बॅसिडर–स्वागतासाठी हजर होते.

छोटेसे पण सुंदर शहर आहे. माझ्या हॉटेलरूममधून जवळ जवळ शहराचा प्रमुख भाग दृष्टिपथात येतो आहे. जिनिव्हाचे प्रसिद्ध सरोवर व आसपासची वस्ती ही कशी सुरेख वाटतात. शहराच्या पूर्वेकडे असणाऱ्या उंच डोंगराची पार्श्वभूमी या शहराचे एक वैशिष्टच दिसते. येथून दुपारी २ वाजता व्हिएन्नास प्रयाण आहे.

*

## १३ व्हिएन्ना

२० एप्रिल, १९७२

जिनिव्हामध्ये दोन-तीन तास शहरामध्ये मोटारीतून भटकलो. हे शहर तसे फार लहान आहे. दोन लाखांची वस्ती. परंतु जवळ-जवळ दोनशेच्यावर आंतरराष्ट्रीय संस्थांची केंद्रीय व इतर दप्तरे इथे असल्या-मुळे याचे एक प्रकारे महत्त्व आहे.

या शहराचे खरे सौंदर्य सरोवर व आसपासची विस्कटलेली वस्ती यात आहे. या शहराच्या तीन्ही बाजूला फ्रान्सचा मुलूख आहे. आम्ही

यू. एन्. च्या प्रमुख कचेरीच्या आवारात जाऊन आलो. जुन्या 'लीग ऑफ नेशन्स' ची ही कचेरी होती. ऐसपैस राजवाडाच आहे. समोर पृथ्वीचा एक सोनेरी विशाल गोल आहे. आकर्षक वाटला.

जिनिव्हाचे हे सरोवर जवळ-जवळ ८० किलोमिटर आहे. खरे म्हणजे आल्पस्मधून आलेल्या नदीचे हे सरोवर झाले असून त्यांतून ती नदी पुढे वाहात जाते. श्रीनगरच्या डाल लेकसारखेच हे प्रकरण आहे. झेलम वाहात येऊन श्रीनगरच्या मैदानात डाल सरोवर बनते व त्यातून पुढे झेलम पुनश्च आपला प्रवास पुढे सुरू करते.

या सरोवराच्या काठी अमेरिका व इतर संपन्न देशांतील शौकिन धनपती, फिल्मी दुनियेतील नामांकित नटनटचा व श्रीमंतीत लोळणारे यशस्वी लेखक आपापली निवासस्थाने बांधून वर्षातील बराचसा काळ येथे काढतात. निर्धास्त संपत्ती साठविण्यासाठी या देशाचे कायदेकानू सोयीस्कर असल्यामुळे हे शक्य होते असे सांगण्यात येते.

या सरोवराचे वातावरण आहे मोठे रम्य, आल्हाददायक, म्हणूनच काव्यात्मक. यासंबंधी काहीसा इतिहासही आहे. या सरोवराच्या काठी सुप्रसिद्ध इंग्लिश कवी बायरन बराच काळ राहिला होता. सरोवराच्या काठच्या एका मोठ्या खडकावर बसून त्याने आपल्या काही प्रसिद्ध कविता लिहिल्या आहेत. या सरोवरातच त्याचा अंत झाला. या सरोवराच्या काठच्या या भागातील छोटचाशा वस्तीस त्याचे नावही दिलेले आहे.

श्री. राम प्रधान यांच्या घरी ते घेऊन गेले होते. त्यांची मुले, पत्नी भेटल्या. त्यांच्या एकुलत्या एका मुलीच्या डोळ्याचे ऑपरेशन करावे लागले. त्यामुळे दोघेही पति-पत्नी दुःखी दिसले.

दुपारचे जेवण बॅनर्जींच्या घरी झाले. शहराच्या बाहेर एका सुरेख फार्मव्हिला मध्ये ते राहतात. दुपारच्या उन्हात घराबाहेर बसून वेळ काढला. त्या वेळी काहीशी गुलमर्गची आठवण झाली.

सुरेख ऊन्हे. झोंबणारा वारा. दूर अंतरावर दिसणारे उंच बर्फाच्छादित डोंगर. विस्तीर्ण पसरलेली हिरवीगार गवताळ शेती. उंच झाडांची गर्दी. अशी ही काही महत्त्वाची साम्यस्थळे आहेत. फक्त एक

महत्त्वाचा फरक म्हणजे आंतरराष्ट्रीय विमानतळाचा शेजार. त्यामुळे एकसारखी येणारी व जाणारी विमाने आपल्या कर्णकर्कश घरघरीने वातावरणात अस्वस्थता निर्माण करतात.

दुपारी दोन वाजता निघून झ्युरिकमार्गे व्हिएन्नास संध्याकाळी पोहोचलो. श्री. विष्णू त्रिवेदी हे येथील आमचे राजदूत. त्यांच्या घरी रात्रीचे जेवण झाले.

काही महत्त्वाची स्थानिक माणसे त्यांनी जेवावयास बोलाविली होती. त्यात अर्थखात्याचे प्रमुख चिटणीस, पूर्वीच्या व आत्ताच्या ऑस्ट्रियन राजदूतिका होत्या. योगायोगाने लागोपाठ दोन महिलांना हिंदुस्थानमध्ये आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली हे एक वैशिष्टच म्हटले पाहिजे. हल्लीच्या ॲम्बॅसडर बाई या राजकीय दृष्टचा या देशातील एक महत्त्वाच्या व्यक्ति आहेत. समाजवादी राजकारणात या देशात त्यांचे स्वतःचे स्थान आहे. यू. एन्. ने त्यांना आपल्या देशातील मदतीच्या कार्याचे प्रमुख नेमले आहे.

येथील चर्चेत मला प्रथमच समजले की, येथील तीन महत्त्वाच्या व मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण दुसऱ्या महायुद्धानंतर लगेच झाले असून या राष्ट्राच्या पुनर्रचनेमध्ये या बँकांनी फार महत्त्वाची कामगिरी केली आहे.

या राष्ट्रीयीकरणाची आणि आपल्या राष्ट्रीयीकरणाची पार्श्वभूमी एकदम वेगवेगळी आहे. दुसऱ्या महायुद्धामध्ये या देशाचा आणि उद्योगधंद्याचा संपूर्ण विध्वंस झाला होता. या विध्वंसाच्या राखेतून नवा देश उभा करायचा होता. हे काम करण्याचे साधन राष्ट्रीयकृत बँकांना बनविले.

या बँकांचे प्रमुख, जेवणानंतरच्या चर्चेत म्हणाले, In your country you nationalized the assets of the banks, but in our country we nationalized the ruins of the banks. शेतीला कर्ज देण्याचे काम सहकारी बँका करतात. शेतीवर काम करणारांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे.

Savings Banks हा तिसरा प्रकारही येथे आहे. सामान्यपणे या तऱ्हेच्या बँका विजेचे उत्पादन वगैरे 'इन्फ्रा स्ट्रक्चर' च्या विकासास मदत करण्याचे कार्य करीत असतात. (एल्. आय्. सी. चा नमूना.) अशा तऱ्हेने १९ तारीख गेली.

*

## १४ व्हिएन्ना

२२ एप्रिल, १९७२

आज दुपारी ए. डी. बी. ची सभा संपली. माझे भाषण कालच झाले. सर्व देश आपापले निवेदन करतात. विकासशील देशांमार्फत अधिक स्पष्टपणे बाजू मांडण्याचे काम भारताला नेहमीच करावे लागते. याही खेपेला काही विचार परखडपणे मांडावे लागले.

आशियातील सर्व प्रतिनिधींना आनंद वाटला पण स्वतः मात्र सर्वजण जपून, सांभाळून बोलले. बँकेचे अध्यक्ष श्री. वॉटनबी यांच्याशी सभेनंतर चर्चा झाली. बांगला देशाचा प्रश्न अधिक तपशीलाने मांडला.

हा गृहस्थ फार सावधपणे बोलतो. सहानुभूति आहे. कायद्याच्या काही अडचणी सांगत होता. परंतु शेवटी मदत करील असा अंदाज आला.

ऑस्ट्रियाचा अर्थमंत्री ३४ वर्षांचा समाजवादी विचाराचा तरुण आहे. त्याच्याशी आणि इंग्लंडचे मंत्री रिचर्ड वूड ( लार्ड हॅलिफॅक्सचा मुलगा ) यांच्याशी हिंदुस्थानच्या आर्थिक व परदेशी कर्जांच्या प्रश्नाबाबत चर्चा झाली. परदेशी मदतीबाबत अमेरिकेच्या धोरणाच्या पार्श्वभूमीवर खरी चर्चा झाली.

हा प्रश्न आम्ही अधिक काळ लोंबकळत ठेवणार नाही. आम्हाला काही पावले निर्धाराने टाकावी लागतील असे मी सूचित केले. या प्रश्नाबाबत विशेष चर्चा श्री. पीटर कारगिल यांच्याशी झाली. हिंदुस्थानच्या वतीने, मदत देणाऱ्या राष्ट्रांशी त्याला नित्य बोलावे

लागते. तेव्हा आमच्या धोरणाची पूर्वसूचना त्यांना स्पष्टपणे देणे आवश्यक होते.

श्री. आय. जी पटेल यांनीही त्याच्याशी तपशीलावर चर्चा केलेली होतीच. पीटरला अमेरिकेची नीति नामंजूर आहे. अर्थात् त्याने आपला सल्ला देऊ केला नाही. परंतु आम्ही काही कडक उपाय योजले तर ते समजण्यासारखे आहेत व इतर देशांचाही त्यामुळे गैरसमज होऊ नये असे तो म्हणाला. येथून परत आल्यानंतर या महत्त्वाच्या प्रश्नाचा पाठपुरावा करावा लागणार आहे.

व्हिएन्ना हे एक इतिहासप्रसिद्ध आणि युरोपमधील एक प्रकारे सांस्कृतिक केंद्र आहे. ऑस्ट्रिया आता एक फार मोठा देश आहे. परंतु एकवेळ मध्ययुरोपातील अत्यंत प्रबळ साम्राज्याचे हे केंद्र होते. त्याची साक्ष आजही या शहरामध्ये ठायी ठायी दिसते. इतक्या प्राचीन व कलाकुसरीने संपन्न अशा अनेक सुंदर इमारती व विशाल राजवाडे, दुसऱ्या कुठल्याही एका शहरात असतील असे वाटत नाही.

या देशामध्ये भाषा जर्मन बोलली जाते. परंतु हे लोक स्वतःला जर्मन समजत नाहीत. त्यांची जर्मन सॉफ्ट आहे असे तेहून सांगतात. या देशावर तुर्कांची अनेक आक्रमणे झाली परंतु ती त्यांनी परतवून लावली. हिटलरने देश जिंकल्यानंतर मात्र अनेक संकटपरंपरा आल्या. पण शेवटी हा देश मजबूत निघाला. आज तसा पुष्कळ प्रगत देश आहे. स्थिर लोकशाही समाजवादी सरकार येथे संपन्न आहे.

खरे म्हणजे युरोपमधील संगीताची ही एक राजधानी आहे. अनेक जगप्रसिद्ध कंपोझर्स या शहरामध्ये राहिले व वाढले. मोझारत्, बीथोव्हेन ही नावे त्यांतील प्रमुख आहेत. त्यांच्या कलेची प्रथा आजही मोठ्या अभिमानाने या देशातील जनता आणि सरकार नुकसान सोसून जतन करीत आहेत.

आजच त्यांचा ऑपेरा पाहिला. ऑपेराबद्दल अनेकवेळा ऐकले व वाचले होते. परंतु प्रत्यक्ष पाहण्याचा योग आज आला. इतिहासप्रसिद्ध ऑपेरा-हाउसमध्ये हा प्रयोग झाला. अर्थात् जुने ऑपेरा-हाउस युद्धामध्ये मोडून तोडून गेले होते. येथील सरकारने लक्षावधींनी खर्च करून

पुन्हा ते उभारले आहे. जवळ जवळ २५०० माणसे बसतील अशी व्यवस्था आहे.

हा ऑपेरा म्हणजे संगीत नाटक आहे. संपूर्ण संगीतामध्येच नाटक चालते. पहिल्या प्रतीचे गायक नट, दर्जेदार ऑर्केस्ट्रा आणि तसेच रसिले प्रेक्षक यांचा मेळ बसला म्हणजे फारच बहार येते.

आज आम्ही जो ऑपेरा पाहिला त्याचे नाव Le Nozze De Firago ( Marriage of Firago) असे आहे. गाण्याचे शब्द व कथा इटालियन आहे. संगीत मोझार्टने दिलेले आहे. याचा पहिला खेळ याच शहरात १७८६ मध्ये झाला होता.

जवळ जवळ २०० वर्षे हा खेळ सातत्याने चालूच आहे. असे अनेक आहेत. या सर्व ऑपेरांची माहिती देणारा एक मोठा ग्रंथ मला माहितगारांनी दाखविला. शब्द समजत नाहीत परंतु कथा समजते. संगीतातले गूढ समजले नाही तरी लय लागून जाते. तीन तास केव्हा निघून गेले लक्षातही आले नाही. फार दिवसांची इच्छा पूर्ण झाल्याचे समाधान मिळाले.

आज दुपारी सभा संपल्यानंतर व्हिएन्नाचे बाहेर फिरावयाला बाहेर पडलो.

या शहराच्या उत्तरेस वृक्षराजीने भरलेला पहाडी प्रदेश आहे. डॅन्यूब नदीपासून व्हिएन्नाचे ईशान्येकडे आल्प्स पर्वतांची जी रांग सुरू होते, त्याचा श्रीगणेशा म्हणा हवेतर, इथून सुरू होतो.

आम्ही जेव्हा या wood मध्ये गेलो तेव्हा बारीकसा पाऊस पडत होता. आभाळ ढगाळ होते. आसमंत धुक्याने भरले होते. आम्हाला वाटले दिवस उदासीन व व्यर्थ जाणार.

या वनराजीमधील एका Fisherman's रेस्टॉरॉंमध्ये आमचे दुपारचे जेवण घेतले. वातावरण कसे अगदी घरगुती आणि प्रसन्न होते. आधुनिक हॉटेलसमधील कृत्रिम व नखरेबाजपणाचे प्रदर्शन तेथे नव्हते.

जेवणे संपवून आम्ही बाहेर आलो तो वातावरण बदलून गेले होते. आकाश मोकळे झाले होते. स्वच्छ उन्हे पडली होती. हवेत वाऱ्यामुळे अर्थातच गारवा होता. या डोंगरमाथ्यावरून व्हिएन्ना शहराचे

सुरेख दर्शन होते. कितीतरी वेळ आम्ही हे सर्व पहात भटकत राहिलो. मनामध्ये कितीतरी दिवस घर करून राहतील, अशा काही घटका या होत्या, यात संशय नाही.

तेथून आम्ही एक विलक्षण नवी गोष्ट पहाण्याचे एकाएकी ठरविले. व्हिएन्नापासून २० मैलांवर Seegrottee (cave lake) म्हणून ठिकाण आहे ते पहाण्यास गेलो.

Gypsums च्या खाणीचे काम शंभर वर्षांपूर्वी येथे सुरू झाले होते. हजारो फुटांचे भुयार आहे. आत गेले म्हणजे जवळ जवळ दोन हजार माणसे काम करतील अशी विस्तीर्ण गुहा पसरलेली आहे. आत स्वच्छ पाण्याचे जणू काय कालव्यासारखे सरोवर झाले. या भुयारातील या सरोवरात छोटचा बोटींनी आम्ही प्रवास केला. मला तर सर्व प्रकार लोकविलक्षण वाटला.

१९४४ साली जर्मनांनी हा देश काबीज केल्यानंतर जेट विमानांची तयारी करण्याचा कारखाना येथे काढला होता असे माहीतगार सांगत होते.

आजचा सर्व दिवस फारच मजेत गेला. या सुंदर प्रदेशाच्या विस्तीर्ण रस्त्यावरून प्रवास करीत असताना एकदम तुझी आठवण झाली. इतकी सुंदर स्थळे निव्वळ तुझ्या प्रकृतीमुळे तू पाहू शकत नाहीस याची खंत वाटते. मला वाटते तू निर्धाराने हे प्रवास करण्याची तयारी केली पाहिजेस. प्रकृतीची कथा तर नेहमीचीच आहे. मी तेथे नसलो म्हणजे त्यामुळेच एकाकीपणाचे भावनेतून तू आजारी पडतेस. त्यापेक्षा बरोबर राहून काहीसा त्रास झाला तरी त्याची तीव्रता कमीच भासेल. माझ्या पुढच्या प्रवासात तुला येण्याचा आग्रह मी करणार आहे, हे आताच कळवून ठेवतो.

उद्या आम्ही परत संध्याकाळपर्यंत डॅन्यूब नदीच्या काठी भटकंतीसाठी जाणार आहोत. आज एक १२ व्या शतकातील Monastry पाहिली. उद्याही अशीच एक Monastry पहाणार आहोत. ॲम्बॅसिडर श्री. विष्णू त्रिवेदी सहकुटुंब या प्रवासात आमच्याबरोबर राहणार आहेत. उद्या संध्याकाळी ६ वाजता स्टॉकहोमला निघणार.

२३ एप्रिल, १९७२

आभाळ भरून आले आहे. पावसाची रिमझिम चालू आहे. वातावरण धुक्याचेच आहे. परंतु डॅन्यूबच्या खोऱ्यात सफर करण्याचा विचार आम्ही अमलात आणलाच.

सकाळी ९॥ वाजता सामानाची बांधाबांध करून हॉटेल सोडले. मेल्क Monastry पाहण्यासाठी बाहेर पडलो. हे ठिकाण व्हिएन्नाहून १२५-१५० किलोमीटर असावे. राजरस्त्याने वेगाने प्रवास सुरू होता. समुद्रसपाटीपासून ४००-५०० फूटच उंच, परंतु हिरव्यागार वनराजीने भरलेल्या डोंगराळ मुलुखातून हा रस्ता जात होता. उंच वृक्ष, हरित शेते, उजव्या बाजूने थोड्या अंतरावर चाललेली डॅन्यूब नदी असा हा सुरेख प्रवास होता.

मेल्क मोनॅस्ट्री हे एक ऐतिहासिक स्थळ आहे. त्याच्या पाठीमागे शेकडो वर्षांचा इतिहास आहे. आज असलेली मोनॅस्ट्री सतराव्या शतकात बांधलेली आहे. त्याच्यापूर्वीची अशीच मोठी असलेली इमारत पाडून नव्या बॉराक शिल्पपद्धतीने ही नवीन बांधली आहे.

मोनॅस्ट्री हे खरे म्हणजे धर्मशिक्षणाचे केंद्र. त्याच हेतूने ते बांधले होते. आजही तेथे धर्मगुरूंच्या शिक्षणाचे काम चालू आहे. परंतु धार्मिक लढयांसाठी आवश्यक असलेल्या किल्ल्याचे त्याचे स्वरूप होते असे म्हटले तर ते अधिक युक्त होईल. त्याचा तसा शेकडो वर्षांचा इतिहास आहे.

तुर्कांच्या कब्जातून जेरुसलेम मुक्त करण्यासाठी युरोपमधून जाणाऱ्या crusaders चे विश्रांतिस्थान होते. हा विशाल राजवाडाही आहे. ऑस्ट्रियाचे सम्राट-सम्राज्ञी येथे येऊन राहात असत.

एका सम्राटाने मधुचंद्रासाठीही येथे येऊन मुक्काम केला होता. त्यामुळे काही खोल्यांतील सजावट फारच कलापूर्ण व राजेशाहीची आहे. ऑस्ट्रियाची कर्तबगार सम्राज्ञी मेरिया थेरॅसो येथे येऊन राहात असे.

नेपोलियननेही येथे येऊन दोन वेळा मुक्काम केला होता. त्याच्या सुरेख हस्ताक्षरांतील एक पत्र येथील लायब्ररीमध्ये मुद्दाम आठवणीसाठी ठेवले आहे. जुने हस्ताक्षरांतील व इतर छापील सात-आठ हजार ग्रंथ येथील लायब्ररीत आजही आहेत.

डॅन्यूबच्या काठचा हा प्रासाददुर्ग आणि त्याच्या जवळून वाहणारी विशाल डॅन्यूब पाहून मन प्रसन्न झाले. सुमारे दीड-दोन तास ही मोनॅस्ट्री आम्ही पहात होतो. नंतर मोटारबोटीवर चढून डॅन्यूब ओलांडली. वर डॅन्यूबच्या काठाकाठाने जाणाऱ्या रस्त्याने परतीचा प्रवास सुरू केला.

नदीकाठाने, निसर्गसौंदर्याने बहरून गेलेल्या या प्रदेशातून प्रवास करताना अनेक आठवणींनी मन भरून आले. कवींनी व लेखकांनी वर्णिलेली मध्ययुगीन निळीभोर डॅन्यूब आज राहिलेली नाही.

औद्योगिक युगातील आजची डॅन्यूब ही वेगळी आहे. परंतु काठोकाठ भरून वेगाने वाहणारी नदी पाहिली की मला फार आनंद होतो. आषाढ-श्रावणात काठोकाठ भरून वाहणाऱ्या कृष्णा-कोयनेच्या काठच्या माझ्यासारख्या माणसाच्या मनात जुन्या काळच्या स्मृतींनी गर्दी केली तर आश्चर्य कसले !

वाटेत Hotel Schlob Durnstein या डॅन्यूब काठच्या छोटेखानी गावातील सुंदर हॉटेलमध्ये आरामशीर खाना घेतला. ॲम्बेसडर श्री. त्रिवेदी व श्रीमति त्रिवेदी आमची देखभाल करण्यासाठी बरोबर असल्याने आम्हास काहीही कमी नव्हते. थोडी विश्रांति घेऊन स्टॉकहोमचे विमान गाठण्यासाठी व्हिएन्नाच्या विमानतळाकडे त्या सुंदर रस्त्याने आमचा प्रवास पुन्हा सुरू झाला.

*

२० सप्टेंबर, १९७२.

येथे पोहोचून दोन दिवस झाले. जम्बो जेटचा प्रवास तसा सुखकर झाला. का कोण जाणे हे जाडजूड हत्तीसारखे प्रचंड विमान मला आवडत नाही हे खरे.

गडबडीच्या वार्ता होत्या. परंतु बेरूतला आम्ही उतरलो. बेरूत ते लंडन श्री. महाजन म्हणून विमानाचे कॅप्टन आले. साहजिकच आपले-पणाने बोलले. वागले.

जम्बोचे टेक्-ऑफ व लँडिंग ही दोन्ही त्यांनी आग्रहपूर्वक दाखविली. मधल्या काळात थोडावेळ आपल्या एअर-इंडियाच्या कारभाराबाबत काही कहाण्याही सांगितल्या. राष्ट्रीयकृत संस्थांमध्ये संस्थानिकांसारखी नोकरशाही कशी वाढते आहे, त्याची काही नमुनेदार उदाहरणेही दिली.

मुंबईच्या एअर-इंडियाच्या प्रमुख कचेरीचा एक संपूर्ण मजला दोन-तीन ऑफिसरच्या कचेरीसाठी कसा वापरला जातो वगैरे गोष्टी ऐकून आश्चर्य वाटले. त्याच्या तपशीलात जाण्याचे मी ठरविले आहे. याच संदर्भात त्यांनी स्टेट बँकेचाही उल्लेख केला.

फ्रँकफर्ट—पॅरिस मार्गे थांबत थांबत आलो. मात्र या वेळी विमान सोडून बाहेर जाता आले नाही. म्यूनिक आलेंपिकच्या कत्तलीपासून बंदोबस्त फारच कडक केला आहे.

लंडनच्या गेल्या आठ वर्षांत अनेक फेऱ्या झाल्या. परंतु हॉटेल-मधला लांबलचक मुक्काम हाच पाहिला. इंग्लिश स्टाइलचे हे जुने व प्रसिद्ध हॉटेल आहे (Claridges). सरकारी व्यवस्था उत्तम आहे. तूही सोबतीला असणार या कल्पनेने त्यांनी सर्व व्यवस्था केली होती....पण... कशी आहे तुझी प्रकृति ? उगीच माझी काळजी करून प्रकृतीस त्रास करून घेऊ नकोस.

गेल्या दोन दिवसांत दोन वेगवेगळ्या ठिकाणी लंडनच्या बाहेर जाऊन आलो. पहिल्या दिवशी कँटरबरीच्या इतिहासप्रसिद्ध कॅथिड्रलला भेट दिली. श्री. अप्पासाहेब पंत साथीला होते.

इंग्लंडमधील प्रत्येक गोष्टीला काही ना काही इतिहास असतोच, असे म्हटले तरी चालेल. मग हे तर इतिहासप्रसिद्ध स्थान ! १२ व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंत येथे अनेक घडामोडी झालेल्या आहेत.

धर्मकारण व राजकारण या दोन्ही क्षेत्रांतील संघर्ष व त्यांचे अवशेष आणि स्मृति येथे पहावयास सापडतात. याचे बांधकाम दोन-तीन शतकभर वेगवेगळ्या स्थापत्यप्रणालीप्रमाणे झाल्यामुळे ते एकजिनसी दिसत नाही. परंतु त्याची विविधता हे त्याचे सौंदर्य म्हटले पाहिजे.

इंग्लंडच्या इतिहासात जसे अनेक राजे व राण्या यांचे वध झालेत त्याचप्रमाणे प्रमुख धर्मगुरूही ( आर्च-बिशप ) बरेचसे मारले गेले आहेत. या विस्तीर्ण व विशाल वास्तूमध्ये हिंडत असतांना इतिहासाच्या दालनांतून प्रत्यक्ष फेरफटका करीत आहे अशी भावना होते. एक वृद्ध धर्माधिकारी आमच्या सोबतीला माहिती देण्यासाठी होते. विद्वत्ता, आतिथ्य, नर्मविनोद याचा सुंदर संगम या माणसात दिसला.

कालचा जवळ जवळ संपूर्ण दिवस ब्राईटन या इंग्लंडच्या दक्षिण किनाऱ्यावरील शहराला भेट देण्यात गेला. लंडनपासून साधारणतः ६० मैल दूर आहे हे ठिकाण. गेल्या दीड-दोनशे वर्षांत समुद्रकाठचे प्रवासी केंद्र म्हणून याची वाढ झाली आहे.

चौथ्या जॉर्जने येथे आपल्यासाठी एक राजवाडा बांधला आहे. (Royal Pavalion) १९ व्या शतकाच्या प्रारंभी मोंगल व चीनी स्थापत्याचे संस्कार झाल्यामुळे या राजवाड्याच्या बांधकामाची शैली संपूर्ण पौर्वात्य आहे. ही एकच इमारत इंग्लंडचे पूर्वेशी आलेल्या संबंधाची साक्षीदार असावी असे वाटते.

समुद्रकिनाऱ्यावर मैल नि मैल सुरेख रस्ता आहे. एका बाजूला जुन्या विविध तऱ्हेच्या शानदार इमारतींची रांग आहे. या रस्त्यावरून जाताना मुंबईच्या मरीन ड्राईव्हची आठवण झाली. या रस्त्यालाही येथे मरीन ड्राईव्हच म्हणतात. परंतु दोन्हींमध्ये फरक फार जाणवला. मुंबईच्या मरीन ड्राईव्हवरची घाई गर्दी, गोंधळ एकीकडे आणि येथील प्रशांत वातावरण दुसरीकडे. नवीन म्हणून का असेना हा मरीन ड्राईव्ह काही दिवस येऊन राहण्यासारखा वाटला.

लंडनबाहेरचा प्रवास अधिक सुखकर वाटला. अधून मधून हिरवीगार गवताची शेती, योजनापूर्वक राखलेली वृक्षराजी, यामुळे डोळयांना एक वेगळेच समाधान लाभते. परंतु तुलनेने पाहिले तर ऑस्ट्रियामध्ये डॅन्यूबच्या काठाने केलेला प्रवास व त्या आसमंताचे सौंदर्य कितीतरी पटीने जास्त आहे हे स्पष्ट जाणवते.

काल संध्याकाळी येथे पोहोचताच ' इंडिया लीग ' मध्ये भाषणासाठी गेलो. स्वातंत्र्यपूर्व काळापासून या संस्थेने येथे भारताच्या सेवेसाठी फारच काम केले असल्यामुळे ही एक प्रमुख प्रातिनिधिक संस्था मानली जाते.

श्री. कृष्णमेनन यांनी या संस्थेची खूपच जोपासना केली होती. कालही माझ्या स्वागतासाठी झालेल्या सभेसाठी त्यांनी मुद्दाम संदेश पाठविला होता. याचा अर्थ, दिल्लीत राहूनही लंडनमधील संस्थेशी आजही त्यांनी जिव्हाळयाचे संबंध ठेवले आहेत.

सिल्व्हरमन हे पार्लमेंटचे सदस्य सभेचे अध्यक्ष होते. प्रमुख भारतीय लोक, अनेक वृत्रपत्रांचे प्रतिनिधि, काही प्रमुख इंग्लिश मंडळी असे सर्वजण हजर होते.

या सभेचे ठिकाणी श्री. सिद्धार्थ शंकर रे यांचे सासू-सासरे भेटले. त्यांचे सासरे बॅरिस्टर आहेत. अजूनही प्रॅक्टिस चालू आहे. सासूबाई नुकत्याच हिंदुस्थानमध्ये जाऊन जावई मुख्यमंत्रि झाल्याचे आपल्या डोळयांनी पाहून आलेल्या. त्यात लेक संसदसदस्य झाली आहे याचा अभिमान. अगत्याने त्या माया रे हिच्या पार्लमेंटच्या कामाची चौकशी करीत होत्या.

आजपासून परिषदेच्या कामाच्या पूर्वतयारीस खऱ्या अर्थाने लागणार. बांगला देशचे अर्थमंत्री जनाब ताजुद्दिन आणि इंग्लंडचे अर्थ मंत्री श्री. बार्बर यांच्याशी आज भेट होणार आहे.

जमले तर दुपारनंतर शहरात थोडेसे भटकणार आहे. विशेषतः येथे एक प्रसिद्ध बुक-शॉप आहे. तेथे चक्कर मारावी म्हणतो. निदान पुस्तके पाहून घेईन. खरेदी करण्याची शक्यताच नाही. तेवढेच नेत्रसुख.

प्रकृति उत्तम आहे. २३ येथून तारखेस सकाळी वॉशिंग्टनला जाण्यासाठी निघेन.

※

## १७ वॉशिंग्टन

२५ सप्टेंबर, १९७२

वॉशिंग्टनहून लिहितो आहे. लंडनमध्ये शेवटचे तीन दिवस, एकदा परिषदेचे काम सुरू झाल्यानंतर इतक्या गर्दीचे व धावपळीचे गेले की, निवांतपणे बसून लिहिणे शक्य झाले नाही.

अर्थमंत्र्यांच्या या परिषदेत बरेच नवे चेहरे दिसले. हे खातेच असे आहे की, तेथे फार दिवस राहणे अवघड आहे, असे अनेकांनी बोलून दाखविले. जुन्यांच्या गाठीभेटींनी आनंद वाटला. नव्यांचा नवेपणा जाणवेल अशा तऱ्हेने ते वागत होते.

ही परिषद म्हणजे वॉशिंग्टनच्या ( I. M. F. )* परिषदेची रंगीत तालीमच म्हटली पाहिजे. अनेक गोष्टींवर बहुतेकांचे सहमत असल्याचे स्पष्ट झाले. मला वाटते, या परिषदेचा हाच सर्वांत मोठा फायदा म्हटला पाहिजे.

या सर्व गडबडीत मी दोन नाटके पाहिली. लंडनची रंगभूमी हे माझे सर्वांत मोठे आकर्षण आहे. दोन्ही नाटके अगदी वेगवेगळ्या स्वरूपाची पण रंगतदार होती.

1) The man आणि 2) My father knew Lloyd George.

अभिनयातील सहजता, आधुनिक तंत्रामुळे आलेली वास्तवता, कथेतील स्वाभाविकता, – नाटकाचे अंक दोन. दोन अंकांत सर्व मिळून

---

* International Monetary Fund ( I. M. F. ) परिशिष्ट पहा.

चार प्रवेश. दोन अडीच तासांत सर्व काही संपते. एक नवा आनंद घेऊन प्रेक्षक बाहेर पडतो. कित्येक नाटके दोन दोन वर्षे सतत चालली आहेत. या रंगभूमीला पल्लेदार इतिहास आहे. काळाने आलेली परिपक्वता आहे. कलाकारांची जाणीव आणि व्यासंग या सर्व गोष्टींनी नाटचकला येथे सदा बहरलेली असते.

कॉमनवेल्थ मिनिस्टर्सना श्री. बार्बर (इंग्लंडचे अर्थमंत्रि) यांनी हॅम्टन कोर्टमध्ये खाना दिला. खाना महत्त्वाचा नव्हता. हॅम्टन कोर्ट महत्त्वाचे होते.

लंडनच्या बाहेर २०–२२ मैलांवरील ८ व्या हेन्रीचा हा राजवाडा. एक ऐतिहासिक वास्तू म्हणून प्रवाशांचे आकर्षण आहे. पंधराव्या शतकातील ८ वे हेन्री म्हणजे एक विलक्षण प्रकरण होते. अनेक लग्ने केली. अनेकांच्या मिळकती हडपल्या. हॅंप्टन कोर्ट त्यापैकीच. ( Col. Woolsay ) म्हणून त्यांचे हस्तक एक धर्माधिकारी होते. त्यांनी तो स्वतःसाठी बांधला होता. राजाची लहर लागली आणि ते मर्जीतून उतरताच, दडपण आणून वास्तू आपलीशी केली. मोठमोठी आणि लागोपाठ अशी तीन प्रांगणे ( court-yards ), एक कलापूर्ण दिवाणखाना, जुनी ५०० वर्षांपूर्वीची अजूनही रेखीवपणे राखलेली सुंदर बाग, जुन्या चित्रकारांनी काढलेल्या कलाकृति आणि जुन्या शस्त्रांनी सजविलेल्या राजवाडयाच्या भिंती, ही सर्व मला वैशिष्टचपूर्ण वाटली.

या खान्यामध्ये श्री. Knoff म्हणून अर्थखात्याचे राज्यमंत्री माझ्या शेजारी बसले होते. एक मजेदार नवी ओळख म्हणूनच उल्लेख करतो आहे.

सरकारी कामकाजाच्या गोष्टी यांच्याशी बोलण्यात मला फारसा रस नव्हता. म्हणून इतरच गोष्टी निघाल्या. त्याच्या चार पाच पिढ्या हिंदुस्थानात ब्रिटिश सैन्यात अधिकारीपदावर काम करीत होत्या. याचा उल्लेख करण्याने मला अवघड वाटेल म्हणून तो ते टाळीत होता. मी म्हटले तो आता जुना इतिहास झाला आहे. आज तशी वैयक्तिक कटुता आमच्यात राहिलेली नाही. तेव्हा स्वारी कुठे खुलली आणि मोकळेपणाने बोलू लागली.

तो गेली ६ – ८ वर्षे पार्लमेंटचा सभासद आहे. त्याच्या मतदार-संघात साठ हजार लोकसंख्या आहे. माझ्या मतदारसंघाची लोकसंख्या कमीत कमी ६–७ लाख असेल असे मी म्हटले तेव्हा तो थोडा चकितच झाला. दिल्लीपासून साधारणतः एक हजार मैलांवर दूर माझा मतदार-संघ आहे हे सांगितल्यावर तर तो सर्दच झाला. मतदार-संघाशी घनिष्ट संबंध ठेवणे कसे शक्य होते – विशेषतः मंत्रिपदावर राहून संपर्क ठेवणे जमते का असे त्याने विचारले. मी म्हटले, अजून लोकांची कृपा आहे म्हणून जमते.

परंतु ज्या तऱ्हेने इंग्लंडमध्ये ते मतदारसंघाशी संपर्क ठेवतात तसा निदान मी तरी ठेवू शकलो नाही, हे मी त्याचेजवळ कबूल केले.

लंडनपासून ६०–७० मैलांवर त्याचा मतदार-संघ आहे. मतदार लहान-सहान सर्व कामे घेऊन येतात. सामान्यतः सर्व सुखी शेतकरी आहेत. तसे म्हटले तरी लहानच. ३५–४० एकरांची शेती असते. परंतु एक कुटुंब सुखाने राहू शकते असे तो म्हणाला.

पण सर्वांत आश्चर्याची गोष्ट त्याने सांगितली ती अशी – त्याच्या मतदार-संघातील सर्व, वंशदृष्ट्या, इंग्लंडमधील इतर लोकांपेक्षा अलग आहेत. त्यांची बोलीही वेगळी आहे. अजून इंग्लंडच्या सर्वसामान्य जीवनप्रवाहाशी एकरूप न झालेला हा समाज आहे.

दूर राहून हे सर्व बारकावे आपल्याला समजत नाहीत. अँग्लो सॅक्सन्सचा हल्ला झाला तेव्हा त्याचे हे लोक मध्य इंग्लंडमधून काढून लावले. तेथून ते समुद्रकिनाऱ्याशी जाऊन आज कित्येक शतके तेथेच शेती करीत राहिले आहेत.

त्यांचे लग्नसंबंधही त्यांनी आपल्यापुरतेच मर्यादित आणि बंधनात परवा परवापर्यंत ठेवले होते. काही प्रमाणात आजही तीच प्रथा आहे. एक प्रकारची जातपातच म्हणाना ! त्याने स्वतः मात्र एका युगोस्लाव्हियन युवतीशी विवाह केला आहे. याचा त्याने अभिमानाने उल्लेख केला. खाण्यानंतर, ओठावर व डोळ्यांत खेळकर हास्य असलेल्या एका सुन्दर तरुणीशी 'ही माझी पत्नी' म्हणून ओळखही करून दिली. असा हा आमचा हॅम्प्टन राजवाड्यावरील खाना आरामात पार पडला. ❋

सप्टेंबर २६, १९७२

ही सर्व हकिगत लंडनची झाली. दि. २३ ला दुपारी एक वाजता निघून साडेसात तासांच्या प्रवासानंतर वॉशिंग्टनच्या ४ वाजता, पॅन अमेरिकन सर्व्हिसने एकदाचे वॉशिंग्टनला पोहोचलो.

गेले चार दिवस कसलीच उसंत नाही. अनेक कार्यक्रमांनी गच्च भरलेले होते. आलो त्या दिवशी ऑफिसर्सशी डेलिगेशनसह चर्चा झाली. २४ ला G. 24 * ची मीटिंग झाली. २५ ला I.M.F. वर्ल्ड बँकेची बैठक झाली. प्रेसिडेंट निक्सन १५ मिनिटांचे भाषण देण्यासाठी मधेच येऊन गेले.

I.M.F. चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. स्वाइट्झर (Pierre-Paul Schweitzer) (दिल्लीला सहकुटुंब आपणाला भेटले होते. त्यांच्याबरोबर त्यांची मुलगी पाहिल्याचे आठवत असेल. तिला पॅरिसमध्ये कोणी गुंडाने हल्ला करून सुऱ्याने वार केले होते. परंतु ती आता सुखरूप आहे असे तिचे वडील मी त्यांना भेटलो तेव्हा सांगत होते.) यांचे उत्तम भाषण झाले.

गेल्या संबंध वर्षात या माणसाची आंतरराष्ट्रीय कर्तबगारी नजरेत भरण्यासारखी झाली. अमेरिकेला चार शब्द–शहाणपणाचे–त्यांना सांगावे लागले. परंतु त्यामुळेच अमेरिका त्यांच्यावर नाराज असून त्यांच्या जागेवरून त्यांना बाजूला काढण्याची कारवाई सुरू केली आहे. त्याची प्रतिक्रिया अशी झाली की, ते भाषणासाठी उभे राहिले तेव्हा प्रेसिडेंट निक्सनपेक्षा कितीतरी अधिक असे स्वयंस्फूर्त टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत झाले.

श्री. मॅक्नामारा ( जागतिक बँकेचे अध्यक्ष ) उत्तम बोलले. त्यांचे भाषण म्हणजे आपल्या काँग्रेस पक्षाचा ‘ गरीबी हटाव ’ चा जाहिरनामाच होता म्हणाना !

---

* G. 24 : Inter-Governmental Group of 24. परिशिष्ट पहा.

काल संध्याकाळी स्वातंत्रदिनाच्या २५ व्या वर्धापन-दिनाच्या निमित्ताने राजदूत-निवासावर रिसेप्शन आखले होते. अनेक अमेरिकन पुढारी, पत्रकार हजर होते. मोठा गोड, आकर्षक मेळावा होता. अमेरिकन सरकारतर्फे मैत्रीचा ' टोस्ट ' देण्यासाठी श्री. इर्विन होते. उत्तरादाखल मी बोललो. भूतकाळ विसरून संबंध सुधारण्याची आमच्या देशाची इच्छा आहे, हे मी आग्रहपूर्वक सांगितले.

सामान्यपणे अमेरिकन धोरण भारताला अनुकूल नाही. त्यांच्या मनामध्ये किंतु आहे. त्यांच्या अर्थमंत्र्यांना मी आज भेटलो. त्यानंतरही माझ्या मनावर तोच परिणाम राहिला. त्यांच्या जागतिक डावपेचांच्या आराखड्यामध्ये भारताला महत्त्वाचे स्थान नाही. मोठी काळजी वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण करावयास हे लोक मागेपुढे पाहतील असे वाटत नाही. फार सावधानतेने राहिले पाहिजे.

वार्षिक बैठकीमध्ये आज संध्याकाळी ५ वाजता भारतातर्फे निवेदन केले. आता रात्री केनेडी सेंटरवरील कॉन्सर्ट ऐकून परत आलो आणि हे लिहिणे पुरे केले.

※

## १९ सॅन्‌फ्रॅन्सिस्को

१ ऑक्टोबर, १९७२

काल दुपारी वॉशिंग्टनहून येथे पोहोचलो. अमेरिकेमधील अति सुंदर शहरांपैकी एक अशी या शहराची ख्याती आहे.

१९६४ साली पश्चिम किनाऱ्यावर लॉसएंजिलिस येथे मी काही दिवस काढले होते. त्या वेळीही त्या वेळचे भारतीय राजदूत (श्री. मेनन) आग्रहाने मला या म्हणत होते. परंतु जमले नव्हते. खऱ्या अर्थाने पॅसिफिक सागराच्या किनाऱ्यावरील एक रमणीय शहर आहे, यात शंका नाही.

सागराचे पाणी डोंगराळ भागात आत घुसून एक छोटासा उपसागर झाला आहे. त्याच्या आवतीभोवतीच्या टेकड्यांवर शहर वसले आहे. शहराचे रस्ते बरेचसे चढउताराचे आहेत. तसे शहर दोनशे वर्षांचे आहे. फार जुना इतिहास नाही.

येथे पोहोचताच या शहराचे मेयॉर यांचे प्रतिनिधि विमानतळावर भेटले. एक छोटासा अनौपचारिक स्वागत-समारंभ करून सन्मानदर्शक ‘ Key of Sanfransisco ’ अर्पण केली.

शहराची किल्ली पाहुण्यांना देऊन त्यांचा सत्कार करण्याची येथे पद्धत आहे. ही किल्ली भली मोठी आहे. मी त्यांच्याकडे चौकशी केली तेव्हा दोनशे वर्षांपूर्वी येथे पहिले चर्च बांधले, त्या चर्चच्या किल्लीची ही प्रतिकृति आहे असे त्यांनी सांगितले.

सर्व शहरभर भटकलो. नवी अमेरिका तिच्या उंच इमारतींच्या रूपाने वाढते आहे यात शंका नाही. पण जुन्या मेक्सिकन, स्पॅनिश संस्कृतीचा ठसा दिसेल असा, शहराचा काही विभाग आहे. चिनी लोकांची येथे बरीच वस्ती आहे. ‘ चायना टाऊन ’ म्हणून येथे एक प्रसिद्ध विभाग आहे. हे सर्व लोक कम्युनिस्ट चीनचे विरुद्ध आहेत असे दिसते. कारण काल त्यांचे पेकिंग-राजवटीविरुद्ध एक निदर्शन होते. आज कम्युनिस्ट चायनाचा राष्ट्रीय दिन आहे. त्या निमित्ताने व जपान आणि चीनच्या नव्या मैत्रीच्या निषेधार्थ हे निदर्शन योजिले होते. मला तर हे सर्व अवास्तव व कृत्रिम वाटते. परंतु हा त्यांचा प्रश्न आहे.

शहराच्या वेगवेगळ्या भागांना जोडणारे पूल आहेत. हे पूल म्हणजे प्रचंड, अतिप्रचंड अशा शब्दांनी वर्णन करावेत असे आहेत.

‘ गोल्डन गेट ब्रीज ’ वरून आम्ही पलीकडे गेलो. एक नमुनेदार – म्हणजे एकदम वेगळ्या पद्धतीचे कलाकेंद्र पाहिले. ( आर्टस् सेंटर ). ४०-५० कलाकार येथे राहतात किंवा काम करतात. सरकारी मदत घेत नाहीत. शिल्प-चित्रे व इतर अनेकविध कलाकृति, सर्व आपली साधने हातांनी बनवून तयार करतात.

नृत्याचे व इतर कलांचे शिक्षण घेण्यासाठी शेकडो लोक – स्त्रिया पुरुष– आठवड्यात एक-दोन वेळा त्यांच्या सोयीप्रमाणे येतात.

आम्ही गेलो त्या वेळी एका मोठ्या खोलीमध्ये विविध तऱ्हेने सजलेल्या स्त्रियांचे नृत्याचे शिक्षण चालू होते. मला त्यांच्या वेषभूषेवरून सिनेजगतातील स्त्रिया असाव्यात असे वाटले. केंद्राचे डायरेक्टर – एक तल्लख तरुण अमेरिकन स्त्री – बाईंना तसे विचारलेही. परंतु तिने No-No असे डोळे विस्फारून आश्चर्य व्यक्त करून सांगितले.

या सर्व संसारी स्त्रिया ( होम वाइव्हज् ) आहेत. शरीराची बांधणी आकर्षक रहावी, वेळ जावा, नवीन शिकावे, आपल्या पतीचे मन सतत आकर्षित ठेवावे या हेतूने अनेक संसारी स्त्रिया हे नृत्य शिकतात. नृत्य पाहण्यासारखे होते. तालबद्ध पद्धतीने शरीराची ठसकेबाज हालचाल करणारे हे लोकनृत्य असावे.

Muir wood म्हणून येथील एक प्रसिद्ध नैसर्गिक ' उद्यान ' आहे. जुने प्रचंड वृक्ष – एकदम सरळ उंच. काही काहीतर १५० – २०० फुटांपर्यंत उंच असावेत. Red wood चे हे वृक्ष आहेत. काही ५०० वर्षांपेक्षाही जास्त जुने असावेत, असे सांगितले गेले.

येथील हे उंचच्या उंच सरळ वृक्ष पाहिल्यानंतर काश्मीरमधील अशा उंच झाडांची आठवण झाली. श्री. सुचितला बॅनर्जी माझेबरोबर होते. ते काश्मीरमध्ये कमिशनर असताना मी गेलो होतो. त्याची आठवण करून दिली, तेव्हा त्यांनी त्या वेळी मला सांगितलेल्या एका गोष्टीचे स्मरण करून दिले.

" काश्मीरमध्ये या झाडांच्या खेरीज ' सरळ ' असे दुसरे काहीच नाही. आणि ती सरळ झाडेही पोकळ आहेत."

परंतु इथली झाडे उंच आणि खंबीर आहेत. अर्धा-एक तास या वनराजीमध्ये निवांत भटकलो व हॉटेलकडे परतलो. विजेच्या झगझगाटाने शहर रंगले होते. उंच टेकडीवरून शहराचे दृश्य अत्यंत विलोभनीय वाटले.

रात्री येथील राजदूत श्री. भुतानी यांच्या घरी भोजनास गेलो होतो. या शहरातील वेगवेगळ्या क्षेत्रांतील प्रमुख लोक होते. बँकर्स, सायंटिस्ट, उद्योगपति, शिक्षणक्षेत्रात कार्य करणाऱ्या एक-दोन प्रसिद्ध स्त्रिया अशी मंडळी होती.

गेली दहा वर्षे अमेरिकेच्या अॅटॉमिक कमिशनचे अध्यक्ष असलेले आणि प्रसिद्ध नोबल प्राइझ मिळविणारे वृद्ध शास्त्रज्ञ मुद्दाम आले होते. हे वृद्ध दांपत्य मोठे मनमिळावू वाटले. जास्त जबाबदारीचे काम नको म्हणून आपल्या मुक्त युनिव्हर्सिटीमध्ये संशोधनाचे व अध्यापनाचे आपले प्रिय कार्य त्यांनी पुन्हा सुरू केले आहे. देश मोठा होतो तो अशा माणसां-मुळे व त्यांच्या ज्ञाननिष्ठतेमुळे.

आज दुपारी येथून होनोलुलूला निघेन. तोपर्यंत बे-ब्रीज, आणि रिचमंड ब्रीज ओलांडून बर्कले युनिव्हर्सिटी पाहून येईन.

काल सायंकाळी सॅन्फ्रॅन्सिस्को विश्व-विद्यालयामधील Phelan Hall मधील राज्यातील हिंदी रहिवाशांनी स्वागत केले. गुजरात, पंजाब-मधील बरीच मंडळी होती. चार-दोन महाराष्ट्रीयही भेटले. दोन पंजाबी धनिक भेटले. जमीनधारणेच्या विरुद्ध तक्रार करीत होते. अमेरिकेत ते रहात असले तरी त्यांची पंजाबमधील जमीनीची मालकी राहिली पाहिजे असे ते तावातावाने बोलत होते. दोन घोड्यांवर स्वारी करता येणार नाही असे हसत उत्तर देऊन मी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. परंतु फारसे यश आले नाही.

१९१०–११ साली हिंदी स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणारे, 'गदर पार्टीचे' एक प्रमुख गोविंद बिहारीलाल हे या स्वागत-समारंभाचे अध्यक्ष होते. वय ८० च्या वर आहे. परंतु तरतरीत दिसले. गेल्या एक-दोन वर्षांपूर्वीच त्यांना पद्मभूषण देऊन गौरविले आहे. किती दूरपर्यंत स्वातंत्र्यसंग्रामाचे सैनिक निष्ठेने काम करीत होते हे पाहिले म्हणजे हृदय भरून येते.

येथील हे फेअर माऊंट हॉटेल एक प्रसिद्ध हॉटेल आहे. आधुनिक सर्व साधने आहेत. परंतु सर्व वातावरण जुन्या राजवाड्यासारखे आहे. या उंचीवरून हे सुंदर शहर विजेच्या प्रकाशाने नटलेले दिसत आहे. दूर उपसागराचे दर्शन होत आहे. या प्रशांत अशा सकाळच्या लवकरच्या प्रहरात, प्रशांत सागराच्या किनाऱ्यावर बसून लिहिण्यात मोठा आनंद आहे.

घर सोडून दोन आठवडे झालेत. खरे म्हणजे प्रवासाच्या धावपळीचा काहीसा कंटाळाही आला आहे. आता पुन्हा होनोलुलूहून लिहीन.

✻

## २० होनोलुलू

२ ऑक्टोबर, १९७२

आज गांधीजींचा जन्मदिन. घरापासून हजारो मैल दूर, काल रात्री आम्ही तो साजरा केला.

सॅन्फ्रॅन्सिस्कोहून काल विमान तीन तास उशीरा निघाले. त्यामुळे येथील लोकांची मोठी गैरसोय झाली. त्यांनी स्वागत-समारंभ व नंतर जेवण ठेवले होते.

विमानतळावरून मिसेस् वाटूमल, – येथील भारताच्या कौन्सल – यांनी आपल्या गाडीतून ईस्ट–वेस्ट– सेंटर मधील या समारंभ-स्थळी आणले. या बाई आपल्या पतीच्या मागे भारताचे प्रतिनिधित्व करीत आहेत.

अमेरिकन आहेत त्या. वय ७२–७३ असावे. छोटीशी मूर्ति परंतु अपूर्व उत्साह. स्वतः मोटार चालवीत १०–१५ मैलांच्या प्रवासात मला सर्व काही स्थानिक माहिती आणि कार्यक्रमाची रूपरेखा सांगितली.

मी अर्धा-एक तास भारतीय परिस्थितीवर बोललो. भारतीय बरेचसे होते. अमेरिकन्सही काही होते. वॉशिंग्टन पोस्टचा सेलीम हॅरिसन आपल्या पत्नीसह हजर होता.

दिल्लीनंतर त्यांची येथे भेट झाली. आम्हा दोघांनाही आश्चर्य आणि आनंद वाटला. वॉशिंग्टन येथील प्रेस क्लबमधील माझ्या भाषणात त्याच्या ' डेंजरस डिकेड 'चा उल्लेख केला होता. तो त्याच्या

पाहण्यात आलेला दिसला. काही महाराष्ट्रीय तरुण शिक्षणासाठी आलेले भेटले. एक तरुण 'काका' म्हणत जेव्हा जवळ आला तेव्हा तर फारच आनंद झाला.

रॉयल हवाईन हॉटेल मध्ये उतरलो आहे. या शहरात असंख्य राजेशाही हॉटेल्स आहेत. सबंध हवाईची लोकसंख्या दहा लाख; तर दरसाल १० ते १५ लाख बाहेरून येतात.

समुद्रकाठी हॉटेलची रांगच रांग आहे. आता मी अथांग पसरलेला समुद्र व रेशमी वाळूचे लांबच लांब पसरलेले बीच पहात पहात माझ्या खोलीत बसून हे लिहीत आहे.

मुंबईसारखी हवा, जुहूसारखे वातावरण, मरीनड्राईव्हसारखा रस्ता. नेहरू शर्ट चुरीदार घालून बीचवर फेरफटका मारून आलो.

दुपारी ४ वाजता जपानसाठी प्रस्थान ठेवायचे आहे. त्यापूर्वी पर्ल हार्बर पाहून येणार आहे. आणखीही काही प्रेक्षणीय स्थळे पाहीन म्हणतो. वेळ थोडा आणि पाहण्यासारखे फार ! जमेल तेवढे पहावे.

काही घ्यावे म्हणून येथील दुकानात गेलो. भरमसाठ किंमती. येथील लाकडात कोरलेली एक सुंदर कलाकृति फार आवडली. किंमत ६५० डॉलर्स म्हणजे जवळ जवळ पाच हजार रुपये. म्हटले रामराम ! निदान नेत्रसुख तरी लाभले. ❊

## २१ वॉशिंग्टन

( हॉल ऑफ दि अमेरिका )

२६ मार्च, १९७३

मला येथे येऊन चार दिवस झाले. लिहावे असा विचार करीत होतो. परंतु आज सुरू होणाऱ्या परिषदेची तयारी व पूर्वचर्चा यासाठी पुष्कळ वेळ द्यावा लागला.

भारतीय अधिकाऱ्यांशी चर्चा करावयाची होती. त्याचबरोबर या कमिटीवरील आमच्या कॉन्स्टिटचूअन्सीचे सदस्य आणि श्रीलंकाचे अर्थमंत्री डॉ. परेरा यांच्याशी आणि विकासशील (डेव्हलपिंग) देशांचे प्रतिनिधींशीही चर्चा करावयाच्या होत्या.

G 24 ची सभा उत्तम झाली. विकासक्षम देशांचे ऐक्य दर्शविण्याचा तो एक प्रयत्न होता. तो बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाला.

C 20 वरील डेव्हलपिंग देशांच्या प्रतिनिधींना मी 'वॉशिंग्टन हिल्टन' मध्ये खाना दिला. त्या वेळच्या चर्चेमध्ये भारताचा दृष्टिकोन स्पष्ट करण्याची आणि त्यांना त्या दिशेने प्रयत्न करण्याची विनंती करण्याची उत्तम संधी मिळाली.

या खान्याचे निमंत्रण C 20 चे अध्यक्ष श्री. अलिवर्धन यांना दिले होते. ते आलेही होते. हा तरुण मंत्री त्यांच्या देशाच्या आजच्या प्रो-अमेरिकन धोरणामुळे फार सावध बोलत होता. प्रगत देशांच्या भावना न दुखवता आपले प्रश्न मांडावेत असा त्यांचा सल्ला होता.

सावधानता मी समजू शकतो. परंतु शरणागती स्वरूपाचे पडखाऊ धोरण विकासशील देशांच्या आर्थिक भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत घातक ठरेल. विशेषतः आज नवे धोरण आखण्याचा एक संघटित प्रयत्न करण्याची ऐतिहासिक संधी आम्हास प्राप्त झाली असताना, जर आम्ही त्याचा योग्य उपयोग याच वेळी केला नाही तर, इतिहास आम्हाला क्षमा करणार नाही, हे माझे विचार त्यांना मी ऐकवले. किती उपयोग झाला कोण जाणे ?

आज सभा उत्तम वातावरणात सुरू झाली. रात्री अमेरिकन अर्थमंत्र्यांचे भोजन आहे. तेथे अनौपचारिक चर्चा होईल, त्यावेळी Blair House मध्ये काही महत्त्वाचे निर्णय घ्यावेत असा प्रयत्न निश्चित होईल.

---

'C 20' The Committee of Twenty consisted of Finance/Governors of Central Bank representing the twenty constituencies.

– परिशिष्ट पहा

श्री. बार्बर माझ्याशेजारी सभेत आहेत. हा धूर्त इंग्रज, मी विचारले तेव्हा म्हणतो की "मी सब्स्टॅन्सिअल प्रश्नावर बोलावयाचे नाही असे ठरविले आहे. वर्क प्रोग्रॅमवर बोलावे असा विचार आहे."

इतरांना बोलू द्यावयाचे व आपणास जे करावयाचे ते करीत राहावयाचे ही त्यांची नित्याची नीति आहे. पाहू या काय होते ते.

धनी देश सर्व प्रश्न बरेच दिवस लोंबकळत ठेवण्याची नीति अवलंबतील, तर आम्हा लोकांना नैरोबीची वार्षिक सभा होण्यापूर्वी मोनॅटरी सिस्टिमची मूलतत्त्वे निश्चित ठरविण्याची घाई आहे. शक्यतर जुलैमध्ये पुन्हा एकदा मिनिस्टर्सची सभा व्हावी असा आमचा आग्रह आहे.

उद्याचा एक दिवस येथे थांबून परवा संध्याकाळी न्यूयॉर्कहून निघेन. बारा तास न्यूयॉर्कमध्ये मिळतील. या शहरामध्ये बारा तासांपेक्षा जास्त वेळ मिळू नये असाच योग दिसतो.

वॉशिंग्टनला ही माझी चौथी भेट. या वेळी प्रथमच मी हॉटेलमध्ये ( वॉशिंग्टन हिल्टन ) उतरलो आहे. श्री. एल्. के. झा हे हिंदुस्थानमध्ये पुढच्या आठवड्यातच, आपली येथील कामगिरी पुरी करून परत चालले आहेत. त्यांची घरची आवराआवर सुरू आहे. त्यामुळे नेहमीप्रमाणे त्यांच्याकडे उतरलो नाही.

श्री. झा यांनी त्यांच्या घरी, सेक्रेटरी ऑफ स्टेट, श्री. रॉजर्स यांना प्रयाणापूर्वीची मेजवानी दिली. त्या वेळी मात्र त्यांनी आग्रहाने बोलाविले होते. थोडी पण निवडक मंडळी हजर होती. श्री. मॅक्नामारा, काही सिनेटर्स, मेयर व काही प्रमुख राजदूत.

श्री. मॅक्नामारा फारच स्पष्ट बोलत होते. विशेषतः अमेरिकेतील वरिष्ठ वर्गावरील कर कमी केल्याबद्दल निक्सन-राजवटीवर त्यांनी कडक टीका केली. त्यातून आजचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत असे त्यांचे म्हणणे. सोशल जस्टिसची सर्व वचने व कार्यक्रम कापले जात आहेत. विकसित देशांना मदत करण्याच्या नीतीला मागील खुर्चीवर बसावे लागेल असे दिसते. चलनवाढीलाही ही करकपात काहीशी कारणीभूत आहे, वगैरे वगैरे.

जेवणापूर्वी श्री. रॉजरशी फारसे बोलता आले नाही. जेवणानंतर श्री. झा व रॉजर्स या दोघांचीही भाषणे झाली. श्री. झा फारच चांगले बोलले. आपल्या कार्याच्या ' मर्यादित ' यशाचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. भारत व अमेरिका यांचे राजकीय संबंध – बरोबरीच्या नात्यावर आणि आजच्या वास्तवतेवर आधारूनच चालावे लागेल – याच अर्थाचे विचार काही महिन्यांपूर्वी श्री. रॉजर्स यांनी व्यक्त केल्याचेही त्यांनी सांगितले.

उत्तराच्या भाषणात श्री. रॉजर्स हे या सदिच्छांचे पुनरुच्चार करते झाले. श्री. झा यांच्या तुलनेने हे भाषण मनमोकळे वाटले नाही. छोटेखानी व औपचारिक. त्यांनी एक मुद्दा वारंवार घोळून घोळून सांगितला. तो म्हणजे मित्रदेश असले तरी मतभेद अपरिहार्य असतात; परंतु मतभेदांची जाहीर टीका-टिपणी होऊ नये. जेवणानंतर भारताशी आपल्या देशाचे संबंध ' up-slope ' आहेत असेही ते म्हणाले.

आम्ही स्वतंत्र एकत्र बसलो तेव्हा थोडे बोलणे झाले. त्या वेळी दोन मुद्दे मुख्यतः स्पष्ट केले. अमेरिकन पद्धतीमध्ये आणि हिंदुस्थानच्या सरकारी कामकाजाच्या पद्धतीमध्ये एक सूक्ष्म फरक मी त्यांच्या नजरेस आणला. अमेरिकेचे कॅबिनेट मिनिस्टर्स प्रेसिडेंटला जबाबदार असतात; त्यामुळे कित्येक प्रश्नावर ते जाहीर बोलण्याचे टाळू शकतात. परंतु हिंदुस्थानमध्ये, मंत्री हे पार्लमेंटला जबाबदार असतात. त्यामुळे प्रत्येक महत्त्वाच्या प्रश्नावर त्यांना वारंवार धोरणाचे स्पष्टीकरण करण्यासाठी मतप्रदर्शन करावे लागते. त्यातून अपरिहार्यपणे मतभेदांचीही चर्चा करावीच लागते. कोणाला हौस असते म्हणून मतभेदांवर बोट ठेवून टीका केली जाते असे काही नाही. त्यांनी हा फरक मान्य केला.

भारतीय sub-continent वर परस्पर संबंध अधिक निकट करून आपासांतील चर्चांमधून प्रश्न सोडविण्याची आमची नीति आहे. त्या बाबतीत आम्ही पुढाकार घेऊन अनेक प्रकारे प्रयत्न सुरू केले आहेत. त्या प्रयत्नांना दृष्ट लागेल असे धोरण कोणाही प्रमुख राष्ट्राने अंगिकारले तर भारतीय जनता अस्वस्थ होते. भारतीय जनमानस या बाबतीत फारच जागृत असते असेही मी सांगितले.

मोठ्या राष्ट्रांनी – अमेरिकेने सुद्धा – ही गोष्ट जाणली पाहिजे. माझ्या या विचारावर त्यांनी आपली स्पष्ट प्रतिक्रिया दिली नाही. परंतु 'आय अंडरस्टँड' म्हणून हा प्रश्न तेथेच सोडला.

काल 'वुइल्यम् बर्ग' हे ठिकाण पाहाण्यासाठी १५० मैलांचा मोटारीने प्रवास केला. रविवार असल्यामुळे वेळ मोकळा होता.

अमेरिकेला फारसा इतिहास नाही. आता ते घडवीत आहेत यात शंका नाही. त्यामुळे २०० वर्षांपूर्वीचा त्यांचा इतिहास, त्या वेळची अमेरिका, शहरे, घरे, राहणी कशी होती याचे एक प्रदर्शनच आहे हे शहर.

काही जुनी घरे तशीच आहेत. काही पुनर्बांधणी करून 'कलोनिअल अमेरिका' कशी होती व स्वातंत्र्यसंग्राम कसा, कोठे झाला याची थोडी फार कल्पना येते.

बराच भटकलो. या निमित्ताने चालावयास मिळाले, याचाच मला आनंद झाला. थकेतोपर्यंत चाललो. तेही फार दिवसांनी. बाकी प्रेक्षणीय असे काही विशेष आहे असे मात्र मला वाटले नाही. तूर्त पुरे.

*

## २२ वॉशिंग्टन

३० जुलै, १९७३

दिल्लीहून निघाल्यानंतर २०–२१ तासांनी लंडनला पोहोचलो. वाटेत बेरूत आणि फ्रँकफर्ट मध्ये तीन तास फुकट गेले. त्यामुळे लंडनला मी अगदी थकून गेलो होतो. 'सेव्हॉय' मध्ये पोहोचल्यानंतर सरळ झोपी गेलो.

संध्याकाळी ॲक्टिंग हाय-कमिशनर सात वाजता येणार होते. म्हणून उठून कसातरी तयार झालो. संध्याकाळचे जेवण घेत असताना

श्री. नामदेवराव मते यांची नातेवाईक मुलगी - एअरइंडियामध्ये असणारी- भेटावयास आली. त्यांची तक्रार ऐकून घेतली.

श्री. शरद उपासनी यांनी लहान सहान गोष्टींत खूप काळजी घेतली. त्या दिवशी विश्रांती पूर्ण मिळाली. दुसऱ्या दिवशी ९ वाजता पुस्तकांच्या दुकानात चक्कर मारली. काही काही पुस्तके घेण्याचा मोह होत होता. परंतु साधनांची कमतरता होती. नवी नवी पुस्तके डोळ्यांनी पाहिली. जर्मनीच्या नोबल प्राइझ विजेत्या लेखकाची नवी कादंबरी खरेदी केली आणि विमानतळाकडे प्रयाण केले. कारण पॅन–अमेरिकनचे विमान साडेअकरा वाजता वॉशिंग्टनसाठी निघणार होते.

विमानतळावर वेळेत पोहोचलो पण विमान प्रत्यक्ष दीड तास उशीरा निघाले. हा प्रवास संपूर्ण दिवसाचा असल्यामुळे बिनत्रासाचा- झाला. 'C 20' मीटिंगसाठी आवश्यक असलेले सर्व महत्त्वाचे कागदपत्र वाचावयाचे होते. सात-आठ तासांचा हा प्रवास या कामासाठी फारच उपयोगी पडला.

वॉशिंग्टनच्या २।। वाजता येथे पोहोचलो. भारताचे नवे राजदूत श्री. कौल ( मॉस्कोला गेलो होतो तेव्हा ते तेथे राजदूत होते ) आणि इतर मंडळी भेटली.

राजदूतावासामध्ये पोहोचल्यानंतर थोडी विश्रांति घेतली व स्थानिक वृत्तपत्रे पाहिली. सर्व वृत्तपत्रे वॉटरगेट प्रकरणाच्या मथळ्यांनी व तपशीलवार मजकुरांनी भरून गेली होती. सिनेटच्या चौकशी-समिती- समोर निक्सनच्या निकट सत्ताधारी वर्तुळातील प्रमुख लोकांच्या साक्षी चालू आहेत. त्यातून जी हकिगत बाहेर येत आहे त्यामुळे सबंध अमेरिकन राष्ट्र चकित झाले आहे. वृत्तपत्रे, रेडिओ, टेलीव्हिजन ही सर्व माध्यमे याच एका विषयाने भरून गेली आहेत. लहानापासून मोठ्यांपर्यंत हा एकच विषय आहे.

काल रात्री सिलोन एम्बसीमध्ये फंडाचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. स्वाइट्झर यांना निरोपाचे जेवण होते. तेथे श्री. मॅक्नामाराही भेटले. आम्ही जवळ जवळ एक तासभर बाजूला बसून या वॉटरगेटसंबंधी बोलत होतो.

श्री. मॅक्नामारा फार मोकळेपणाने बोलत होते. ते दुःखी होते. कारण अमेरिकन राजकीय जीवन इतके मलीन झाले आहे की, अमेरिकेच्या राजकीय जीवनावर याचे लांबवर परिणाम होणार आहेत असे त्यांना वाटते. त्यांतल्या त्यात चांगली गोष्ट – त्यांच्या मते – एवढीच की, हे सर्व प्रकरण प्रकाशांत आले. मी त्यांना काही मूलभूत प्रश्न विचारले.

१) निव्वळ काही चुकीच्या व्यक्ति सत्तेभोवती जमा झाल्या त्यामुळे हे झाले की आधुनिक सत्तायंत्रणेत, विशेषतः अमेरिकेसारख्या प्रमुख जागतिक सत्ता असलेल्या देशाच्या सत्तेच्या रचनेमध्ये ( पॉवर स्ट्रक्चर ) हे अपरिहार्य आहे ?

२) अमेरिकन घटनेने आणि इतिहासाने दिलेल्या काही सत्ता-संस्था ( पोलिटिकल इन्स्टिटयूशन्स ) कमजोर झाल्या आहेत किंवा केल्या आहेत त्याचा हा परिणाम आहे काय ?

३) निक्सनच्या व्यक्तित्वात या प्रकृती पहिल्यापासून आहेत की हे अपघातासारखे अनपेक्षितरीत्या घडले ?

४) जबाबदार असलेल्या प्रमुख व्यक्ति, विचारपरंपरा – स्वभाव या दृष्टीने काही विशिष्ट प्रकारच्या आहेत काय ?

या सर्व प्रश्नांना श्री. मॅक्नामारा यांनी दिलेली उत्तरे काही दृष्टचा मला महत्त्वाची वाटली. त्यांचे म्हणणे असे की, अमेरिकेच्या सत्तारचनेत (आधुनिक जबाबदाऱ्या व राष्ट्रीय संरक्षणाचे प्रश्न लक्षात घेऊन सुद्धा) या गोष्टी मुळीच अपरिहार्य नाहीत. अमेरिकन परंपरेच्या एकदम विरोधी अशा या प्रवृत्ती आहेत. त्यांचा बीमोड केला पाहिजे. त्यांनी स्वतःचा, संरक्षणमंत्री-काळातील अनुभव सांगून हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या मते निक्सन यांनी आपल्याभोंवती एका वेगळ्या ( रूथलेस अॅण्ड फॅन्टॅस्टिक ) प्रकारच्या लोकांचे वर्तुळ रचले. सेक्रेटरी ( मंत्री कॅबिनेट मिनिस्टर ) या संस्थेचे अवमूल्यन केले आहे. त्याचा हा परिणाम आहे.

त्यांच्या भोवतालचे लोक हे इतके शक्तिशाली बनविले की, सेक्रेटरी नामधारी मंत्री झाले. त्यांची प्रतिष्ठा संपली होती. अमेरिकन सामान्य

जनतेला काही व्यक्तींच्याबाबत ते कॅबिनेट मिनिस्टर्स आहेत, याचीही कल्पना नसते. Devaluation of the institution of cabinet is the basic cause of this development.

सत्ता व जबाबदारी यांची फारकत झाली की, हे असेच होणार. निक्सनच्या व्यक्तित्वात या प्रवृत्ति, त्यांच्या राजकीय जीवनात पहिल्यापासूनच होत्या म्हटल्या तरी चालेल.

त्यांनी त्यांच्या पहिल्या निवडणुकीत एका महिला उमेदवाराविरुद्ध अशाच खोटारडचा व घाणेरडचा युक्ती-प्रयुक्तीचा उपयोग केला होता. त्यांच्या जवळच्या व्यक्ति, फॅसिस्ट स्वभावाच्या - आपण म्हणतो तेच खरे – आपण नैतिकदृष्टचा इतरांहून उच्च आहोत अशा अहंकारी व बेदरकार वृत्तीच्या आहेत. आणि अशा व्यक्तींची निवड निक्सननी जाणीवपूर्वक केली हे विशेष आहे.

*

२३ — १ ऑगस्ट, १९७३

गेले तीन दिवस G 24 आणि C 20 च्या मीटिंगमध्ये गेले. G 24 फक्त फार्सच होता. अर्थात् राजकीय दृष्टचा याचे महत्त्व असल्यामुळे आम्ही त्यात निराश न होता प्रयत्न करीत राहिलो.

एकमताची भूमिका तयार केली. ही भूमिका अधिकृतरीत्या C 20 चे चेअरमन श्री. अलिवर्धन यांना कळवावी असे मी सुचविले. परंतु लॅटिन अमेरिकन्स् मोठे विचित्र आहेत – विशेषत: ब्राझील – त्यांनी सुरुवातीला काही स्वीकारले नाही. परंतु मीटिंग संपल्यावर ‘ Link ’* बाबतची भूमिका अधिकृतरीत्या कळविण्याचे कबूल केले. श्री. मनमोहन सिंग यांनी या बाबतीत फारच प्रयत्न केले.

---

* Link - A link between development assistance and SDR (Special Drawing Rights) allocation.

C 20 ची चर्चा पहिल्या दोन प्रश्नांवर चांगली झाली. काही निष्पन्न झाले, परंतु बाकीच्या प्रश्नांवर मतमतांतरे बरीच आहेत हे स्पष्ट झाले.

विकसित देशांच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न होता Link चा. अविकसित देशांचा spokesman म्हणून हा प्रश्न इनिशिएट करण्याबाबत भारतास सुचविले. भारताची याबाबतची भूमिका सर्व अविकसित देशांना मान्य आहेच. परंतु तत्त्वतः बहुसंख्य विकसित देशांच्या प्रतिनिधींनाही मान्य दिसली.

फ्रान्स, इटली, नेदरलँड्स् यांनी फार स्पष्ट पाठिंबा दिला. यू. के. ची भूमिका मला तरी त्वयार्धम् मयार्धम् – चलाखीची वाटली. कॅनडाचे मौन होते. ऑस्ट्रेलियाचा पाठिंबा स्वच्छ होता. जर्मनी पूर्वी फार विरोधी होते. परंतु या वेळी जागतिक मत पाहून काही तडजोड निघाली तर आपली सहकार्याची भूमिका राहील – इथपर्यंत प्रगति दिसली.

स्पष्ट विरोध होता अमेरिकेचा. त्यांच्या फेडरल बँकेचे प्रमुख श्री. ए. बर्नस् यांनी बाजू मांडली. ते प्रामाणिक, प्रतिष्ठित बँकर म्हणून प्रख्यात आहेत. परंतु त्यांचे अर्थशास्त्र १९ व्या शतकातील आहे असे म्हणावे लागेल. याबाबत technical level वर अजून फारच प्रयत्न धीर न सोडता करण्याची आवश्यकता आहे. जपान उत्सुक नाही पण विकसित देशांना काहीशी चुचकारण्याची भूमिका दिसली.

३०, ३१ व १ रोजी लंच आणि डिनरच्या वेळी ज्या अनौपचारिक चर्चा झाल्या त्या फारच अर्थपूर्ण होत्या. १९७४ पर्यंत योजना कायम करण्याची इच्छा दिसून आली. अडचणी आहेत. मतभेद आहेत. परंतु बदललेल्या नव्या आर्थिक जमान्याला उपयुक्त अशी नवी मॉनेटरी सिस्टिम असल्याशिवाय चालणार नाही याची जाणीव दिसली. यावर्षी नैरोबी व पुन्हा एकदा वॉशिंग्टन येथे बसावे लागेल.

१ तारखेला डॉ. किसिंजरना व्हाइट हाऊसमध्ये श्री. कौल यांच्यासहित भेटलो.

एलिचपूरचा देशमुखांचा मुलगा अशरिफ देशमुख येथे स्थायिक झाला आहे. त्यांच्याकडे दुपारचे जेवलो. त्यांची पत्नी अमेरिकन आहे.

प्रेमळ जोडपे आहे. अतिशय अगत्य दाखविले. वॉशिंग्टनपासून दूर राहतात. आपल्या गाडीतून अगदी वेळेवर विमानतळावर पोहोचविले.

आता लांबलचक व थकविणारा न्यूयॉर्क – न्यूदिल्ली प्रवास सुरू झाला आहे. थकवा आहे. डोळयांवर झोपेची झापड आहे. म्हणून थांबवितो.

❋

## २४ नैरोबी

२१ सप्टेंबर, १९७३

आज येथील वेळेप्रमाणे १।। वाजता (भारतीय वेळ ४ वाजता) पोहोचलो. विमानाचा प्रवास सव्वापाच तासांचा परंतु अतिशय सुखकर झाला. येथे दुपारी चांगलेच गरम भासले. अगदी दिल्लीसारखे. परंतु संध्याकाळ बरीच थंड आहे. संध्याकाळी ५ चे सुमारास पावसाचा थोडा शिडकावाही झाला.

दुपारी येथे पोहोचताच मी अगदी थकून गेलो होतो. त्यामुळे झक्क झोपून गेलो. नंतर श्री. शरद उपासनींनी माझ्या जखमांवर पावडर * मारण्याचे काम अगदी जिव्हाळयाने केले. नंतर शहरामध्ये भटकण्यास गेलो.

साडेसहा लाख वस्तीचे हे शहर आहे. आधुनिक शहर परंतु स्वच्छ आहे. केनियाची ही राजधानी असल्यामुळे सर्व प्रमुख सरकारी कचेऱ्या आहेत. काही नवीन आहेत.

केनिया सेंटर, जेथे आय्. एम्. एफ्. आणि 'वर्ल्ड बँकेची' बैठक होणार आहे ती इमारत बाहेरून पाहिली. गोल आकाराची, उंचच उंच अशी इमारत आहे. आफ्रिकेचे प्रतीक म्हणून इमारतीचा रंग गडद काळा ठेवला आहे.

---

* अंगावर 'नागिण' झाल्याने जखमा झाल्या. – संदर्भ.

बाजारपेठांतून मोटारीने १५–२० मिनिटांतच चक्कर मारून झाली. नंतर सहल म्हणून शहराबाहेर गेलो. श्री. एम्. जी. कौल दारेसलामहून येथे पोहोचले होते. तेही आमच्याबरोबर होते. कॉफीची शेती उत्तम वाटली. बाकीची शेती निष्काळजीपणाने केली जाते असे वाटले. जमीन उत्तम दिसली. पाऊसही ३०-४० इंच पडत असावा. परत येताना येथील हायकमिशनर श्री. नायर यांच्या सरकारी निवासस्थानी चहासाठी थांबलो. उत्तम घर आणि भोवतालची मोकळी जागा – आकर्षक आसमंत.

आज थोडीशी कणकण असल्यासारखे वाटत आहे. संध्याकाळी जेवण न घेण्याचे ठरविले आहे. एकेक दिवस मोजून काढावा लागणार आहे. जखमा भरून येत नाहीत, याची चिंता वाटते.* दिल्लीहून निघताना मला यापूर्वी इतके कधीच अवघड वाटले नव्हते. घरी असलो म्हणजे मी तुझ्यावर इतका अवलंबून असतो की, त्याची कल्पना बाहेर आल्याशिवाय येणार नाही. तूही मनाने हळवी होतीस. त्याची वारंवार आठवण येते.

उद्यापासून कार्यक्रम सुरू होत आहेत. त्यांत मन रमले तर प्रकृती अस्वास्थ्याकडे दुर्लक्ष होईल अशी आशा आहे. तुमच्या सर्वांच्या सद्‌भावनेने माझी प्रकृती उत्तम राहील असा विश्वास आहे. येथे सर्व आपले अधिकारी उत्तम असून ते माझी खूपच काळजी घेत आहेत. माझी काळजी करू नकोस. आपल्या प्रकृतीची काळजी कर.

*

* छातीवर व पाठीवर 'नागिण'चे फोड झालेल्या अवस्थेतच यशवंतरावांना या महत्त्वाच्या दौऱ्याची जोखीम पत्करावी लागली होती. – संदर्भ

२५ २३ सप्टेंबर, १९७३

काल संबंध दिवसभर अतिशय कामात गेला. त्यामुळे काही लिहू शकलो नाही. आजही C 20 ची बैठक सुरू आहे. त्या बैठकीत बसूनच हे लिहीत आहे.

प्रकृती बरी आहे. अंगावर सूट घालून उभे राहिले म्हणजे फारच त्रास होतो. बसले म्हणजे हलके वाटते. जखमा बऱ्या होतात की नाही याची कल्पना येत नाही. पावडर मारण्याचा कार्यक्रम नित्याने सुरू आहे. बाकीची औषधे वेळेवर घेत आहे. झोप उत्तम लागते ही एक चांगली गोष्ट आहे.

येथील बाजारात सर्व वस्तू बाहेरून येतात, त्यामुळे फारच महाग असतात असे दिसले.

आज सर्व दिवस कामात जाईल. उद्यापासून मुख्य परिषद सुरू होत आहे. त्यामुळे कामात दिवस जातील अशी आशा आहे.

('बोर्डस् ऑफ गव्हर्नर्स ' च्या बैठकीला नैरोबीला गेलेले असताना यशवंतरावांनी हे लिहिले आहे. )

*

२६ **नैरोबी**

२३ सप्टेंबर, १९७३

दिवसभर मन गुंतून गेलेले असले की, प्रकृतीची आठवण कमी व औषधांचेही विस्मरण होते. परंतु संध्याकाळी हॉटेलवर येऊन बसले की, प्रकृतीचे सर्व प्रश्न एकदम उभे राहतात.

तुम्ही सर्वांनी प्रेमाने मला इतके दुबळे केले आहे की, स्वतःचेही काही करावयाची सवय राहिली नाही. काखेतील जखमा ओल्याच आहेत.

पावडरचा मारा मात्र चालू आहे. त्या लवकर बऱ्या होतील अशी चिन्हे नाहीत. छातीवर घुमारा करून बसलेल्याही जशाच्या तशाच आहेत.

अंगावर जाड कपडे चढले की, काटयासारखे टोचतात. पण आता त्याची सवय केली पाहिजे. दुपारचे नित्याचे जेवण व संध्याकाळी 'सूप' असा कार्यक्रम ठेवला आहे. त्यामुळे अजून पोटाची तक्रार नाही. पण हे प्रकृतीचे पुराण किती सांगणार ? तेच तेच पुन्हा सांगत राहिलो आहे.

सौ. सुशिला रोहटगी दारेसलामहून परत आल्या. त्या येथे भेटल्या. उद्या संध्याकाळी येथून त्या निघणार आहेत. दारेसलामच्या परिषदेमध्ये त्यांनी चांगलीच छाप टाकली. मला सर्वांनी हे सांगितले तेव्हा अतिशय आनंद वाटला.

काल दुपारी इतर देशांतील काही अर्थमंत्र्यांना मी लंचसाठी बोलाविले होते. केनियाचा अर्थमंत्री अगत्याने आला होता. वैयक्तिक संबंधांना परराष्ट्रीय क्षेत्रात अतिशय महत्त्व आहे. परिषदेमध्ये ज्या गोष्टी बोलता येत नाहीत त्या अशा प्रसंगी सहज बोलून होतात.

आज संध्याकाळी आपले प्रेसवाले – येथील आणि दिल्लीहून मुद्दाम आलेले – यांना ब्रीफिंगसाठी बोलाविले होते. श्री. सरवर लतीफ आणि स्वामीनाथन् हे दोन तरुण अर्थतज्ज्ञ आहेत. प्रश्नोत्तरांत चलाखी होती. जे लिहावयाचे असेल ते लिहितील, पण बैठक तर खूपच रंगली.

आमचे तीन इकॉनॉमिस्ट येथे आमचेबरोबर आहेत. एकेका प्रश्नावर तिघांची तीन वेगवेगळी मते असतात. प्रामाणिक असतात पण वेगळी मते असतात हे खरे. त्यातून राजकीय व व्यावहारिक कसोटी लावून निर्णय घ्यावा लागतो.

आज संध्याकाळी परिषदेच्या चेअरमनचे रिसेप्शन होते. चेअरमन, या वर्षी श्री. चेंबर्स – त्रिनिदादचे अर्थमंत्री – हे आहेत.

गेली तीन-चार वर्षे या परिषदांत भेट होत असल्यामुळे चांगलाच परिचय झालेला आहे. त्यांना भेटावे म्हणून या रिसेप्शनला गेलो.

परंतु नंतर गेल्याचा पश्चात्ताप झाला. ३००० लोक आमंत्रित होते. भंडाराच म्हणाना ! पिणे-खाणे याची रेलचेल होती. प्रत्येक आमंत्रितामागे १५ डॉलर्स म्हणजे जवळजवळ १०० रुपयांचे वर खर्च केला.

आम्ही तेथे जाऊन कसेतरी त्या हॉलमधून बाहेर पडलो. माणसाला माणूस खेटून होते. माझा दुखरा हात आणि काख यांना सांभाळून चालणेही मला मुष्कील झाले. परत येण्यासाठी बाहेर आलो आणि गाडी क्यूमधून यावयाला तब्बल एक तास लागला. पश्चात्ताप झाला म्हटले तो यामुळे. पुन्हा या रिसेप्शन्सना जावयाचे नाही असे ठरवून टाकले आहे.

उद्या आता मुख्य परिषद आणि भाषणांचे सत्र सुरू होईल.

*

२७ — २५ सप्टेंबर, १९७३

आय्. एम्. एफ्. आणि जागतिक बँकेची ही चौथी बैठक आहे; जिला मी ओळीने हजर आहे.

आफ्रिकेच्या भूमीवरची ही पहिली बैठक आहे. त्यामुळे आफ्रिकन देशांमध्ये काहीसे औत्सुक्य व उत्साह दिसतो. काल केनियाचे अध्यक्ष जोमो केनियाटा यांनी या बैठकीचे मोठ्या इतमामाने व समारंभपूर्वक उद्घाटन केले.

आम्ही आमच्या विद्यार्थिदशेपासून या देशभक्ताचे नाव ऐकून होतो. पंडितजी व केनियाटा हे समवयस्क होते. केनियाटाचे आज वय अंदाजे ८४ असावे. परंतु त्यांची प्रकृती पाहून आश्चर्य वाटेल इतका त्यांचा उत्साह व दमदारपणा होता. आवाजात आत्मविश्वास व धारदारपणा होता.

या वयातले आपले तारुण्य जगातील प्रतिनिधींना पटावे म्हणून की काय ते आपल्या तरुण चौथ्या पत्नीसह समारंभास आले होते.

बैठक काल सुरू झाली. आज वेगवेगळ्या राष्ट्रांतर्फे स्टेटमेन्ट्स् होतील. बहुतेक प्रमुख राष्ट्रे आजच बोलतील असे दिसते.

यू. के., यू. एस्. ए., जर्मनी, फ्रान्स, इटली आणि हिंदुस्थान यांची आज भाषणे ( स्टेटमेंट्स् ) होतील. आजच्या जगापुढील जी महत्त्वाची समस्या आहे ( मॉनेटरी सिस्टिम ) त्यावरची प्रमुख प्रतिक्रिया बैठकी-पुढे पहिल्याच दिवशी येत आहे हे एका अर्थाने चांगले आहे.

एका वर्षाच्या या क्षेत्रांतील चर्चेवरून व त्यातील प्रमुख माणसांशी आलेल्या संबंधावरून असे वाटू लागले आहे की, हा प्रश्न प्रमुख राष्ट्रे सहजासहजी सोडवू देतील असे वाटत नाही.

अविकसित राष्ट्रांच्यातर्फे आपली भूमिका स्पष्ट मांडण्याची कामगिरी भारताला करावयाची असल्यामुळे थोडासा कडवटपणा स्वीकारावा लागतो. परंतु हे अपरिहार्य आहे.

' C 20 ' पुन्हा जानेवारीत वॉशिंग्टनमध्ये भरणार आहे.

संध्याकाळी आपल्या एम्बसीमध्ये रिसेप्शन आहे. हिंदुस्थानमधील येथील प्रमुख लोक भेटतील. येथे एक महाराष्ट्र-मंडळ आहे. ती मंडळी एक-दोन दिवसांत भेटणार आहेत.

येथून १०० मैलांवर असलेले एक प्रेक्षणीय स्थळ पाहण्यासाठी जावे अशी एक सूचना आली होती. परंतु मी ती नाकारली. मोटारीचा प्रवास मला झेपणार नाही असे वाटते.

*

## २८ फ्लॉरेन्स ( इटली )

१३ जानेवारी ( रात्री ९-३० ), १९७४

भारतीय वेळ १४ जानेवारी – संक्रांति, १९७४

जानेवारी बाराच्या मध्यरात्रीनंतर म्हणजे १३ च्या प्रारंभी – दीड वाजता मुंबईहून निघालो.

मुंबईचे सर्व वातावरण एकूण अस्वस्थ करणारे होते. निघण्यापूर्वी श्री. वसंतराव नाईक भेटले. ते असतानाच पी. एम्. ला फोन करून

त्यांच्या भेटीबाबत माझा सल्ला काय आहे तो सांगितला. आता निर्णय त्यांचा. पण जो घेतील तो योग्यच असेल.

उद्याची निवडणूक, जे मी ऐकले त्यावरून, जिंकेल असे वाटत नाही· मतदान फारच कमी झाल्यावर पराभवातही अंतर फार कमी पडावे असाही एक अंदाज दिला जातो. All tactics and no principled strategy. परिणाम असेच भोगावे लागतात.

उगीच विचार करीत विमानात झोपून राहिलो. केव्हा तरी झोप लागली. कुवेतमध्ये जाग आली· पुन्हा एकदा कॉफी घेऊन झोपी गेलो.

दोन तासांनी जाग आली ती आलीच. अगदी वेळेवर रोमवर विमान घिरट्या घालू लागले. वैमानिकाचा आवाज आला की, खाली दाट धुके आहे. तासभर इकडे तिकडे भटकावे लागेल.

काहीशा कमी उंचीवर भटकंती सुरू झाली. खाली कधी दाट डोंगराळ प्रदेश, कधी कधी त्यांच्या उंच टेकड्या बर्फाच्छादित दिसत होत्या तर कधी छोटी छोटी तळी मंद चंद्रप्रकाशात चमकून जात. तासाभराने पुन्हा वैमानिकाचा आवाज – अर्धा तास आणखीन् थांबावे लागेल. नच जमले तर सरळ पॅरिसला जाऊ.

मजा वाटली. रोमच्याऐवजी आजचा दिवस पॅरिसमध्ये जाणार तर – सर्व कामाचा खेळखंडोबा ! काही न करता उगीच दुसऱ्या विमानाची वाट पहात, पॅरिसच्या विमानतळावर बसले आहेत आपले ! परंतु ते घडले नाही. दीड तासाच्या भ्रमणानंतर रोमच्या विमानपट्टीवर आम्ही एकदाचे उतरलो.

रोममध्ये प्रवेश करताच एक प्रकारचा शुकशुकाट दिसला. कारण समजले की पेट्रोलचा वापर रविवारी व इतर सुट्ट्यांचे दिवशी बंद ! दुकाने बंद. पेट्रोल-पंप बंद, क्वचित् टॅक्सीज् व बसेस् चालू दिसल्या. स्त्रिया, पुरुष, मुले सायकलीवरून रपेट करताना दिसली.

ग्रँड हॉटेलवर पोहोचलो. जुन्या राजवाड्याच्या स्टाइलवर हे हॉटेल आहे· घाईघाईने दाढी, स्नान केले. आय· एम्· एफ्. वरचे आमचे एक्स डायरेक्टर श्री. प्रसाद आणि डॉ. मनमोहन वाट पहात होते· तास दीडतास त्यांच्याशी C 20, आणि G 24 सभांतील अजेंडाविषयी

प्राथमिक चर्चा केली. ११॥ वाजता असीसी आणि फ्लॉरेन्सच्या सफरीवर निघालो.

ता. १४ रात्री (रोम)

दोन वाजता असीसीला पोहोचलो. दोन तासांचा प्रवास आहे. मोटारवाहतुक नव्हतीच. त्यामुळे प्रवास जलद झाला... एका सुरेख डोंगरखोऱ्यांतून प्रवास आहे. अधून मधून इतिहासकालीन, मध्ययुगीन, डोंगरमाथ्यावर वसलेली गडवजा गावे दिसतात. आपल्या गडापेक्षा फारच वेगळी. There are Roman towns on hill tops. मजबूत व चढत्या क्रमाने बांधलेली डोंगरमाथ्यावरची ही घरे व सर्वांत शेवटी उंच ठिकाणी असलेली प्रासादतुल्य कोठी.

या निसर्गरम्य परिसरात ही गावे लक्ष वेधून घेतात. असीसी असेच एक मध्ययुगीन गाव आहे. सेंट फ्रॅन्सिसचे जन्मस्थळ आणि त्याच्यामुळे इतिहासप्रसिद्ध बनलेले आहे. शेकडो वर्षांचा इतिहास आहे.

येथील 'टेंपल ऑफ मिनर्व्हा' हे ख्रिस्तपूर्वकालीन मंदिर आहे. त्याच्या अंतर्भागात आता चर्च आहे. पण हे सर्व विसंगत वाटते. या गावाच्या वर एका उंच ठिकाणी ज्या गुहेत सेंट फ्रॅन्सिस प्रार्थना करीत असत ती गुहा पाहिली.

येथील सर्व वातावरण पाहिले म्हणजे हे ख्रिस्ती संत आपल्या संत-ऋषी-सारखेच वाटतात. तशीच तपश्चर्या. सर्व परित्यागाचे व्रत. पक्षी-प्राण्यांवरील प्रेम. मानवतेची सेवा. हे सर्व ऋषीधर्म त्यांच्या जीवनात पहायला सापडतात. आणि मग तो ख्रिस्ती की हिंदू की आणखी कोणी याला तसे फारसे महत्त्व राहात नाही.

या संतांच्या स्मरणार्थ बांधलेले सर्व हे एक कलामंदिर झाले आहे. त्या काळच्या प्रख्यात चित्रकारांनी सेंट फ्रॅन्सिस्च्या जीवनावर काढलेली कलात्मक चित्रे शेकडो वर्षे झाली तरी त्या संतजीवनाची स्मृती देत आजही तेथे आहेत. हजारो प्रवासी ते येऊन पाहतात, आनंदी होतात. मी त्याचपैकी एक. मन विनम्र झाले. उभ्या उभ्या प्रार्थनेसाठी डोळे आपोआपच मिटले.

काल रात्री गडद धुक्यातून प्रवास करीत, वाट चुकत चुकत फ्लॉरेन्सला पोहोचलो. It was quite an adventure. रात्री या हॉटेल-मध्ये झोपलो.

आज सकाळी उठताच संक्रांतीची आठवण झाली. कशामुळे माहीत आहे ? छोटी बॅग कशासाठी तरी उघडली तर समोर तिळगुळाचे पाकीट ! आरामशीर माझे मलाच तिळगूळ दिले आणि मनामनाने तुलाही. श्री. शरद उपासनी थोड्या वेळाने आल्यानंतर ' गोड बोला 'च्या पुकाऱ्यात त्यांनाही दिले. तीळगूळ घ्या – गोड बोला.

९॥ नंतर फ्लॉरेन्स-दर्शनार्थ रपेट सुरू. आमच्याबरोबर श्री. उपासनी, श्री. सोनी ( चार्ज डी अफेअर्स ) आणि श्री. मलहोत्रा – हिंदुस्थानचे इटलीमधील रहिवासी – व्यापारी आहेत. कोणा एका कंपनीचे प्रतिनिधी आहेत. ते मला भेटल्याची ( मुंबईत ) आठवण देत होते. बरे वाटले गृहस्थ. दुपारी लंचच्या वेळी त्यांची कन्या व जावई – हे इटालियन उद्योगपती आहेत – हजर होते, सुरेख जोडपे वाटले. मनमोकळे बोलणे. अकारण कृत्रिम ऐट नव्हती. स्मरणीय व्यक्ती.

' मिचेल अॅन्जेलो 'ची कलाकृति पाहिली. हे गाव त्यांची जन्मभूमी व प्रथम कार्यक्षेत्र. नंतर Palaa of Pitti – हे अतिशय भव्य म्युझियम आहे. अनेक नामवंत महाचित्रकारांच्या कलाकृति अगदी खच्चून भरल्या आहेत. भरून गेले आहे. रफॅलो, रुबेन्स इत्यादींच्या इतक्या कलाकृति आहेत की, सर्व पहाता पहाता मी दिपून गेलो. म्हणजे नाही म्हटले तरी काहीसा गोंधळून गेलो म्हटले तरी चालेल.

कॅथेड्रलमध्ये या शहरातील प्रख्यात व्यक्तींचे दफन झालेले आहे. मायकेल अंजेलो, मॅकीव्हिली, गॅलिलिओ, केवढी वजनदार यादी आहे नाही ? आमचा जो गाईड होता, तो सांगत होता की, मॅकीव्हिलीचा वारसदार त्याचा पत्त्याच्या खेळातील साथीदार आहे. तोच मॅकीव्हिलीचा शेवटचा वंशज आहे. कारण त्याला मूलबाळ नाही. तसा वंशज राहणार नाही हे त्याचे खरे आहे, पण जगभर राजकारणात पसरलेले एकाहून एक चढ आणि कदाचित त्यालाहि मागे टाकणारे असे कित्येकांचे वंशज आहेत – त्यांचे काय ?

दुपारी २॥ वाजता निघालो. तीन तासांत रोमला पोहोचलो. २०० मैल अंतर असावे. सुंदर रस्ता – सुंदर परिसर. अधून-मधून पावसाचे शिंतोडे येत होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूस चार-दोन मैलांच्या अंतरावर दिसणारी धूसर डोंगर-रांग – नाही म्हटले तरी मुंबई-पुण्याच्या प्रवासाची आठवण झाली.

*

## २९ रोम

१६ जानेवारी, १९७४

काल सकाळी रोम 'पहाण्यासाठी' बाहेर पडलो. विशेषतः जुने रोम – प्राचीन रोम.

काही जुने अवशेष पाहिले. इतिहासाची गतिमानता, झालेले बदल यांचा चित्रपटच पाहावयाला मिळतो. व्हॅटिकन अजून पहावयाचे आहे. मिकिलॅन्जेलोची मोजेसची प्रतिमा पाहिली. बराच वेळ, निरखून पहात बसून राहिलो. थोर कलाकृती पहाण्याचा निखालस आनंद म्हणतात तो अनुभवला. शहरातील प्रसिद्ध चौक पाहिले. प्रत्येकाच्या पाठीमागे काही ना काही इतिहास आहे.

दुपारचे जेवण सौ. नलीनी पंत यांचे स्वीकारले होते. तासा-भराचा प्रवास करून तेथे पोहोचलो. एका शांत अशा 'कौंटी हाऊस' मध्ये ते राहातात. गोल्फ टेनिस – रेसच्या घोड्यांच्या ट्रेनिंगची मैदाने याच्या परिसरात हे घर आहे. त्या परिसरातच एका छोटेखानी रेस्टॉरॉं-मध्ये लंच घेतले. मला एकंदरीत वातावरण आवडले. विश्रांतीसाठी अशा ठिकाणी येऊन राहिले पाहिजे.

श्री. प्रसाद, मनमोहन, जगन्नाथन्, ६ वाजता आले. कॉमनवेल्थ-मीटिंग-अजेंडा, चर्चा झाली. ड्राफ्ट्स सामान्यपणे कायम केले.

रात्री आमचे डिनर होते. इटालियन फॉरिन ट्रेड मिनिस्टर, युगोस्लाव्हियन फायनान्स मिनिस्टर, श्रीलंकाचे डॉ. परेरा वगैरे हजर होते.

१६ जानेवारी. आज मीटिंग्ज सुरू होत आहेत. G-24 : फार विशेष घडले नाही. एनर्जी प्रॉब्लेम आणि आमच्यावर झालेला परिणाम याचा मी उल्लेख केला मात्र – सबंध दिवस याच चर्चेत गेला. तेल-उत्पादक ( oil producing ) देश आपला डिफेन्स देत होते. कॉमनवेल्थ-मध्ये हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. एवढी तरी मान्यता दिली.

कालपासून C 20 सुरू झाली. प्रथम यू. एस्. ए. चे श्री. जॉर्ज शुल्ट्झ् बोलले. त्यानंतर मी तेलाच्या ( oil ) प्रश्नाबाबतची आमची भूमिका मांडली. तेल-उत्पादक देशांना कितपत आवडली कोण जाणे ? परंतु इतरांनी इंटरेस्ट दाखविला. माझ्या मते आमचे स्टेटमेंट बॅलन्स्ड होते. It was based on the line so clearly stated by P. M. with economic committee before I left.

आज सबंध दिवसात श्री. बार्बर हजर नव्हते. यू. के. मध्ये अंतर्गत परिस्थिती फार अवघड झाली आहे. संप – संप – संप !

रात्रीच्या इटॅलियन मिनिस्टरच्या जेवणाच्या वेळी श्री. बार्बर हजर होते. मोठा आनंदी माणूस आहे. लंडनच्या बाहेर एखादा दिवस जरी येता आले तरी हल्ली जरा मोकळे वाटते असे म्हणाला. 'आफ्टर डिनर' चर्चेचा सूर मोठा निराशाजनक होता. शेवटची C 20 ची बैठक जूनच्या मध्यावर घ्यावी असे ठरले.

'मॉनेटरी सिस्टिम' आखीव, रेखीव पद्धतीने यातून निघेल असे वाटत नाही. काही मुद्यांवर कॉन्शस् तयार होईल कदाचित आणि त्या आधारावर outline in generalities तयार करून वार्षिक सभेपुढे सादर करावी – त्याच्यावर जे काही सोपस्कार करावयाचे ते जनरल बॉडीने करावे. त्याला काही वेळेचे बंधन नसावे. डेव्हलप्ड देशांची भूमिका अशी दिसली की, मॉनेटरी सिस्टिममध्ये महत्त्वाचे फरक करण्यासारखी परिस्थिती राहिलेली नाही. जसे जसे कठीण प्रश्न

निर्माण होत आहेत तसे तसे ते सोडविले पाहिजेत. त्यासाठी आवश्यक अशी 'फ्लेक्झिबल' भूमिका असावी.

Link-? फारसे निघेल असे वाटत नाही. जर्मनी, यू. एस्. ए. बिलकूल विरुद्ध आहेत. आम्हाला प्रयत्न करीत राहिले पाहिजे.

*

## ३० रोम

१९ जानेवारी, १९७४.

काल दुपारी C 20 ची बैठक फारच रंगली. Communique वर चर्चा सुरू झाली आणि सारे वातावरण रंगून गेले.

तेल-उत्पादक ( oil producing ) देशांचे प्रतिनिधी अगदी लढाऊ पवित्र्यात आले. त्यांचे म्हणणे तेलकिंमती, बाजारभावाचे चढउतार आर्थिक नियमानुसार होतात, तशा वाढलेल्या आहेत. अविकसित देशांवर त्या किंमतीमुळे काहीशी आपत्ती आली हे खरे. परंतु आमच्या शक्तिनुसार आम्ही बाजारभावाने या देशांना कर्जे वगैरे देऊ. एकूण सर्व दांभिकपणा होता.

अर्थात् आमच्या दृष्टीने तेलवाले देश आणि प्रगत धनी देश हे दोघेही सारखेच आहेत. आज यांनी तेलाची किंमत वाढ करून अरिष्ट निर्माण केले आहे तर दुसरे नेहमीच आवश्यक त्या वस्तूंच्या किंमती भरमसाठ वाढवून गबर होत आले आहेत.

अमेरिका, ऑस्ट्रेलिया किंवा कॅनडा यांनी गेली दोन वर्षे गव्हाच्या किंमती अशाच बेफाट वाढवून आमच्या देशाची दुर्दशा केली हे आम्ही कसे विसरावे ?

परंतु आज तेलाच्या प्रश्नामुळे या विषयाची चर्चा C 20 मध्ये झाली. तेली देशांबद्दल आम्हाला स्पष्ट बोलणे भाग होते. तेही तोलून बोललो. त्यांच्या वस्तूंच्या किंमती ठरविण्याचा त्यांचा अधिकार मान्य. त्यांना कोणी धाकदपटशा करू नये हेही मान्य. परंतु आमच्यावर अरिष्ट आले आहे हे स्पष्ट केले. त्यामुळे तूर्त अमेरिका आणि कं. आमच्या (म्हणजे नॉन ऑईल प्रोडयुसिंग डेव्हलपिंग नेशन्स) प्रश्नांची तरफदारी करीत आहेत.

श्री. शूल्ट्झ् व तेली देश यांच्यात खूपच चकमक झाली. काही देवाण-घेवाण झाली व कसे बसे कम्युनिक तयार झाले. आठवणीत राहण्यासारखा प्रसंग होता.

Words for which they fought were not important by themselves. They were symbols of the attitudes they represented.

आज सकाळी उठून थोडे फार-शॉपिंग केले. नंतर व्हॅटिकन पहायाला गेलो. गेली वर्षानुवर्षे ज्याच्याबद्दल ऐकले, वाचले ते आज थोडेफार पाहिले.

व्हॅटिकन ही पोपची राजधानी. याला स्वतंत्र देशाचे स्थान आहे. रोम शहरातील एका विस्तीर्ण भागात सलग असे हे छोटेसे शहरच आहे.

प्रथम सेंट पीटर्स चर्च पाहिले. मला वाटते जगात इतके महत्त्वपूर्ण, सुंदर व विशाल चर्च दुसरे नसावे. सेंट पीटर आणि सेंट पॉल हे ख्रिस्ताचे दोन शिष्य इस्त्राएलमधून ख्रिस्ती धर्मप्रसारासाठी रोममध्ये आले व तेथेच हुतात्मा झाले.

युरोपमध्ये ख्रिस्ती धर्मप्रसाराचे ऐतिहासिक कार्य यांनी केले. रोमन लोकांनी यांचा अतोनात छळ केला. पुढे येथे एक छोटे चर्च बांधले व ते पुन्हः पुन्हा बांधत बांधत आले. आजचे चर्च ३००–४०० वर्षांपूर्वी बांधले गेले. मॅन्किलाँजेलने याची व त्या चर्चसमोर असलेल्या विशाल चौकाची आखणी आणि बांधणी केली. आत रॅफेल, तो स्वतः आणि बर्निनी यांच्या कलाकृतींनी सौंदर्याचा बहर आणला आहे.

ख्रिस्ताला सुळावरून उतरवून त्याचा मृतदेह मांडीवर घेऊन त्याची माता मेरी बसली आहे, ही मूर्ती जगातील एक अत्यंत सर्वश्रेष्ठ

कलावस्तू मानली जाते. कितीतरी वेळ मी ती पहातच राहिलो. मनाचे व डोळ्यांचे तरीही समाधान अपुरेच राहिले.

नंतर चॅपेल – १६ पाहिले. मिकिलॉंजेलोची चित्रकला येथे पूर्ण बहरली आहे. नंतर रोमचे बाहेर फार जुने सेंट सेबॅस्टर चर्च पाहण्यासाठी गेलो. या चर्चखाली मैलोगणती भुयारे आहेत.

रोमन सत्तेच्या काळात ख्रिस्ती लोक आणि धर्मप्रसारक छळाच्या भीतीमुळे येथे राहात. ही भुयारे म्हणजे त्यांची स्मशानभूमी व राहण्याची वसाहत – दोन्हीही होती. याचे कारण काय असावे अशी जेव्हा मी विचारणा केली तेव्हा जे कारण सांगितले गेले ते मोठे मजेदार आहे.

रोमन साम्राज्याचा एक कायदा असा होता की, शत्रू किंवा मित्र इतर कोणीही असो, त्याच्यावर स्मशानभूमीत हल्ला करावयाचा नाही किंवा त्यांचा छळ करावयाचा नाही. हा कायदा रोमन सत्ताधारी फार काटेकोर पद्धतीने पाळीत. म्हणून ख्रिस्ती लोकांनी स्मशानभूमीतच तळ ठोकला. ही भुयारे पहात असताना त्या काळात त्याच्या भिंतीवर एका ठिकाणी ' स्वस्तिक ' चितारलेले आढळले. संशोधकांना एक नवीन पुरावा हाती आला असला पाहिजे.

घाई-घाईने परत हॉटेलात आलो आणि कसेबसे काही खाऊन घेतले. आता २॥ वाजता विमानतळाकडे निघावयाचे आहे. जाण्यापूर्वी हे सर्व लिहून घेतले.

आठ दिवस भर्रदिशी निघून गेले. हा प्राचीन देश, त्याची सौंदर्यस्थळे आणि त्यांच्या संस्कृतीचे पुरावे पहावयाला मिळाले याचा आनंद मनात साठवून आता परतीच्या रस्त्यावर – दिल्ली, मुंबईची – वर्तमानपत्रे आज पाहिली.

महाराष्ट्रात सर्व पोटनिवडणुकीत झालेले पराभव धक्का देणारे वाटले. कठीण प्रश्न – न सुटलेले गुंतागुंतीचे प्रश्न – व रागावलेले लोक यांच्याकडे परत येतो आहे. पण ते घरचे प्रश्न आणि घरचे लोक आहेत. त्यांच्यातच राहावयाचे आहे आणि त्यांच्यासाठीच मरावयाचे आहे. घरी परतण्यास मन अत्यंत उत्सुक आहे. ❋

२६ एप्रिल, १९७४

दिल्लीहून निघालो त्याच दिवशी दुपारी तीन वाजता येथे पोहोचलो. ( दिल्ली टाईम १ पी. एम्. ) वाटेत जवळ जवळ दोन तास बँकॉकमध्ये काढले.

त्या दोन तासांत विमानतळावरूनच 'अयोध्या' पहाण्यासाठी गेलो. आज ती 'अयोध्या' ओसाड आहे. काही पडलेल्या इमारतींचे आणि मंदिरांचे भग्न अवशेष जुन्या वैभवाची पुसटशी साक्ष देत आहेत.

तसे म्हटले तर पहाण्यासारखे काही नाही. नाही म्हटले तरी ४०० वर्षे हे शहर या देशाची राजधानी होते. १८ व्या शतकाच्या शेवटी ब्रह्मी सैन्याने आक्रमण करून या शहराचा विध्वंस केला. भारतापासून हजारो मैल दूर अंतरावरील ही 'अयोध्या' पहाताना हजारो वर्षांच्या सांस्कृतिक संबंधांचा इतिहास मनात गर्दी करून गेला.

ए. डी. बी. च्या वार्षिक सभेचा अध्यक्ष म्हणून ( चेअरमन ) मी आलो असल्यामुळे स्वागत वगैरे समारंभपूर्वक झाले. त्यातून मुक्त होऊन चारचे सुमारास हिल्टनमध्ये पोहोचलो.

कौलालंपूर हे पाच लाख वस्तीचे शहर आहे. ब्रिटिश राजवटीची सर्व छाप, इमारतींचे बांधकाम, रस्त्यांची आखणी व इतर शिल्प यावरून झटकन ध्यानात येते. गेल्या दहा वीस वर्षांत काही बदल झाले असणारच. परंतु गेल्या दोन-तीन वर्षांत नवी हॉटेले मात्र बरीच झाली आहेत. आजकाल शहरांचे मोठेपण आधुनिक हॉटेल्सच्या उंच हवेल्यांवरून मापण्याची प्रथाच पडलेली दिसते.

आम्ही ज्या हॉटेलमध्ये ( हिल्टन ) उतरलो आहोत ते गेल्या चार महिन्यांखालीच तयार झाले. सर्वांत मोठे व अत्यंत आधुनिक असे ते मानले जाते. बहुतेक सर्व देशांची प्रतिनिधिमंडळे येथेचे उतरली आहेत. आम्ही सर्वजण २४ व्या मजल्यावर आहोत.

माझ्या खोलीतून शहराचे फार सुरेख दृश्य दिसते. अगदी पुण्या-सारखे दिसते. डोंगराच्या उतारापर्यंत शहर पसरले आहे. घरांची शेवटची रांग बहुधा लहान लहान टेकड्यांच्या कुशीत, वृक्षराजींनी झाकलेली दिसते. हॉटेलपासून जवळच विस्तृत असे 'रेसकोर्स' आहे.

उत्तम ठेवलेली, काहीशी चक्राकार, घोड्यांची धावपट्टी आणि त्याच्या दोन्ही बाजूला सुरेख राखलेली व मर्यादशीर पसरलेली गवत-जमीन ( लॉन ) मन मोहून घेते. वेळ मिळाला की, या रेसकोर्सकडे पहात गरम चहा घेत बसणे हा येथील माझा आवडता छंदच झाला आहे.

कोण जाणे, हे रेसकोर्स पाहिले की मला पुण्याची आठवण येते. या रेसकोर्सभोवती जुन्या ब्रिटिश राजवटीत बांधलेले, वसाहती राज्यांना शोभणारे शैलीदार बंगले आहेत. त्यामुळे 'क्वीन्स गार्डन, पूना' ची याद मन भरून टाकते. पाठोपाठ रेसकोर्स रोड दिल्लीचा ताजाताजा सहवास मन उल्हसित करतो.

सकाळी लवकरच जाग आली. झुंजुमुंजु झाले होते. पंचवीस-तीस उमदी घोडी रपेटसाठी किंवा सरावासाठी मैदानावर होती. काही आली होती, किंवा येत होती. पावसाची रिमझिम चालू होती. हे सर्व पाहिले नि डोळ्यासमोर उभी राहिली ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यांतील पुण्यातील एक पावसाळी सकाळ. आठवणींनी मनात गर्दी केली.

कितीतरी आठवणी – सुख-दुःखाच्या ! आशा-निराशांच्या ! नव्या भेटलेल्या व जुन्या जिव्हाळ्याच्या हरवलेल्या माणसांच्या !

मनात कसली तरी हुरहुर असावी आणि ती शोधून हुडकून काढावी म्हटले तरी सापडत नसे – ती हुरहुर कुठेतरी हरवून गेली होती. आज अचानक हलकेच ती परत आली. आठवतात का तुला, पंधरा नंबर सतरा नंबर, अकरा नंबर – क्वीन्स गार्डनमधले दिवस ?

आज सारा दिवस तुझ्या आठवणीत गेला. तुझ्या संगतीत काढलेले कष्टाचे – आनंदाचे सर्व क्षण कसे अलगून बिलगून जवळ येतात आणि मन एका अर्थाने कृतज्ञतेने भरून जाते.

परवा येथे येताना मी अगदी शेवटच्या घटकेला वाचण्यासाठी जे पुस्तक उचलले ते मी बरेच दिवस राखून ठेवले होते. आवडीने खावयाचा

पदार्थ जसा चाखून माखून खावा, शेलकी, चांगली वस्तू जशी राखून सावरून वापरावी – तसे हे पुस्तक थांबत थांबत, त्याची रुची घेत घेत सावकाशीत वाचावे असे ठरविले होते.

हा विचार ग्रंथकर्त्याने या पुस्तकाला जी अर्पण-पत्रिका दिली आहे ती वाचूनच माझ्या मनात आला. माझ्या नेहमीच्या संवयीप्रमाणे पुस्तक उलटसुलट चाळून झाल्यावर आता ते सलग, ओळीने वाचावयाचे असे मी ठरविले.

ज्या दिवशी हे ठरविले तो दिवस होता २ फेब्रुवारीचा. रात्रीच्या निवांत वेळी पुस्तक हातात घेतले. पुन्हा फक्त अर्पणपत्रिका वाचून झाली आणि माझे वाचन तिथेच थांबले. विचारांचा आणि स्मृतींचा चाळा सुरू झाला नि वाचन तसेच राहिले. पुन्हा सवडी-सवडीने वाचू म्हणून जे राहिले ते परवा परत हाती आले.

एका प्रसिद्ध इंग्लिश लेखकाचे हे आत्मचरित्र आहे. मला अजून ते पुरे वाचावयाचे आहे. त्याचा दुसरा खंडही परवा असाच खरेदीत हाती आला. इथे आल्यानंतर या पुस्तक-वाचनाची पुन्हा पहिल्यापासून सुरुवात केली आणि पुन्हा अर्पणपत्रिकेतच मन रेंगाळले.

सत्तर वर्षे वय झालेल्या, ४०-४५ वर्षे संसार केलेल्या, एका कर्तृत्ववान, बुद्धिमान, विचारवंताने आपल्या बहुढंगी जीवनाची खेळी कशी झाली त्याची कहाणी सांगताना त्याची अर्पणपत्रिका कृतज्ञता-बुद्धीने, प्रामाणिकपणाने आपल्या प्रिय पत्नीस लिहिली आहे.

लिहिली आहे असे म्हणणेही तितकेसे बरोबर नाही. कारण त्यानेही एका जुन्या पण विख्यात फ्रेंच कलावंताने आपल्या पत्नीस लिहिलेले चार ओळीचे पत्र फक्त नाव बदलून येथे दिले आहे. ते पत्र म्हणजेच ही अर्पणपत्रिका !

या पत्रात त्या कलावंताच्या ज्या भावना आहेत व ज्यांचा प्रतिसाद या लेखकाच्या अंतःकरणात ऐकू आला, अगदी त्याच भावना माझ्या आहेत. एकमेकांशी संपूर्ण मिळत्या जुळत्या आहेत. गेले दोन महिने हाच विचार माझ्या मनात अधून मधून सारखा येत होता. अर्पणपत्रिका वाचून पुन्हा मन जे तेथेच रेंगाळले आहे त्याचे कारण हे आहे.

आता पुस्तक पुढे वाचण्यापूर्वी ते पत्रच मूळचे नाव बदलून तुझ्या नावे येथे देत आहे. त्यातल्या भावना त्या कलावंताच्या वा लेखकाच्या नाहीत. माझ्या – अगदी माझ्या आहेत. शब्द त्याचे आहेत हे खरे; परंतु अनुभूती माझी आहे – माझीही आहे.

" तुझ्या संगतीची साथ ही ईश्वराने दिलेली मोठी देणगी आहे. त्याच्या या कृपेच्या जाणिवेने माझे मन आकंठ भरलेले आहे. तुझ्या उदार अंतःकरणामध्ये माझ्या या जाणिवेला जागा राहू दे, एवढे सांगण्या-साठीच हे पत्र लिहीत आहे."

*

## ३२ न्यूयॉर्क

१४ मे, १९७४

आज दिवसभर न्यूयॉर्कमध्ये काढला. सी. व्ही. नरसिंहन् यांच्या-कडे लंच घेतले. दुपारनंतर दीड-दोन तास इकडे-तिकडे मोटारीतून भटकलो – न्यूयॉर्क पाहाण्यात.

येथे सकाळी येणे आणि संध्याकाळी येथून जाणे हा माझा नित्याचाच कार्यक्रम झाला आहे. तेच ते रस्ते व इमारती पहात असतो. पुन्हा विसरत असतो. केव्हातरी येथे एक-दोन दिवस राहिले पाहिजे. न्यूयॉर्क-मध्ये ब्रॉडवेवरील प्रमुख थिएटरमध्ये नाटक पाहण्याचे माझे अजून राहून गेले आहे.

यू. एस्. ए. मध्ये वॉटरगेटचेच वातावरण खच्चून भरले आहे. अध्यक्ष निक्सनच्या इंपीचमेंटची तयारी सुरू आहे. सर्व वृत्तपत्रांतून याच प्रश्नांची चर्चा सुरू आहे. त्यात डॉ. किसींजरने राजीनाम्याची धमकी देऊन भर टाकली आहे. चांगला गुणी माणूस म्हणून तो सर्वांना हवासा आहे. परंतु हा पोरकटपणा करावयास नको होता असे काहींचे म्हणणे आहे.

हिंदुस्थानबाबत दोन प्रश्न विचारले जात होते.

१) न्युक्लिअर एक्स्प्लोजन आणि २) आर्थिक परिस्थितीचे गांभीर्य.

अणुसंशोधनाबाबत आमचा दृष्टिकोन आम्ही तपशीलाने सांगत असतो. काहींना तो समजतो परंतु काहींना तो समजूनही पटत नाही. अणुस्फोट आणि तो शस्त्रासाठी नाही ही गोष्ट दुर्दैवाने त्यांना समजतच नाही. त्यांची टीका दोन दृष्टीने असते. हिंदुस्थानने आजपर्यंत नैतिक भूमिका (अणूबाबत व जागतिक शांततेबाबत) घेतली, तिच्याशी हे सुसंगत नाही. दुसरी, उपाशी – गरीब हिंदुस्थान हा बॉम्ब कशाशी खाणार ? या लागट दृष्टीने होते.

हिंदुस्थानच्या आर्थिक परिस्थितीबाबतही विलक्षण अतिरेकी चित्र हिंदुस्थानचे मित्र म्हणविणारेच काढीत असतात. हिंदुस्थानचे राजकीय स्थैर्य संकटात आहे अशी कल्पनाचित्रे तयार करतात.

आमच्यापुढे अडचणी सर्वांप्रमाणे जरूर आहेत. परंतु आम्ही त्यांच्यावर मात करू शकू असे विश्वासाचे उत्तर, माहितीच्या आधारे आम्ही देत असू. पण पर कॅपिटावर त्यांचे गणित आधारलेले असल्यामुळे त्यांचा किती विश्वास बसतो कोण जाणे !

※

## ३३ वॉशिंग्टन

१३ / १४, जून, १९७४

येथे येऊन पाच – सहा दिवस होऊन गेले. लिहीन म्हटले तरी उसंतच मिळाली नाही. सकाळी, दुपारी कॉन्फरन्स, लंच आणि डिनर्स. सर्व बांधून घेतलेले कार्यक्रम. उजवीकडे किंवा डावीकडे पहायला जागा नाही अशी परिस्थिती.

आलो त्या दिवशी मुंबईसारखे येथे गरम होते. आणलेले गरम कपडे एकदम निरुपयोगी. खादीचा सूटच खरा उपयोगी पडला.

या खेपेला येतानाचा, विमानाचा प्रवासही कंटाळवाणा झाला. निघण्यापूर्वी पाच तास आधी उजाडलेले होते. त्यानंतर १४–१५ तास प्रवास करून लंडनमध्ये पोहोचलो तेव्हाही उजेडच होता. त्यामुळे झोप अशी आलीच नाही. प्रयत्न करून सुद्धा. एअर-पोर्टच्या शेजारी एक्सलसिअर हॉटेलमध्ये एक रात्र राहिलो. कंपोजची झोपेची गोळी घेऊन झोपलो. ५–६ तासांच्या झोपेनंतर सकाळी काहीशी हुषारी वाटली.

या खेपेला बाहेरच्या या मुक्कामात प्रकृति बरी नाही राहिली. रात्रीची झोप अर्धवट. बरे नसल्याची भावना सतत राहिली. एक रात्री तर कण्हत राहिलो. अंग गरम नव्हते पण कणकणी वाटली. सॅकरिन घेऊन झोपलो. तेव्हा काहीसे बरे वाटले. या खेपेला हा काहीसा नवा अनुभव आला.

C 20 च्या मुख्य मीटिंगला या वेळी विशेष महत्त्व होते. कारण ती शेवटची मीटिंग होती. गेली दोन वर्षे सतत प्रयत्न केल्यानंतर त्यातून काही निष्पन्न तर केले पाहिजे !

बऱ्याच देशांचे प्रतिनिधी बदलले होते. चेअरमन अलिवर्धनम्, स्वीडनचा मंत्रि आणि मी एवढेच पहिल्या मीटिंगपासून अखेरपर्यंत राहिलेले प्रतिनिधी कायम होतो. बाकीचे एकसारखे बदलत राहिले.

विशेषत: फ्रान्सचे गिस्कार्ड, जर्मनीचे स्मिथ, इंग्लंडचे बार्बर व यू. एस्. ए. चे श्री. शुल्ट्झ् यांची गैरहजेरी भासली. श्री. बार्बरचे जागी यू. के. चे प्रतिनिधी चॅन्सेलर डेनिस ही आले होते. १९६४ साली रक्षामंत्रि म्हणून आम्ही दोघे इंग्लंडमध्ये भेटलो होतो. त्याची त्यांनी आठवण काढली

डिफेन्सवर खर्चच खर्च करणारांना वित्तमंत्रि करून खर्चावरचे पहारेकरी करण्यात नियतीने काही मजेदार खेळ केला आहे नाही ? असे ते विनोदाने पण मार्मिकपणे म्हणाले. या मीटिंगमध्ये त्यांच्या राजकीय अनुभवाचा उपयोग मी करून घेऊ शकलो. LINK च्या प्रश्नावर जर्मनी व यू. एस्. ए. यांची मने वळविण्यात त्यांची बरीच मदत झाली.

G 24 मध्ये अविकसित देशांची एकी टिकविण्याचे महत्त्वाचे काम घडले. अल्जेर्सचा तरुण वित्तमंत्रि या कॉन्फरन्सचा चेअरमन होता. त्या नात्याने त्याला महत्त्वाचा रोल होता. त्याची माझी युती चांगलीच जमली. परिषदेपूर्वीच त्याने मला आग्रहपूर्वक लिहिले होते.

या शेवटच्या सभेसाठी जर G 24 चा आम्ही उपयोग करू शकलो नसतो तर सर्व व्यर्थ होते. ता. १३ चा म्हणजे आजचा सर्व दिवस याच नाट्यमय घडामोडीत गेला.

Link चे प्रश्नावर तडजोड नाही अशी भूमिका घेतल्यामुळे सर्व प्रश्नास धार आली. शेवटी तडजोड, वेळ देण्याबाबत करावी लागली. परंतु यू. एस्. ए. व जर्मनी यांना पुनर्विचार करण्याचे धोरण जाहीर करावे लागले. परिषद उधळली जाणार या कल्पनेने अलिवर्धनम् अस्वस्थ होते. परंतु शेवटी शेवटी मदत झाली म्हणून मुद्दाम आभार मानण्यासाठी सभेनंतर आवर्जून आले होते.

एक दिवस वेळ काढून ३५–४० मैलांवर येथील नेव्हल अकादमी पहावयास गेलो होतो. तेथे एक हिंदी प्रोफेसर भट्टाचार्य भेटले. तरुण मनुष्य आहे. त्याच्या ज्ञानाचा तेथे एका शाखेचा प्रमुख म्हणून उपयोग केला जात आहे. परंतु हिंदुस्थान शिपयार्डमध्ये त्याला तो मागत असताना नोकरी देण्याचा शहाणपणा आमच्या देशाने दाखविला नाही अशी त्याची तक्रार होती.

पहाण्यासारखी संस्था आहे. १८४७ पासून संस्था हळूहळू वाढते आहे. आज ४००० चे वर कॅडेट्स् आहेत. त्यांची लायब्ररी व अन्य हॉल्स पाहिले. शिक्षणाची आधुनिक साधने पाहिली. बऱ्याच दिवसांनी, जवळ जवळ दोन अडीच तास एकसारखा चालत राहिलो. शेवटी काहीसे थकल्यासारखे वाटले. पण वेळ मोठा आनंदात गेला.

परिषदेच्या कागदपत्रांपेक्षा अधिक काही वाचता आले नाही.

नेहमीप्रमाणे चार-पाच दिवसांनंतर घरची आठवण तीव्र होते व परतीची ओढ सुरू होते. तुम्हा सर्वांची आठवण येत आहे.

निघण्यापूर्वी चि. राजासंबंधी* आपली चर्चा झाली होती. तो प्रश्न सर्व प्रवासात माझ्या मनात एकसारखा घर करून आहे. त्याच्यासाठी काही केलेले नाही ही एकसारखी बोचणी आहे. तो बिचारा, माझ्यासारखा आहे. त्याची जर कुणी काळजी घेतली नाही तर त्याचे कसे होणार ही चिंता मला लागली आहे. कदाचित ही माझी चिंता अकारण असेल. ☼

## ३४ मॉस्को

२४ जून, १९७४

दहा वर्षांनंतर सोविएत रशियाला, विशेषतः मॉस्को विभागात पुन्हा काल सकाळी ९।। ( मॉस्को टाइम ) पोहोचलो.

दहा वर्षांपूर्वीच्या स्वागत-समारंभासारखा थाट अर्थातच या वेळी नव्हता. बाकी आदरातिथ्य, स्वागत मनापासूनचे होते.

सोव्हिएटस्स्कॉया या हॉटेलमध्ये व्यवस्था आहे. जुने खानदानी हॉटेल आहे· व्यवस्था उत्तम आहे. या वेळच्या प्रवासामध्ये एकूण मला थकवा जास्त वाटला. प्रवासात तास-दीड तास झोपलो असेन तेवढाच.

पोहोचल्यापासून येथील धावपळीत झोप शक्यच नव्हती. जेव्हा थोडा वेळ मिळाला तेव्हाही पडून राहिलो. परंतु झोप नाही. काल रात्री ११।। वाजता झोपलो. ५।।–६ तास झोप झाल्यामुळे सकाळी पुष्कळच हुशारी वाटली.

काल सकाळचा तेहरान ते मॉस्को प्रवास मात्र मनोरंजक झाला. सकाळची कोवळी सूर्यकिरणे पडू लागली होती, तेव्हा आमचे विमान इराणच्या उत्तर सीमेवर होते.

दूर बर्फाच्छादित शिखरे दिसू लागली नि स्पष्ट होऊ लागले की, सीमा जवळपास आहे. एकदम डाव्या बाजूला ढगांच्या वर डोके काढून

---

* चि. राजा (डॉ. विक्रम चव्हाण) हा यशवंतरावांचा पुतण्या. हा पुढे १९८३ मध्ये पुणे-सातारा मार्गावर अपघातात ठार झाला.– संदर्भ

सूर्यकिरणात चकचकणारे हिमाच्छादित असे एकुलते एक उंच शिखर दिसते. त्याच्या आसपास मैलोगणति काही दृष्टिपथात येत नव्हते.

हा एकाकी पहारेकरी कोण ? अशी जिज्ञासा निर्माण झाली. चौकशी केली हवाईसुंदरीजवळ. मुंबईची उत्तम मराठी बोलणारी ही मुलगी माहितगार दिसली. तिने सांगितले की Holy Mountain Ararat म्हणतात तो हाच. तिने त्याचे धार्मिक, ऐतिहासिक महत्त्व मोठ्या जिव्हाळ्याने सांगितले. मला काहीसे आश्चर्य वाटले.

मी विचारले, तुला एवढी माहिती कशी ? तिने मोकळेपणाने हसून सांगितले की माझी आई आर्मेनियन आहे. वडील सारस्वत – मंगलोरकडचे. तेहरानमध्ये असताना आईशी लग्न केले. घरात कोकणी बोलतो. मुंबईत मराठी वस्तीत राहतो. त्यामुळे मराठी मातृभाषाच झाली आहे. वगैरे वगैरे, " एकूण सर्वच गोंधळ नाही ?" असं तीच म्हणाली. मी म्हटलं, " तसं काही नाही, आता नव्या हिंदुस्थानमध्ये असेच होत राहणार आणि त्यात वावगे असे काहीच नाही."

अरारतचे शिखर ( शिखर शिंगणापूरची आठवण होते ) तुर्कस्तानच्या हद्दीत आहे. ते पहात पहात आम्ही सोव्हिएट हद्दीत शिरलो.

अर्मेनिया, जॉर्जिया ओलांडून पुढे आलो तेव्हा कॉकेशियसची उंच तटबंदी लागते. मोठे मनोहर दृश्य होते.

कालचा दिवस काहीसा तयारीत गेला. एम्बसीमध्ये दोन तास वाटाघाटींचा तपशील कसा मांडावा या चर्चेत गेला. दुपारी टेलिव्हिजन टॉवर पहाण्यास गेलो.

मी पूर्वी पाहिलेल्या मॉस्कोत ही चीज नव्हती. १९६७ मध्ये बांधली आहे. १५००-१६०० फूट उंच रॉकेटच्या आकाराची ही इमारत आहे. प्रेक्षणीय आहे. काल रविवार असल्यामुळे हजारो रशियन स्त्री-पुरुष रांगा लावून पहाण्यासाठी, लिफ्टच्या दाराशी उभे होते.

दुपारचे जेवण याच इमारतीत असलेल्या रेस्टॉरॉंमध्ये घेतले. हे रेस्टॉरॉं ९०० ते १००० फूट उंचीवर आहे. ते सारखे फिरत असते. अर्ध्या तासात एक फेरी पुरे करते. इथे बसून सर्व मॉस्को शहर उत्तम पहाता येते.

संध्याकाळी, बोल्शिव्हा थिएटरमध्ये इटॅलियन (मिलानच्या प्रसिद्ध कंपनीचा) ऑपेरा पाहिला. फारच बहारदार झाला. अर्थात् शब्द इटॅलियन होते परंतु संगीत सर्वांचे होते. गेले तीन महिने हा ऑपेरा चिक्कार गर्दीत येथे चालू आहे. कालचा शेवटचा दिवस होता. थिएटर-मध्ये स्पीकर, श्री. धीलाँ सहकुटुंब भेटले. तेही येथे दौऱ्यावर आले आहेत.

उद्यापासून दोन दिवस चर्चा आहेत. अजून बडेमियांची भेट ठरलेली नाही. होईल का नाही निश्चित कोणीच सांगत नाहीत. प्रेसिडेंट निक्सन २७ ला येथे येत आहेत. त्या भेटीच्या तयारीत सर्व गुंतले आहेत असे सांगितले जाते. शक्य आहे.

दहा वाजता वित्तमंत्र्यांशी चर्चा करण्यासाठी जावयाचे आहे आणि कांही कागदपत्रे चाळावयाची आहेत. तूर्त येथेच थांबतो.

❋

## ३५ मॉस्को

२५ जून, १९७४

कालचा दिवस हा महत्त्वाचा गेला. वित्तमंत्र्यांशी सविस्तर बोलणे झाले. सामान्यतः आजपर्यंतच्या अनुभवावरून सोविएत रशियाच्या वित्तमंत्र्याला भारतीय प्रश्नाबाबत प्रत्यक्ष भाग घेऊन निर्णय देण्या-घेण्याची फारशी प्रथा–संधी–नसावी.

अनेक गोष्टींचा, जो मी माझ्या चर्चेत उल्लेख केला, त्याचे बार-कावे आपल्याला माहीत नाहीत असे त्यांनी प्रांजलपणे सांगितले.

भारतीय – सोव्हिएट आर्थिक सहकार्य आता निश्चित व भक्कम पायावर उभे आहे. त्याची विविध क्षेत्रांत वाढ झाली आहे. त्याचा आकार (व्हाल्यूम) वाढला आहे. त्यातून काही प्रश्न निर्माण झाले

आहेत. ते प्रश्न नव्या दृष्टीने तपासून पाहून काही धोरणात्मक निर्णय, राजकीय दृष्टिकोनातून घेण्याची तातडीची आवश्यकता आहे; हा माझा मुख्य मुद्दा होता.

येथील सर्व चर्चेमध्ये हेच मला विस्ताराने व तपशील देऊन सांगावयाचे आहे. हे आर्थिक सहकार्य अजूनही विस्तारावयाचे आहे. त्याची सखोलता व दृढता अजूनही वाढवावयाची आहे. त्यासाठी काय करणे शक्य आहे ते सांगण्यासाठी मी आलो आहे.

Composition of credit assistance and the framework of this assistance needs to be changed and softened. या दृष्टिकोनातून मी काही निश्चित सूचना मांडल्या.

दुपारी श्री. सॅचकोव्ह यांच्याशी बोलणे झाले. हे भारतात अनेकवेळा आलेले गृहस्थ आहेत. भारतीय आर्थिक संयुक्त आयोगावरील (जॉईन्ट कमिशन) सोव्हिएट प्रतिनिधी म्हणून काम करतात.

त्यांना मी माझ्या भेटीचा हेतू समजाविला. निव्वळ तांत्रिक (टेक्निकल) किंवा फक्त आर्थिक प्रश्न नसून मूलतः राजकीय प्रश्न म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे हे आग्रहाने सांगितले.

हे गृहस्थ काहीसे रिजिड आहेत. त्यांना माहीत असलेल्या तपशीलात गुंतून जाऊन मुख्य प्रश्नापासून दूर राहतात. दिल्लीतील झालेल्या चर्चेत मला हाच अनुभव होता म्हणून येथे मी त्यांना जरा (त्यांच्या पाहुणचाराच्या वातावरणाचा फायदा घेऊन म्हणा तर) सुनविले. रात्रीच्या भोजनप्रसंगी इतर सोव्हिएट पाहुण्यांच्या हजेरीत त्यांची माझी पुन्हा भेट झाली. तेव्हा मी त्यांचा " very competent Technocrat " असा उल्लेख केला तेव्हा तेच थोडेसे व्याकूळ झाले. म्हणाले, टेक्नोक्रॅट शब्द येथे थोडासा टीकात्मक दृष्टीने वापरतात. म्हणजे ज्याला राजकीय दृष्टी समजत नाही असा तज्ज्ञ या अर्थानेही हा उल्लेख होतो.

तेव्हा मी हसत हसत सांगितले की, ह्या अर्थाने मी बोललो नाही. तेव्हा त्याला काहीसे बरे वाटले. पण त्याला जे समजणे जरूर होते ते तो समजला.

चारच्या सुमारास बाहेर फिरायला गेलो. क्रेमलिनच्या आवारात त्यांनी नवे डी मॉंड एक्झिबीशन किंवा म्युझियम तयार केले आहे. ते पहावयास गेलो.

सैबेरियामध्ये हिऱ्यांच्या नव्या खाणी सापडल्या आहेत. हा एक नवा उद्योगधंदा मोठ्या प्रमाणात सुरू झाला आहे. तेथे सापडलेले नवे हिरे-माणकांचे नमुने येथे आहेत.

महत्त्वाचा विभाग म्हणजे रशियाच्या राजकुटुंबातील, शेकडो वर्षांत जमलेल्या अमोल हिऱ्यांचा साठा येथे पहावयास मिळतो. राज-मुकुट आणि हिरेजडित असे अमोल दागदागिने व आभरणे पाहण्या-सारखी आहेत.

क्रेमलिनच्या आवारात इकडे तिकडे अर्धा तास फिरलो. १९६४ सालीही येथेच फिरावयास आलो होतो. पुन्हा एकदा उजळणी. कॉ. लेनिनचा बसलेल्या स्थितीतला एक आकर्षक पुतळा हे फक्त नवीन दिसले. क्रेमलिनच्या भिंतीमध्ये व जवळपास दुरुस्त्या चालू आहेत त्यामुळे लाल चौकात (रेड स्क्वेअर) भटकता आले नाही. क्रेमलिनच्या आवारातील या सफरीमध्ये मिसेस् चिबिसॉव्ह (Chibisova) आणि श्री. रोमॉनाव्ह (Romanav) हे रशियन अधिकारी ( जे आमच्या दिमतीला दिले आहेत ते) आमच्या बरोबर होते.

रात्री वित्तमंत्र्यांचे भोजन होते. खूप मजेत वेळ गेला. काही मंत्री होते. बरेचसे आर्थिक तज्ज्ञ व बँकर्स होते. बँकर्स हे चांगले प्रतिष्ठित आणि पोक्त वाटले. व्यवस्थित पोषाख, गंभीर मुद्रा, पोक्त बोलणे–वागणे या सर्व बाबतींत हे बँकर्स पाश्चिमात्य बँकर्ससारखेच वाटले. आज त्यांच्या संस्था पाहाणार आहे. तेव्हा अधिक समजेल.

वित्तमंत्री मोठा अघळपघळ व गृहस्थीची आवड असणारा मानव वाटला. कौटुंबिक जीवनात विशेष रस दिसला. आपल्या दोन लेकींचे व त्यांच्यापासून झालेल्या दोन नातवांचे खूपच कोडकौतुक सांगत होते. आपल्या जीवनातील अत्यंत आवडते काम म्हणजे आपल्या नातवंडांशी भेटणे – खेळणे हे आहे. हे त्यांनी इतक्या सहजपणे – भावनापूर्वक सांगितले

की 'आजोबा' ही संस्था ऐतिहासिक घटनांच्या उलथापालथीतही कायम राहिली आहे, याचा आनंद वाटला.

या 'आजोबांना' पुन्हा २८ तारखेला भेटणार आहे. या खेपेचे रशियातील हे आमचे यजमान पाहून गेल्या भेटीतील आमचे होस्ट रक्षामंत्री मार्शल मॉलेनोव्हस्की यांची तीव्रपणे आठवण झाली.

*

## ३६ नोवोसिबिर्स्क (सैबेरिया)

यू. एस्. एस्. आर.

२७ जून, १९७४

मॉस्कोहून २५ तारखेला रात्री ( ? ) ९ वाजता इकडे येण्यासाठी 'सोव्हिएटस्काया' हॉटेलमधून निघालो तेव्हा बाहेर झक्क संध्याकाळची उन्हे पडली होती. मावळतीकडे झुकलेला लाल लाल सूर्य डोळे भरून पहाण्याइतका सौम्य वाटत होता.

हल्ली इकडे दिवस मोठा – म्हणजे फारच मोठा आहे. अंधार १० चे पुढे पडतो. ४ चे सुमारास पुन्हा उजेड. रात्री १०–४५ वाजता विमान मॉस्कोहून निघाले. पाच तास प्रवास करून येथे पोहोचलो तेव्हा सकाळचे ७ – ४५ झाले होते. ४ तासांचे अंतर आहे.

इतकी वर्षे सैबेरियासंबंधी ऐकले होते. वाचले होते. एकदा या भूमीवर येऊन पाहिले पाहिजे अशी तीव्र इच्छा होती. ती आज पूर्ण झाली. अर्थात् हे शहर – दक्षिण सैबेरियात आहे. अगदी आर्क्टिकचे किनाऱ्यावर काय, कसे आहे त्याचा अंदाज येथे येऊन अर्थातच येणार नाही.

बारा लाख वस्तीचे शहर आहे. उद्योगधंद्यांचे केंद्र आहे. झकपकीत म्हणतात तसे शहर नाही. उद्योग वाढत आहेत – तसे वाढणारे शहर

वाटले. अजून घरे होत आहेत. आहेत ती फंक्शनल आहेत. रस्ते बऱ्यापैकी – अधून मधून आपल्याकडे जशा दुरुस्त्या चालू असतात तशा चालू आहेत. वाहतुकीमध्ये माल-वाहतुकीचे ट्रक्स फार दिसले. म्हणजे कामसू शहर आहे. संपत्ती-उत्पादनाचे कार्यक्षेत्र वाटले.

सैबेरियातील अर्थातच हे सर्वात मोठे शहर आहे. सर्व आशियाभर पसरलेला हा सैबेरिया अनेक विभागांचा आहे. त्याचा हा एक विभाग आहे. हे सर्व सैबेरियाचे विभाग रशियन फेडरेशनमध्ये सामील आहेत. ( म्हणजे सैबेरिया हा स्वतंत्र रिपब्लिक नाही. )

ट्रान्स सैबेरियन रेल्वे येथून पुढे जाते. सर्व लाइन विजेची केली आहे. मॉस्को ते नोवोसिबिर्स्कला रेल्वेने ४८ तास लागतात. आणि सबंध सैबेरिया ओलांडण्यास ८ दिवस रेल्वेचा प्रवास करावा लागतो. या शहरामध्ये दोन तीन तरी विमानतळ असावेत.

गेल्या २५ वर्षांत हे शहर अधिक वाढले. अत्यंत योजनापूर्वक या प्रदेशाचा विकास चालू आहे. Massive univers lands केल्या आहेत. ऑइललँड्स्, आयर्न, डायमंड्स्, कॉपर यांनी हा प्रदेश खच्चून भरला आहे.

या शहराच्या आवती भोवती असलेल्या तेलांच्या खाणींतून दरसाल १२० मिलियन टन तेल निघते. शेतीची जमीन – जी काही आम्ही विमानतळावरून शहरामध्ये २० - ३० मैलांचा प्रवास करताना पाहिली – उत्तम काळीभोर आहे. मशागत झालेली दिसली. गव्हाचे पीक दिसले. ऑगस्टच्या मध्यावर कापणी असते. हिवाळ्याची चाहूल लागण्यापूर्वी पीक हाती यावे अशी योजना असावी.

या विभागात पिकाखाली येण्यासारखी जमीन ४० लाख एकर आहे. लोकसंख्या सर्व २० - २२ लाख लोकांची. त्यांपैकी ७० टक्के शहरवासी. बाकी ३० टक्के शेती व तत्सम कार्यात, ग्रामीण भागात अशी वाटणी आहे.

येथे पोहोचताच या विभागाच्या कमिटीचे प्रमुख स्वागतास हजर होते. त्यांनी अगत्याने शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या सेंटोइट हॉटेलमध्ये नेले. जुन्या पद्धतीचे हॉटेल आहे. परंतु व्यवस्था उत्तम. बैठकीचा

मोठासा हॉल, बेडरूम तशीच प्रशस्त. मोठ्या काचेच्या बंदिस्त खिडक्या. उजेड भरपूर. गालीचे भक्कम पण उत्तमपैकी ( नाजूक नव्हेत ).

हॉटेलच्या समोर शहराच्या मध्यवर्ती, चौक आहे. वाहतुक एकसारखी असते. चौकाच्या पलीकडे लेनिनचा भव्य पुतळा आहे. त्याच्या पाठीमागे सुरेख डोम असलेली एक विशाल, नव्या तऱ्हेची इमारत आहे.

मी चौकशी करता समजले की, ते युद्धकालानंतर बांधलेले थिएटर आहे. काल संध्याकाळी ७ ते ९॥ आम्ही 'ॲना करेनिना' हा बॅले पाहिला. दोन हजार लोक बसतील एवढे प्रेक्षागृह आहे. त्याच थिएटरमध्ये दुसरेही प्रेक्षागृह आहे. तेथेही एक हजार प्रेक्षकांची सोय असून त्या वेळी त्या ठिकाणी कॉन्सर्ट चालू होता.

येथील ॲडमिनिस्ट्रेशनच्या कार्यालयात दीड दोन तास घालविले. त्यांच्या व्हाइस चेअरमननी तेथे चालू असलेल्या विविध कार्यांच्या प्रगतीचा तपशील दिला. अर्धा पाऊण तास त्यांनी, आम्ही आता पुरे म्हणावे, अशा थाटात स्टॅटिस्टिक्सची भेंडोळी आमच्या अंगावर फेकली. अर्थात् ही सर्व वस्तुस्थितिनिदर्शक माहिती होती. I was really impressed.

दुपारी जेवणानंतर 'सिटी ऑफ सायन्स' २० - २५ मैलांवर आहे, तेथे गेलो. सोव्हिएटच्या नेत्यांच्या दूरदृष्टीचा खरा पुरावा मला येथे दिसला. तेथील उपप्रमुखांनी संस्था, केव्हा, कशी व का सुरू झाली याची साद्यंत माहिती प्रथमच दिली. या ॲकॅडमीची पुढील कार्य-दिशा आणि मार्गदर्शक तत्त्वे कोणती आहेत तेही स्पष्ट केले.

१९५७ मध्ये सेंट्रल कमिटीने प्रथम निर्णय घेतला की, सैबेरियामध्ये विज्ञानाचे केंद्र स्थापित करावयाचे. पुढे त्याची अंमलबजावणी झाली. अजूनही होत आहे. राष्ट्रीय प्रमुख केंद्रापासून दूर विभागात विज्ञानाचा पाया प्रस्थापित केला पाहिजे हे एक मूलसूत्र ! Deconcentration. त्याचबरोबर अनेकविध संपत्तीनी भरलेल्या सैबेरियाचा विकास म्हणजे फक्त उद्योगधंदे काढून ती संपत्ती वापरणे असाच त्याचा उद्देश असता कामा नये.

त्याचबरोबर त्या प्रदेशात देशातील पहिल्या प्रतीच्या वैज्ञानिकांनी जाऊन राहिले पाहिजे. तेथे आपले कार्यक्षेत्र केले पाहिजे. त्या प्रदेशातील निवडक, पहिल्या प्रतीच्या तरुणांना निवडून त्यांच्यामध्ये विज्ञानाचा प्रसार केला पाहिजे. मूलतत्त्वांच्या संशोधनाबरोबरच तेथील प्रश्नांच्या व परिस्थितीच्या संदर्भातही संशोधन झाले पाहिजे अशी तत्त्वप्रणाली त्यांच्यापुढे होती. यामध्ये फार दूरदृष्टि होती.

प्रदेशाचा विकास म्हणजे फक्त साधन-संपत्तीचा विकास व वापर नव्हे तर तेथील जनजीवनाचा विकास. हे करावयाचे तर आधुनिक जीवनाची कार्यशील प्रेरणा म्हणजे विज्ञान – त्याची वाढ केली पाहिजे. विज्ञानावर आधारलेली संस्कृति हा जनजीवनाचा स्थायीभाव करावयाचा असेल तर असा ऐतिहासिक महत्त्वाचा निर्णय आवश्यक होता. त्याचे परिणाम दिसून येत आहेत.

सायन्सच्या सर्व प्रमुख शाखांच्या संशोधन-संस्था येथे प्रस्थापित आहेत. मॉस्को, लेनिनग्राड व तिसरी नोवोसिबिर्स्क अशी विज्ञानाची तीन केंद्रे मानली जातात.

महत्त्वाचे मानले गेलेले तज्ज्ञ येथे येऊन राहिले आहेत. जगातील महत्त्वाच्या विश्वविद्यालयांशी त्यांचे संबंध आहेत. एक नवी पिढी बनली आहे. नवे विश्वविद्यालय याच कँपस्‌वर आहे. या कँपस्‌ची लोकसंख्या दहा हजार आहे.

सैबेरियामध्ये इतर दोन ठिकाणीही नवी केंद्रे सुरू केली आहेत. याकुत ( Yakut ) ( पूर्व सैबेरिया ) मध्ये असेच केंद्र आहे. संशोधनाचे नवे विषय येथील भौगोलिक परिस्थितीच्या आधारावर निवडले आहेत. उदाहरणार्थ – येथील मैलोगणती जमीन नित्य बर्फाच्छादित असते. तेव्हा त्या जमीनीची परिस्थिती– तिचा उपयोग, तेथील प्राणी, यांच्या संदर्भात याकुतमध्ये एक इन्स्टिटयूट फक्त हेच संशोधन-कार्य करीत आहे.

सैबेरिया ही सोविएत रशियाची एक जबरदस्त शक्ति आहे व ती अधिकाधिक शक्तिमान होऊन राहिली आहे.

आम्हाला पुष्कळ पाहाण्यासारखे व शिकण्यासारखे आहे. आज जे मी पाहिले त्याचा माझ्यावर परिणाम झाला आहे. पाहिल्याचा आनंद आहे. नवी नजर यातून मिळते. आम्ही ती केव्हातरी वापरू या आशेनेच हे लिहिले आहे.

✻

## ३७ नोवोसिबिर्स्क

२७ जून, १९७४

आज संध्याकाळी ७ वाजताच्या विमानाने मॉस्कोस परत जात आहे. येथील लोक मोठे आदरातिथ्यशील, प्रेमळ आहेत.

काल संध्याकाळी येथील Obe या नदीवरील धरण आणि वीज-उत्पादन-केंद्र पाहिले. सपाट जमिनीवर डॅम बांधला आहे. ११० स्क्वे. कि. मीटर्सचा पाण्याचा साठा आहे. या सर्व विभागास – शहरास येथीलच वीज मिळते.

सैबेरियात सर्व नद्या उत्तरवाहिनी आहेत. फार मोठ्या आहेत. ही Obe नदी, जिच्या दोन्ही काठांवर हे शहर वसले आहे – रशियाच्या मोठ्या नद्यांमध्ये ही गणली जाते. मुखाजवळ कित्येक मैल तिचा पसारा आहे. मोठ्या प्रमाणात जलवाहतुक, हिच्यातून चालते.

आज सकाळी हेवी इंजिनिअरिंग मशिन टूल मॅन्युफॅक्चरिंग प्लॅन्ट पाहिला. युद्धाचे दरम्यान पश्चिम भागातून सुरक्षिततेसाठी हे कारखाने हलविले होते. ते येथेच राहिले – वाढले – व आधुनिक झाले. रांची, बोकारो आणि भिलाई येथील बरीचशी यंत्रसामुग्री येथीलच आहे.

हरद्वारला येथूनच मशिनरी गेली आहे. हरद्वार येथे राहून आलेले दोन इंजिनिअर्स भेटले. हरद्वारएवढाच कारखाना आहे. येथे चार हजार लोक कारखान्यात आहेत. हरद्वारला मात्र १३ हजार लोक ( इति एम्. एस्. कौल ) आहेत.

नोवोसिबिर्स्क म्हणजे नवसैबेरिया. प्रतिकात्मक नाव आहे व बऱ्याच अर्थांने खरे आहे. नवीन शहर – तरुण शहर, भवितव्य उज्ज्वल– शहराचे; प्रदेशाचे व देशाचे. Good-by Saibaria !

*

## ३८ मॉस्को

२९ जून, १९७४

आज ९।। वाजता मॉस्को सोडणार. गेल्या सात दिवसांची भेट पुरी झाली. काल संध्याकाळी येथील वित्तमंत्रि श्री. गरबोजेव्ह व त्यांचे इतर सहकारी यांनी प्राया हॉटेलमध्ये आमचेतर्फे भोजन दिले. योग्य ती भाषणे झाली.

त्याच्या आधी वित्तमंत्र्यांना मी निरोपाचे भेटून आलो होतो. त्या वेळी इतरांशी झालेल्या सर्व चर्चेचा मी आढावा घेतला आणि मी काय अंदाज, आशा, अपेक्षा घेऊन परत चाललो आहे याचीही त्यांना कल्पना दिली.

वस्तुतः आमचे ' निगोशिएटिंग डेलिगेशन ' नाही. परंतु सोविएत सरकार ज्या वेळेस नवी योजना ( १९७६–८० ) वनविण्याच्या तयारीत आहे, तेव्हा आमच्या अर्थकारणात निर्माण झालेल्या तातडीच्या स्वरूपाच्या गंभीर समस्या त्यांच्यासमोर मांडून त्यांच्या–आमच्या व्यापार व इतर आर्थिक संबंधात काय सुधारणा करण्याची निकड आहे ती मांडणे मित्र-राष्ट्र म्हणून आमचे कर्तव्य आहे.

समस्या व त्यांची उत्तरे यांचे स्वरूप त्रिविध आहे.

१) ज्या अटीवर पत-कर्जे देण्याची व्यवस्था आहे तीमध्ये महत्त्वाचे बदल करून ती व्यवस्था आमच्या अर्थकारणास झेपेल अशा तऱ्हेने सौम्यातिसौम्य करणे.

२) प्रकल्पांनाच आवश्यक ती यंत्रसामुग्री देण्याची त्यांची नीति आहे. ती काहीशी ढिली करून आम्हाला आवश्यक ती, त्याच इक्विपमेंटशी संबंधित 'स्पेअर्स अँण्ड कांपोनंट्स्' द्यावेत म्हणजे दिलेल्या कर्जांचा वापर लवकर पुरा होईल.

३) आज साठलेल्या कर्जांची परतफेड आम्ही न चुकता करू. परंतु त्याचा कालावधि वाढवून आमचे ओझे काहीसे हलके करणे.

आजच्या चलनवाढीच्या भयानक व जागतिक स्वरूपाच्या वातावरणाने आमच्या परकीय चलनाचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे म्हणून या उपायांची तातडी आहे, ही आमची भूमिका परत स्पष्ट केली व त्याचा हाय-लेव्हलवर विचार होऊन निर्णय होणे आवश्यक आहे अशी त्यांची भूमिका त्यांनी मांडली. कोणीही एक मंत्री निर्णय घेऊ शकणार नाही. मूलभूत नीतीचे प्रश्न आहेत.

येथे अमेरिकन प्रेसिडेंट निक्सन आले आहेत. सर्व नेते मंडळी त्यांच्याशी चर्चेत गुंतली आहेत. त्यामुळे निर्णय लगेच होणार नाही. परंतु सर्व बाजूंनी या प्रश्नाचा ते विचार करतील – वगैरे आश्वासन त्यांनी दिले.

आता यातून नेमके काय घडेल ते सांगणे सोपे नाही. परंतु माझ्या अंदाजाप्रमाणे नं. १ व नं. २ कमी-जास्त फरक करून मानले जाईल. नं. ३ बाबत विशेष काही होणार नाही. श्री. एम्. जी. कौल यांना मी माझा अंदाज सांगितला.

या चर्चेच्या सत्रात ता. २५ रोजी श्री. बॅबेकॉव्हशी चर्चा मोठी मजेदार झाली. सुरुवातीला स्पष्ट नाहीच म्हणाले. परंतु मी आस्ते आस्ते त्यांच्या माझ्या दिल्लीला झालेल्या चर्चेची आठवण करून दिली. मग स्वारी सरळ रस्त्यावर आली, आणि माझ्या स्मरणशक्तीने मला दगा दिला, तुम्ही हे प्रश्न माझेबरोबर श्री. ब्रेझनेव्हचे भेटीचे वेळी, आदल्या दिवशी उपस्थित केले होते वगैरे आपल्या सहकाऱ्यांच्या समक्ष कबूल केले. पुढची चर्चा फारच मोकळी व मैत्रीच्या वातावरणात झाली. ते व मी स्वतंत्रपणेही अर्धा तास बसलो.

गेल्या दहा वर्षांत सोव्हिएट समाजही बराच बदलला आहे. सुबत्ता अधिक. दुकानांमधून विविध वस्तु मुबलक दिसतात. ( अर्थात् पश्चिमी देशांशी तुलना मी करीत नाही व तशी तुलना योग्यही नाही.) रस्त्यावर मोटार-गाड्या, इतर शहरांत दिसाव्यात तशाच दिसतात.

आजचे राजकीय प्रश्न व राजकीय पुढारी यांच्याशिवाय इतर प्रश्नांबाबत बऱ्याच मोकळेपणाने बोलताना आढळतात. वाचनाची जबरदस्त हौस वाढली आहे. पुस्तके लाखांच्या संख्येने खपतात. लहान मुले या बाबतीत सर्वांचे पुढे आहेत. शिक्षणप्रसारामुळे ज्ञानविषयक जिज्ञासेची एक नवी लाट उसळली आहे.

सैबेरियाच्या भेटीच्या वेळी मजबरोबरचे उपवित्तमंत्रि श्री. बोरिसॉव्ह ( हे अर्थशास्त्राचे पी. एच्‌डी. आहेत ) आणि स्थानिक पीएच्. डी. चा विद्यार्थी (जो आमच्याबरोबर इंटरप्रिटर होता) त्यांचेबरोबर पुस्तकां-बाबत चर्चा निघाली. मला पुस्तके प्रिय आहेत हे त्यांना माहीत असावे. ( पाहुण्यांची सर्व तपशीलवार माहिती स्थानिक अधिकाऱ्यांना असते.) त्यांनी स्वतःची माहिती देताना आपणही बुक-लव्हर आहोत अशीच दिली.

शास्त्रविषयक पुस्तके विविध निघतात. त्यांचा व्यासंग विश्व-विद्यालयात चालू असतो. परंतु त्यांची तक्रार, साहित्यविषयक व कथा-कादंबऱ्या हे वाङमय मागणीच्या प्रमाणात फार कमी पडते. पुस्तके प्रयत्न करूनही मिळत नाहीत. हजारो लायब्ऱ्या आहेत, तरीही ही अवस्था !

कोणत्या तऱ्हेच्या कथा-कादंबऱ्या प्रसिद्ध होतात, असे विचारता त्यांनी classics वर अधिक मागणी असते असे सांगितले. उदाहरणार्थ– पुश्किन, लिओ टॉलस्टॉय वगैरे. परदेशातील classics वर तसेच लोकांचे प्रेम आहे.

रविंद्रनाथ टागोर हे नाव त्यांनी विशेषत्वाने सांगितले. महा-भारताचे भाषांतर वा सारांश प्रसिद्ध झाले आहे. आपणास अजूनही ते वाचावयास मिळत नाही ही खंत त्यांनी बोलून दाखविली.

लहान मुलांबाबत श्री. बोरासॉव्हने मला जे सांगितले ते तर मी कधीच विसरणार नाही. " Children are our new ruling class." सर्व विशेष हक्क त्यांना आहेत. सर्व गरजांमध्ये त्यांच्या गरजांना विशेष

अग्रहक्क दिला जातो. भविष्याकडे आत्मविश्वासाने जाणाऱ्या समाजाची ही मोठी खूण आहे.

या देशात हिंडत असताना लेनिनची प्रतिमा सर्वत्र दिसते. लोक लेनिनला विसरलेले नाहीत. सर्व समाज त्यांच्याबद्दल कृतज्ञ आहे, याची साक्ष पावलोपावली मिळते.

देशाला नवजीवन देणाऱ्या नेत्याला जो देश विसरतो, त्या देशाला भविष्य नाही. आम्ही आमच्या देशामध्ये गांधीजींना विसरलो नाही ना ? मोठा अस्वस्थ करणारा प्रश्न मनामध्ये उभा राहिला. अशी काहीशी खंत मनामध्ये घेऊन मी आज मॉस्कोमधून निघालो.

पुढे अधिक प्रागमधून.

❋

## ३९ ब्राटिस्लाव्हा, (झेकोस्लॉव्हाकिया)

१ जुलै, १९७४

परवा सकाळी मॉस्कोवरून ९॥ वाजता निघालो व प्राग येथे जवळजवळ त्याचवेळी पोहोचलो. २॥ तासांचा प्रवास आणि वेळेचे अंतरही तेवढेच. प्रागमध्ये इंटर-नॅशनल हॉटेलमध्ये व्यवस्था आहे. उत्तम !

दुपारी ३॥ वाजता येथील एम्बसीमध्ये भारतीय संघाच्या सभासदांना भेटण्यासाठी गेलो. येथे असलेले १०-५ भारतीय व दूतावासाच्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांचे हे संमेलन होते. सुमारे ५० माणसे स्त्री-पुरुष मिळून होती. श्री. एल्. पी. सिंग (भारतातील पूर्वीचे होम सेक्रेटरी) यांच्या दोन मुली येथे आहेत. त्यांचा जावई आय्. एफ्. एस्. मध्ये आहे. तो येथे फर्स्ट लेफ्ट. म्हणून काम करतो. सर्व वातावरण घरगुती होते. लहान मुलांची गाणी-नाच झाले. भाषणे झाली. शेवटी चहाही.

यानंतर झेक सरकारच्या एका मंत्र्यासह प्राग शहर पाहण्यासाठी बाहेर पडलो. ६-७ टेकड्यांवर आणि नदीच्या दोन्ही काठांवर वसलेले हे एक सुंदर शहर आहे. त्याची सुंदरता, त्याच्या प्राचीनतेत आहे.

जुन्या प्रागमध्ये हिंडत असताना अरुंद रस्ते, ऐतिहासिक प्रासादतुल्य जुन्या इमारती. प्रत्येक शतकातील शिल्पाची साक्ष देण्याची वेगवेगळी चर्चेस् आणि बडे-बडे इमले. नदी ओलांडण्यासाठी १५ व्या किंवा १६ व्या शतकात बांधलेले पूल. ( तसे आता अनेक पूल त्या नदीवर आहेत.) उंच टेकडीवर प्रागचे क्रेमलिन म्हणून प्रसिद्ध असलेला castle व त्यामध्ये आखीव-रेखीव दिसणारे चर्च. ही सर्व पाहिली म्हणजे प्रत्यक्ष इतिहासाच्या हजेरीतच आपण आहोत, असे वाटते. त्यात नवेपणही आले आहे.

समाजवादी सरकारने मोठमोठे हाउसिंग कॉम्प्लेक्स बांधले आहेत ( तरीही येथे राहण्याच्या जागेची टंचाई आहे असे मला अनेकांनी सांगितले.) अंडरग्राउंड रेल्वे सुरू झाली आहे. मुलेबाळे घेऊन या रेल्वेने प्रवास करणे हा प्रागवासियांचा आजकालचा आवडीचा छंद झाला आहे. ८ वाजता परत आलो आणि लवकरच झोपी गेलो.

काल सकाळी प्रागवरून ९ वाजता निघून सरकारच्या एका छोटया विमानाने ब्राटिस्लाव्हा या शहरात पोहोचलो. हे शहर डॅन्यूब नदीच्या काठी आहे. माझ्या मते या शहराचे, मला वाटणारे हेच आकर्षण आहे.

ऑस्ट्रियापासून निघून व्हिएन्नामधून ती नदी झेकोस्लोव्हाकिया-मध्ये येते. तिच्या काठचे तेथील हे पहिले शहर आहे. आता ज्या हॉटेल-मध्ये बसून मी हे लिहीत आहे, तेथे समोर डॅन्यूब व तिच्यावर बांधलेला नवा पूल मला दिसतो आहे.

हे शहर स्लाव्हियाची राजधानी आहे. अगदी सीमेवर आहे. नदीच्या पलीकडे एका बाजूला ५-६ मैलांवर ऑस्ट्रियाची सरहद्द आहे. तर दुसऱ्या बाजूला १० मैलांवर हंगेरीची सीमा लागते.

गेली हजार वर्षे येथे लढाया व आक्रमणे सतत झाली आहेत. ८००-९०० वर्षे हंगेरियनांचे येथे साम्राज्य होते. जर्मन्सनीही दोनशे वर्षे राज्य केले. तुर्की सैन्याचा हल्ला झाला होता. नेपोलियनचे सैन्य या शहरात राहून पुढे पूर्वेकडे गेले. असा सर्व जुना इतिहास आहे.

नवा इतिहास म्हणजे दुसऱ्या महायुद्धात जर्मनांनी कब्जा केला होता. त्यांच्या मगरमिठीतून १९४५ साली सुटका झाली. रशियन सैन्याने शर्थीची लढाई करून केली. रशियन सैनिकांचे येथे अत्यंत भावपूर्ण स्मारक आहे. त्या लढाईच्या गोष्टी निघाल्या तेव्हा मी विचारले, त्या सैन्याचा सेनापती कोण होता ? तेव्हा येथील वडीलधाऱ्या जाणत्या मंत्र्यांनी सांगितले की ' मार्शल मालेनोव्हिस्की '. मला हे ऐकून आनंद वाटला. आपल्या स्नेह्याची कार्यभूमी म्हणून एक नवी आत्मियता वाटली. (हे मार्शल सोव्हिएट रशियाचे रक्षामंत्री होते.)

दुपारनंतर ६० मैलांवरील एक को-ऑपरेटिव्ह पाहण्यासाठी गेलो. चांगल्यापैकी कॉम्प्लेक्स म्हणून दाखविले. स्लाव्हियामधली ८५ टक्के जमीन अशा को-ऑपरेटिव्हमध्ये आहे. आम्ही सर्वत्र फिरून पाहिले. पिके उत्तम वाटली. त्यांची यंत्रसामुग्री पाहिली. सुमारे १५-२० हजार एकर जमीन या को-ऑपरेटिव्हखाली आहे. गहू, बार्ली, शुगरबीट, भाजीपाला करतात. पिगरी आहे. एक हजार गायींची आधुनिक दूधशाळा आहे. उत्तम फायदा काढतात. ७०० मेंबर्स आहेत. अर्थात् त्यांची मालकी नाही. मॅनेजमेंटमध्ये भाग घेतात. २५ वर्षांपूर्वी को-ऑपरेटिव्ह सुरू झाले.

पहिल्या पिढीतले ५-६ टक्के लोक राहिलेत. सर्व मेंबर्स ४–५ एकर जमीन घेऊन सामील झाले होते. या पंचवीस वर्षांत त्यांच्या असेट्स्‌ची संपूर्ण परतफेड झाली आहे. आज प्रत्येक सभासदाला वर्षाला सामान्यतः १२-१३ हजार रुपये मिळतात. परंतु सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे उत्पादनाच्या सर्व शाखांत क्रांति (रिव्होल्यूशन) झाली आहे. तिप्पट-चौपट उत्पादन वाढले आहे.

पूर्वी हे लहान शेतकरी उपासमार काढीत होते. स्लाव्हियाचे अर्थमंत्री क्रांतिकारक कम्युनिस्ट कार्यकर्ते होते. एका छोटचा शेतकऱ्याचे चिरंजीव – ते सांगत होते, त्याची २-२॥ हेक्टर जमीन होती. त्यात कुटुंबाचे भागत नसे. म्हणून त्याचे वडील फ्रान्समध्ये कोळशाच्या खाणीवर कामगार म्हणून सात वर्षे राहिले.

पुष्कळ विचार केल्यानंतर मी या निर्णयाला आलो आहे की, समाजवाद म्हणजे केवळ संपत्तीच्या वाटणीचे शास्त्र नाही. तर वस्तुतः

उत्पादनाच्या तंत्रात क्रांति करणारे शास्त्र व शस्त्र आहे.

भारतातील लहान लहान शेतकऱ्यांचा प्रश्न व अन्नउत्पादनाचा प्रश्न सोडवावयाचा असेल, तर आम्हाला मूलभूत नवा विचार केला पाहिजे.

लहान शेतकऱ्यांना कितीही कर्जे द्या. ते शेतीची नवी तंत्रे वापरू शकणार नाहीत. त्यांच्या शक्तीच्या बाहेरचे काम आहे हे. सहकारी सामुदायिक शेती हा यावर एकमेव उपाय आहे. नागपूर-काँग्रेसमध्ये आम्ही हा विचार स्वीकारला आणि तेथेच सोडून दिला. 'पुनःश्च हरि ओम्' केले पाहिजे.

संध्याकाळी 'झोक शॅले' (कॉटेज) म्हणून येथून जवळच डोंगररांगांमध्ये असलेल्या एका हॉटेलमध्ये जेवण्यास गेलो. कार्पेथियन पर्वताच्या पायथ्याच्या या डोंगररांगा (Foot-Hills) आहेत. सुरेख वातावरण होते. छोटी छोटी कॉटेजेस् आहेत. एकामध्ये शेगडी पेटवून मासे-मटन भाजण्याचे काम चालू होते. बाजूला २०–२५ माणसे बसतील अशी व्यवस्था. जिप्सी चालीवर सुरू असलेले संगीत. अधूनमधून तंतुवाद्यांवरील संगीतास, ऐकणारांची सामुदायिक साथ. एक वेगळेच वातावरण होते. आपण तर एकदम खूष झालो.

## ४० प्राग

३ जुलै, १९७४
(रात्री १० वाजता)

शेवटचा कार्यक्रम पार पाडून आत्ताच परत आलो. उद्या सकाळी ७-५० ला येथून निघणार. पॅरिस-मुंबई मार्गे परत दिल्लीस.

येथील अर्थमंत्रि श्री. लिओपाल्ड लेर – (व त्यांची पत्नीही) अतिशय आतिथ्यशील जोडपे – गृहस्थ आहेत. मी येथे आल्यापासून

गेले चार दिवस एकसारखे माझेबरोबर आहेत. लहान-सहान गोष्टींकडे लक्ष ठेवतात व व्यवस्था करतात. हिंदुस्थानबद्दल या सर्वांच्या मनात विलक्षण आदर आहे.

त्यांच्या प्राईम् मिनिस्टरला काल भेटलो. ४८–४९ वर्षांचा तरुण आहे. हार्ड कम्युनिस्ट ! परंतु बोलण्या-चालण्यात मोकळा. एकंदरीत सोव्हिएट रशियापेक्षा वातावरण मोकळे वाटले.

एक गोष्ट मात्र माझ्या मनाला खटकली. ती म्हणजे अनेक ठिकाणी झेक निशाणाबरोबरच रशियन निशाण असे. याचा काय नेमका अर्थ तो समजला नाही. आम्हीही कोणाला विचारले नाही.

ब्राटिसाएव्हच्या भेटीत ' झोक-शॅले ' मध्ये ऐकलेल्या रशियन गाण्याची आठवण झाली. व्होल्गा नदीला उद्देशून गाणे होते. नदीचे गाणे म्हणजे माझ्या मनाला भुरळ पडते.

दुपारी डॅन्यूबचे दर्शन झाले होते. या लोकमातांच्या स्वरूपाने केवढे सांस्कृतिक शक्तिस्रोत मानवी इतिहासात निर्माण झाले आहेत ! त्याची आठवण झाली म्हणजे मन त्यातच गुंतून जाते. मला केव्हातरी एक सुरेख लेख लिहावयाचा आहे. आज व्होलगाच्या त्या गाण्याचे इंग्लिश भाषांतर मी करून आणविले. ते सोबत ठेवले आहे.

प्रागमधले विशेष ठिकाण म्हणजे त्यांचा – castle – कॅसल. त्याचे नाव आहे हरदचानिच ( HARDCANY ).

मी बाहेर असताना तिकडे बऱ्याच गोष्टी होऊन राहिल्या आहेत. राष्ट्रपतींचे नाव एकंदरीत कायम झाले. ६९ ची आठवण आल्याशिवाय रहात नाही. गिरी आता काय करतात ते पहावयाचे. श्री. जत्ती यांची निवड चांगली झाली.

मी प्रकृति टिकवून आहे. ब्लडप्रेशर एकदा मॉस्कोमध्ये तपासून घेतले. डोके वगैरे दुखत नाही. परंतु मला सहज शंका आली. निघाले ९०–१६०. याचा एकदा बंदोबस्त केल्याशिवाय गत्यंतर नाही. ही पीडा आजपर्यंत नव्हती.

आम्हाला भारतीय जेवण बरेच दिवस मिळाले नाही म्हणून श्री. एल्. पी. सिंग यांच्या कन्येने ( मिसेस् मेहता ) मुद्दाम घरगुती जेवण

करून आणले आणि स्वाभाविकच दोन घास संवयीप्रमाणे जास्त गेले. रात्री जेवलो नाही.

व्होल्गाच्या* गाण्याचे इंग्लिश भाषांतर :-

From behind an isle large,
Stenka Razin's boats of beauty,
Up the river are coming.

In the first boat Stenka himself
Merry, nice, and very gay,
With his Princess a new wedding celebrate.

Volga, Volga, my native river,
River heartily beloved,
No gift from a Russian Cossack,
Were you able to accept.

Bratislava - Zoch - cottage, 30-6-74

श्री. लेर ( Leopoled, Ler ) अर्थमंत्री झेकोस्लोव्हाकिया. ❋

## ४१ ओटावा

२५ सप्टेंबर, १९७४

या प्रवासात मुंबई ते बेरूत उत्तम झोपलो. त्यामुळे सकाळी ( लंडनच्या ) ११ वाजता उतरलो तेव्हा पुष्कळच ताजातवाना होतो.

या खेपेस स्काय-लाइन या हॉटेलमध्ये एअर इंडियाने उतरविले होते. उत्तम गरम पाण्याचे स्नान घेतले व हायकमिशनर श्री. बी. के. नेहरू यांची वाट पहात बसलो.

१२ च्या सुमारास ते आले. त्यानंतर पुरे पाच तास त्यांच्या संगतीत घालविले. ते स्वतः गाडी चालवीत होते. लंडनच्या बाहेर २५-३० मैलांवर टेम्स नदीच्या किनाऱ्यावरील एका छानदार रेस्टॉरांमध्ये लंच घेतले.

* 'व्होल्गा' वरील मूळ काव्य रशियन भाषेत आहे. त्याचे हे इंग्रजीकरण कागदावर श्री. लिओपोल्ड लेर यांची स्वाक्षरी आहे.

टेम्स, लंडन शहराच्या आवती-भोवती वळणे घेत हिंडते म्हटले तरी चालेल. दोन्ही किनारे बंदिस्त करून शेजारील जमिनीचा वापर-विकास-योजनाबद्ध पद्धतीने केल्यामुळे नदीचे व किनाऱ्यावरील विभागाचे सौंदर्य व उपयुक्तता दोन्ही वाढली आहेत.

नदीत पाणी सतत वाहते रहाते. त्यामुळे छोटचा छोटचा किस्ती (बोटी) मध्ये मुलेबाळे घेऊन जाणारी, नदीवर आनंदाने विहार करणारी अनेक कुटुंबे दिसली. रविवार असल्यामुळे सर्व काही बंद. परंतु लोक मात्र सर्वार्थाने मुक्तांगणात भटकत होते म्हटले तरी चालेल.

नदीकिनाऱ्यावरील या बांधबंदिस्तीमुळे, मला मी महाराष्ट्रात असताना सुरू केलेल्या एका प्रयोगाची तीव्र आठवण झाली. पानशेतनंतर पुणे शहराच्या नदीकिनाऱ्याची या तऱ्हेने रचना, विकास करावा म्हणून एक कायदाही मी पास करून घेतला. परंतु मी महाराष्ट्र सोडून आलो आणि पाठीमागे या योजनेचेच पानशेत महाराष्ट्र-सरकारने केले.

कोलिनो आणि असल्याच कसल्यातरी योजनांचा विचार करण्याची कल्पनाशक्ती फक्त या लोकांमध्ये आहे. त्यांना ध्येयवादी दूरदृष्टी नाही, हे दुर्दैवाने मला आज दिसून आले.

कराड-नगराध्यक्षांनाही मी चीफ मिनिस्टर असताना कृष्णा-कोयनेची अशीच विकास–रचना करावी अशा अर्थाचे पत्र लिहिले होते. त्याचीही. या वेळी मला आठवण झाली. Sorry for the diversion !

श्री. बी. के. नेहरू यांच्या संगतीत हे पाच तास केव्हा गेले ते समजले नाही. लंचनंतर लंडनच्या परिसरातील गावे-उपनगरे पहात पहात पाच वाजले.

अनेक विषयांची चर्चा झाली. आर्थिक प्रश्नांबाबत त्यांना काही विशेष सांगण्यासारखे दिसले नाही. मी असे पाहिले की विश्वविद्यालयीन आणि शासकीय अर्थशास्त्री असोत, राजकीय विचारवंत आणि यशस्वी उद्योगपती वा व्यापारी असोत, त्यांना आजच्या आर्थिक कठीण परिस्थितीच्या कार्यकारणभावाचा खुलासा करता येत नाही वा त्यावरील उपाययोजनेचे दिग्दर्शन करता येत नाही. एका नव्या प्रकारच्या आर्थिक अरिष्टाला आज आम्ही तोंड देत आहोत असेच त्यांचेही मत पडले.

१० ऑक्टोबरला पुन्हा जनरल इलेक्शन जाहीर झाले आहे. आठ महिन्यांत दोन सार्वत्रिक निवडणुका हा एक विलक्षण अनुभव आहे. कोण जिंकेल हे सांगणे अगदी अवघड आहे. कोणताच पक्ष बहुमतात येणार नाही असे मत सांगणारे बरेच भेटले. बी. के. चे निदान असे मत दिसले. डॉ. आर. एम्. होनावर व दुसरे काहीजण म्हणत होते की, लेबर पार्टी थोडयाशा का होईना पण बहुमतात येईल. परंतु ही पार्टी राईट व लेफ्ट अशी महत्त्वाच्या प्रश्नावर तीव्रपणे विभागलेली आहे. त्यामुळे मजूरपक्षाचे सरकार किती दिवस टिकेल किंवा महत्त्वाचे प्रश्न किती परिणामकारकरीत्या सोडवू शकेल अशी शंका वाटते.

सामान्यपणे असे म्हटले पाहिजे की, ब्रिटनचे राजकीय जीवन अधिकाधिक रॅडिकल होत चालले आहे. लेबरने जिंकले नाही तरी ट्रेड युनियन्स बरोबर घेऊन जाण्याचे धोरण यापुढे कॉन्झरवेटिव सरकारलाही चालवावे लागेल.

१९४५ ची निवडणुक एका अर्थाने वॉटर-शेड निवडणूक होती. ही दुसरी वॉटर-शेड निवडणूक ठरेल. कोणीही जिंको, धोरणे प्रागतिक व समाजवादी वळणाची वा तोंडावळयाची राहतील, असे एक नवे राजकीय चित्र येथील राजकीय जीवनात दिसू लागले आहे.

पाच वाजल्यानंतर योगायोगाने रवी टिकू यांचे घरी चहाच्या निमंत्रणावरून गेलो. हे एक प्रस्थ आहे. परंतु तो भारतीय तरुण येथे येऊन अत्यंत यशस्वी शिप-ओनर झाला आहे. हे यशस्वी शिप-ओनर घोटाळयात येतात असा अनुभव आहे. आशा आहे की हा अपवाद ठरेल. एक नवी ओळख म्हणून ठीक. लंडनमधला यशस्वी भारतीय म्हणून औत्सुक्य होते. त्याला भेटण्यामागे एवढाच हेतू.

हा तरुण काश्मीरी ब्राह्मण आहे. श्री. एम्. बी. कौल यास ओटावा येथे जेव्हा या भेटीसंबंधी बोललो तेव्हा ते म्हणाले, की त्यांचे आणि टिक्कूचे फार जवळचे नाते आहे. परंतु ते अजून त्याला भेटले नाहीत. कारण तो फार श्रीमंत असल्यामुळे कसा वागेल कोण जाणे ! असे त्यांना वाटत होते. मी शिफारस केली की, बरा दिसतो – म्हणजे अहंकारी दिसला नाही. जरूर भेटा.

रात्री डॉ. होनावर, सौ. होनावर, शरद उपासनी व मी असे, जुनी मेक्सिकन फिल्म पाहावयास गेलो. १९५१ मध्ये या फिल्मला बक्षीस मिळाले होते. दोन-तीन तास आनंदात गेले. अशी जुनी पिक्चर्स पुन्हा पाहावयाला मिळतील का – असा विचार करीत परत फिरलो.

दुसऱ्या दिवशी १२ वाजता लंडन सोडून ओटावाकडे निघालो. बी. के. पोहोचवायला आले होते.

*

## ४२ ओटावा

२६ सप्टेंबर, १९७४

लंडन ते माँट्रियलचा प्रवास सात तासांत झाला. एअर-कॅनडा चांगली सर्व्हिस वाटली. सेवा उत्तम. खाद्यपदार्थ उत्तम, स्वच्छ. प्रवास सुरेख झाला.

माँट्रियल हे महत्त्वाचे औद्योगिक शहर आहे. ओटावापासून १२० मैलांवर आहे. (टोरॅन्टो हे दुसरे शहर जवळच आहे. या दोन शहरांची एका अर्थाने परस्परांत स्पर्धा आहे)

दुपारच्या ४॥ वाजता (कॅनेडियन वेळ) ओटावाला पोहोचलो. ओटावा हे इंटरनॅशनल एअरपोर्ट नाही. हे राजधानीचे शहर तुलनेने छोटे शहर आहे. ३-४ लाखांची वस्ती असावी. ओटावा नदीच्या काठी हे शहर म्हणून ओटावा.

ओटावा नदीचे पार क्विबेक प्रांत आहे. गावातून एक शानदार कालवा जातो. या कालव्याच्या काठाने एक सुरेख रस्ता जातो. शानदार बंगले, त्यांच्या सभोवार भरपूर मोकळी जमीन. हिरव्यागार गवतांची छोटी छोटी अंगणे, मोठी आकर्षक वाटली. नदीच्या काठी असलेल्या युनिव्हर्सिटीच्या नव्या इमारती, गावात जाता जाता न्याहाळल्या.

दुसऱ्या दिवशी शहराबाहेर, नदीपलीकडे असलेल्या विस्तीर्ण पार्कमध्ये जाऊन आलो. खरे म्हणजे कॅनडा देश एक विस्तीर्ण पार्कच आहे. उत्तर कॅनडा म्हणजे एक विशाल वनच आहे. येथील लाकडाचा धंदा हा फार महत्त्वाचा परंपरागत धंदा आहे. परंपरेने धनपती असलेले लोक टिंबरचे व्यापारीच होते व आहेत.

मी ज्या पार्कमध्ये गेलो होतो, त्यात जवळ-जवळ ६०० एकरांची एक इस्टेट माजी प्रधानमंत्री श्री. मॅकेन्झी किंग यांनी देशाला अर्पण केली आहे. आम्ही यात पायाने हिंडलो, भटकलो. आराम वाटला.

काल परिषद सुरू झाली. या परिषदेमध्ये फारसा प्राण राहिलेला नाही. एक औपचारिक मेळावा, हेच खरे रूप होत चालले आहे.

इंग्लंडचे वित्तमंत्रि निवडणुकांमुळे आलेले नाहीत. जॉन टर्नर चेअरमन निवडले गेले. त्यांना मी कालच भेटून आलो होतो. टर्नरची मुख्य काळजी, खेळीमेळीने परिषद कशी पार पडेल हीच होती. न्यूझिलंड, ऑस्ट्रेलिया, इंग्लंडमधून कुणीही प्रमुख येत नाहीत याची त्यालाही खंत आहे.

कॅनडाचे प्रधानमंत्रि परिषदेच्या उद्‌घाटनास आले होते. १०-१२ मिनिटांचे भाषण केले. सामान्य वाटले. परंतु त्याने उच्चारलेले एक वाक्य माझ्या मनातून जात नाही.

"and we realised then as well that answers which do not confer comforts upon ordinary human being are not answers at all"

मी माझ्या येथील भाषणात या वाक्याचा पुनरुच्चार केला. सर्व आंतरराष्ट्रीय परिषदेच्या निर्णयांना या विचाराची कसोटी लावली पाहिजे असे प्रतिपादिले.

या परिषदेमध्ये आफ्रिकन देशांतून आलेल्या प्रतिनिधींची नवी पिढी पाहून नव्या आशा वाढल्या. स्पष्टपणे बोलणारे हुशार लोक आहेत.

सायप्रसचे वित्तमंत्रि श्री. ए. पास्टलीदेस (A. Pastalides) हे भेटल्यामुळे अतिशय आनंद वाटला. गेल्या चार महिन्यांत सायप्रसमध्ये झालेल्या उलथापालथीमध्ये या सुसंस्कृत, मितभाषणी, गोड स्वभावाच्या पण सावध माणसाचे काय झाले असेल असा सारखा विचार माझ्या

मनात येत होता. १९७० च्या निकोसियामध्ये झालेल्या कॉमनवेल्थ वित्तमंत्रि परिषदेचे ते चेअरमन होते व त्याच वेळी त्यांची माझी चांगली मैत्री झाली होती.

त्यांनाही मला भेटून खराखुरा आनंद वाटला. गव्हर्नर-जनरलच्या स्वागत-समारंभाच्यावेळी मुद्दाम वेळ काढून सायप्रस-बंडाळीच्या वेळच्या रोमहर्षक कहाण्या त्यांनी सांगितल्या.

आर्चबिशप पापकोरेस कसे पळाले, ८-१० दिवस ते सर्वजण आपापल्या घरी कसे बंदिस्त राहिले, इत्यादि हकीगती त्यांच्याच तोंडून ऐकताना एक वेगळा अनुभव आला.

सायप्रस अजून अस्वस्थ आहे. आर्चबिशपना पाठिंबा बहुमताचा असला तरी त्यांचे सायप्रसमध्ये येण्याने आज ज्या ऐक्याची गरज आहे ती टिकणारी नाही, असे त्यांना वाटते. तसे आर्चबिशपना भेटून सांगितले आहे.

काल ' स्टिंग ' ही जुनी ( मेक्सिकन ) फिल्म पाहिली. भरपूर मनोरंजन होते. हजार लोकांसाठी बांधलेल्या चित्रपटगृहामध्ये २५-३० लोक प्रेक्षक म्हणून होते. टेलिव्हिजनने चित्रपटगृहांची हीच परिस्थिती सर्वत्र केली आहे म्हणतात ! १९५१ मध्ये फ्रेंच प्रदर्शनामध्ये या चित्रपटास उत्तमोत्तम चित्र म्हणून मानले होते. जुने चित्र म्हणून मुद्दाम गेलो होतो.

मुद्दाम वेळ काढून पार्लमेंटचे सभागृह पाहून आलो. बसण्याची पद्धति, आमच्या जुन्या पुण्याच्या कौन्सिल हॉलसारखी. समान रांगांमध्ये एकमेकांसमोर सरकार व प्रतिपक्ष बसतात. पंतप्रधान पहिल्या रांगेतील मध्यस्थानी बसतात. इमारत जुनी, ऐतिहासिक वाटते. आत सर्व आधुनिकता आहे. लायब्ररी उत्तम. पहिल्या स्त्री-सभासदाचा व लढाईत कामी आलेल्या पहिल्या एम्. पी. चा पुतळा कॉरिडॉरमध्ये होता. दर्शकांना ते मुद्दाम दाखविले जाते.

या सभागृहात मी एक अत्यंत चांगली प्रथा पाहिली. लढाईत कामी आलेल्या जवानांची स्मृति राष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून अत्यंत सन्मानपूर्वक जागविते. अशा जवानांची नावे अनेक व्हॉल्यूममध्ये लिहून ते एका हॉलमध्ये मुद्दाम ठेवले आहेत. प्रत्येक दिवशी सकाळी, पार्लमेंटचा

गार्डचा अधिकारी सन्मानपूर्वक प्रत्येक ग्रंथाचे पान उलटून अभिवादन ( सॅल्यूट ) करतो.

बुक-स्टॉल्स् पाहिले. सगळीकडे अमेरिकन लेखकांचीच पुस्तके दिसली.

परिषद नित्यासारखीच झाली. काही नव्या ओळखी झाल्या. कॉमनवेल्थचे Opec वाले ( तेली ) सदस्य धनिकासारखे बोलू-वागू लागले आहेत. एका वर्षात किती चटकन आणि महत्त्वाचा बदल झाला आहे, याचा वारंवार अनुभव येतो.

*

४३ क्विबेक

२७ सप्टेंबर, १९७४

मिनिस्टर्संची मीटिंग चालू असतानाच मोकळा ( किंवा कंटाळवाणा ) वाटलेल्या वेळात यापूर्वीचे लिहिले.

आज सकाळी ओटावाहून सरकारी विमान भरून कॉमनवेल्थ देशांचे बहुतेक वित्तमंत्रि येथे पोहोचले. Miss Lind Sowrd नावाची संपर्काधिकारी म्हणून आमच्या ग्रूपचे मार्गदर्शन करीत आहे.

फ्रेंच लोक या प्रांतात प्रथम आले म्हणून येथे त्यांचे व त्यांच्या भाषेचे प्रभुत्व आहे. येथे सर्व काही फ्रेंच आहे. प्रांताभिमान म्हणजे काय आहे ते येथे आल्याशिवाय समजणार नाही.

सर्वच युरोपियन देशांमध्ये ही प्रवृत्ती वाढती आहे. विशेषतः इंग्लंडमध्ये तर या स्वतंत्रतेच्या भावनेची तीव्रता जास्तच दिसते. याचे नवल वाटते. साम्राज्याची राजकीय शक्ती, प्रतिष्ठा आणि आर्थिक सुबत्तेमध्ये योग्य ती भागीदारी असल्यामुळे कदाचित या भावना झाकल्या

व दबल्या गेल्या असतील. परंतु आता ही राष्ट्रे एका अर्थाने दुय्यम दर्जाची झाल्यामुळे ती अवस्था राहिली नाही.

नॉर्दर्न सी – उत्तर सागरामध्ये सापडलेल्या तेलाच्या प्रचंड साठ्यामुळे स्कॉटलंडमध्ये नव्या राष्ट्रवादाची फुटीर चळवळ अंग धरून राहिली आहे. निवडणुकीतील यशासाठी या वृत्तीशी तडजोड करण्याची सर्व प्रमुख पक्षांची तयारी दिसते.

इंग्लंडच्या डेलिगेशनचे प्रमुख श्री. मिचेल यांनी आपल्या देशाच्या सर्व नेत्यांवर, माझ्याशी झालेल्या खाजगी बोलण्यात स्पष्ट टीका केली आणि हे महाअरिष्ट आहे असे बोलून दाखविले.

हीथ व विल्सन या दोघांच्यावर लोकांचा व त्यांच्या पक्षाचाही खराखुरा विश्वास ( ट्रस्ट ) नाही व लिबरल पक्षाची धोरणे, त्यांची कार्यशक्ति व तिचा अभाव ही दोन्ही सिद्ध झालेली नाहीत. त्यामुळे त्यांची खरी माहिती नाही.

नेतृत्वाची, दुर्दैवाने अशी परिस्थिती असल्यामुळे Identity of the nation is fast ebbing away असे अत्यंत कारुण्यपूर्ण उद्गार काढले. हे जगातले नवे ट्रेंड्स् आहेत. भारताच्या संदर्भात याचे अन्वयार्थ तपासले पाहिजेत.

सेंट लॉरेन्स, केवढी प्रचंड नदी आहे ! जगातल्या मोठ्या नद्यांपैकी नदी आहे. नदीकाठचे उंच खडकाळ टेकडीवरील शहर. नदीच्या काठी असलेली सुंदर नवी-जुनी शहरे, लांबच लांब विस्तीर्ण हिरवीगार मैदाने मन मोहून टाकतात. थंडी होती तरी या हिरवळीवरच्या आखीव-रेखीव वाटांवरून नदीकाठापर्यंत दोन मैल चालून आलो.

नदीचा काठ म्हटला म्हणजे मला माझे बालपण व युवावस्था यांची तीव्र आठवण येते. नदीकाठचे, माझ्या हॉटेलच्या खोलीमधून दृश्य पहात पहातच हे लिहीत आहे.

कालपासून कॅनडामध्ये बऱ्याच बुक-स्टॉल्सवर गेलो. काही फ्रेंच व बहुतेक अमेरिकन लेखकांची पुस्तके प्रामुख्याने दिसली. माझ्या बरोबरच्या येथील लोकांना, कॅनॅडियन लेखक व त्यांची पुस्तके सुचवा असे

मी सांगितले. लिंडाने एक लिस्ट दिली आहे. दोन पुस्तके हायकमिशनर श्री. वाजपेयी यांनी माझ्याकरिता विकत घेतली. प्रवासात परत जाताना जरूर वाचणार आहे.

आता परत रिसेप्शन व रात्री भोजन आहे. उद्या सकाळी ६ वाजता निघून वॉशिंग्टनसाठी विमान पकडावयाचे आहे. पुढे आता वॉशिंग्टनमधून लिहीन.

※

## ४४ बोस्टन

४ ऑक्टोबर, १९७४

आज दुपारी ४ वाजता बोस्टनला पोहोचलो. आता रात्रीचे ११ वाजले आहेत. ७ तास कसे गेले समजले नाही. शरीर थकले आहे. परंतु काही ओळी लिहिल्याशिवाय झोपावयाचे नाही असे मनात होते.

कित्येक वर्षे या शहराचा मनात ध्यास होता. हॉर्वर्ड विद्यापीठाचे केंद्र म्हणून–केनेडींचे शहर म्हणून, एम्. आय. टी. साठी म्हणून–आज पाहिले. अधिक उद्या पहावयाचे आहे.

फर्स्ट नॅशनल बँक ऑफ बोस्टनचे श्री. क्रॅफ्ट्स् मुद्दाम श्री. तेलंग यांचेबरोबर विमानतळावर न्यावयास आले होते. हे गृहस्थ १५ वर्षांपूर्वी मुंबईत मला भेटले होते. श्री. जी. एच्. मेहता यांचे मित्र. तसेच हिंदुस्थानचे हितैषी.

येथील युनिव्हर्सिटीमधील व इतर काही तरुण भारतीय भेटले. डॉ. जगदीश भगवती हे तरुण अर्थशास्त्री त्यांत होते. हे डॉ. मनमोहनचे मित्र आहेत. हिंदुस्थानच्या आर्थिक प्रश्नाबाबत चर्चा झाली.

समुद्रकाठचे हे पूर्वीचे प्रख्यात बंदर. चार्ल्स नदीचे मुखावर वसले आहे. नदीच्या एका बाजूला बोस्टन – दुसऱ्या बाजूस केंब्रिज (जेथे एम्. आय. टी. हॉर्वर्ड वगैरे आहेत.)

संध्याकाळी येथील समुद्रकिनाऱ्यावरील Pier 4 या रेस्टॉरॉंमध्ये जेवण घेतले. सी – फूड उत्तम – चांदणी रात्र – शांत समुद्र – उत्तम संगत. अधिक काय हवे ?

श्रीमती क्रॅफ्ट्स् (वय सुमारे ५०) शेजारी होत्या. बायकांचा नेहमीचा प्रश्न त्यांनी विचारला. कुटुंब किती मोठे आहे ? मी सांगितले आम्ही फक्त दोघेच आहोत. त्यांनी विचारले की, मग पत्नीला एकटयाच टाकून कसे आलात ?

तेही दोघेच आहेत. त्यांनाही मूलबाळ नाही. त्या म्हणाल्या, मी श्री. क्रॅफ्ट्सबरोबर सर्व जगभर प्रवास करते. एकटी मागे राहात नाही. श्री. क्रॅफ्ट्सही मोठया कौतुकाने म्हणाले, She is a great traveler. (प्रवासाला तशी ती जबरदस्त आहे.)

मी त्यांना सांगितले की, मी हा तुमचा निरोप माझ्या पत्नीला सांगेन. माझा शब्द मी पाळला आहे. बाकीचे तुझ्यावर.

*

४५

## न्यूयॉर्क

६ ऑक्टोबर, १९७४

काल संध्याकाळी चार वाजता येथे आलो. भारत-सरकारच्या नव्या काटकसरीच्या धोरणाप्रमाणे या नव्या हॉटेलमध्ये (The Alrae) उतरलो आहे.

बोस्टनमध्ये कालची सकाळ अतिशय आनंदात गेली. चार्ल्स नदी ओलांडून पलीकडे असलेल्या जगप्रसिद्ध विद्यानगरात (केंब्रिज) येथे एम्. आय. टी. (मॅसॅच्युसेट्स् इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी) आज जवळजवळ शंभर वर्षे शिक्षण व संशोधन करणारे खाजगी विद्यापीठ आहे.

अलीकडे २५ वर्षांत सरकारी संशोधनाचे प्रकल्प घेतात म्हणून काही ग्रँट्स् घेत आहेत. अमेरिकेतील प्रसिद्ध नोबेल प्राइज विनर्स या संस्थेमध्ये व हार्वर्ड युनिव्हर्सिटीमध्ये आहेत म्हटले तरी चालेल. प्रसिद्ध भारतीय संशोधक श्री. खुराना एम्. आय. टी. मध्ये आहेत.

एम्. आय. टी. च्या आसमंतात थोडा वेळ घालविला आणि नंतर हॉर्वर्ड-आवारात गेलो. हॉर्वर्डच्या कँप्स्मध्ये मात्र पायी भटकलो. प्रसिद्ध हॉर्वर्ड-यार्डमध्ये जुन्या इमारतींच्या शांत वातावरणात भटकताना १९३० साली शाळेत असताना, पुणे पहायला गेलो तेव्हा फर्ग्युसन कॉलेजच्या प्रांगणात भटकताना जसे वाटले तशी नेमकी भावना व प्रसन्नता होती.

नेमकी या युनिव्हर्सिटीच्या समोर, नदीपलीकडे, बोस्टन युनिव्हर्सिटी आहे. एक सुरेख शहर आहे. शहराचे काही विभाग जुनेपणा टाकून नवे बनत आहेत. 'नवे शिक्षित लोक नोकरीसाठी व राहण्यासाठी हे शहर अधिक पसंत करतात,' (न्यूयॉर्कच्या तुलनेने) असे श्री. क्रॅफ्ट्स् म्हणत होते.

नंतर २०–२२ मैल प्रवास करून जेथे स्वातंत्र्ययुद्धाची पहिली लढाई झाली त्या भागात गेलो. पहिली गोळी कुठे उडाली ते स्थळही त्यांनी स्मारक म्हणून ठेवले आहे. एका रेस्टॉरॉंमध्ये जेवण करून विमानतळ गाठला.

येथे आलो. जवळपासची एक दोन बुक-शॉप्स् पाहिली. संध्याकाळी ब्रॉडवेवर ॲम्बॅसडर थिएटरमध्ये Capino हे विनोदी नाटक पाहिले. नाटक हलके-फुलके होते पण छान रंगले. आपल्या नाटकांपेक्षा वेगळे तंत्र वापरतात. प्रेक्षक व नटसंच एक असल्यासारखे वातावरण होते. दोन अडीच तास कसे गेले ते समजले नाही.

एका रेस्टॉराँमध्ये जेवलो. डोळ्यांवर चिक्कार झोप होती. येऊन झोपलो तो सकाळी ८ वाजता उठलो.

आज दुपारी श्री. आय्. जी. पटेल आणि श्री. जगन्नाथन्, मनमोहन या मंडळींशी 'फ्लोटिंग ऑफ एक्चेंज रेट' वर चर्चा आहे. नंतर श्री. आय्. जी. पटेल यांच्या घरी जेवण आहे. (येथून त्यांचे घर बरेच लांब आहे म्हणतात.) ३॥-४ पर्यंत तेथून परत येऊन ६॥ पर्यंत मॉडर्न आर्टस् म्युझियम पाहून सरळ आठ वाजता विमान गाठण्यासाठी निघावयाचे आहे.

उद्या सकाळी लंडन व तेथे न थांबता एअर-इंडियाचे जे पहिले विमान मिळेल त्याने दिल्ली. पंधरा-सोळा दिवस झाले. आता अगदी कंटाळा आला आहे.

दर्शन तिसरे

विदेश-मंत्री

( ऑक्टोबर १९७४ ते मार्च १९७७ )

## ४६ रोम

१९ जानेवारी, १९७५

पुन्हा या वर्षीच्या जानेवारीत काही तासांसाठी येथे राहिलो आहे. आज रविवार. दुपारी एक वाजता बेलग्रेडला विमान आहे.

गेल्या खेपेच्या असीसि आणि फ्लारेन्सच्या भेटीची तीव्र आठवण झाली. तुला एक वेळ असीसिला घेऊन जाण्याचे कबूल केले आहे – सेंट फ्रॅन्सिसला. त्यांचे आशीर्वाद आहेत, घडून येईल.

येथे फारसे कुठे हिंडता येईल असे दिसत नाही. ब्रेकफास्ट करून बाहेर पडू ते भटकत भटकत विमानतळावर जाऊ. नंतर युगोस्लाव्हमध्ये गर्दीचे व कामाचे तीन-चार दिवस जातील. तेथून निघताना मुंबईहून रात्री उशीरा निघालो परंतु विमानात झोप चांगली झाली. त्यामुळे आता स्नानानंतर खूपच फ्रेश वाटतंय. श्री. डोंगरे बरोबर आहेत. त्यामुळे चिंता नाही.

रात्री दादासाहेब भेटले. विमानतळावरही आले होते. छान वाटले. ती. आक्का, बाबूराव कोतवाल, राजा, अशोक भेटले.* बराच वेळ बसले होते. अनेक घरगुती गोष्टीसंबंधी मोकळेपणाने बोलले. मुख्य चर्चेचा विषय होता – दादा घाडगे.

---

* राजा, अशोक हे यशवंतरावांचे पुतणे. बाबूराव कोतवाल हे भाचे.

दादासाहेबांनी दिल्लीला स्थळ शोधले आहे परंतु बाबाच्या डोक्यात प्रकाश पडेल तेव्हा खरे. असो, उगीच मनात आले म्हणून लिहिले.

बाकी नंतर बेलग्रेडहून.

*

## ४७ हॅवाना

२० मार्च, १९७५

दिल्ली सोडून एक आठवडा झाला. परंतु निवांत बसून काही लिहीन म्हटले तरी शक्यच झाले नाही.

दिल्लीहून निघाल्यानंतर १३-१४ तासांच्या प्रवासानंतर पॅरिस-मध्ये पोहोचलो. वाटेत रोममध्ये श्री. अप्पासाहेब पंत भेटले. येत्या नोव्हेंबरमध्ये ते परत येणार आहेत.

पॅरिसमध्ये धुके आणि पावसाळी हवा होती. पॅरिस हिल्टनमध्ये तो दिवस काढला. श्री. चटर्जी – येथील राजदूत – यांच्याबरोबर शहरात एक फेरफटका मारला. पावसाची झिरझिर चालू होती. धुके होते. त्यामुळे गाडीतून उतरून चालण्याची संधी मिळाली नाही. रात्री त्यांच्या घरी जेवण झाले.

त्यांनी येथील पार्लमेंटचे एक महत्त्वाचे व त्यांचे मित्र-सभासद सपत्निक आमंत्रित केले होते. दोघेही नवरा–बायको हिंदुस्थानचे मित्र दिसले.

मोठी तेज बाई होती. एकदम स्पष्ट 'अॅटमबॉम्ब जरूर बनवा.' तुमची इज्जत वाढेल – तिने सल्ला दिला. आमचे ते धोरण नाही असे मी समजावले. पण ती थोडेच ते मानणार! तिचे प्रवचन चालू होते. नवरा गंभीर वाटला. न्यूक्लिअर सायन्सच्या क्षेत्रात इंडो-फ्रेंच सहकार्य वाढले

पाहिजे असे त्याचे मत आहे. परंतु Subtle pressure from western powers and Russians on our leaders is building up. One has to take care of it. त्याने आतली माहिती सांगितली आणि सल्लाही दिला.

सकाळी १० वाजताच हॉटेल सोडले. पॅरिसचे बरेच दूर, पण नवे, विमानतळ गाठावयाचे होते. वाटेत एका गाडीला ॲक्सिडंट झाला होता. त्यामुळे ट्रॅफिकची रांगच्या रांग मैल दोन मैल थांबलेली. आमचा ड्रायव्हर मोठा चलाख. त्याने कसातरी मार्ग काढून, आम्ही चांगलेच वेळेत पोहोचलो. परंतु आमचे सामान, पासपोर्ट वगैरे कागदपत्र व विमानाची तिकिटे पाठीमागच्या गाडीत असलेल्या ऑफिसरजवळ होती.

विमान सुटावयाला पाच मिनिटे राहिली तरी त्यांचा पत्ता नव्हता. माझी हँडबॅग माझ्याजवळ होती. विमानातील सीट नंबरचे कार्ड होते. मी सामानाशिवाय व पास-पोर्टशिवायही जायचे ठरविले होते. कारण नाहीतर हॅवानामध्ये वेळेवर पोहोचणे शक्यच नव्हते.

राजदूत बिचारा गोंधळून गेला. पण अगदी शेवटच्या घटकेला आमचे लोक पोहोचले. कसेतरी करून विमानाला थोडा उशीर करून, आम्ही स्थानापन्न झालो.

दुसरा १३ तासांचा विमानप्रवास सुरू झाला. हाऊस्टिन (टेक्सास) मार्गे मेक्सिकोला पोहोचलो संध्याकाळी साडेसहाला. (लोकल–टाइम).

लॅटिन अमेरिकन भूमीवर प्रथम पाय ठेवला. एक कोटी दहा लाख वस्तीचे हे विस्तीर्ण शहर. सात हजार फूट उंच पठारावर वसले आहे. चार साडेचारशे वर्षांचा इतिहास या शहरामागे आहे. एक सुंदर शहर म्हणून १७ व्या शतकातही या शहराला मान्यता होती.

हॉटेलमध्ये पोहोचेपर्यंत अंधार पडला होता. येथील आमचे राजदूत म्हणजे श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांचे ज्येष्ठ जामात श्री. अशोक मेहता. ते व श्रीमती चंद्रलेखा मेहता दोघेही विमानतळावर आले होते. फार आपुलकी दाखविली.

माझ्या चोवीस तासांच्या मुक्कामात एकदाही त्यांनी पंतप्रधानांशी असलेल्या नात्याचा अप्रत्यक्षही उल्लेख केला नाही; किंवा त्यांचा उल्लेखही झाला नाही. खूप गप्पा-चर्चा झाल्या.

दुसऱ्या दिवशी श्री. अशोकसह आम्ही सर्वजण नॅशनल म्यूझियम-मध्ये गेलो. तास दीड तास तेथे काढला. पंधराव्या शतकात युरोपमधून येणाऱ्या गोऱ्यांची वसाहत सुरू होण्यापूर्वी येथील Incas ची प्रगत संस्कृति होती.

संघटित राज्ये होती. त्या संस्कृतीचे काही अवशेष वा तिचे काहीसे चित्रण या म्यूझियममध्ये पहावयास मिळते. लॅटिन अमेरिका हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. यू. एस्. ए. आणि या अमेरिकेमध्ये काही मूलभूत फरक आहेत आणि मूलभूत संघर्षही आहेत.

दुपारचे जेवण श्री. मेहता यांच्या घरी झाले. श्रीमती चंद्रलेखांनी उत्तम व्यवस्था ठेवली होती. जेवणानंतरची विश्रांति त्यांच्या घरीच घेतली व हॅवानाला जाण्याच्या तयारीला लागलो.

मेक्सिको ते हॅवाना प्रवास योगायोगाने मेक्सिकन सरकारच्या छोटेखानी जेट-प्लेन मधून करता आला. सात माणसांचे हे विमान ४० हजार फूट उंचीवरून ताशी ५०० मैल वेगाने दोन तासांत हॅवानाला पोहोचले. विमानतळावर क्यूबाचे परराष्ट्रमंत्रि राहुल राऊ हजर होते. वेळी अवेळी येणाऱ्या पाहुण्यांचे आगत-स्वागत करण्याने थकला-भागलेला पण हसतमुख दिसला.

※

## ४८ क्यूबा

२० मार्च, १९७५

१६ वर्षे झाली. क्यूबामध्ये झालेल्या क्रांतीच्या रोमहर्षक कथा ऐकल्या होत्या. फिडेल कॅस्ट्रो यांचे यावर भरपूर लिखाण प्रसिद्ध झाले आहे. त्यातले थोडेबहुत वाचले होते.

१९६२ चा क्यूबा-क्रायसिस जगप्रसिद्ध आहे. क्रुश्चेव्ह आणि केनेडी अणुयुद्धाच्या उंबरठ्यावर आले होते. बुबळाला बुबळे भिडून गेली होती. आणि त्याच संदर्भात भारत-चीन युद्ध मनात जागृत होते.

क्यूबामध्ये आज काय स्थिति आहे, कॅस्ट्रोची त्याच्या देशात काय प्रतिमा आहे, समाजक्रांतीचे रूप काय आहे, हे सर्व पहावयास मिळणार ही आशा ठेवूनच मी या परिषदेकडे काहीसा आकर्षित होतो.

दि. १७ ला सकाळी कॅस्ट्रो जेवणाचे ठिकाणी भेटले. सर्वांशी मिळून-मिसळून वागत होते. संभाषणात मृदुता होती. डोळे स्वच्छ आणि मोकळे मोकळे वाटले.

दुसरी भेट दि. २० ला दुपारनंतर ५ वाजता त्यांच्या कचेरीत झाली. श्री. केवलसिंग ( Foreign Secretary) बरोबर होते. ॲम्बॅसडर श्री. टंडनही होते.

४०-४५ मिनिटांच्या या भेटीत त्यांनीच हिंदुस्थानसंबंधी अनेक प्रश्न विचारले. मी माणूस समजून घेण्याचा प्रयत्न करीत होतो. त्यांच्या बोलण्यात-वागण्यात सिन्सिरिटी ओथंबत आलेली होती.

न्युक्लिअर एक्स्प्लोजनचा प्रश्न निघाला. "तुमच्याकडे ही प्रगति आहे. आमच्याकडे नाही. साम्राज्यशाहीच्या सागरामध्ये आम्ही एक लहानसे बेट आहोत." असे ते म्हणाले. मी म्हणालो, "पण गेल्या १६ वर्षांत तुम्ही हे सिद्ध केले ना की ध्येयनिष्ठ जनतेचा एकमुखी निर्धार म्हणजे एक अणुबॉम्बच आहे. खऱ्याखुऱ्या अणुबॉम्बचा सागर तुमची शक्ति रोखू शकणार नाही."

कॅस्ट्रो मनमोकळेपणाने खळखळून हसले.

कॅस्ट्रोची राजवट रुजली आहे. अंतर्गत विरोध छुपा असला तर न जाणे ! पण सर्वांच्या बोलण्यात तसा काही विरोध नाही असेच आले.

कोलंबस या बेटावर उतरला तेव्हापासून या बेटाचा इतिहास इतर वसाहतींचा इतिहास असतो तसाच आहे.

आफ्रिका, युरोपमधून लोक आले. जुन्यांना नामशेष केले. नवे एकमेकांत मिसळून एक मिश्र समाज बनला. परंतु आर्थिक अधिराज्य

अमेरिकेचे आले. त्यात या बेटातील सामान्यांचे जीवन अपमानितांचे जीवन होते.

क्रांतीला लागणारे सर्व सामान तयार होते. अरेराव, बेफिकीर राज्यकर्ते, विलक्षण भ्रष्टाचार, नव्या पिढीकडे संपूर्ण दुर्लक्ष याच्या माध्यमानेच क्रांति येते. त्याला नेतृत्व देण्याचे धैर्य व निष्ठा कॅस्ट्रोंनी दाखविली.

आज तो सामान्य जनांचा थर सुखी आहे, असे टीकाकारही सांगतात. अर्थात् बंधने फार आहेत. सर्व समाजालाच त्यांनी सेना बनविली आहे असे म्हटले तरी हरकत नाही. कसलाही धोका होणार नाही याबाबत पराकोटीची सावधानता आहे.

नवीन कायद्याने प्रत्येक नागरिकाजवळ Indentity card with photograph असले पाहिजे असे ठरले आहे. अंमलबजावणी लगेच सुरू होणार आहे.

भारतीय वृत्तपत्र-प्रतिनिधी वॉशिंग्टनहून येथे आले आहेत. त्यांच्याशी क्यूबाच्या अंतर्गत परिस्थितिसंबंधाने चर्चा करीत असता, एकाने मोठा अवघड प्रश्न विचारला. " कायमचे राहण्यासाठी म्हणून तुम्ही या देशाची निवड कराल का ?"

मी म्हटले, " याच नाही, पण भारताखेरीज दुसऱ्या कोणत्याच देशांची निवड मी करणार नाही."

उत्तर म्हणून हे ठीक झाले आणि तेच योग्य उत्तर आहे. परंतु बंधनांची अशी परिस्थिति आपल्या देशात निर्माण करू देणार का, असा खरा रोख त्या प्रश्नाचा होता.

त्याला उत्तर एकच की, आमच्या सामाजिक, आर्थिक प्रश्नांची उत्तरे आम्ही देऊ शकलो नाही तर ही बंधने भारताला अपरिहार्य ठरतील. लोकशाही संस्थांची ही कसोटी ठरणार आहे.

कॉन्फरन्स ठीक पार पडली. Opec ( तेलवाले देश ) वाल्यांना कॅस्ट्रोने चांगलेच सुनावले. राजकीय व आर्थिक प्रश्नांची निवेदने चांगली तयार झाली. या परिषदेमध्ये भारताची प्रतिष्ठा आहे.

आर्थिक समितीचे अध्यक्षपद भारताकडे होते. अनेक परराष्ट्र-मंत्र्यांच्या ओळखी झाल्या. एकमेकांकडे मग येणे-जाणे, चर्चा झाल्या.

अर्थमंत्र्यांच्या दुनियेतून विदेश-मंत्र्याच्या दुनियेतला हा प्रथम प्रवेश तर ठीक झाला.

*

## ४९ किंग्जटन

२५ एप्रिल, १९७५

मुंबईत दीड तास थांबलो होतो. घरचे कोणी आले होते की काय ते समजले नाही. प्रधानमंत्र्यांच्या लवाजम्यात काही पत्ताच लागला नाही. गव्हर्नर व मुख्य मंत्री सपत्निक हजर होते. त्यांनी सर्वांना चालत विमानतळाच्या मजल्यावर नेले. त्यामुळे कोणीच भेटू शकले नाही.

श्री. बाळासाहेब देसाई इंदिरा गांधींची भेट व्हावी म्हणून उभे होते. पण ते घडले नाही. मजजवळ आले. मी प्रकृतीची चौकशी केली. बरी नाही म्हणाले. श्रीमती गांधींची भेट न झाल्याने निराश होऊन परतले.

बरोबर ९। वाजता निघालो. थोडे खाऊन घेतले. इंदिराबाईंशी किरकोळ गप्पा झाल्या. जमैकन प्रधानमंत्र्यांनी लिहिलेले "पॉलिटिक्स अँण्ड चेंज' हे पुस्तक मजजवळ होते. ते पाहण्यासाठी त्यांना दिले.

थोडा वेळ वाचले आणि १०॥ वाजता झोपी गेलो. जवळ-जवळ १० तासांचे उड्डाण आहे. मी ६-७ तास झोपलो. इंदिराबाई तर ९ तास शांत झोपल्या होत्या.

लंडनला पोहोचल्यावर श्री. बी. के. नेहरू हजर होतेच. दीड-दोन तास ते होते. बराच वेळ इंदिराबाईंशी बोलत बसले होते. त्यात काही खाजगी, काही सार्वजनिक असावे. परतताना लंडन येथे बाईंनी नकार दिलेला कार्यक्रम त्यांनी स्वीकारावयास लावला. परतताना मी लंडनमध्ये

थांबत नाही म्हणून ते बरेच नाराज दिसले. परंतु काम नसताना थांबण्यात अर्थ काय! गेल्या महिन्यात तर मी थांबलोच होतो. कशी तरी समजूत काढली.

पुन्हा १० तासांचा प्रवास. मी सर्व वेळ वाचनात काढला. किंग्जटनला पोहोचेपर्यंत घड्याळात बदल न करता भारतीय स्टँडर्ड टाइम मी ठेवले होते. त्या अंदाजाने तिथल्या वेळेप्रमाणे दुपारचे लंच घेतले. दिल्लीहून निघाल्यापासून बरोबर २५ तासांनी किंग्जटनला पोहोचलो.

यातले शेवटचे चार तास प्रकाश होता. बाकीचा प्रवास – अवती-भोवती रात्रच होती. किंग्जटनला पोहोचलो तेव्हा सकाळचे ९.३५ झाले होते. आगत-स्वागत झाले. येथील प्राईम मिनिस्टर स्वागतासाठी आले होते.

या बेटावर इंदिराजींच्या आगमनाचे मोठे कौतुक होते. संध्याकाळी टेलिव्हिजनवर त्यांची बऱ्यापैकी मुलाखत दाखविली.

येथे या परिषदेला जोडून इंग्लंडच्या राणीची भेट ठेवली असल्यामुळे वृत्तपत्रांत सर्वत्र त्या राणीसाहेबांच्या तसबिरी पाने भरभरून होत्या.

येथे पोहोचल्यावर मात्र मला थकवा वाटला. काही तातडीचे कार्यक्रम नसल्यामुळे दुपारी ४-५ तास झोपून काढले. परिषदेच्या कामाच्या तयारीबाबत माहिती घेतली.

श्री. केवलसिंग यांनी श्री. टी. के. कौलचा निरोप आणला आहे की मी जाताना न्यूयॉर्कमध्ये थांबू नये. डॉ. किसिंजर भेटण्याची इच्छा दाखविण्याची शक्यता आहे. आणि तसे झाले तर नाही म्हणणे बरे दिसणार नाही. या वेळी भेटण्यात फारसा फायदा नाही.

अजून काही निर्णय घेतला नाही. आज-उद्या ठरवीन. आज दुपारी ११ वाजता परिषद सुरू होईल. ( सकाळी ६ वाजता हे लिहीत आहे. परत दुपारी लिहीन. )

*

१ मे, १९७५ ( सकाळी ६ वाजता )

परवा दुपारी लिहावयास बसेन म्हटले तरी ते शक्य झाले नाही. काहीही करून मी वेळ काढीन म्हणून ठरवले होते. परंतु या परिषदां-साठी आले म्हणजे इतकी कामे व अंतर्गत-औपचारिक इतक्या मीटिंग्ज ठरतात व होत असतात की काही सोय नाही.

परिषदेच्या उद्घाटनाचा भाग समारंभपूर्वक व थाटात पार पडला. भारताच्या पंतप्रधानांना मोठे सन्मानाने वागविले.

जमेकाचे पंतप्रधान मायकेल मॅनले यांचे भाषण फार उत्तम झाले. स्वच्छ, मूलगामी विचार, अचूक व सुरेख शब्दांची निवड – निर्भीड मांडणी आणि सौजन्यता यांचे योग्य मिश्रण भाषणात होते. मला ते भाषण आवडले.

त्यांच्या भाषणाच्या उत्तरादाखल पंतप्रधान श्रीमती गांधी यांचे भाषण झाले. कॅरिबियन* मधील लहानसर बेटावरील जनतेबद्दल त्यात जिव्हाळा होता. जमेकन् संगीताबद्दलचा भावपूर्ण उल्लेख त्यातील नर्म विनोदामुळे अधिक हृदयस्पर्शी झाला. कॉमनवेल्थसंबंधी उल्लेख व अपेक्षाही उत्तम शब्दांत व्यक्त केली. आपल्या पित्याचा उल्लेख अत्यंत समर्पकपणे केला.

टेलिव्हिजनवर सर्व देशभर हे भाषण ऐकले गेले. वृत्तपत्रांत, जनतेला हे भाषण आवडल्याचा आवर्जून उल्लेख होता.

माझा या परिषदेचा पहिला अनुभव आहे. मी गेली दोन्ही अधिवेशने दोनही दिवस सर्व वेळ थांबून बारकाईने ऐकली. पाहिली. आज जागतिक आर्थिक व व्यापारविषयक प्रश्नांची चर्चा होणार आहे. त्यात बोलणारही आहे.

कॉमनवेल्थचे सर्व प्रमुख नेते आले आहेत. ब्रिटिश पंतप्रधानांचे अशा परिषदांत अकारण स्तोम पूर्वी होते म्हणे ! परंतु आता बदल

---

* दक्षिण अमेरिकेचा ईशान्य किनारा आणि वेस्ट इंडीज बेटे यांच्या मधल्या भागातील समुद्राला ' कॅरिबियन सी ' नाव देण्यात आले आहे.

दिसतो. अनेक सभासदांपैकी एक मात्र या नात्याने या वेळी तरी वावरत आहेत. तसं म्हटलं तर कुणालाही हेवा वाटावा असे स्थान एकंदर कामकाजात इंदिराबाईंनाच मिळाले असे निर्धास्तपणे म्हणता येईल.

श्री. विल्सन वक्तशीर येत व बहुतेक सर्व वेळ हजर असत. एक-दोन वेळेस, विशेषत: साऊथ आफ्रिकेच्या प्रश्नाचे वेळी विधायक स्वरूपाचे भाषणही केले. अनुभवी, ज्येष्ठ मुत्सद्याला शोभेसे ! परंतु एकंदरीत सर्व सूर खालच्या पट्टीत वाटला. आज व्यापारविषयक चर्चेचा प्रारंभ ते करणार आहेत. पाहू या, काय नवीन कल्पना, वा धोरणे मांडताहेत ते !

श्री. व्हाइटलॅम ( ऑस्ट्रेलिया ) आपल्या उंच व्यक्तिमत्वाने झटकन् डोळयांत भरतात. सर्वांशी मनमोकळे बोलतात, मिसळतात. अविकसित देशांबद्दलची आपुलकी दाखविण्याचा प्रयत्न दिसतो.

उंचीमुळे आठवण झाली· पॅसिफिकमधील बेटांतील बहुतेक प्रतिनिधी त्यांच्या उंचीमुळे ( शारीरिक ) उठून दिसतात. फिजी व व टोंगोचे दोन्ही पंतप्रधान शरीराने खूपच उंच आणि जाडजूड आहेत. बोलणे मात्र सौम्य व वागणेही समंजसपणाचे होते.

न्यूझीलंडचे श्री· Wallace Rowlind अतिशय सरळ व कळकळीचे गृहस्थ वाटले· एका जेवणाचे वेळी त्यांची भेट झाली. त्या वेळच्या त्यांच्या वागण्यावरून व त्यांच्या दोन भाषणांवरून माझा त्या माणसाबद्दलचा आदर वाढला आहे·

इंग्लंड, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंडचे या खेपेचे तीन्हीही पंतप्रधान लेबर पक्षाचे प्रतिनिधी आहेत हा एक योगायोगच आहे. कॉमनवेल्थ परिषदेमध्ये हे प्रथमच घडले आहे, असा मुद्दाम उल्लेख श्री. व्हाइटलॅमनी केला.

कॅनडाचे पंतप्रधान श्री. ट्रयूडो काहीसे अलिप्त वाटले. सर्व चर्चांना सर्व वेळ हजर होते. परंतु अजून बोलले नाहीत. या सर्व कॉमनवेल्थ-प्रकरणात त्यांना किती राजकीय रस आहे ते सांगता येत नाही. जागतिक परिस्थितीत वेगाने घडलेल्या फरकांमुळे आणि अमेरिकेच्या प्रांगणातील वास्तव्यामुळे सर्व धोरणांची परीक्षणे चालू असावीत. त्यामुळे घाईने काही बोलण्याची तयारी दिसत नाही एवढेच.

आफ्रिकेमधून आलेल्या सर्व प्रतिनिधींमध्ये World stature चे दोन नेते आहेत. प्रेसिडेंट ज्युलिएस न्येरेरे आणि प्रेसिडेंट केनेथ कौंडा. दोघांची भाषणे प्रौढ व आत्मविश्वासाची वाटली. साऊथ आफ्रिकेचा प्रश्न धैर्याने पण मुत्सद्देगिरीने सोडविण्याचा त्यांचा निर्धार आहे.

दोघांचेही वक्तृत्व पहिल्या प्रतीचे आहे. कर्तृत्ववान नेते म्हणून त्यांच्या शब्दाला एक नवे वजन होते. प्रे. न्येरेरेचे उत्स्फूर्त भाषण मला फार आवडले.

नायजेरियन प्रेसिडेंट जनरल श्री. गोआन हा तरुण गृहस्थ आहे. प्लेझंट पर्सनॅलिटी ! विचारपूर्वक बोलतात. Must watch him. बाकी आफ्रिकेचे प्रतिनिधी अजून कोणी फारसे बोलले नाहीत. आफ्रिकेमधील विदेशमंत्र्यांची नवी पिढी ' डायनॅमिक ' वाटली.

काल इंदिराजींना दिलेल्या लंचचे वेळी Sierra leone चे पंतप्रधान भेटले. वयस्कर व काहीसे दांडगेश्वर वाटले. परंतु त्यांच्या संभाषणावरून मोठी हुषार वल्ली दिसली. जुने, अनुभवी ट्रेड युनियनचे कार्यकर्ते म्हणून राजकारणात वाढलेले आहेत.

राज्यकर्त्यांनी ट्रेड युनियन्सवर कबजा ठेवला पाहिजे असे आग्रहाने सांगत होते. डेव्हलपिंग देशांमध्ये संपामुळे निर्माण होणाऱ्या अनागोंदी परिस्थितीची सर्वसामान्य चर्चा चालू होती. त्यांनी सांगितले की, मी निरर्थक तात्त्विक प्रश्नामध्ये फसत नाही. ट्रेड युनियन्स या ' राइट डिमांड अॅन्ड राँग डिमांड ' असा फरक कधी करूच शकत नाहीत. आपली मागणी रेटण्याची शक्ति असली म्हणजे झाले. रास्तपणाची त्यांची हीच कसोटी असते.

ते म्हणाले, In my case I begin at the beginning. म्हणजे काय म्हणून विचारले तर म्हणाले, म्हणजे, ट्रेड युनियन्सच्या निवडणुकी होतात त्यावेळी मी दक्ष असतो. आपली माणसे स्वच्छ त्यात घुसवितो. त्यामुळे ठीक चालले आहे. राज्यकारभाराच्या इतर प्रश्नांबद्दलही अशीच स्पष्ट मते देत होते. त्यांची मते योग्य की आयोग्य हा प्रश्न वेगळा. पण व्यावहारिकपणाच्या कसोटीवर ती बरोबर आहेत याबाबत ते स्वतः बिलकूल नि:शंक दिसले.

२ मे, १९७५

काल मी आर्थिक प्रश्नावर बोललो. श्री. विल्सन व बर्न हॅम (गियाना) यांनी दोन पेपर्स परिषदेपुढे ठेवले होते. त्या अनुषंगाने बोलणे प्राप्त होते.

बर्न हॅमनी डेव्हलपिंग देशांची बाजू मांडली. त्यामध्ये कळकळ, काहीसा संताप होता आणि निर्धारही. काही क्रांतिकारक बदल आणि आंतरराष्ट्रीय संस्थांची मूलभूत पुनर्रचना झाली पाहिजे असे सांगितले.

मला यात नवीन काही वाटले नाही. जागतिक बँकेच्या अधिवेशनामध्ये आणि C 20* मध्ये हे विचार मी अनेक वेळा मांडले आहेत. जगातील गरीब व श्रीमंत राष्ट्रांतील आर्थिक व सामाजिक विषमता घालवावयाची असेल तर संपत्तीची पुनर्वाटणी होईल अशी काही व्यवस्था व्यापाराच्या क्षेत्रांत व इतर आर्थिक क्षेत्रांत व्यवहार करणाऱ्या संस्थांच्या पुनर्मांडणीच्या रूपाने झाली पाहिजे. हे माझ्या विचाराचे सूत्र होते. Real transfer of Resources झाले पाहिजे हा मूलमंत्र आहे.

पण श्रीमंत विकसित देश हे सर्व मख्खाप्रमाणे फक्त गंभीरपणे ऐकून घेतात आणि निर्णय घ्यावयाच्या वेळी त्यांना हवे तसेच वागतात हा माझा अनुभव आहे. S D R-Link चा प्रश्नही मी पुन्हा मांडला.

आज साऊथ आफ्रिकेच्या प्रश्नाची पुन्हा चर्चा सुरू झाली. तेव्हा थोडी गरमा-गरमी झाली. युगांडाचा प्रतिनिधी त्याचा अध्यक्ष अमीनतर्फे काही मूर्खासारखा बोलला. केनेथ कौंडा फारच रागावले. म्हणाले, ‘ I dont easily suffer fools ’. चेअरमन मॅनलीने त्यांना आवरले. सामान्यत: अशा परिषदेत असे कधी होत नाही. पण कौंडांचे रास्त होते. मालावी, युगांडा आणि केनिया यांचे वागणे इतरांपेक्षा काहीसे वेगळेच वाटले.

---

* C-20 The Committee on Reform of the International Monetary System and Related Issuses. (परिशिष्ट पहा.)

आफ्रिका खंडामध्ये अंर्तविरोध फारच आहेत. काही सूक्ष्म आहेत तर काही अगदी उघड आहेत. आज जे सूक्ष्म आहेत ते उद्या उघड होतील.

विकासाचे स्तर आणि गति यांमध्ये फरक आहेत. नैसर्गिक साधने व नेतृत्वाची गुणवत्ता यांमधील फरकांमुळे आज असलेले फरक उद्या वाढतील आणि त्यातून राजकीय समस्या उभ्या राहतील यात शंका नाही.

आफ्रिकन अरब व काळे आफ्रिकन असा प्रश्न आजही काही प्रमाणात आहेच. मुस्लिम आफ्रिका व ख्रिश्चन आफ्रिका असाही सूक्ष्मभाव दिसतो.

श्री. न्येरेरे आणि केनेथ कौंडा यांचे मला महत्त्व वाटते ते यासाठी की, हे सर्व प्रश्न त्यांनी हेरले आहेत आणि त्यांची उत्तरे सापडतील असे विचार व संस्थात्मक संबंध वाढविण्याच्या प्रयत्नात ते आहेत.

आफ्रिका खंडातील हे विरोध वाढविण्यात पश्चिम युरोप व अमेरिका यांचे हितसंबंध आहेत. हल्ली काही देशांत चीनही प्रयत्नशील आहे. भारताच्या दृष्टीने स्वतंत्र, संपन्न व स्नेही आफ्रिका ही महत्त्वाची गरज आहे. आमच्या विदेश-नीतीचे हे मूल सूत्र राहील.

आज सकाळी एकाएकी श्रीमती पद्मजा नायडू वारल्याचे वृत्त आले. इंदिराजी दुःखी झाल्या. सकाळी एकाएकी मला बोलावून मी आजच दिल्लीला परत जाते, असे म्हणाल्या.

सर्व कार्यक्रम एकदम बदलले. सकाळच्या अधिवेशनामध्ये आल्या परंतु सर्वांना भेटून निरोप घेण्यासाठी. संध्याकाळी ७ वाजता येथून निघाल्या.

त्यांना निरोप देऊन week end साठी सर्व प्रमुख पाहुणे ( Tryall in Hanover ) या ठिकाणी आलो आहोत. रविवारी संध्याकाळी परत किंग्जटनला जाऊ. उत्तरेच्या किनाऱ्यावरचे एक महत्त्वाचे (नं. २ चे) शहर आहे. या शहरापासून १०–१२ मैलांवर सागराच्या काठी केळी-नारळी यांच्या वनामध्ये छोटेखानी बंगलेवजा कॉटेजमध्ये राहिलो आहोत. भोवताली निसर्ग अगदी रसरसून आहे. पण माझे मन उदास आहे.

श्रीमति पद्मजाजींचे सौजन्यपूर्ण, सुसंस्कृत आणि स्नेहशील व्यक्तित्त्व आता यापुढे दिसणार नाही, या विचाराने मन विषण्ण झाले.

❋

४ मे, १९७५
Happy days
( Tryall in Hanover )

परवा संध्याकाळपासून या ठिकाणी आहे. आज दुपारी Week-end संपवून आम्ही सर्वजण परत किंग्जटनला जाऊ.

बऱ्याच वर्षांनंतर अशी सुट्टी मिळाली. जमेकाचे बाहेरील धनिक लोकांनी आपल्या विश्रामासाठी बांधलेली ही सुंदर वसाहत आहे. समुद्र-काठाला लागून असलेल्या छोटेखानी टेकड्यांवरील हिरव्यागर्द वृक्षराजीमध्ये इतस्ततः पसरलेले तीस एक बंगले असावेत. एकापेक्षा एक उत्तम. सुरेख रंगीबेरंगी फुलांनी नटलेला झाडोरा आवती-भोवती. एकमेकांपासून अलग – पण म्हटला तर शेजार आहे.

खाण्या-पिण्याची उत्तम व्यवस्था. (आम्ही पिणारे नाही हे पाहून आमची व्यवस्था ठेवण्यासाठी येथे हजर असलेल्या लोकांची फारच निराशा झाली. )

मी काल येथील Swimming pool मध्ये फार वर्षांनी पोहून घेतले. येथून १२ मैलांवर असलेल्या मॉंटेगो बे या शहरात फेरफटका मारून आलो आणि दुपार झक्क झोपून काढली.

काल रात्री येथील बीचवर प्रधानमंत्रि श्री. मॅनली यांची पार्टी होती. त्याला हजर राहिलो. सर्व Heads of Govt. हजर होते.

जमेकाच्या संगीताची पार्श्वभूमी आणि सागराच्या लाटांच्या तालबद्ध चढउताराची लय यांची साथ, यामुळे पार्टी लगेच जमून गेली. गप्पांचा कलकलाट. अधूनमधून हास्यांची उडणारी कारंजी. हातांत हात घालून मोकळपणाने इकडे तिकडे भटकणारी जोडपी – सगळे वातावरण कसे मोकळे मोकळे होते.

कॅनडाचे प्रधानमंत्रि श्री. ट्र्यूडो आणि श्रीमती ट्र्यूडो हे जोडपे विशेष खूष दिसले. संगीत अधिक तेज होताच या जोडप्याने नृत्याचा

श्रीगणेशा केला. बहुतेक सर्व जोडपी त्यांत सहभागी झाली. अशा तऱ्हेने हा आनंद-समारोह रात्री ११ वाजेपर्यंत चालू होता.

या पार्टीमध्ये या ठिकाणची दोन-चार सिंधी धनिक जोडपी भेटली. जगात कोठेही जा, सिंधी तेथे असतात. आणि नुसते असतात असे नाही तर ते महत्त्वाचे व्यापारी असतात. इंपोर्ट—एक्स्पोर्टचा त्यांनी कबजा केलेला असतो. सर्वांचा पुणे-मुंबईशी संबंध असल्यामुळे केव्हा ना केव्हातरी ते आपणाला भेटलेले असतात.

त्या सर्वांनी तू बरोबर आहेस का म्हणून चौकशी केली आणि माझ्या एकाकीपणावर नेमके बोट ठेवले.

गेली चार-पाच वर्षे मी जगभर भटकतो आहे पण एकटा. मला याचा आता कंटाळा आला आहे. आजच इजिप्तच्या विदेशमंत्र्यांची दिल्लीला आलेली तार मला येथे Re-direct होऊन मिळाली. त्यांनी २६ मे ते ३० मे या माझ्या दौऱ्याच्या वेळी मिसेस् चव्हाणना घेऊन या असे आग्रहाने लिहिले आहे. तुझी अडचण मला माहीत का नाही ? काय वाटते ते मनात आले म्हणून लिहीत आहे.

※

## ५३ मॉंटेगो बे (जमेका)

४ मे, १९७५

गेले दोन तीन दिवस अनेक प्रश्नांनी माझ्या मनात काहूर मांडले आहे. त्या प्रश्नांची उत्तरे काय आहेत कोण जाणे. पण प्रश्न तरी नेमके काय आहेत व त्यांची उत्तरे काय असावीत वा असू शकतील हे एकदा कागदावर मांडून पहावे असे मनात आले आहे.

कामाच्या व प्रवासाच्या दैनंदिन गर्दीमध्ये आपल्या अंतर्मनात डोकावून पाहाण्यासाठीही सवड व शांतता मिळत नाही. येथील निवांत

वातावरणामध्ये कदाचित ते शक्य होईलसे वाटते. हे लिहिणे ( पत्रे ) म्हणजे तुझ्याशी केलेली संभाषणेच आहेत. तेव्हा हे सगळे तुझ्याशी बोलायचे नाही तर कोणाशी ?

मी सुरुवातीला म्हटले आहे की, गेल्या 'दोन तीन दिवसांत' प्रश्नांनी काहूर केले आहे. याचा अर्थ ते प्रश्न काही दोन तीन दिवसांत निर्माण झालेले नाहीत. गेले अनेक महिने व काही वर्षे म्हटले तरी चालेल, हे प्रश्न जमून गेले आहेत.

काही प्रश्न जसजसे उभे राहात गेले त्या त्या वेळी तात्कालिक उत्तरे मिळत गेली. पण सुसंगत उत्तराची आखणी झालेली नाही. ही एक रुखरुख मनाला लागून आहे. येथील मुक्कामात निवांतपणामुळे ही रुखरुख स्वस्थ बसू देईना एवढाच त्याचा अर्थ.

पुढल्या वर्षी तीस वर्षे होतील मी पहिली निवडणूक जिंकून सरकारमध्ये आलो. अनेक अडचणी आल्या. परिश्रम करावे लागले. अनेकांचे आशीर्वाद मिळाले. लौकिक अर्थाने नावलौकिक मिळाला. सत्तेची अनेक स्थाने पाहिली. राज्यात आणि केंद्रात. सामान्य अर्थाने कुणालाही हेवा वाटावा अशी !

मीही अशा स्थानांची महत्त्वाकांक्षा धरली होती हे म्हणणे खरे नाही. किंवा त्यासाठी कुणाच्या पाठीमागे लाचारीने लागलो असेही नाही. परंतु जेव्हा जबाबदारी आली तेव्हा मागे फिरून पाहिले नाही.

अडचणींची व संकटांची कल्पना माझ्याइतकीच तुलाही आहे. कोणत्या परिस्थितीत कोणते काम स्वीकारले व ते का हे तुझ्याइतके दुसऱ्या कुणास माहिती नाही. टीकाकार स्वाभाविकच सत्तेच्या मागे लागले आहेत वगैरे म्हणणार याची मला कल्पना आहे. मी त्यांच्याशी वाद घालायला जाणार नाही.

पण योजून एखादी सत्तेची जागा हस्तगत करावयाची असे मी कधीच केले नाही. पण वस्तुस्थिती आहे की, सातत्याने गेली तीस वर्षे सत्तास्थानावर आहे.

जाणीवपूर्वक सत्तेचा उपयोग समाजाच्या परिवर्तनासाठी करावयाचा माझा प्रयत्न राहिला. नव्या विचारांना सामोरा गेलो, मुख्यतः

दलितांबद्दल कणव ठेवून सामाजिक न्याय प्रस्थापित केला पाहिजे ही माझी प्रेरणा प्रथमपासूनची होती. माझ्या हातात संपूर्ण (?) सत्ता होती तेव्हा त्या सत्तेचा आग्रहाने व योजनापूर्ण दृष्टीने आणि वर उल्लेखिलेल्या उद्दिष्टांसाठी उपयोग करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

त्याचा काही परिणामही झाला. त्या धोरणाने अनेक नवी माणसे महाराष्ट्रात उभी करण्याचा मी प्रयत्न केला.

जे आपणासाठी कोणी केले नाही, ते आपण इतरांसाठी करावे आणि सत्तेच्या केंद्रस्थानी असताना ते केले तर अधिक फलदायी होते, म्हणून अधिक मित्रभावाने, हळुवारपणे पण विचारांच्या दिशा कायम ठेवून माणसे मी वागविली आणि वाढविलीही.

हे सर्व ठीक आहे. पण आज मी जेव्हा राजकारणातले चित्र पाहतो तेव्हा माझे मन अस्वस्थ होते. खरोखरीच आपण काही नव्या कामाचा पाया घातला होता का ? खरी जिव्हाळ्याची माणसे आवती-भोवती होती का ? काही काही माणसांचे नमुने पाहिले म्हणजे आश्चर्यही वाटते – खरे म्हणजे दुःख होते.

झाले हे पुरे नाही का ? हा असाच खेळ पुढे किती दिवस, कुणासाठी आणि काय म्हणून चालू ठेवावयाचा असा प्रश्न माझ्यापुढे आहे.

मी काही राजकारणसंन्यास घेण्याचा विचार करीत नाही. विचार येतो निवडणुकांचा आणि सत्तास्थानांचा. आज सत्तास्थानावर राहण्याची अनेकांची धडपड चालू आहे. जे आहेत ते तेथेच कसे राहता येईल यासाठी साधनशुचितेचा कसलाही विचार न करता अगदी क्रूरपणे कारस्थाने करताहेत.

असल्या कारस्थानांत अप्रत्यक्षपणे सामील न होता, किंवा त्या कारस्थानाचे बळी होण्यापूर्वीच, योग्य वेळी योग्य निर्णय घेऊन बाजूला झाले तर बरे नाही का ? असा प्रश्न मनात घोळतो आहे.

याचा निर्णय कसा घ्यावयाचा, त्या निर्णयासाठी कसोटचा कोणत्या लावावयाच्या ? फक्त आपल्या स्वतःच्या भावनांचा (subjective) विचार करून निर्णय घ्यावयाचा का ? तर उत्तर ' होय ' असे येते.

श्रीमतीजी अजून महत्त्वाच्या कामात सल्ला मसलत घेतात. पण सत्तेच्या केंद्रवर्तुळाच्या बाहेर ठेवण्याचा समजेल असा प्रयत्न करतात, असा अनुभव आहे. मग मन धुमसत राहते. असे अवमानित राहण्याने ज्यांचा मी प्रतिनिधी आहे असे मानतो, त्यांचाही अवमान तर नाही ना होत, अशी बोचणी असते.

मी माझी समजूत घालतो की, नाही, असा वैयक्तिक भावनांचा विचार करून निर्णय घ्यावयाचे नसतात. राष्ट्रीय कार्य करीत असताना स्वत:ला विसरले पाहिजे – भविष्याकडे लक्ष ठेवले पाहिजे. रागाने मोडता येते, जोडता येत नाही. तडजोडीने वागले पाहिजे असा विचार करून मग काम चालू राहते.

पण खऱ्या अर्थाने काम चालू आहे का? की एका व्यक्तीचा अहंकार सुखविण्यासाठी हे सर्व चालू आहे ?

काँग्रेस पक्ष हे मी माझे सर्व जीवन मानले. ती काँग्रेस कुठे आहे ? काँग्रेसमध्ये लोकशाही राहिली आहे का ? सत्ता मिळवून ती ताब्यात ठेवण्याचे यंत्र म्हणून आज काँग्रेस वापरली जात आहे.

आजची शासन-यंत्रणा अत्यंत आधुनिक तंत्रे वापरून अधिक एक-केंद्रित होत आहे. प्रसंग पडला तर ही यंत्रणा जीवघेणा निष्ठुरपणा दाखविण्यासही मागे पुढे पाहणार नाही असे आधुनिक सत्तेचे सर्व जगातच स्वरूप दिसत आहे. आपला देशही याला अपवाद नाही. आणि या पद्धतीत माझे मन रमत नाहीच पण तिच्याविरुद्ध मनात विष आहे.

जनतेची काँग्रेस खऱ्या अर्थाने बनावी, यासाठी जनतेत राहिले पाहिजे – सत्तेच्या बाहेर राहिले पाहिजे असे मला एकसारखे वाटते. श्रीमतीजींना विरोध करण्यासाठी नाही. माझी तशी भावनाच नाही. प्रथमपासूनच माझा त्यांच्याकडे ओढा होता हे तुला माहिती आहे.

१९६९ मध्ये मी त्यांच्याविरुद्ध मत दिले ते त्यांना सत्तेवरून काढण्यासाठी हे निदान माझ्याबाबतीत तरी खरे नाही. मी त्यांचे मत एकसारखे विचारले होते. त्यांचे मत बनत नव्हते. हे करू का ते करू अशी चंचलता होती. शेवटी मी जे ठरवीन ते इतरांनी मानावे अशी त्यांची रीत होती.

मला हेही कबूल केले पाहिजे की श्रीमतीजी माझ्याशी कधी सूडाने वागल्या नाहीत. Fair वागणे म्हणतात तसे गेली ६ वर्षे त्यांनी माझ्याशी व्यक्तिशः वर्तन केले. पण शेवटी हे सगळे वैयक्तिकच ना ? सार्वजनिक जीवनात आणि राजकारणात जी तत्त्वे मानली त्यांच्या भविष्याचे काय ?

आम्ही साऱ्यांनी वैयक्तिक विचार करूनच वागणे योग्य आहे का असा संघर्ष मनात चालू आहे. निवडणुकीला उभे राहू नये आणि लोकांत काम करीत रहावे, किंवा निवडणूक करून ती जिंकून सत्तेबाहेर राहावे असे दोन पर्याय आहेत. कोणता स्वीकारावा ? पण निवडणुका तरी होणार आहेत का ?

सत्तेच्या बाहेर राहिल्यानंतर आजची शक्ती राहणार नाही. लोकांची दृष्टि बदलेल. दूर होतील. साधनांची कमतरता होईल. आणि मग मनाने कष्टी होऊन एकाकी पडावे लागेल हेही शक्य आहे. पण त्याची तयारी नको का करायला ?

जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नापासून दूर न होता, किंबहुना त्यांच्याशी एकरूप होऊन राहावयाचे म्हटले तर ही भीति कशासाठी ?

आणि मला महाराष्ट्र काँग्रेस पक्षालाच मार्ग दाखविला पाहिजे. छुपे शत्रु आणि आज वरवर दिसणारे मित्रही लांब जातील, विरोध करतील हे सर्व समजून उमजून निर्णय घ्यावा लागेल.

कुटुंबाचा विचार केला तर माझे कर्तव्य सर्वांच्या दृष्टीने माझ्या परीने मी पुरे केले आहे. संसारातले प्रश्न कधीच संपत नाहीत. आणि माझे मन पूर्वीही त्यात नव्हते. आजही नाही. प्रश्न आहे तुझा नि माझा. तू धैर्याने साथीला मनापासून असलीस म्हणजे मला कशाची पर्वा नाही.

आयुष्यातली शेवटली जी काही वर्षे आता राहिली आहेत ती तेजोभंग करून घेऊन काढण्यात अर्थ नाही.

माझ्या मनात काय चालले आहे ते स्पष्टपणे लिहिले आहे. त्यामुळे ते मलाही अधिक स्पष्ट समजले आहे. निर्णय काहीच घेतलेला नाही. मनोव्यापार काय चालले आहेत ते माहीत व्हावे म्हणून लिहिले आहे.

एकमेकांच्या सल्ल्यानेच निकाल घेऊ. घाई कसलीच नाही. पण एक गोष्ट निश्चित की हा निर्णय – 'हो' चा की 'नाही' चा – कसाही घेतला तरी तो माझ्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि कदाचित शेवटचाच ठरणार आहे.

माँटेगो बे मधील 'हॅपी डेज' या बंगल्यातून शांत समुद्र दिसतो आहे. जसा मलबारहिलवरील 'ऐरी' बंगल्यातून दिसत असे तसा. त्या वेळी माझी जी मन:स्थिती होती तीच आज आहे की काय न कळे !

वातावरण प्रसन्न आहे. खूप विश्रांति मिळाली. मन मोकळे झाले. आता ४।। च्या विमानाने किंग्जटनला परतावयाचे आहे.

हे सर्व लिहीत असताना तू समोर बसली आहेस असे मला एकसारखे वाटत होते.

*

## ५४ किंग्जटन

६ मे, १९७५

संध्याकाळी ६ वाजता परिषद संपली. परिषदेहून हॉटेलमध्ये आल्याबरोबर लगेच भारतीय पत्रकारांशी चर्चा झाली.

रात्री काही सांस्कृतिक कार्यक्रम सरकारमार्फत ठेवला होता परंतु मी जायचे नाही असे ठरविले. कारण सकाळी लवकर उठून सामानाची आवरा-आवर करून, ९ वाजताचे विमान पकडून, पुढच्या देशी प्रयाण करणे महत्त्वाचे होते.

माझ्या कल्पनेप्रमाणे परिषद चांगली झाली. कॅरीबियनमधल्या छोटया देशांचा हा 'शो' होता म्हटले तरी चालेल. ४० – ५० च्या मधली पिढी राज्यकर्ती आहे. आधुनिक शिक्षणामुळे त्यांची समज उत्तम –

वागणे-बोलणेही चपखल आणि अनौपचारिक. कामाचा उरक चांगला.

परिषदेचे अध्यक्ष श्री. मॅनली यांनी अतिशय कुशलतेने काम चालविले. ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि हिंदुस्थानचे प्रतिनिधी आपले म्हणणे आवश्यक तेव्हा मुद्देसूद, शांतपणे पण स्पष्टपणे आणि थोडक्यात सांगत असत. उगीच दिमाख दाखविण्याचा प्रयत्न कोणी केला नाही. आम्हीही केला नाही.

महत्त्वाच्या मुद्यावरील निर्णय आम्हाला हवे तसे मिळाले. Nuclear Explosion च्या मुद्यावर कॅनडाचे प्रधानमंत्र्यांनी आज सकाळी नैतिक मुद्यावर ( ? ) तक्रार उभी करून, शांततापूर्ण विधायक कामासाठी अणुस्फोट आणि अणुअस्त्रासाठी अणुस्फोट यांत फरक नाही असे म्हणणे मांडले आणि त्यावर परिषदेचा निर्णय बदलून घेण्याचा डाव टाकला.

परंतु आम्ही आमचे म्हणणे शांतपणे मांडून हा फरक शास्त्रज्ञांनीच मान्य केला आहे असे स्पष्ट केले. नैतिक तक्रारच करावयाची असल्यास अणुअस्त्रांचे मक्तेदार प्रमुख देश आहेत त्यांना उपदेश केला पाहिजे. कारण संहार त्यांच्यामुळे होणार आहे. अण्वस्त्रांसंबंधी आमची नीति पहिल्यापासून स्पष्ट आहे आणि आजही ती आम्ही सोडलेली नाही. गेल्या २५ वर्षांची या देशाची शांततापूर्ण नीति पाहिली असता भारताच्या हेतूबद्दल शंका घेता कामा नये असे विचार मी मांडले.

कॅनडाने आम्हाला प्रारंभापासून या क्षेत्रात सहकार्य केल्याबद्दल खरे म्हणजे आम्ही त्यांचे महत्त्व मानतो. त्यांनी अकारण गैरसमज करून घेऊन या प्रश्नात कटुता वाढवू नये असेही सांगितले.

प्रधानमंत्र्यांनी धोरण बदलून मला फक्त हा नैतिक प्रश्न म्हणून उठवावयाचा आहे. ठरावाची भाषा बदलण्याचा आग्रह धरून हिंदुस्थानशी मतभेद वाढवावयाचे नाहीत अशी सामोपचाराची भाषा वापरली आणि हा एक वादग्रस्त प्रश्न या परिषदेपुरता तरी संपला.

परंतु माझ्या कल्पनेप्रमाणे हे प्रकरण वारंवार उपस्थित केले जाणार आहे. आशिया खंडातील आणि हिंदी महासागरातील इतर देशांचे मनांत भारताबद्दल संशय व भीति वाढविण्याचा यात डाव आहे. हा डाव खेळणारांना साथ मिळणारच नाही असे नाही.

गेले आठ दिवस येथे काढले. दिवस कसे जातात हेच समजत नाही. निसर्ग-सौंदर्य, संगीत आणि मित्रभाव यासाठी हा देश नित्य स्मरणात राहील. अनेक खंडांतील व वंशांतील लोक एकमेकांत मिसळून एक देश बनलेला आहे. " Out of many, one people " हे या देशाचे ब्रीदवाक्य ( Motto ) आहे.

पुण्याचे एक महाराष्ट्रीय जोडपे येथे मुद्दाम भेटावयास आले होते. १०–१२ वर्षे इथे आहेत. चांगली नोकरी व पगार आहे. परंतु त्यांचे मन अजून येथे लागलेले नाही. परत केव्हा जाऊ असे बाई अगदी डोळ्यांमध्ये पाणी आणून सांगत होत्या.

मी त्यांना वरील ब्रीदवाक्याची आठवण करून दिली तेव्हा त्या म्हणाल्या की, आम्ही येथे अजून पाहुणेच आहोत. मुलाबाळांच्या शिक्षणासाठी, विशेषतः मुलीच्या शिक्षणासाठी व संस्कारांसाठी परत गेलेच पाहिजे. मध्यमवर्गीय भारतीय प्रतिक्रियेचा एक नमुना म्हणून हे नमूद केले आहे.

नवा देश बनत असतो तेव्हा जुने मोहपाश – सर्व प्रकारचे – तुटून जावे लागतात. जुन्याच्या राखेतून नव्याचा जन्म होतो. भारत खऱ्या अर्थाने नवा व्हावयाचा असला तर जुने मोडून-तोडून टाकल्याशिवाय गत्यंतर नाही. कदाचित हे कुणाला अतिरेकाचे वाटेल. एकांगी वाटेल. पण मला वाटते, इतिहासाचा अर्थ असाच दिसतो.

*

५५

Mexico City

10 th May, 1975

आज संध्याकाळी गेले तीन दिवस चालू असलेली लॅटिन अमेरिकेतील भारतीय राजदूतांची बैठक संपली. उद्या सकाळी येथन न्यूयॉर्कला प्रयाण.

गेल्या दोन महिन्यांपूर्वी मी हॅवानाचे वाटेवर याच हॉटेलमध्ये (Hotel Camino Real) एक रात्र राहिलो होतो. आमचे जोडीला (म्हणजे मुक्कामाला) मेक्सिको प्रेसिडेंटचे पाहुणे म्हणून इराणचे शहेनशहाही याच हॉटेलात आहेत.

या खेपेला मी येथील सरकारचा पाहुणा नव्हतो. मी आपल्या अंतर्गत राजदूतांच्या बैठकीसाठी आलो होतो. त्यामुळे याच कामामध्ये अधिक म्हणजे दररोज ५-६ तास गेले.

अशा तऱ्हेच्या बैठकीचा माझा प्रथमच अनुभव होता. अशी परिषद घ्यावी असे दीड-दोन महिन्यांपूर्वी माझ्या मनात आले. तशी तयारी केली होती.

प्रथम ब्राझीलमध्ये घ्यावी असा विचार होता. पण नंतर मेक्सिकोचा निर्णय झाला. मला वाटते अशा बैठकांची व विचारविनिमयांची वारंवार गरज आहे. या खंडातील ही अशी पहिलीच बैठक झाली असे सांगण्यात आले.

जगाच्या सर्व विभागांचा असा तपशीलवार अभ्यास संबंधित सर्वांशी एका ठिकाणी बसून झाला, म्हणजे त्या विभागात काम करणाऱ्या राजदूतांनाही मदत होते. दिल्लीत केंद्रकचेरीतून काम करणाऱ्यांना आणि विदेशी मंत्र्यांनाही उपयोगी पडतो यात शंका नाही.

आशिया आणि आफ्रिका या खंडांतील सर्वसामान्य माहिती मला होती. परंतु लॅटिन अमेरिकन देशासंबंधी तशी माहिती फार नव्हती. मंत्रालयामध्येही त्यासंबंधी सखोल अभ्यास नव्हता. त्यामुळे याची गरज होती. येथील मीटिंग संपल्यानंतर सर्वांनी कबूल केले की, अशा बैठकीची नितांत गरज होती.

२० देशांचा हा खंडप्राय मुलुख. त्याचा इतिहास, त्यातील लोक व त्यांची संस्कृति, त्यांच्या आर्थिक आकांक्षा आणि आजची विकासाची स्थिति, या देशांची राजकीय धोरणे व त्याच्या पाठीमागे असणाऱ्या शक्ती व प्रेरणा यांचा उत्तम ऊहापोह झाला.

त्या संदर्भात भारतीय धोरणाची दिशा कशी असावी, आर्थिक सहकार्याची शक्यता व मर्यादा याचीही तपासणी झाली. प्रत्येक देशाच्या

प्रतिनिधीने - राजदूताने या दृष्टीने प्रेझेंटेशन करावयाचे आणि इतरांनी त्याला स्पष्टीकरणाचे प्रश्न विचारावे अशी पद्धती ठेवली होती.

बैठकीसाठी Agenda ही बनविला होता. त्यामुळे चर्चा मुद्देसूद आणि आखीव अशी झाली. परिषदेच्या सुरुवातीला १५-२० मिनिटे परिषदेच्या उद्देशासंबंधी बोलून मी विषयप्रवेश केला होता.

काल शेवटी summing up साठी दीड तास बोललो. लॅटिन अमेरिकेसंबंधीचे माझे विश्लेषण व त्यांची राजकीय व आर्थिक धोरणे आज काय आहेत व ती तशी का आहेत, त्यांच्यापुढील दिशा कशा राहतील याचे सर्वसामान्य दिग्दर्शन केले.

This area is full of profound contradictions and equally profound problems as it is in India.

अमेरिकन आर्थिक प्रभुत्वाचे अस्तित्व व त्यापासून मुक्त होण्याची प्रेरणा,हा प्रमुख विचार येथील राजकारणाच्या पाठीमागचे एक सूत्र आहे. State home Relationship आहे म्हटले तरी चालेल.

लोकसंख्येची वाढ आणि गरीबी हे येथील स्फोटक प्रश्न आहेत. या बाबतीत भारताच्या व या देशातील प्रश्नांचा तोंडावळा हा एक-सारखा वाटतो.

मेक्सिकन सरकारचा पाहुणा नव्हतो तरी येथील सरकारने आमची देखभाल चांगली ठेवली होती. येथील प्रेसिडेंटना भेटण्यास गेलो होतो. ३५–४० मिनिटे एकत्र होतो. भारतासंबंधी आपुलकी आहे; पण निश्चित स्वरूपाची सहकार्याची क्षेत्रे निवडून ही आपुलकी खंबीर पाया-वर उभी केली पाहिजे असे त्यांनी बोलून दाखविले. राजदूतांच्या परिषदे-साठी मेक्सिकोची निवड केल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

काल इराणचे शहेनशहा यांचे बॅक्वेट होते. त्याचे त्यांनी खास आग्रहपूर्वक निमंत्रण दिले. सर्व डेलिगेशनसह या सोहाळ्यात सामील झालो. Colourful function. तीन हजार लोकांना एकत्र जेवण होते. प्रेसिडेंटच्या राजवाड्यातील एका विस्तीर्ण प्रांगणात सजावट उत्तम केली होती. लक्षात राहाण्यासारखा अनुभव.

सकाळी थोडा वेळ मिळाला म्हणून येथून ३० मैलांवर असलेले प्राचीन पिरॅमिड्स् पाहून आलो. स्पॅनिश लोकांनी हा देश जिंकला त्यापूर्वी येथे अनेक राज्ये व वेगवेगळ्या संस्कृति विकसित झाल्या होत्या.

ख्रिस्तपूर्व ५०० वर्षांपूर्वी बांधलेला पिरॅमिड आहे. इजिप्तचे पिरॅमिड्स् आणि या पिरॅमिड्स् मध्ये एक प्रमुख फरक आहे. येथील पिरॅमिड्स् म्हणजे त्या लोकांनी बांधलेली मंदिरेच आहेत. चंद्राचा पिरॅमिड, सूर्याचा पिरॅमिड अशी त्यांची नावे आहेत.

इजिप्तमधील पिरॅमिड्स् म्हणजे तेथील शक्तिशाली राजांच्या व प्रमुख स्त्रीपुरुषांच्या कबरी आहेत. इतिहासातील अनेक आश्चर्यांपैकी हेही एक आश्चर्य आहे की, हजारो वर्षे नांदत आलेली ही संस्कृति व राजा, कोर्टीस (Courtes) या स्पॅनिश सेनापतीने ४०० सैनिकांच्या मदतीने पराभूत करून एका नव्या साम्राज्याचा आणि नंतर एका विशाल मिश्र समाजाचा पाया घातला.

या आक्रमकांमध्ये आक्रमकांची विजिगीषुता होती. नवी शस्त्रे (तोफा, बंदुका, घोडे) होती. त्यापुढे ही जुनी संस्कृति नमली. पण तिच्यातील काही मूलभूत शक्तीमुळे ती संपूर्ण पराभूत झाली नाही.

कालाच्या ओघात त्या संस्कृतीचा परिणाम जेत्यांवरही झाला. त्यांच्या परंपरा आणि युरोपातून, आफ्रिकेतून आलेल्या लोकांच्या मिश्र जीवनांतून एक नवाच समाज तयार झाला आहे.

काल या हॉटेलमधील दुकानातून फिरून आलो. एक-दोन पुस्तके खरेदी केली. बाकीच्या वस्तु पाहिल्या परंतु महागाई फार म्हणून विचार सोडून दिला.

येथील राजदूतावासामध्ये काम करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांना व परिषदेसाठी आलेल्या राजदूतांना रात्री मी निरोपाचे भोजन दिले. हॉटेलमध्ये परत येऊन हे लिहीत आहे

सर्व दिवसाचा खूप थकवा आहे. प्रवासाचा कंटाळा आला आहे. घरच्या आठवणीने अस्वस्थ वाटत आहे. पण आता ४-५ दिवसांनी घरी जाणार म्हणून परतीच्या प्रवासाची ओढही आहे. दिल्लीचे ८-१० दिवसांचे पेपर्स काल एकत्र पाहिले. ❋

## कैरो (काहिरा)

२९ मे, १९७५

उद्या सकाळी येथून दमास्कसला जाण्यासाठी निघणार. तीन दिवसांची येथील भेट आज पुरी झाली. येण्यापूर्वीची तीन दिवसांची पुणे–सातारा–कराडची भेट अतिशय गर्दीची व धावपळीची झाली होती. दिल्लीस पोहोचल्याबरोबर, लगेच त्या रात्री पहाटे निघावे लागले. त्यामुळे निघतांना मला थकून गेल्यासारखे वाटत होते.

विमान बेरूतला जाणार व झोपेसाठी वेळ अधिक मिळेल असे वाटले होते. परंतु विमान कुवेतलाच थांबले· साडेतीन-चार तासांचा प्रवास. त्यामुळे झोप पुरी मिळाली नाही.

कुवेतला ॲम्बॅसडर श्री. अफझलखान यांनी ‘कुवेत हिल्टन’ मध्ये व्यवस्था केली होती. तेथून कैरोला जाणारे विमान दुपारी १२॥ ला असल्यामुळे निवांत वेळ मिळाला. झोप आली नाही पण सुरेख स्नान मिळाले. शांत वेळ सापडला. त्यामुळे कागदपत्र वाचावयाचे राहून गेले होते ते वाचून झाले.

कैरोला ४ वाजता पोहोचलो. म्हणजे पाच तास उशीरा. कार्यक्रमांची थोडी गडबड झालीच. विदेशमंत्र्यांचे येथील त्या दिवशीचे जेवण दुसऱ्या दिवसावर गेले.

संध्याकाळी ७ वाजता २॥-३ तास त्यांच्याशी फार मोकळी चर्चा झाली. मध्यपूर्वेच्या प्रश्नांत इजिप्तची भूमिका मध्यवर्ति असल्यामुळे त्यांचा दृष्टिकोन समजणे आवश्यक होते.

त्यांचा देश आर्थिक अडचणीत आहे. रशिया शस्त्रेही देत नाही आणि कर्ज परतफेडीची सवलतही देत नाही. यामुळे खूपच नाराज दिसले. शेजारच्या लिबियाला देतात, सिरीयाला देतात आणि आम्हाला नाही अशी उघड उघड तक्रार करीत होते.

राजकीयदृष्टचा या दोन देशांमध्ये फारच अंतर वाढले आहे. अमेरिका तरी काय करणार आहे कोण जाणे, ही भावना त्यांना सतावत

आहेच. परंतु आशा असली तर त्यांच्यावरच आहे. कारण त्यांचे इस्राइल वर वजन आहे.

मला ही भोळसटपणाची आशा वाटते. आम्हाला हे सांगण्यात सोव्हिएटशी आम्ही बोलावे असा उद्देश असावा. पश्चिम युरोपीय देशांचे वर्तन उत्तम आहे. ते संपूर्ण साथ देत आहेत असे त्यांना सर्टिफिकेट दिले.

महत्त्वाची मुलाखत दुसऱ्या दिवशी प्रेसिडेंटड सादत यांच्याशी झाली. कैरो शहराच्या बाहेर बराज शेजारच्या एका निवांत, शांत vila मध्ये ४५ मिनिटे भेट झाली. पहिली पंधरा मिनिटे मी प्रधानमंत्र्यांचे पत्र देऊन आपल्याकडील राजकीय व आर्थिक परिस्थिती निवेदन केली. पाकिस्तानचाही उल्लेख झाला. 'शो पेशन्स' असा त्यांचा सल्ला मिळाला.

त्यानंतर अर्धा तास तेहून फार मोकळे व स्पष्ट बोलले. सोव्हिएट-वर खूपच राग आहे त्यांचा. त्यांना ते गैरभरवशाचे राष्ट्र वाटते. त्यांच्या-वर अवलंबून राहू नका असा तुमच्या प्रधानमंत्र्यांना माझा निरोप सांगा इथपर्यंत स्वारी गेली.

जिनिव्हा-कॉन्फरन्स अपरिहार्य आहे असे त्यांना वाटते. ती यावर्षी झाली पाहिजे व तशी ती होईल असेही त्यांना वाटते.

अमेरिकन प्रेसिडेंटला भेटण्यासाठी युरोपमध्ये दुसऱ्या दिवशी ते जाणार होते. परंतु प्रेसिडेंट श्री. फोर्ड यांच्या मनात नेमके काय आहे त्याचा आपल्याला पत्ता नाही. फोर्ड अॅडमिनिस्ट्रेशन दुबळी आहे. फोर्डला आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे बारकावे अजून समजलेले नाहीत. त्यामुळे त्यांची पुरी पकड नाही. उलट पुढच्या वर्षी निवडणुका असल्यामुळे इस्राएल अमेरिकेतील धनिक ज्यूंच्यामार्फत फोर्डवरच दडपण आणील अशी भीति त्यांच्या मनात आहे.

इजिप्तचे हित हे प्रथम – बाकी सर्व नंतर असा त्यांचा अग्रक्रम दिसला. माझे रशियनांशी भांडण नाही; पण मी त्यांच्या खिशात जाऊन नाही बसणार. मला दोन्ही प्रमुख सत्तांचा समतोल ठेवावयाचा आहे. तो बॅलन्स ठेवला तर त्यांची खरी मदत हा प्रश्न सुटण्यास होणार आहे.

अरबांमध्ये अनेक भांडणे आहेत. परंतु त्या सर्वांना भेटून त्या सर्वांना समजावण्याचा मी प्रयत्न केला आहे. पी. एल्. ओ. मध्ये फार

गट आहेत. अराफतची शक्ती तो दाखवितो तितकी नाही. They want to be tamed and I am trying to tame them. अशी त्यांनी आपली बाजू सांगितली.

प्रधानमंत्र्यांच्यासंबंधी व भारतासंबंधी फार आपुलकीने बोलले. I have something up my sleeve. but I will not disclose it now असेही एकदा बोलून गेले. मी प्रयत्न करीत रहाणार आहे. एक प्रयत्न फसला तर काही दुनिया बुडाली असे मी समजणार नाही. दुसरा प्रयत्न सुरू करीन. मी आशावादी आहे. तसाच वास्तववादीही आहे अशी त्यांनी आपली कैफियत मांडली.

मला त्यांचे म्हणणे पटो वा न पटो परंतु I came back impressed by his staring installed personality and sheer logic of his arguments. संस्मरणीय मुलाखत झाली म्हटले तरी चालेल.

अशा तऱ्हेने २८ संध्याकाळपर्यंत माझे महत्त्वाचे काम संपले.

कैरो शहर मी प्रथमच पाहिले. १९६४ साली लंडनच्या वाटेवर, विमानतळावर तासभर थांबलो होतो एवढीच जुनी आठवण. आता तो विमानतळ लष्करी विमानतळ बनला आहे. एक नवे विस्तीर्ण शहर – उभे राहिले आहे.

नाईलच्या काठचे हे प्राचीन शहर अगदी आधुनिक शहरांपैकी एक झाले आहे. ६०-७० लाख वस्ती आहे. नाईलच्या दोन्ही काठी शहर पसरले आहे. नाईलच्या पूर्वेची वसाहत जुनी व विस्तृत आहे.

संध्याकाळच्या वेळी नाईलच्या दोन्ही काठांची शोभा प्रेक्षणीय आहे. मेरिडियन हॉटेल नाईलचे अगदी काठावर आहे. तसे म्हटले तर काहीसे नदीतच आहे. नदीकाठच्या गॅलरीमधून संध्याकाळी नाईलचा संथ पण विशाल प्रवाह व त्यात चमकणारे काठावरचे प्रकाशदिवे पहाण्यात मोठी मौज आहे.

ही नदी म्हणजे खऱ्या अर्थाने या देशाचे जीवन आहे. हजारो वर्षे या नदीच्या काठी संस्कृति विकास पावत गेली. अनेक साम्राज्ये बनली, वाढली व मोडली गेली. या देशातील ८० टक्के जनता या नदीच्या काठी राहते. पश्चिमेला वाळवंट आहे.

श्री. नासरने आस्वानचा मोठा तट उभा केला. त्यामुळे वीज-उत्पादन वाढले आहे. पुराचे संकट टळले आहे. प्रवाह केव्हा, किती असावा हे नियंत्रण शक्य झाले आहे. अर्थात् यामुळे नव्या अडचणी निर्माण झाल्या आहेत असे सांगणारेही लोक भेटले.

जो काही थोडा वेळ मिळाला त्यात येथील काही गोष्टी पाहून घेतल्या. म्युझियम – ख्रिस्तपूर्व दीड-दोन हजार वर्षांचा इतिहास तेथे पहावयास मिळतो. जुनी हत्यारे, मूल्यवान जडजवाहर, अनेकविध मूर्ति व विशेषतः ' ममीज ' येथे पहावयास मिळतात.

म्युझियमची आधुनिक मांडणी नाही. स्टोअरसारखे दाटीवाटीने वस्तू ठेवल्या आहेत. इस्लाम व अरब या देशात येण्यापूर्वीच्या काळच्या संस्कृतीचे हे अवशेष आहेत. या संस्कृतीचा आपला अतूट संबंध आहे अशी भावनात्मक जाणीव कमी दिसली. परंतु त्याचा काहीसा परिणाम जरूर असावा. नासरच्या सेक्युलर धोरणाची शक्यता या परिणामातून निर्माण झाली असावी.

Citadal म्हणून नदीच्या पूर्वेकडील भुईकोट किल्ला आणि त्यातील १२ व्या शतकातील इमारती व मशिदी पाहिल्या. शेवटी आज दुपार-नंतरचे तीन तास पिरॅमिड्स्, Finxच्या आसमंतात काढले.

इजिप्त व पिरॅमिड्स् हे नाते अतूट आहे. सम्राट, राजे-महाराजे या मंडळींना अमर होण्याचा मोठा षोक प्राचीन काळापासूनच आहे. आपली सारी सत्ता, संपत्ती व लक्षावधींचे घामाचे श्रम या कामासाठी वर्षानुवर्ष वापरली गेली आहेत.

पण हे सर्व खरे असले तरी त्या काळच्या संस्कृतीचा ( साडेतीन चार हजार वर्षांपूर्वीच्या ) इतिहास या अवशेषांमुळे जतन झाला आहे हे कबूल केले पाहिजे. Finx म्हणजे सिंहाला मानवी चेहरा दिलेली मूर्ति. हे एक मानवी पराक्रमाचे व सत्तेचे उत्तम प्रतीक आहे. या चेहेऱ्याचे नाक तुटले आहे.

नेपोलियन बोनापार्ट आक्रमण करून या देशात आले तेव्हा त्यांनी तोफेचे गोळे उडवून हा प्रकार केल्याचे समजले. एका थोर पराक्रमी पुरुषाने हे करावे याबद्दल विषाद वाटला. नेपोलियनबद्दल वाटणाऱ्या

आदरातून एक टक्का तरी उणा केला पाहिजे असे मनात येऊन गेले.

या शहरात तीन विश्वविद्यालये आहेत. कैरो युनिव्हर्सिटी पाहिली. विद्यार्थी अत्यंत जागृत दैवत आहे. ७२ साली युद्ध झाले पाहिजे म्हणून निदर्शने करून सादतसाहेबांना यांनी हैराण केले होते.

बाकी शॉपिंग वगैरेसाठी कोठे जाताच आले नाही. निदान दुकाने, मांडणी, विविध वस्तू पाहून तरी घ्याव्यात असे जरूर वाटते. पण या भेटीत वेळ अपुरा पडला. सकाळी ६ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत वेळ कसा जात होता तेच समजले नाही.

ओबेरॉयच्या मॅनेजमेंटखाली मीना हाउस म्हणून एक हॉटेल, पिरॅमिड्सच्या अगदी जवळ चालते. नवीनच आहे. तेथे हिंदी-इजिप्शियन मित्रसंघातर्फे स्वागत-समारंभ झाला. दोन्ही समाजांतील अनेक प्रमुख लोक होते.

उत्तराच्या भाषणात जेव्हा मी 'गंगा-यमुनेच्या प्रदेशांतील जनतेच्या शुभेच्छा नाईल-काठच्या जनतेसाठी मी घेऊन आलो आहे' अशी सुरुवात केली तेव्हा सर्व लोक हर्षोत्फुल्ल झाले. या सर्व भेटीत हाच विचार माझ्या मनात एकसारखा होता म्हटले तरी चालेल. आता दमास्कसमधून लिहीन.

*

## ५७ दमास्कस (सिरिया)

१ जून, १९७५

सकाळी ११ वाजता येथे पोहोचलो. मक्का-मदिनानंतर इस्लाम-मध्ये या शहराला स्थान – धार्मिकदृष्टचा – दिले जाते. त्याचप्रमाणे अरब राष्ट्रीयत्वाला जन्म देणारे शहर म्हणूनही राजकीयदृष्टचा या शहराला महत्त्व आहे.

१२ लाख वस्तीचे शहर. शहराची पार्श्वभूमी म्हणजे चढती डोंगरांची रांग आहे. डोंगराच्या उतारावर शहराची वस्ती पसरत चालली आहे. खालच्या मैदानावरही विस्तृत पसरलेले हे शहर जगातल्या अत्यंत जुन्या शहरांपैकी एक आहे.

एक छोटीशी नदी शहरामधून वाहते. परंतु ती वाहते हे लवकर ध्यानात येत नाही – अशी बांधबंदिस्ती आहे.

दुपारचे जेवण ॲम्बॅसिडरकडेच होते. तेव्हा मोकळा वेळ कामी लागावा म्हणून येथून ४० मैलांवर असलेल्या एका हेल्थ-रिसॉर्टवर चक्कर मारण्याचे ठरविले. (ब्ल्यूडॉन)

ओसाड व निष्पर्ण डोंगरांच्यामधून एक सुंदर खोरे आहे. दमास्कस सोडताना चिंचोळे दिसते. परंतु पुढे ते खोरे विस्तृत होत जाते. या खोऱ्यांतून जाणारा हा रस्ता लेबनॉनमध्ये बेरूतला जातो. बेरूत ४०-५० मैलांवर तास–दीड तासाच्या रस्त्यावर आहे.

या खोऱ्यात जसजसे पुढे गेलो, तसे उंची वाढत गेली. हवेत गारवा वाटू लागला. हिरव्यागार शेतीवाडीने भरलेले खोरे दृष्टिपथात येताच नेत्रांची तृप्ती होते.

ब्ल्यूडॉन हे ४॥ ते ५ हजार फूट उंचीवर आहे. वाटेत नैसर्गिक पाण्याचे झरे आहेत. एका ठिकाणी आम्ही सर्वजण थांबलो. झऱ्याचे पाणी आणि टर्किश कॉफी दोन्हींची चव घेतली, आणि दुपारी २ वाजता परतलो.

संध्याकाळी सरकारी कार्यक्रम सुरू झाला. येथून ३५–४० मैलांवर असलेल्या कुनेत्रा शहराला भेट दिली. आता याला शहर तरी कसे म्हणावयाचे ?

सर्व घरे इस्त्राइली सैनिकांनी बुलडोझर्सनी अक्षरशः नांगर फिरविल्यासारखी पाडली आहेत. ६० हजार वस्तीचे हे शहर भुताटकीच्या शहरासारखे उद्ध्वस्त झाले आहे.

१९६७ आणि ७३ मधील मध्यपूर्वेच्या लढाईमध्ये 'गोल्डन हाईट्स्' हे नाव आपण सर्वांनीच वृत्तपत्रात वाचले आहे. उंच मैदानाचा मुलुख म्हणून त्याला 'हाईट्स' हे नाव असावे. एका जिल्ह्याचे हे नाव. कुनेत्रा हे त्या जिल्ह्याचे प्रमुख शहर होते.

१९६७ मध्ये इस्राइली सैनिकांनी ते जिंकले. १९७३ च्या लढाई-नंतर युद्धतहकुबीच्या तडजोडीत हे शहर सिरीयाला परत दिले गेले. ते देण्यापूर्वी शहर सोडून जाताना सैनिकांनी योजनापूर्व विध्वंस करून एका अर्थाने शहराचे स्मशान करून – त्यांच्या ताब्यात दिले. यू. एन्. मध्येही याची बरीच चर्चा झाली.

युद्धभूमीवरील, माणुसकीला लाजविणारे हे दुःखचित्र पाहून कष्टी मनाने परतलो.

रात्री येथील विदेशमंत्री अब्दुल हालिम खदाम यांचे जेवण होते. मंत्रिमंडळांतील इतर प्रमुख मंत्री आणि प्रमुख देशांचे राजदूत हजर होते. योग्य ती भाषणे होऊन कालचा दिवस ११ वाजता रात्री संपला.

आज सकाळपासून आत्तापर्यंतचा वेळ खूपच गर्दीचा गेला. ९।। ते १२।। विदेशमंत्र्यांशी चर्चा करण्यात गेला. भाषांतरामुळे अधिक वेळ गेला. तत्त्वांची चर्चा व मांडणी त्यांनी चांगली केली. पाकिस्तानचा प्रश्न आला म्हणजे, नाही म्हटले तरी त्यांची काहीशी मानसिक गडबड होते.

इजिप्तच्या व त्यांच्या भूमिकेत मूलभूत फरक दिसतो. प्रो-सोव्हिएट तर आहेतच. जिनिव्हा झाले पाहिजे व त्यात आशिया, आफ्रिका आणि नॉन-अलाइन्ड यांना प्रतिनिधित्व दिलेच पाहिजे वगैरे. पी. एल्. ओ. बाबत आणखी एक सूक्ष्म फरक ध्यानात आला.

त्यांच्या मनात आत कोठेतरी अशी भावना आहे की, पॅलेस्टाइन व सिरिया यांचे एक राज्य व्हावे. इराण व इराक यांच्या नव्या स्नेहा-बाबतही त्यांनी लावलेला अर्थ वेगळा आहे.

दोन्ही देशांत (इराक व सिरिया) Bath पार्टीचे राज्य आहे. परंतु अलीकडे युफ्रेटिस नदीच्या पाणीवाटपावरून व व्यक्तिगत राजकीय संघर्षामुळे त्यांच्यात बेबनाव झाला आहे. उघड उघड एकमेकां-वर जाहीर टीका व आरोप प्रत्यारोपांची खैरात होत आहे.

इराणने आपले वैर विसरून जी मैत्री केली त्याचे पाठीमागे इराकमधून सोव्हिएट मैत्रीची हकालपट्टी करण्यासाठी टाकलेला भांडवल-शाही डाव आहे. सौदी अरेबियाच्या द्वारे हाच डाव इजिप्तमध्ये खेळला

गेला व तेथे अमेरिकेचे वर्चस्व वाढवून रशिया व इजिप्त यांमध्ये अंतर निर्माण केले. इराणमध्ये शस्त्रात्रांच्या जबरदस्त वाढीच्या पाठीमागे बदललेली दुनिया लक्षात घेऊन साम्राज्यशाहीने टाकलेले हे नवे पाऊल आहे.

' डिडांट 'च्या पार्श्वभूमीवर Alliamon चे महत्त्व कमी झाले आहे. आता वेगवेगळ्या विभागांत आपल्याला अनुकूल नवी ( centres of power ) शक्तीची केंद्रे उभारण्याची नवी नीति सुरू झाली आहे. इराण हे गल्फसाठी व हिंदीमहासागराचे भविष्य घेऊन या हेतूने निवडले गेले आहे. नव्या घडामोडींचे त्यांचे हे विश्लेषण आहे. आमच्या मतांशी जुळणारे हे विश्लेषण आहे. परंतु आर्थिक क्षेत्रात इराणशी लांब मुदतीची सहकार्य-क्षेत्रे निवडण्याचे आमचे – भारताचे – धोरण दूरदृष्टीचे व योग्य असेच आहे असे त्यांनी मत व्यक्त केले.

विदेशमंत्र्यांना भेटून एकच्या सुमारास हॉटेलवर परतलो. १॥ ते २ च्या सुमारास सर्वांनी एकत्र जेवावयाचे असे आम्ही ठरविले होते. दीड वाजल्यानंतर एकाएकी प्रेसिडेंट श्री. आसद यांनी लगेच भेटीस बोलाविले आहे असा पॅलेसवरून निरोप आला. त्यांची ही नेहमीचीच पद्धति आहे असे सांगण्यात आले.

आधी वेळ व जागा कळविली जात नाही. एकपक्षीय राज्यातील हे सर्वाधिकारी अध्यक्ष असेच वागतात म्हणे !

४०-५० च्या वयाचे काहीसे गंभीर परंतु Relaxed म्हणता येईल असे व्यक्तित्व दिसले. एक तासभर मी तेथे होतो. त्यांचे विदेशमंत्रीही हजर होते. शांत आणि सावकाशपणे त्यांनी इस्राएलच्या प्रश्नाचा इतिहास सांगितला.

अरब राष्ट्रांबाबत आणि जगातील स्वातंत्र्य-चळवळीसंबंधीची भारताची जी सक्रीय मैत्रीची भूमिका आहे त्याबद्दल आनंद व्यक्त केला. मी आमचे शेजारच्या राष्ट्रांशी मैत्री दृढ करण्याचे जे प्रयत्न सुरू आहेत त्यांचा काहीसा तपशील सांगितला. आर्थिक सहकार्यासाठी दोन्ही देशांत नवी कार्यक्षेत्रे निवडली पाहिजेत असे सांगितले. त्यांनी त्या दृष्टीने आपल्या मंत्रिमंडळाशी चर्चा करण्याचे मान्य केले. दुपारी श्री. सन्याल यांच्याशी, चार-पाच मंत्र्यांशी यादृष्टीने मुलाखतीही झाल्या.

दुपारनंतर दमास्कस शहर पहाण्यासाठी बाहेर पडलो. येथे ८ व्या शतकातील जुनी मशीद आहे. ती पाहण्यासाठी गेलो. इतिहासप्रसिद्ध मशीद आहे.

इस्लाम सुरुवात झालेला हा मुलुख आहे. महमद शेवटचा पैगंबर आहे. त्याच्या आधी प्रेषितांनाही ते सन्मानाने वागवितात, हे मशीदीवरून अनुभवास आले.

ख्रिस्तपूर्व रोमन मंदिर होते. त्याचाही पुरावा म्हणून शिल्लक ठेवला आहे. नंतर त्याचे चर्च झाले. इस्लामच्या आगमनानंतर कित्येक वर्षे हे स्थळ चर्च व मशीद म्हणून समजुतीने एकाच वेळी प्रार्थनेसाठी वापरत असत.

पुढे मुस्लिम समाजाने ख्रिश्चनांसाठी चर्चेस बांधून दिली. ही फक्त मस्जिद झाली. हे सर्व ऐकून काहीतरी अनोखे ऐकतो, पहातो आहे असे वाटले. खुद्द मशिदीमध्ये एका ख्रिश्चन साधूची कबर अगदी मध्यस्थानी आहे. तिचा योग्य तो सन्मान केला जातो. नवल आहे की नाही ? पण वस्तुस्थिती आहे.

नंतर गेलो महमद पैगंबराचे नातीची कबर पाहण्यासाठी. नेहमीसारखे वातावरण होते. धार्मिकदृष्टया ऐतिहासिकता आहे. अनेक स्त्री-पुरुष भक्तिभावाने येता-जाताना दिसले.

शहराच्या पश्चिम दिशेला नव्या व आधुनिक थाटाच्या वसाहती, ज्या डोंगर-चढावावर आहेत त्या मग पहात पहात गेलो. नवा मध्यमवर्ग वाढतो आहे. सरकारी अधिकारी, सैन्याधिकारी, व्यापारी वगैरे, त्यांचे हे स्थान आहे. आधुनिक घरे, शांत वातावरण, उत्तम रस्ते हे सर्व ओलांडून डोंगर पार केला आणि एकदम मावळतीला कललेले तेजःपुंज सूर्यबिंब दिसले.

लेबनॉनच्या सरहद्दीवर असलेल्या डोंगरमाथ्यावरून सूर्य हळूहळू नजरेआड होत होता. फार दिवसांनी सुरेख सूर्यास्त पहात होतो. गार वारा आल्हाददायक होता. किती तरी वेळ तसाच थांबलो. अंधार वाढू लागला. सिरियाचा संरक्षण-अधिकारी हलकेच जवळ येऊन म्हणाला, 'सर, आता परतले पाहिजे. विदेशमंत्र्यांना तुमचे रात्रीचे भोजन आहे.'

सरकारी औपचारिकतेच्या जंजाळात परत पाऊल टाकले. पण परत फिरून पुन्हा एकवेळ सूर्यास्तानंतरचे डोंगरमाथ्यावरचे लालसर कवडसे पाहूनच !

उद्या सकाळी बेरूतहून राजदूत श्री. एस्. के. सिंग येणार आहे. त्याला भेटून एक वाजता येथून निघेन. कैरोमार्गे २ जूनला* सकाळी दिल्लीत. योगायोगाने २ जूनला मी परत येतो आहे याचा फार आनंद आहे.

*

## ५८ फ्रँकफर्ट

२३ ऑगस्ट, १९७५

फ्रँकफर्टला ९-९॥ वाजता सकाळी पोहोचलो. वाटेत रोमला, त्या विमानात महाराष्ट्रातील ४० द्राक्षमळेकऱ्यांचा, युरोपच्या द्राक्षांच्या बागा पाहाण्यासाठी आलेला एक जथा भेटला.

इचलकरंजी, सांगली, तासगाव, बारामती, पुणे, उरळीकांचन या सर्व भागातील नवे-जुने पण अनुभवी जाणते बागाईतदार होते. त्यात शेंबेकरांसारखे मोठे धनिक शेतकरी जसे होते तसेच चार-सहा एकरवाले लहानही होते. एम्. एस्सी. ( अग्री. ) होऊन परत स्वतःच्या शेतीवर गेलेला एक उमदा तरुणही भेटला.

मी विमानात आहे असे समजताच सर्वजण भेटून गेले. रोम ते फ्रँकफर्ट या प्रवासात महाराष्ट्रातील ग्रामीण भागात दौरा करीत असल्यासारखे वाटत होते. काही मंडळी सपत्निक आली होती. मला फार आनंद वाटला आणि अभिमानही.

---

* २ जून हा दिवस यशवंतराव व वेणुताई यांच्या विवाहाचा वाढदिवस.

बागायती शेतीमुळे जवळ आलेला पैसा असा-तसा खर्च करण्यापेक्षा इतर देशातील शेती पाहून आपल्या अनुभवांची क्षितिजे वाढविण्याची नवी दृष्टि महाराष्ट्रातील ग्रामीण भागात वाढते आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

फ्रँकफर्टच्या विमानतळावर या सर्व मराठी मंडळींबरोबर उतरलो. जर्मन सरकारचे प्रतिनिधी स्वागतासाठी आले होते. त्यांना आमचा हा सर्व जिव्हाळा व गोतावळा पाहून नवल वाटले.

सर्वांच्या बरोबर गटागटाने फोटो झाले आणि मग त्यांचा निरोप घेऊन आपले राजदूत श्री. रहिमान व जर्मन विदेश मंत्रालयाच्या प्रतिनिधींचे स्वाधीन झालो.

फ्रँकफर्ट विमानतळावर गेली ११ वर्षें अनेक वेळा येता-जाता थांबावे लागले होते. परंतु आज प्रथमच विमानतळाबाहेर शहरात प्रवेश केला.

हे २० लाख वस्तीचे औद्योगिक व्यापारी केंद्र आहे. माईन नदीचे काठावर अनेक शतकांपूर्वीपासून हे शहर वसले आहे. त्याला जुना इतिहास आहे.

प्रसिद्ध जर्मन कवी गटे याचा जन्म इथला. इथेच त्याचे शिक्षण झाले. तरुणपण गेले. एका धनिक घरात याचा जन्म झालेला. त्याचे ते तीन-चार मजली घर येथे आहे. ते पाहाण्यासाठी तास-दीड तास घालविला.

दुसऱ्या युद्धात हे शहर संपूर्ण उद्ध्वस्त झाले होते. सर्व शहर पुन्हा बांधले गेले आहे. या घराचीही तीच अवस्था झाली होती. पुन्हा काहीसे पहिल्यासारखे परत बांधले आहे. मात्र जुनी पुस्तके, फर्निचर, चित्रे सुरक्षित ठेवली गेली होती. त्यामुळे त्या घराच्या स्मारकाला काहीसा जिवंतपणा आल्यासारखे वाटते.

या शहराच्या आसपास सुरेख वनराजी आहे. उंच, हिरव्या पानांची फुललेली ही जंगले पाहिली म्हणजे काश्मीरमध्ये आल्यासारखे वाटते.

सकाळी थोडा वेळ आराम केला. दुपारी १२॥ वाजता एअर-पोर्ट हॉटेलवर गेलो. जर्मनीच्या विदेश-मंत्र्यांनी, श्री. गेनचर ( Hans Dietrich Genscher ) यांनी दुपारचे जेवण तेथे दिले. ते मुद्दामहून एक तासाचा हेलिकॉप्टरचा प्रवास करून आले होते. त्यांची खरी इच्छा मी दक्षिण जर्मनीमध्ये, ते सुट्टीसाठी जेथे राहिले होते तेथे जावे अशी होती.

परंतु विमानप्रवास अधिक वाढविण्याची माझी इच्छा नव्हती. अजूनही मला जवळजवळ २० तास प्रवास करावयाचा आहे हे जाणून तेच येथे आले.

श्री. गेनचर यांची माझी ही पहिली भेट. मध्यम वयाचे (४०-५०) राजकारणी आहेत. लिमाचे वाटेवर मी आहे हे जाणून महत्त्वाच्या आर्थिक व राजकीय प्रश्नांवर विचारांची देवाण-घेवाण करणे हा उद्देश होता.

एका स्वतंत्र जागेत एकांतात १०-१२ लोकांचे आमचे हे बिझिनेस लंच २॥ तास चालले. प्रगत व संपन्न देश असला तरी आर्थिक प्रश्नांच्या अडचणींचा पाढा वाचत होते.

त्यांच्या व आमच्या प्रश्नांचे स्वरूप वेगळे आहे. हेलेसिंकी येथे झालेल्या परिषदेचे महत्त्व, त्यांतून निर्माण झालेल्या आशा-शंका यांचाही उल्लेख आला.

मी आपले उपखंड आणि बांगला देश येथील परिस्थितीची रूपरेखा सांगितली. बांगलादेशमधील नवीन परिस्थितीबाबत निश्चित मत आज देणे अवघड आहे, परंतु आमच्या धोरणाची दिशा सहकार्याची राहील असेही मी सांगितले.

'इमर्जन्सी व प्री–सेन्सारशिप 'ची चर्चा अपरिहार्यपणे आली. जर्मन सरकारने समजुतीची भूमिका घेतली आहे. परंतु येथील प्रेस फार विरोधी आहे. श्री. गेनचर म्हणाले, Press is a super power in our country. काहीसे विनोदाने असेल पण त्यात सत्यताही दिसली. मी इमर्जन्सी आणि आर्थिक कार्यक्रमाची थोडक्यात कारणमीमांसा दिली.

जागतिक आर्थिक प्रश्नांवर विरोधापेक्षा सहकार्यानेच संवाद चालू ठेवला पाहिजे व मार्ग काढला पाहिजे याबाबतीत त्यांचे सरकार व आमचे सरकार यांचे सामान्यपणे एकमत आहे.

मध्यपूर्वेबाबत लिमा परिषदेने एकांतिक भूमिका घेऊ नये अशी सल्लामसलत त्यांनी दिली. मी या बाबतीत आमची भूमिका सांगितली. इस्रायली आग्रही व हट्टाची भूमिका सोडीत नाहीत. अरब राष्ट्रावर अन्याय झालेला आहे. आम्ही त्यांचा पाठपुरावा करण्याची नीति स्वीकारली आहे हे स्पष्ट केले.

सहज विश्रांतिसाठी राहण्याचे ठरविले. परंतु नाही म्हटले तरी एक दिवसाची तशी ऑफिशियल व्हिजिट झाली म्हटले तरी चालेल.

आज सकाळी सहा पूर्वीच जागा झालो. ताजेतवाने वाटले. पुढच्या प्रवासाला आत्मविश्वासाने तयार झालो आहे.

George Kennen चे Memoirs चा दुसरा खंड वाचनासाठी बरोबर घेतला आहे. विदेशनीतीसंबंधी त्याचे लेखन, चिंतन प्रसिद्ध आहे. त्याचे हे आत्मचरित्रात्मक लेखन तर फारच प्रसन्न आहे. हा सर्व प्रवास त्यांच्या संगतीतच जाणार याचा मला आनंद आहे.

*

## ५९ लिमा ( पेरू )

२९ ऑगस्ट, १९७५

आजचा दिवस पेरूच्या इतिहासात बदलाचा निघाला. अर्थात हा बदल बरा की नाही हे काळ ठरवील. आमच्या दृष्टीने काहीसा विस्मयाचा आणि अपेक्षाभंगाचा असा हा दिवस उगवला म्हटले तरी चालेल. माझ्या दृष्टीने या महिन्यातील आश्चर्याचे दिवस अजून संपलेले नाहीत असे वाटले.

येथे आज अचानक व अनपेक्षित राज्यक्रांति झाली. ' कूप ' होतो असे वाचतो, ऐकतो परंतु जेथे होतो तेथे काय होते वा काय घडते ते आज अनुभवले. मात्र सुदैवाने यात कोठे रक्तपात झाला नाही.

आज सकाळी लवकर उठावे लागले. कारण भूतानचे विदेशमंत्रि ८ वाजता येणार होते. तसे ते आले. तास-दीडतास होते. त्यांनी आज फारच मोकळे बोलून मनाला चिंता वाटेल असे प्रश्न उपस्थित केले.

त्यांच्या म्हणण्याचा आशय असा की, भारत-भूतान मैत्री आहे पण ती भारताच्या बाजूने एकांगी आहे. भूतानच्या दृष्टीने काही प्रश्न महत्त्वाचे आहेत, त्यांची स्पष्ट चर्चाच होत नाही. आणि त्यामुळे lack of communication आहे असे त्यांना वाटते.

या गृहस्थाविषयी माझी जी शंका आहे ती खरी ठरत आहे. हा काही ना काही प्रश्न उपस्थित करून या दोन देशांच्या संबंधात काही अडचण निर्माण करील असे मला सतत वाटत आहे.

भूतानमध्ये एक नवी संशयाची व काहीशी भारतविरोधी भावना मूळ धरू पहात आहे. त्याला खतपाणी घालण्याचा यांचा उद्योग आहे. हा एक गटच आहे. परत गेल्यानंतर, भूतान राजे येणार आहेत त्यावेळी हे सर्व बोलून घेतले पाहिजे. योग्य वेळीच शंका निरसन झाले नाही आणि या लोकांचे धंदे उघडे केले नाहीत तर ही एक मोठी डोकेदुखी ठरणार आहे.

सभागृहात ९॥ वाजता ब्यूरोची मीटिंग म्हणून आलो. या Non-alligned मीटिंग्जमध्ये कोणतीही बैठक ठरलेल्या वेळी होत नाही. मीटिंग १०॥ वाजता सुरू झाली.

अंगोलाच्या परस्परविरोधी वाढणाऱ्या दोन्ही मूव्हमेंटस् आहेत. MPLA आणि FLNA यांची यादवी स्वातंत्र्याच्या आड येईल असे दिसते. बोलावयाचे असेल तर दोघांनी नाहीतर कोणीच नाही असा निर्णय आम्ही घेतला. सभेचे चेअरमन – लिमाचे विदेशमंत्रि – त्यांनी वाटाघाटी करून हे सर्व ठरवावे असा निर्णय झाला.

हे सर्व होईतो ११-११। झाले. नंतर फ्लेनरीमध्ये राहिलेली स्टेटमेंट्स् होणार होती. अल्जेअर्सचे स्टेटमेंट महत्त्वाचे होईल या कल्पनेने मी पहिल्यापासून हजर राहिलो. त्यांचे स्टेटमेंट होईतो १२ वाजले. नंतर

दुसरे प्रतिनिधी बोलावयाला आले. श्री. रिखी जयपाल माझे साथीला होते.

१२। चे सुमारास कॉन्फरन्स हॉल संदेशवाहनाचे काम करणारी एक मुलगी धावतच माझेकडे आली व हातात एक कागद दिला. त्याचे उत्तर मागितले आहे असे म्हणू लागली.

कागद उघडून पाहिला तर फ्रेंच प्रेस सर्व्हिसच्या प्रतिनिधीने कळविले होते की आत्ताच लिमामध्ये coup d'etat झाला आहे. तुमची प्रतिक्रिया काय आहे वगैरे.

चिठ्ठी वाचून सर्व अवाक् झाले. दोन-तीन मिनिटांत सर्व प्रतिनिधींना कळले. मला पाठविलेल्या चिठ्ठीत* लिहिले होते–

Mr. Chavan,

We have just been informed that there is a coup d'etat here in Lima. We would like to know –

1) Whether there is any reaction among ministers here,

2) Whether you and your colligues are likely to stay on or not.

No comments* Thank you,
29-8-75

मी जेव्हा ही चिठ्ठी वाचली त्याचवेळी कोणी प्रमुख अधिकारी, चेअरमन, लिमाचे विदेशमंत्रि यांच्या कानाशी लागले आणि ते चटकन उठून निघून गेले.

युगोस्लाव्हियाचे श्री. मिलिच आणि आम्ही चार-पाच एकत्र जमलो व परिषदेचे कार्य आपण काही बदल न करता शांतपणे चालू ठेवले पाहिजे असे ठरविले. तसे ते चालू राहिलेही.

पण प्रतिनिधींमध्ये गटागटाने चर्चा सुरू झाल्या. काय नेमके झाले आहे आणि ते कसे झाले आहे, सरकारच्या धोरणात बदल होणार का ? ही महत्त्वाची परिषद सुरू असताना मुद्दाम नेमकी ही वेळ राज्यक्रांती-साठी निवडली याचा अर्थ काय ? विदेशमंत्र्यांचे भवितव्य काय ? पेरू

* चिठ्ठीतील मजकूर प्रेस प्रतिनिधीचा असून त्यावर 'No Comments' असे यशवंतरावांनी लिहिले आहे.

सरकारने Non alligned धोरणाचा त्याग केला तर परिषदेचे काय वगैरे स्वाभाविक प्रश्न मनात येऊन गेले.

परंतु हे सर्व शांतपणे व विदेशमंत्र्यांच्या परिषदेला शोभेल अशा Dignity ने चालले होते. कोठेही सभागृहात धावपळ, गडबड नव्हती. गंभीर चेहरे, जणू काही झालेलेच नाही या आविर्भावाने सभेचे काम चालू राहिले.

१।। वाजता मला ऑस्ट्रिलिट मंत्र्यांच्या लंचला हॉटेलमध्ये यावयाचे होते म्हणून परतलो.

लंचच्या वेळी स्वाभाविकपणे याच चर्चा चालू होत्या. ( हळूहळू बातम्या येत होत्या.) परंतु शहरातील सर्व व्यवहार शांतपणे चालू होते. जणू काही घडलेलेच नाही !

लिमामध्ये प्रतिनिधित्व करणारे वेस्टर्न गव्हर्नमेंटचे काही राजदूत हजर होते. त्यांच्या बोलण्यावरून हे स्पष्ट झाले की नवा बदल 'उजवा' आहे. किती उजवा आहे, हे सांगणे अवघड आहे. प्राईम मिनिस्टरने कमांडर ऑफ चीफ आणि वॉर मिनिस्टर आहे त्यांनी हे घडविले आहे. ते अजून लिमाचे बाहेर आहेत.

पेरूच्या विदेशमंत्रालयामधील एक उच्चपदस्थ जेवणासाठी निमंत्रित होते. ते वेळेबरहुकूम आल्यानंतर या चर्चा आम्ही बंद ठेवल्या व इतर गप्पा-गोष्टी सुरू झाल्या.

जेवण संपत आले असताना त्यांना हॉटेल-नोकराने कानाशी निरोप सांगितला. त्यांनी होस्टची क्षमा मागितली आणि National duty is first, I must go. म्हणून ते घाईघाईने निघून गेले.

आम्हाला निरोप सांगितला गेला की जेवण लवकर संपवून हॉटेलमध्येच थांबावे. रस्त्यावर काही गडबड होण्याची शक्यता आहे. मी माझ्या खोलीत जाऊन पडून राहिलो. दुपारच्या झोपेची नाही म्हटले तरी आवश्यकता होतीच.

चारला उठलो. चहा मागविला. वेटरला विचारले की, तुला काय वाटते याबद्दल. तो निर्विकारपणे म्हणाला, ' सर्व सारखेच, त्यात काय वाटायचे. '

सामान्य माणसाची ही प्रतिक्रिया. राज्यक्रांति म्हणजे उच्च पदस्थांनी जबरदस्तीने केलेले सत्तांतर. यात जनतेचा काही भाग नाही. त्यांच्या भावनांना स्पर्श नाही. त्यांना काही माहितीच नाही. पण हे सत्तांतर त्यांच्या भविष्यावर – जीवनावर परिणाम तर करणारच असा विचार करीत मी चार वाजता सभा असणार या कल्पनेने सभागृहाकडे गेलो.

वातावरण काहीसे वेगळे वाटले. जाताना वाटेत नेहमीची वाहातुक व लोकांची ये-जा चालू होती. पण एक गोष्ट लक्षात आली की, किंमती सामानाच्या स्टोअर्सची दारे (शटर्स) बंद होती. रस्त्यावर लष्करी पोलिस नेहमीपेक्षा अधिक होते.

सभागृहामध्येही नव्या चेहेऱ्यांची, लष्करी अधिकाऱ्यांची उपस्थिति अधिक भासली. त्यांच्या वागण्यात मात्र नम्रता होती. तेथे गेल्यानंतर समजले की सभा सहाला सुरू होणार आहे. म्हणून परत हॉटेलकडे परतलो. जॉर्ज केननचे मेमॉयर्स वाचत बसलो.

सहा वाजता परत गेलो. १५-२० मिनिटांनी सकाळी अचानक गुप्त झालेले विदेशमंत्रि हसतमुखाने आले व सभेचे काम सुरू केले.

त्यांनी फक्त Heads of delegation नी हजर रहावे अशी विनंति केली. त्यांनी थोडक्यात सांगितले की, " नव्या प्रेसिडेंटनी सत्ता धारण केली आहे. ' कू ' वगैरे काही नाही. हा परदेशी वृत्तसंस्थांचा खोडसाळ प्रचार (?) आहे. जुने प्रेसिडेंट आमच्या रेव्होल्यूशनरी चळवळीचे आदरणीय पुढारी राहतील. नव्या प्रेसिडेंटशी मी टेलिफोनवर बोललो आहे. Non-alligned च्या धोरणात बदल नाही असे तुम्हा सर्वांना सांगण्याचा आदेश दिला आहे. कदाचित उद्या ते परिषदेत येऊन भाषणही करतील." हे सांगून त्यांनी परिषदेचे काम तहकूब केले.

कारण सर्वांची भाषणे संपली होती. ठरावांचे कागदपत्र तयार नव्हते. दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता परिषद ठरली.

मी त्यांच्याशी बोलत ऑफिसमध्ये गेलो. अधिक तपशील विचारला. त्यांना जे माहिती होते व सांगणे शक्य होते ते त्यांनी सांगितले.

"प्राईम मिनिस्टर हे या परिषदेच्या दिवसांत लिमामध्ये नव्हतेच. He was going up and down the country. आज सकाळी, त्यांच्या आर्मीचे पाच कमांड्स् आहेत. त्या सर्वांनी प्राईम मिनिस्टरचे नेतृत्वाखाली अध्यक्षांना राजिनाम्याची मागणी केली. आम्ही सर्व मंत्रि अध्यक्षांकडे जमलो होतो. तीन तास चर्चा झाली. त्यांनी सत्तांतरास मान्यता दिलेलीच होती. आम्हा सर्वांना नव्या अध्यक्षांना सहकार्य द्या असे त्यांनी सांगितले" वगैरे.

मी त्यांना विचारले की, धोरणात बदल नाही, हे सर्व ठीक आहे पण बाहेर देशांचे इतके महत्त्वाचे लोक परिषदेला म्हणून तेथे असताना ही वेळ सत्तांतरासाठी का निवडली ? त्यानी, 'Honestly I don't know' म्हणून सांगितले.

हा सर्व विषय मी येथेच सोडला आणि परत हॉटेलमध्ये गेलो. डोळयापुढे जुन्या प्रेसिडेंटची मूर्ति येत होती. मी कालच त्यांना भेटलो होतो. काल सर्वाधिकारी प्रेसिडेंट होते. आज ते कोणीच नाहीत. नशीब की ते जिवंत आहेत. सत्ते ! तुझा खेळ अजब आहे ! आणखी दुसरे काय म्हणावयाचे !

*

## ६० लिमा ( पेरू )

२९ ऑगस्ट, १९७५

सकाळी ९ वाजता परिषदेचे काम सुरू झाले. ठराव संपले. पाहुण्यांच्यातर्फे यजमानांचे आभार मी मानावे, असे सर्वांनी एकमताने ठरविले होते.

परिषद सुरळीतपणे पार पडली होती. मी मनःपूर्वक लिमा सरकारचे व विदेशमंत्र्यांचे आभार मानले. या गृहस्थांनी अत्यंत जबाबदारीने,

समजुतीने व सत्तांतराच्या गडबडीतही शांत राहून सभेचे काम समतोलपणाने पार पाडले होते. संपूर्ण सभागृहाने मन:पूर्वक टाळचांच्या गजरात ovation दिले.

१२ वाजता नवे अध्यक्ष इतमामाने आले. उंच रुबाबदार व्यक्तिमत्व आहे. १०–१५ मिनिटांचे भाषण केले. Non alligned ला पाठिंबा दिला. परंतु त्यांत जिवंतपणा नव्हता. उजव्या धोरणाची चिन्हे भाषणात स्पष्ट होती. अमेरिकेच्या जवळ जाण्याचे धोरण उघड वाटले. सहकाराचे वातावरण निर्माण करण्याचा उपदेश देते झाले.

आम्ही सभागृहातूनच विमानतळाकडे निघालो. परिषद संपेपर्यंत कोणतीच विमाने सरकारी आदेशाने जाऊ दिली नव्हती. त्यामुळे बोगोटाला जाणारे एअर-फ्रान्सचे विमान आमची वाट पहात तिष्ठत उभे होते.

सरळ विमानात चढलो. मनात चिंता होती की, पेरूचे आमचे यजमान मित्र – विदेशमंत्रि आपल्या स्थानावर किती दिवस राहतील आणि कोणकोणते बदल वाढून ठेवले आहेत.

आठ दिवसांनंतर हा देश सोडतो आहे. बोगोटोच्या वाटेवर प्रवासात हे लिहीत आहे.

पुन्हा केव्हा या देशात येता आले तर पहाण्यासारखे सर्व राहून गेले आहे ते पहाता येईल. पण त्या वेळी या देशाचे चित्र कसे असेल असा विचार मनात येऊन गेला.

## ६१ बोगोटा (Bogota)

(हिल्टन कोलंबिया)

३० ऑगस्ट, १९७५

दुपारी २ वाजता लिमाहून निघालो. ५॥ वाजता येथे पोहोचलो. बोगोटाची भेट अचानकच ठरली. आजची रात्र येथे राहून उद्या न्यूयॉर्कला जाईन.

८००० फुटांवरील ३० लाख वस्तीचे हे शहर या देशाची राजधानी आहे. विमान उतरत असतानाच मला काश्मीरची आठवण झाली. या उंचीवर एवढे निसर्गसुंदर मैदान-पठार ही एक विलक्षण गोष्ट आहे.

शहराच्या काहीसे पश्चिमेला एअर-पोर्ट आहे. तिथून निघून शहराकडे येऊ लागलो तेव्हा मावळतीचे कोवळे किरण या डोंगराच्या उतरणीवरून खाली विस्तृत होत असलेल्या शहरावर पडल्यामुळे मला तरी क्षणभर स्वप्नसुंदर शहर पाहतो आहे असे वाटले. प्रथमदर्शनी असा परिणाम क्वचितच होतो.

स्वच्छ हवा ( without any polution ) ही मोठ्या शहरातील दुर्मिळ गोष्ट येथे विपुल आहे.

वेळ थोडा आणि कामे बरीच आहेत. हॉटेलमध्ये सामान ठेवून, कपडे बदलून प्रेसिडेंट लोपेझ यांना भेटावयास त्यांच्या पॅलेसवर गेलो.

या देशात लोकशाही आहे. अध्यक्ष जनतेकडून निवडला जातो. तो आपले मंत्रिमंडळ बनवितो. पार्लमेंट ४ वर्षांसाठी निवडले जाते. प्रमुख दोन पक्ष आहेत. त्या दोन्ही पक्षांचे प्रतिनिधि मंत्रिमंडळात आहेत. मंत्रि पार्लमेंटचा मेंबर असलाच पाहिजे हे बंधन नाही. Inflation २० टक्के. Balance of payment चा प्रश्न अजून नाही. oil चे बाबतीत स्वयंपूर्ण आहेत.

प्रेसिडेंटची भेट चांगली झाली. लिमाची परिषद कशी झाली विचारीत होते. आर्थिक ठराव चांगला झाला हे त्यांनी कबूल केले.

परंतु Non alligned चळवळ अमेरिकाविरोधी होत चालली आहे असा तक्रारवजा सूर त्यांनी काढला. स्वतंत्र तिसरा गट, हे त्याचे स्वरूप बदलत चालले आहे असे त्यांना वाटते.

मी माझे मत सांगितले की, तसे नाही. वेगवेगळ्या राज्यपद्धति व विचारधारा असलेले सर्व खंडांतील देश याचे सभासद आहेत. तेव्हा काही मतभेद व आग्रह अधून मधून व्यक्त होतात हे खरे. परंतु स्वतंत्र विदेशी नीति ठेवणारे (Developing) विकासमान देश याचे सभासद आहेत. व त्या अर्थाने ती स्वतंत्र चळवळ आहे. तिच्यामध्ये शक्ती आहे व तिला भविष्य आहे. विषय तिथेच सुटला.

आर्थिक प्रश्नावर मात्र ते अमेरिकेच्या धोरणावर टीका करीत होते. व्यापारी सवलती देत नाहीत, प्रभुत्व ठेवण्याचा प्रयत्न करतात वगैरे.

मी विचारले, यासाठी तुम्ही काय उपाययोजना करीत आहात. तेव्हा फारसे समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. उघड अमेरिका-विरोधी दिसू नये पण ( अमेरिकेची धोरणे पसंत नाहीत असे काहीसे विसंगत– ) विरोधी बोलणे वाटले.

हिंदुस्थानबद्दल फार आपुलकीने बोलले. सहकार्य – राजकीय व आर्थिक, वाढविण्यासंबंधीही चर्चा केली. मनुष्य मुरलेला, शहाणा राज-कारणी वाटला. बोलण्यात, वागण्यात अनौपचारिक मोकळेपणा होता. लॅटिन अमेरिकन प्रेसिडेंटचा लिमामधील एक नमुना पाहून आलो होतो. तेव्हा माझ्या मनात असे तसे काही विचार येऊन गेले.

काही म्हणजे तीन आठवड्यांपूर्वीच या प्रेसिडेंटनी Chief of Army Staff ला नोकरीतून एका मध्यरात्री तडकाफडकी हाकून दिल्याची आठवण माझ्या मनात ताजी होती. डेव्हलपिंग देशांतील फौजी लोक लोकशाहीला धोका देण्याचा संभव हल्ली फार वाढला आहे. लॅटिन अमेरिकेची तर ही जुनी परंपराच आहे. १९५० ते ६० दरम्यानच्या दशकांत ४ वर्षे हा प्रकार या देशातही झाला होता.

रात्री मदनजीत सिंह (राजदूत) यांच्या घरी रात्रीचे भोजन झाले. मंत्रिमंडळांतील तीन प्रमुख मंत्रि आले होते. विदेशमंत्रि बाहेर गेलेले होते. त्यामुळे ते आले नव्हते. तरुण व तज्ज्ञ अर्थमंत्रि भेटले.

गेल्या वर्षी आय. एम्. एफ्. च्या बैठकीत ओळख झाली होती. आज बराच वेळ त्यांच्याशी बोलता आले.

मदनजीत पति-पत्नी आनंदात होते. त्यांचा एक हुषार मुलगा आहे. हे सर्वजण मला मेक्सिकोत भेटले होते. मदनजीत चित्रकला, शिल्पकला यांचा व्यासंगी तज्ज्ञ आहे. हिमालयीन आर्टस् व अजंठा यावरील त्यांची पुस्तके जगप्रसिद्ध आहेत. जेवण्याच्या वेळी त्याने एक सुरेख भाषण केले.

A lovely Evening ! आसमंतात विजेच्या दिव्यांनी चमचमणारी व इतस्ततः पसरलेली ही विस्तृत नगरी एका उंच ठिकाणी जाऊन डोळे भरून पुन्हा एकदा पाहिली व हिल्टनच्या विस्तृत व सुखद खोलीकडे परतलो.

पुढचे न्यूयॉर्कमधून लिहीन.

※

## ६२ न्यूयॉर्क

३१ ऑगस्ट, १९७५

बोगोटा येथून लिहिले त्यात म्हटले होते की, दुसऱ्या दिवशी सकाळी निघेन पण सकाळचे विमान निघालेच नाही. सकाळी १० चे ऐवजी ते संध्याकाळी ६॥ वाजता निघाले. त्यामुळे अधिक आठ तास मिळाले.

आम्ही आमचे हॉटेल सोडले होते. त्यामुळे राजदूत श्री. मदनजीत यांच्या घरी गेलो.

गोल्ड म्युझियम ही इथली पाहाण्यासारखी प्रसिद्ध गोष्ट. तेथे तासभर काढला. कोलंबिया, पेरू हे देश सोन्याच्या खाणीसाठी प्रसिद्ध. येथील प्राचीन संस्कृति-काळातहि सोन्याचे महत्त्व व उपयोग सर्वमान्य होता. स्पॅनिश नेत्यांनी पुष्कळ लुटालूट करूनही काही अवशेष जे त्यांच्या नजरेतून सुटले ते याचा पुरावा देतात.

हे अवशेष या म्युझियममध्ये आहेत. स्त्रियांच्या अनेकविध दागिन्यांचे नमुने पहावयास मिळतात. त्यांत स्त्री-सौंदर्याचा सन्मान करण्यापेक्षा त्यांच्या गुलामगिरीचे अधिक दर्शन होते. निदान मला तरी तसे वाटले.

नमुन्यासाठी एक उल्लेख करतो. ओठांना छिद्रे करून सोन्याचा जाडजूड दागिना त्यांत कायमचा बसवतात असे सांगितले. त्या दागिन्याचा नमुना दाखविला. सोन्याने तोंड बंद करण्याची ही पुरुषी हुषारी कशी काय वाटते?

३१ ऑगस्टला रात्री १ वाजता न्यूयॉर्कला पोहोचलो. कार्लाईल हॉटेलमध्ये येऊन झोपण्यासाठी २ वाजले.

दुसऱ्या दिवशी १ सप्टेंबरला स्पेशल सेशन सुरू होणार होते व २ सप्टेंबरला माझे भाषण होते. त्यामुळे १ सप्टेंबर, या सर्व तयारीत चर्चा- गाठी-भेटी यांत गेला.

येथील आपले P. R. श्री. रिखी जयपाल हे अत्यंत बुद्धिमान पण निगर्वी व मनमिळावू असे गृहस्थ आहेत. फॉरिन सर्व्हिसेस्मधील काही तरुण अधिकारी या परिषदांच्या निमित्ताने माझ्या संपर्कात आले.

कोणालाही अभिमान वाटावा असे हे तरुण आहेत. त्यांचा व्यासंग चर्चेतील कुशलता, परिश्रमांची तयारी, लेखनातील चापल्य अत्यंत उपयोगी पडले.

श्री. साद हाशमी कृष्णन (gusn) मिस् घोष हे विशेष महत्त्वाचे वाटले One must watch their future. श्री. शरद काळे हे या लोकांत चांगलेच मिसळले आहेत. त्यांचीही मदत झाली.

१ सप्टेंबरला मध्यरात्रीनंतर अखेरचा ड्राफ्ट तयार झाला. सकाळी उठल्यानंतर एक महत्त्वाचा मुद्दा जो चर्चेत निघाला होता तो नजरचुकीने राहून गेला होता. त्यासाठी धावपळ करून एक नवा परिच्छेद तयार केला. २ सप्टेंबरला १२-४५ ला या इतिहासप्रसिद्ध अधिवेशनात माझे पहिले भाषण झाले.

आपले म्हणणे स्पष्ट पण समजूतदार शब्दांत मांडले होते. त्यामुळे सर्वांनी येऊन अभिनंदन केले. त्यांत अमेरिका, जर्मनी होते. त्याचप्रमाणे

अल्जिरिया आणि इतर डेव्हलपिंग देशही होते.

पहिल्या दिवशी यू. एस्. ए. चे मार्फत डॉ. किसिंजरचे भाषण, त्यांचे प्रतिनिधी श्री. मोनिहान यांनी वाचले. त्यांच्या धोरणात इष्ट तो बदल दिसतो. त्यांनी परिषदेपुढे असलेल्या सर्व प्रश्नांवर आपली अधिकृत धोरणे तपशीलवार मांडली व सहकार्यांची भूमिका घेतली.

सामान्यपणे या भाषणाचे प्राथमिक स्वागत झाले. Opec देश – तेलवाले – आपली प्रतिक्रिया काय देत आहेत ते पहावयाचे आहे.

हे सर्व सांगितल्यावर सुद्धा हे नमूद केले पाहिजे की, यू. एस्. ए. च्या विधायक वाटणाऱ्या सूचनांतील पेच सावधानपणे तपासावे लागतील. त्यात त्यांची काही Reservations and conditions आहेत. विशेषतः त्यांचा खरा भर Tran-snational corporation आणि खाजगी भांडवल (Private capital) यावर आहे. त्यांच्या मताने These are the effective organs of development. तत्त्वतः ही भूमिका आम्हाला मान्य नाही. ही गोष्ट माझ्या भाषणात यू. एस्. ए. चा उल्लेख न करता स्पष्ट केली आहे.

काल चीनचे भाषण झाले. त्यांच्या परराष्ट्रनीतीचे सर्व डावपेच त्या भाषणात आहेत. अमेरिका व रशिया यांच्यावर टीका आहे परंतु यू. एस्. एस्. आर. वर अत्यंत कडवा हल्ला आहे.

काल संध्याकाळी Equus हे ब्राडवेवर हल्ली प्रसिद्ध असलेले नाटक पाहिले. नवीन तऱ्हेचा अत्यंत गंभीर विषय – पण सूक्ष्मपणे व कुशलतेने दाखविला आहे. रंगमंचावर देखावे नव्हते. साधी रचना होती. नाटकाचे यश कलाकारांच्या वैयक्तिक कौशल्यावर व टीम-वर्कवर आधारलेले आहे.

नाटकानंतर Gay Lord या भारतीय रेस्टॉरॉंमध्ये तंदुरी बिर्याणीची चव घेतली. त्यामुळे एकंदर संध्याकाळ एकदम खूष गेली.

आता यू. एस्. एस्. आर. चे भाषण झाले. अपेक्षेप्रमाणे चीनवर त्यांनी जोरदार हल्ला केला. त्यांच्या टीकेला साधार उत्तरे दिली. विकसनशील देशांच्या प्रगतिसाठी केलेल्या प्रयत्नांचा तपशील दिला.

मेंढराचे कातडे पांघरून त्यांच्या कळपात शिरलेल्या लांडग्याचे उदाहरण देऊन चीन डेव्हलपिंग देशांच्या कळपात, त्यांच्यापैकी एक

म्हणून शिरला आहे अशी धोक्याची सूचना नाव न घेता दिली.

यू. एन्. मधील या दोन शेजाऱ्यांचे हे सख्त संभाषण त्यांच्या हल्लीच्या संघर्षाचे वास्तव दर्शन आहे.

गेल्या दोन-तीन दिवसांत अनेकांना भेटणे, आणि महत्त्वाची भाषणे ऐकणे यामुळे मला येथे काल संध्याकाळचे नाटक सोडून फारसे फिरता आले नाही. पहाताही आले नाही. उरलेल्या दोन-तीन दिवसांत काही करता आले तर पहाणार आहे.

श्री. शरद उपासनींचा सकाळी वॉशिंग्टनहून फोन आला होता. ५ ला ते येथे येतील असे दिसते.

प्रकृति उत्तम. येथील व्यवस्थाही मला पसंत आहे.

*

## ६३ न्यूयॉर्क ते जिनेव्हा

६ सप्टेंबर, १९७५

मी आता संध्याकाळी ७ वाजता न्यूयॉर्क सोडून निघालो आहे. दिल्लीच्या वाटेवर जिनिव्हामध्ये थांबेन व ९ तारखेला दिल्लीस पोहोचेन. १६-१७ दिवस घराबाहेर आहे. घरची ओढ सारखी आहे.

गेला आठवडा न्यूयॉर्कमध्ये काढला. यापूर्वी मी अमेरिकेस अनेक-वेळा आलो. परंतु काही तास किंवा एकवेळ एक रात्र एवढाच मुक्काम येथे यापूर्वी करता आला. पण संपूर्ण आठवडा सलगपणे या शहरात प्रथमच मिळाला.

यू. एन्. चा पहिला अनुभव. पण या एका आठवड्यातील अनुभवाने मी यात बरेच दिवस रुळल्यासारखे आता वाटू लागले.

इथले वातावरण इतर आंतरराष्ट्रीय परिषदांपेक्षा वेगळे आहे. यू. एन्. मध्ये सगळे जग हजर असते.

मी जागतिक बँक व आय्. एम्. एफ्. बैठका आणि कमिटी मीटिंग्जना पाच वर्षांत अनेक वेळा आलो होतो. परंतु त्यांत सगळे जग नव्हते. जागतिक बँक हे नाव खरे – परंतु सोशॅलिस्ट जग ( चीनसह ) त्यात समाविष्ट नाही. त्यामुळे ते अपुरे जग होते.

यू. एन्. बैठकात सर्व जगातील स्वतंत्र देशचे १३८ सभासद आहेत. या वर्षी आणखीन चार-सहा तरी अधिक सामील होतील. येथील वातावरण वेगळे – धीमेपणाचे – समजून घेण्याचे दिसले.

मी गेल्या आठवड्यात अनेक देशांच्या प्रतिनिधींना भेटलो. तपशीलवार चर्चा केल्या. काहींना जेवणा-खान्याच्या निमित्ताने भेटून ओळखीचा श्रीगणेशा केला.

तपशीलवार चर्चा मुख्यतः या स्पेशल सेशनचे अध्यक्ष श्री. बुरीप्लिका – विदेशमंत्रि अल्जेरिया – यांचेशी केली. हे एक तरुण, बुद्धिमान चलाख व्यक्तिमत्व आहे. त्यांनी नॉन-अलाइड व यू. एन्. या दोन्ही क्षेत्रांत आपल्या व्यक्तित्वाची छाप टाकली आहे.

यांची माझी तशी भेट हॅवाना आणि लिमा येथे झाली होती. परंतु गोष्टी झाल्या नव्हत्या. लिमा येथे भेटून न्यूयॉर्कमध्ये निवांत भेटू असे ठरले होते. तसे येथे भेटलो.

५० मिनिटे चर्चा झाल्या. या स्पेशल सेशनबाबत ते आशावादी दिसले. गेल्या स्पेशल सेशन बोलावण्या पाठीमागेही त्यांच्या देशाचा प्रमुख हात होता. परंतु त्या वेळी मतभेद आणि विरोधी भावनांचे – संघर्षाचे वातावरण होते.

दरम्यानच्या काळात अनेक चर्चा – परिषदा होऊन एकमेकांना समजण्याचे वातावरण निर्माण झाल्याचा पुरावा या परिषदेत मिळाला. प्रगत व अप्रगत देश एकमेकांवर किती अवलंबून आहेत याची प्रचिती प्रगत देशांनाही आली आहे अशी आशा या निमित्ताने निर्माण झाली आहे.

परंतु एकदम फार अपेक्षा करणे चुकीचे ठरेल. दृष्टिकोनात काही मूलभूत फरक आहेत. सिस्टिम्स वेगळ्या आहेत. त्याचे काही परिणाम

राहणारच. परंतु चर्चांना सुरुवात झाली आहे हे काही कमी महत्त्वाचे नाही असे त्यांचे मत आहे. मी त्यांच्याशी सहमत आहे.

सिक्युरिटी कौन्सिलच्या निवडणुकीच्या निमित्ताने पाकिस्तानचा प्रश्न निघाला. हिंदुस्थान व पाकिस्तानचे प्रश्न सोपे व्हावेत अशी त्यांची इच्छा. हिंदुस्थानने पुढाकार घेऊन पाकिस्तानला काही कन्सेशन द्यावे असे त्यांना वाटते.

हिंदुस्थान व पाकिस्तान यांचेमध्ये स्पर्धेचे ( काँपिटिशन ) व संघर्षाचे वातावरण निर्माण झाले की ते सर्वजण ( Arabs ) अडचणीत येतात असे ते म्हणाले. पाकिस्तानने नॉन-अलाइन्ड परिषदेत सामील व्हावे व हिंदुस्थानने निदान आब्झर्वर म्हणून इस्लामिक कॉन्फरन्समध्ये सामील व्हावे असे त्यांना वाटते.

रबार कॉन्फरन्सचे वेळी याह्याखानने अगदीच वेडेपणाची भूमिका घेतली, हे त्याचे चुकले असे त्यांचे मत आहे. हिंदुस्थानमध्ये मोठ्या संख्येने मुसलमान आहेत हे ध्यानात ठेवले पाहिजे. चाळीसच्यावर असलेल्या इस्लामिक राष्ट्रांपासून दुरावा पत्करून राहणे हिंदुस्थानच्या दृष्टीने किती उपयुक्त आहे याचा विचार केला पाहिजे असे त्यांनी सुचविले.

हे सर्व प्रश्न विदेश-नीतीचे दृष्टीने महत्त्वाचे व गंभीर प्रश्न आहेत असे मला वाटते. बदलत्या जागतिक वातावरणात या सर्व प्रश्नांचा विचार करावा लागेल. उत्तरे सोपी नाहीत. पण प्रश्न उभे आहेत.

सिनाईबाबत इजिप्त व इस्राएल यांच्या कराराबाबत मी त्यांचे मत विचारले. तेव्हा ते फार सावध बोलले. अरब-युनिटी संकटात आहे असे त्यांना वाटते. सादत हे रशियाचे विरोधी बोलून राजकीय चूक करीत आहेत. यामुळे अरब-जगतात ग्रेट-पॉवर स्पर्धा सुरू होईल व त्यात अरबांचे नुकसान आहे असे ते बोलले.

विचारात सखोलता व दूरदृष्टि दिसली.

सोव्हिएट रशियाचे P. R. श्री. मलिक यांना मुद्दाम भेटलो. स्पेशल सेशनच्या आर्थिक सहकार्याच्या कार्यक्रमाकडे काहीशा तटस्थ वृत्तीने ते

पाहतात असे वाटले. डेव्हलपिंग देशांसाठी ते पुष्कळ करीत आहेत. परंतु यू. एन्. मधील कार्यक्रमामध्ये त्यांनी भागीदार झाले पाहिजे असे मी सुचवले.

या सेशनमध्ये चीन व रशिया यांनी एकमेकांची खूपच निंदा-नालस्ती केली. पश्चिमी राष्ट्रे ही सर्व मजा मोठ्या आनंदाने पहात होती.

चीनची भूमिका वैराची आहे. तिसरे युद्ध अपरिहार्य आहे. रशिया सत्तापिपासू राष्ट्र असून आपल्या साम्राज्य प्रस्थापनेचा प्रयत्न करीत आहे. त्यांच्यापासून अप्रगत देशांनी (थर्ड वर्ल्ड) सावध राहिले पाहिजे. इतरांच्या मदतीवर अवलंबून न राहता सेल्फ रिलायन्सचे तत्त्वाने आपली शक्ती वाढविली पाहिजे असा सल्ला चीनचा !

तर रशियाने, मेंढराचे कातडे पांघरून मेंढरांच्या कळपात शिर-णारा लांडगा असे चीनचे वर्णन केले ! चीनच्या धोरणाचे हे वर्णन समर्पक आहे असे मला वाटले. हे मी मलिकना म्हटले.

त्यांनी दोन गोष्टी प्रामुख्याने सांगितल्या. (१) जागतिक शांततेचा पाया घातल्याशिवाय आर्थिक प्रगति अशक्य आहे. शस्त्रास्त्र-स्पर्धेमध्ये तीन हजार कोटी डॉलर्स खर्च होत आहेत. त्यामध्ये १० टक्के जरी कपात केली तरी अविकसित राष्ट्रांना कितीतरी मदत करता येईल. पीस-प्रपोजल्सना प्राधान्य दिले पाहिजे असे त्यांचे मत. हा मुद्दा मी माझ्या भाषणात मांडला आहे असे मी त्यांच्या निदर्शनास आणले.

२) दुसरी गोष्ट त्यांनी सांगितली ती म्हणजे, रशियाला पूर्व व पश्चिम दोन्हींकडून, लष्करी वेढा पडला आहे. दक्षिणेकडून इराण, अरब राष्ट्रे (गल्फ प्रदेश) यांची शस्त्रास्त्र-वाढ. ही म्हणजे त्यांचे उदरच संकटात आणते आहे अशी मीमांसा मांडली. रशियाच्या आजच्या विचारावर – धोरणावर प्रभाव टाकणाऱ्या या गोष्टी आहेत यात शंका नाही.

यू. के. चे. विदेशमंत्रि भेटले. फार लहान मनुष्य वाटला. प्रिन्स चार्ल्सची भारत-भेट पुढे ढकलण्याचा निर्णय इमर्जन्सीमुळे, आम्ही घेत आहोत असे म्हणाले.

आमच्या अंतर्गत प्रश्नाबाबत त्यांनी असे काही मत व्यक्त करणे युक्त नाही. राजपुत्र आला किंवा न आला याचे आम्हाला काडीमात्र महत्त्व नाही. परंतु यू. के. चे हे धोरण युक्त नाही हे मी स्पष्ट केले. परंतु त्यांचा हा निर्णय दिसतो.

लेबर पार्टीचे नेतृत्व कद्रु मनाचे व अदूरदृष्टीचे आहे – निदान हिंदुस्थानबाबतीत – असे माझे पूर्वीपासूनचे मत आहे.

१९४५-४६ मध्ये ॲटली नसते तर इतिहासाची पावले कदाचित वेगळी पडली असती असे वाटू लागते. व्यक्ती-व्यक्तीचा फरक इतिहासाच्या दिशा बदलू शकतो हे काही प्रमाणात किंबहुना बऱ्याच प्रमाणात खरे आहे असे यामुळे मला वाटू लागले आहे.

या निमित्ताने, १९६४ साली मी इंग्लंडच्या भेटीस गेलो असताना सेव्हॉय हॉटेलमध्ये दिलेल्या रात्रीच्या भोजनाला ॲटली आपुलकीने व त्या वृद्धावस्थेत आल्याची आठवण कृतज्ञतापूर्वक झाली.

हा आठवडा कसा गेला ते समजले नाही. रिच इन् एक्स्पीरिअन्स ! खूप समजले व बरेच शिकलो.

न्यूयॉर्क, वॉशिंग्टनपेक्षा खूपच वेगळे शहर आहे. पुणे व मुंबईचा फरक येथे जाणवतो. (मला वाटते मी पूर्वी हे लिहिले आहे.) कुठल्याही महत्त्वाच्या शहरात गेल्यानंतर तेथील म्युझियम्स्, बुक-शॉप्स्, थिएटर्स व नदीकाठ पाहिल्याशिवाय ते शहर पाहिल्यासारखे वाटत नाही. या खेपेला वेळात वेळ काढून शॉपिंग सेंटर्स पाहून घेतले. तुझ्यासाठी स्वस्तातली, पण मला आवडलेली एक पर्स मी घेतली आहे. तुला आवडेल की नाही कोण जाणे ? श्री. शरद उपासनी एक दिवसासाठी वॉशिंग्टनहून मुद्दाम आले होते. खुषीत दिसले.

येथील P. R. श्री. जयपाल हे फार चांगले गृहस्थ आहेत. सर्वच तरुण अधिकारी बुद्धिमान व मोकळे वाटले. माझे हे आठ दिवस कामात व आनंदात गेले त्याचे श्रेय सर्वस्वी त्यांनाच आहे. शरद काळे व रमेश मुळे यांची फार मदत झाली.

मध्यरात्री, विमानाच्या प्रवासात हे लिहीत आहे. डोळ्यांत झोप आहे. विमान हलते आहे, बाहेर अंधार आहे. खाण्याचे उत्तम पदार्थ समोर आहेत अशा वातावरणात हे लिहीत आहे.

नाही म्हटले तरी देशात कशी परिस्थिती आहे व राहील याची जरूर चिंता आहे. निर्धास्त मनाने व विचारपूर्वक पावले टाकण्याचा निर्णय आहे. परिणामाची पर्वा नाही. फक्त प्रार्थना आहे की, देश सुखरूप राहावा. जनताजीवन सुखी व्हावे.

म. गांधींचा हिंदुस्थान त्यांना कृतज्ञ राहावा.

❋

६४ 

## जिनेव्हा

७ सप्टेंबर, १९७५

सकाळी ७ वाजता येथे पोहोचलो. ऱ्होन नदीच्या काठावरील ( Hotel Du Rhone Geneve ) या हॉटेलमध्ये येऊन उतरलो आहे.

श्री. ब्रजेश मित्र व अवतारसिंग, येथील यू. एन्. चे व स्वित्सर्लंडचे राजदूत आहेत, ते भेटले. नंतर श्री. राम प्रधान भेटले. बऱ्याच दिवसांच्या गोष्टी बोलून झाल्या.

दुपारी लंचच्या निमित्ताने बाहेर गेलो. गावात फेरफटका मारला. जुने शहर, जे पुराण्या तटबंदीच्या आत आहे ते पाहिले.

पूर्वी मी काही तासांसाठी येथे थांबलो होतो. नदी, सरोवर व त्यांच्या काठावर सुंदर वृक्षराजीमध्ये लपलेली सुंदर वास्तूंची नगरी – रविवार असल्यामुळे शांत शांत वाटत होते. तसे हे शहर पुराणे असले तरी लोकसंख्येने लहान आहे.

यू. एन्. ची अनेक ऑफिसे येथे आहेत. त्यामुळे त्या लोकांचीच ५० हजार वस्ती असेल. ८०० - १००० हिंदी लोकही आहेत. पुण्याचे

कोणी श्री. जगताप मोठ्या आपुलकीने भेटून गेले.

संध्याकाळी श्री. प्रधान यांचे घरी चहाला गेलो. घरगुती वातावरण होते. त्यांचा मोठा मुलगा भेटला. हुषार पण समजदार – आधुनिक तरुण भेटल्याचा आनंद झाला. रात्री श्री. ब्रजेश मित्र यांचेकडे जेवण केले.

उद्या येथून फ्रँकफर्ट व तेथून लगेच दिल्ली असा प्रवास आहे.

दिल्ली कशी आहे? अशा लांबच्या दौऱ्यावरून (या महिन्यात) परत येत असता काहीतरी उलाढाल वाढून ठेवलेली असते. या खेपेला काय याचे जरूर कुतूहल आहे. चिंता नाही.

*

## ६५ न्यूयॉर्क

२२ सप्टेंबर, १९७५

या वेळी विमान वेळेवर निघाले आणि लंडनलाही वेळेवरच पोहोचले. कदाचित अर्धाएक तास उशीर झाला असला तरी निदान माझ्या तो ध्यानात आला नाही. वाटेत सात तास झोप मिळाली.

कुवेत केव्हा येऊन गेले ते समजले नाही. जागा झालो तेव्हा अंधारच होता. मासिके वगैरे वाचण्याचा प्रयत्न केला. त्यात मन रमेना. तेव्हा वाचण्यासाठी बरोबर घेतलेले ‘ Conversations with Kennedy ’ बाहेर काढले आणि पुढचा वेळ केव्हा गेला ते कळले नाही.

रोम आले–गेले. फ्रँकफर्ट आले गेले. लंडनपर्यंत हाच उद्योग केला. थोडेफार खाण्यासाठी येत होते पण मी वाचनात गुंतून गेलो.

डेलिगेशनच्या आमच्या सभासदांपैकी श्रीमती माया रे आणि रेव्ह. मथाई हे दोन सभासद बरोबर होते. थोडा वेळ त्यांच्याशी बोलण्यात गेला. हे दोन्ही सभासद महत्त्वाचे ठरतील. माया रे आदबपूर्वक येऊन

बोलून गेल्या. मथाईही. मोठ्या उमेदीने व हौसेने यू. एन्. च्या कामाकडे ते पहात आहेत.

लंडनला नेहमीप्रमाणे नटवरसिंग आणि श्री. बी. के. नेहरू भेटले आणि सेव्हॉयमध्ये घेऊन गेले. मुंबई ते लंडनपर्यंत १७-१८ तास प्रवासात गेले होते. येथे तर दुपारचे १२॥ – १ वाजले असावेत.

सबंध दिवस पुढे होता पण मी थकून गेलो होतो. त्यांनी कार्य-क्रमाच्या काही सूचना केल्या. परंतु मी हॉटेलमध्ये पोहोचताच विश्रांति घेण्याचे ठरविले.

तीन चार तासांच्या विश्रांतिनंतर गप्पांसाठी व जेवणासाठी म्हणून नेहरूंकडे गेलो. आम्ही दोघेच होतो. पुष्कळ गोष्टी बोलून झाल्या.

फ्रान्सच्या धर्तीवर आमची घटना बदलली पाहिजे असे त्यांचे पूर्वी-पासूनचे मत, या वेळी आग्रहाने मांडत होते. याच आठवड्यात ते भारतात काही आठवड्यांसाठी जात आहेत. तेथे श्रीमतीजींशी बोलून घ्या असा सल्ला मी दिला. माझ्या मते अशा बदलाची जरूरी नाही असे माझे मत मी दिले.

या तऱ्हेच्या बदलाची गरज नाही. पुढे कसे काय जावे लागणार आहे – इमर्जन्सीचा उपयोग कसा करणार ? ती किती दिवस राहील ? इलेक्शन्स होतील ? आणि झाली तर केव्हा ? इमर्जन्सी ठेवून की उठवून ? किती तरी पर्यायांची चर्चा झाली.

इंदिराजींशी माझे जे बोलणे झाले आहे त्यावरून हळूहळू रिलॅक्सेशनची भूमिका दिसली. खरे म्हणजे १५ ऑगस्टपासूनच ही प्रोसेस सुरू करण्याची त्यांची इच्छा होती. परंतु बांगलादेश अरिष्टामुळे ते लांबणीवर पडले आहे.

मी त्यांना येत्या फेब्रुवारीमध्ये निवडणुका घेणे इष्ट आहे असे माझे मत दिले आहे हे सांगितले.

यासाठी घटनात्मकदृष्ट्या इमर्जन्सी हटवलीच पाहिजे याची गरज नाही. मात्र सर्व राजकीय नेते सोडून दिले पाहिजेत. सेन्सॉरशिप ढिली करून संपादकांच्या सल्ल्याने, गाइड-लाइन्स तयार करून घेऊन

त्याची अंमलबजावणी त्यांचेवरच सोडली पाहिजे. म्हणजे त्यांचीही परीक्षा होईल आणि निवडणुकीसाठी आवश्यक असे स्वातंत्र्य राहील. हा प्रोसेस मला व्यवहार्य दिसतो. (आजच्या परिस्थितीत.)

आता विरोधी पक्षांनी निवडणुकांत भाग न घेण्याचे ठरविले तर त्यांचा तो वेडेपणा ठरेल. पण देशाचे दुर्दैव अजून संपले नाही असे म्हणावे लागेल अशी माझी भूमिका सांगितली. गोष्टी मध्यरात्रीपर्यंत चालल्या.

दुसऱ्या दिवशी पुढच्या प्रवासासाठी सकाळी आरामात तयार होऊन १० वाजता निघालो. बरोबर नटवरसिंग होता. तो यू. एन्. डेलिगेशनचा सभासद आहे. सिक्युरिटी कौन्सिल – निवडणुकीसाठी तो उपयोगी पडेल. श्रीमतीजींच्या खास विश्वासातील म्हणूनही तो या डेलिगेशनवर आहे.

त्याचे मते सिक्युरिटी कौन्सिलची निवडणूक आम्ही कारणाशिवाय लढत आहोत. महत्त्वाचे प्रश्न ( आमच्या दृष्टीने ) येण्याची शक्यता नाही. पाकिस्तान व मुस्लिम राष्ट्रे यू. एस्. ए. च्या व चायनाच्या मदतीने कसून प्रयत्न करून आमची कसोटी करणार. यश तसे सोपे नाही वगैरे त्याचे म्हणणे सांगत होतो.

अडचण होणे शक्य आहे आणि चीन, यू. एस्. ए., पाकिस्तान हा एक ॲक्सिस् बनत चालला आहे आणि या निवडणुकीसाठी तो क्रियाशील होण्याची शक्यता आहे हे मलाही मान्य आहे. ४० इस्लामी देश ऐनवेळी भाई-भाईची भूमिका किती घेतात तेही संभाव्य संकट आहेच. मला या सर्व गोष्टींची जाणीव आहे.

परंतु उमेदवारी जाहीर करून ८-१० महिने झाल्यानंतर आता हे सद्गृहस्थ निवडणुकीच्या रस्त्यावर आम्ही जावयासच नको होते हे शहाणपण इतक्या उशीरा का देत होते ?

माझ्या मनात शंका चाटून गेली की, इलेक्शन अवघड – विरोधी गेले तर " आम्ही म्हणत नव्हतो ? " असे म्हणावयास रस्ता मोकळा ठेवण्याचा श्रीमतीजींचाच खेळ तर नाही ?

नटवरच्या मुखातून हे बाहेर आल्यामुळे ही माझी शंका अगदीच अस्थानी नाही. प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची – दोस्तांची परीक्षा होईल. आता परत वळणे नाही असे माझे स्पष्ट मत दिले.

लंडन-न्यूयॉर्क प्रवास आरामशीर झाला. केनेडी-एअरपोर्टवर आगत-स्वागत, 'कार्लाईल'च्या त्याच 4 M या खोलीत पुनरागमन.

परिषदेचे कागद चाळले. डेलिगेशनचे काही मेंबर्स आज आले. श्री. बिठ्ठलराव गाडगीळ अजून आले नाहीत. उद्या यावेत. डेलिगेशनची पहिली बैठक परवा ठेवली आहे.

आज बैठकीत जाऊन आलो. यू. एस्. ए. चे स्टेटमेंट झाले. बऱ्याच महत्त्वाच्या मंडळींशी 'हॅलो' झाले. इथल्या मुक्कामाची व कामाची अशी सुरुवात तर झाली आहे.

*

## ६६ न्यूयॉर्क

३० सप्टेंबर, १९७५

गेले आठ दिवस इतक्या गर्दीचे गेले की, सकाळी ८॥ वाजल्यापासून रात्री ११-१२ वाजेपर्यंत काही ना काही कामात गुंतून राहिलो.

राष्ट्रसंघाच्या या बैठकींचा माझ्या दृष्टीने सर्वांत मोठा फायदा आणि उपयोग म्हणजे या निमित्ताने अनेक राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांशी भेटण्याची आणि तपशीलवार चर्चा करण्याची संधी मिळते. या सर्व देशांना भेट दिल्यासारखे होते म्हटले तरी चालेल.

गेल्या ८-१० दिवसांत दररोज ४ ते ५ परराष्ट्रमंत्र्यांना स्वतंत्रपणे भेटून महत्त्वाच्या प्रश्नांबाबत बोलता आले. फ्रान्स, नेदरलँड, पोलंड आणि सोव्हिएट रशियाचे श्री. ग्रोमिको, स्वीडन वगैरेंशी चर्चा अधिक उपयोगी झाली.

श्री. ग्रोमिको यांना मी पूर्वी ते ताश्कंदला श्री. कोसिजिनबरोबर आले होते त्या वेळी आणि गेल्या दोन वर्षांपूर्वी ते श्री. ब्रेझनेव्हबरोबर दिल्लीला आले होते तेव्हाही भेटलो होतो. पण माझ्या सध्याच्या नव्या जबाबदारीनंतर ही पहिलीच भेट होती.

त्यांनी त्यांच्या मिशनमध्ये एक-दीड तास मनमोकळी चर्चा केली. सोव्हिएट रशियाची हेलेसिंकी परिषदेनंतरची भूमिका आणि मध्यपूर्वेकडील घडामोडींबाबत प्रतिक्रिया समजून घेण्याचा माझा मुख्य उद्देश होता.

बांगलादेशचे श्री. चौधरी येथेही भेटत राहिले. फारच गोड बोलतात. त्यामुळे मनाला उगीच शंका चाटून जाते की, हे सर्व नाटक तर नाही ?

पाकिस्तानचे श्री. असीर अहमदी यांनी मुद्दाम त्यांचे मिशनवर श्री. जयपाल यांना व मला लंचसाठी बोलाविले. आदरातिथ्य भरपूर होते. परंतु महत्त्वाच्या गोष्टी निघाल्या नाहीत. सर्वसामान्य भाषेत बोलणे झाले. संबंध सुधारले पाहिजेत, आमची इच्छा आहे आणि आम्ही प्रयत्न करीत आहोत, परंतु आमच्या जनतेला बरोबर घेऊन चालायचे असल्यामुळे उशीर लागतो आहे वगैरे. सिक्युरिटी कौन्सिलच्या इलेक्शनचा विषय निघाला परंतु त्यातून काही निष्पन्न झाले नाही. संबंध प्रस्थापित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला यात शंका नाही. आता त्याचा ते कसा उपयोग करतात ते पाहिले पाहिजे.

ता. २६ ला हिंदुस्थानतर्फे यू. एन्. चे आमसभेत मी निवेदन केले. त्याचे चांगले स्वागत झाले. सर्व देशांचेमार्फत अशी निवेदने येथे होतात. त्यामुळे हे काम ' रूटीन ' वाटते. परंतु जगापुढे असलेल्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत प्रत्येक राष्ट्राचा काय दृष्टिकोन आहे याची सविस्तर कल्पना येते. मला वाटते याची आवश्यकता आहे.

लंच आणि डिनर हे तर दररोजचेच. तेथें अनेक प्रमुखांच्या दाट ओळखी झाल्या. लिमापासून आजपर्यंत जवळ-जवळ दोन महिने वारंवार संपर्क येत राहिला आहे. त्यामुळे या आंतरराष्ट्रीय क्लबचा मी फार जुना मेंबर आहे असे वाटू लागले आहे.

शनिवारी सकाळी, येथून १५० मैलांवर असलेल्या Onionto या शहरामधील Harwick College च्या निमंत्रणावरून गेलो होतो.

अमेरिकेमध्ये आता मी अनेक वेळा आलो-गेलो. परंतु प्रमुखतः मोठ्या शहरात – उत्तम हॉटेलमध्ये राहिल्यामुळे येथील नागरी जीवनाचेच दर्शन होत आले आहे. अगदी पहिल्याप्रथम Non-urban विभाग पाहता आले.

न्यूयॉर्कच्या बाहेर २०-२५ मैलांवर गेल्याबरोबर हिरव्यागार रानात गायींचे कळप चरताना पाहून मन हरखून गेले. अवती-भोवती रंगीबेरंगी पानांच्या गर्द झाडीने झाकलेली डोंगरांची रांग, मधूनच वाहणारा लहानसा ओहोळ – फार्म हाउसेस आणि धान्य साठविण्यासाठी उभारलेले silos, येथील शेतीच्या आधुनिकीकरणाची साक्ष देत होते.

कॉलेज असलेले शहर ३०-३५ हजार वस्तीचे, डोंगराच्या आसऱ्याने इतस्ततः विखुरलेले आणि लहानमोठ्या ' लेक्स् ' नी सोबत केलेले एक सुंदर युनिव्हर्सिटी टाऊन आहे. कॉलेजचे प्रेसिडेंट श्री. अँडरसन व त्यांची पत्नी फार आतिथ्यशील-पोक्त जोडपे भेटले. त्यांच्या सुंदर घरामध्ये त्यांनी आमची फारच उत्तम व्यवस्था केली होती.

या शहराच्या उत्तम वस्तीत देखील संध्याकाळी ७ – ७॥ नंतर पायी, एकटे-दुकटे हिंडणेही अशक्य आहे. परंतु या शहरातील ' चायना टाऊन ' म्हणून एक विभाग आहे, तेथे मात्र आपल्याकडे, मुंबईला प्रार्थना-समाज, काळबादेवी भागामध्ये जसे रात्री १२ वाजेपर्यंत हिंडत फिरत असतात तसे दृश्य दिसले. एका रेस्टॉरॉंमध्ये एक डिनर होते तेव्हा हे मी पाहिले.

वेळात वेळ काढून दोन नाटके पाहिली. एक अगदीच सामान्य निघाले. परंतु एक संगीतिका Rock-Musical फारच चांगले निघाले. God's spell ही संगीतिका ख्राईस्टच्या जीवनावर आधारलेली आहे.

मी मुद्दाम निमंत्रणावरून गेलो होतो. त्यामुळे सर्व कलाकारांनी फारच मन लावून कामे केली. त्यांची नृत्ये-गाणी vigorous होती. त्यात परिश्रम अतोनात ओतले होते. प्रेक्षक व कलाकार यांच्यामध्ये एक अनौपचारिकतेचे नाते ते निर्माण करतात.

आपल्या नाटकांच्या थिएटर्समधील वातावरणापेक्षा मात्र येथे ही विशेषतः आढळली. नाटकानंतर मी कलाकारांना भेटलो. त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांनी आपल्या सर्वांच्या हस्ताक्षरांनी सजविलेलें त्यांचे प्रसिद्धिपत्रक मला त्यांचे स्मरण म्हणून दिले.

दिल्ली सोडून दहा-अकरा दिवस झाले आहेत. अजून चार दिवस येथे राहून पुढे वॉशिंग्टनला जावयाचे आहे. कामे कधीच संपत नाहीत. पण प्रकृति चांगली राहिल्यामुळे हे सर्व करीत राहणें शक्य झाले आहे.

※

## ६७ काबूल

३१ ऑक्टोबर, १९७५
( हॉटेल इंटर-कॉन्टिनेन्टल )

हिंदुस्थान-अफगाणिस्तानचे वेळाचे अंतर फक्त एक तासाचे आहे. तेथून दीड वाजता निघून येथे २॥ वाजता पोहोचलो.

बऱ्याच वर्षांनंतर पाकिस्तानच्या भूमीवरून विमान-प्रवास झाला. मला वाटते, यापूर्वी १९६४ सालात मॉस्कोला गेलो होतो तेव्हा आणि बहुधा ताश्कंदवरून परत येताना असा प्रवास झाला असावा (१९६६.)

अफगाण-आर्यन लाइनला जो रस्ता पाकिस्तानने दिला आहे तो सिंध-बलुचिस्तान या मार्गे दिला आहे. त्यामुळे विमानातून वैराण माळाशिवाय काही दिसले नाही.

वाटेत सहज मनात आले की, विमान खैबर खिडीवरून जाईल काय ? वैमानिकाकडे चौकशी केली तेव्हा त्याने सांगितले की, खैबर वाटेत दिसणार नाही. मला उगीचच निराश झाल्यासारखे वाटले.

या खैबर नावाचे काय आकर्षण माझे मनावर आहे समजत नाही. पण ही गोष्ट फार जुनी, लहानपणापासूनची आहे.

इतिहास वाचू-समजू लागल्यापासून, आर्यांचेपासून मोगलांपर्यंतचे सगळे वसाहतवाले वा आक्रमक या खिंडीतून आले. हिंदुस्थानचे जीवनावर, संस्कृतीवर या खिंडीचा प्रभाव अशा तऱ्हेने कारणीभूत आहे अशी काही भावना मुळाशी असावी कदाचित.

पण हा प्रभाव पुढेही बराच असावा अशी माझी आठवण आहे. कोल्हापूरला कॉलेजमध्ये असताना श्री· बिडेश कुलकर्णी आणि माझा पहिला परिचय होऊन त्याचे गहिऱ्या दोस्तीत रूपांतर झाले· त्या काळात आमच्या नानातऱ्हेच्या चर्चा झाल्याचे आठवते.

त्यामध्ये समाजवादी राजकीय तत्त्वज्ञानापासून बंगला बांधला तर, वा आवडीने कुत्रा ठेवला तर त्यांची नावे काय ठेवायची हे सर्व विषय येऊन गेले होते. ( नमुनेदार कनिष्ठ मध्यमवर्गीय मनोवृत्तीचा हा एक अजब पुरावा आहे की नाही ? )

मी ह्या वेळी गंभीरपणाने जाहीर केले होते की बंगला बांधला तर त्याचे नाव ठेवीन ' खैबर ' आणि कुत्रा आवडीने पाळला तर त्याचे नाव ठेवीन ' बादशहा. '

त्यांतले दुसरे शक्य झाले. आणि माझा, मला दिलेला शब्द खरा ठरला. ' बादशहा 'ने मुंबई-दिल्ली येथील दिलेली सोबत याची आठवण झाली म्हणजे मला अगदी गहिवरून येते. पहिले शक्य होण्याची पाळी आली नाही आणि ते एक अर्थाने बरेच झाले.

परंतु हे सगळे विचार मनात खेळत असतानाच काबूल एअर-पोर्टवर उतरलो. सरकारी स्वागतसमारंभानंतर लव्याजम्यासहित येथील इंटर-कॉन्टिनेंटलच्या शेवटच्या मजल्यावरील बादशाही सूटमध्ये आणले.

सूटमध्ये प्रवेश करताना वर पहातो तो त्याचे नाव ' खैबर सूट. ' आहे की नाही गंमत ! निदान खैबरखिंड ओलांडून गेल्यानंतर का होईना ४-५ दिवसांसाठी या खैबर नावाच्या बादशाही महालामध्ये राहिलो. केव्हाना केव्हा मनात योजलेले अशा तऱ्हेने घडून आले.

हे सगळेच विषयांतर झाले. आल्या दिवसापासून चार दिवस कसे गेले तेच समजले नाही. वहिद अब्दुल्लाशी त्याच संध्याकाळी दीड

तासांची चर्चा झाली. दुसरे दिवशी म्हणजे २९ ला सकाळी प्रेसिडेंट दाऊद यांचे धाकटे बंधू सरदार नइम यांच्याशी तासभर बोलणी झाली. जॉइंट इकॉनॉमिक कमिशनवर असलेले चार मंत्रि यांच्याशी १० ते १२ दोन तास तपशीलवार चर्चा झाली. सर्व काम पुरे झाले. हे चारही मंत्रि गेल्या चार दिवसांच्या गाठी-भेटी व चर्चा यामुळे अगदी दोस्त बनून गेले आहेत.

दुपारी १२ वाजता प्रेसिडेंट दाऊद यांच्या राजवाड्यामधील ऑफिसमध्ये भेटीसाठी गेलो. १२ ते २ त्यांचेबरोबर काढले. याच वेळात बिझिनेस लंच झाले. सहा-सात जण, सर्व मिळून होतो.

त्यांची माझी ही दुसरी भेट होती. बांगलादेश, हिंदुस्थानची अंतर्गत परिस्थिती, पाकिस्तान व चीनची धोरणे, भारत-अफगाण-सहकार्य हे चर्चेचे मुख्य विषय होते. नॉन-अलाइन्ड आंदोलनाचे स्वरूप व भवितव्य हा एक चर्चेचा विषय होता.

जशी जशी चर्चा प्रगत होत गेली तसे तसे ते अधिक मनमोकळे होत गेले. जेवणाच्या वेळी तर चर्चेला अगदी घरगुती मोकळेपणाचे स्वरूप आले होते.

मनुष्य गंभीर व खोल आहे. राज्यकारभाराचा अनुभव आहे. जनमानसात अजून प्रतिमा चांगली आहे. पण रशिया व चीन या दोन प्रचंड पण परस्परांचे प्रतिस्पर्धि असलेल्या देशांचा शेजार – पाकिस्तान-सारखा आक्रस्ताळी स्वधर्मीय शेजारी – इराण संबंध सुधारू इच्छिते परंतु त्यांचे आणि पाकिस्तानचे सूत-गूत जास्त, अशा पेचिल्या भौगोलिक परिसरामध्ये सापडलेला हा छोटेखानी अविकसित देश – आणि त्याचे नेतृत्व यांना करावयाचे आहे. त्यामुळे त्यांच्या मनावर राजकीय चिंतांचे ओझे जास्त असावे. पण तसे ते दाखवीत नाहीत. रिलॅक्स्ड् वाटले.

रशियाच्या पाठिंब्याचा, आधाराचा विश्वास दिसला. भारताबद्दल वरील परिस्थितीमुळे अधिक जिव्हाळा जरूर आहे.

गरीबी विलक्षण आहे. डोंगराळ, ओसाड मुलूख वाटतो. काबूल शहर तसे छान आहे. काश्मीरच्या, श्रीनगरच्या खोऱ्यासारखे काहीसे वाटले. अर्थात् श्रीनगरचे सौंदर्य आगळेच !

१० लाख वस्तीचे हे शहर विस्तृत पसरले आहे. नवे विभाग आधुनिक बनत आहेत. जुने काबूल तसेच जुने आहे. संध्याकाळी ' खैबर सूट ' मधून काबूल शहर पाहिले. एक विलक्षण शांत-सुंदर, मनोहारी दृश्य दिसते.

भारतीय क्लासिकल संगीत येथे लोकप्रिय आहे. आपल्यासारख्या बैठकी येथे रंगतात. अफगाण गायक श्री. सारंग यांचे गायन, मी आलो त्या रात्रीचे जेवणानंतर विदेश-मंत्रालयाने ठेवले होते. बडे गुलाम अलीची आठवण झाली, सुरावट तीच. आरोह-अवरोहाचे नखरे तेच. देहयष्टीही तशीच.

अफगाण तरुण तबलजी तर मला पहिल्या प्रतीचा वाटला. भारतीय सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे श्री. देशपांडे म्हणून गायक येथे काही महिने राहण्यासाठी आले आहेत. त्यांचीही बैठक अशीच रंगली.

अफगाण-मंत्रिमंडळाचे सदस्य देशपांडे यांना फर्माइश देऊ लागले. कोणी म्हणाले, काफी-तराना म्हणा, कोणी म्हणाले मालकंस होऊ द्या तर कोणाचा आग्रह होता ठुमरीचा !

आज सकाळी सरकारी छोटचा विमानाने ' बामियान ' ला गेलो होतो. तेथे १५०० ते १६०० वर्षांपूर्वीचे भगवान बुद्धाचे दोन भव्य पुतळे डोंगरकपारीत कोरलेले आहेत. कुशान राजवंशाने बुद्धधर्माचा येथे प्रसार केला तेव्हाचे हे सांस्कृतिक लेणे आहे. दोन मूर्ति आहेत. एक १५०-१६० फूट उंचीची व दुसरी असेल १०० फूट उंचीची.

त्या डोंगरकपारीत असंख्य लेणी आहेत. त्यांच्या समोरून बामियान नदीचे पात्र जाते. या दिवसात लहानसा प्रवाह आहे. नदीच्या अलीकडच्या तीरावरून लेणी असलेली डोंगर-भिंत पाहिली म्हणजे अजंठा–वेरुळची आठवण येते. काही गुहांमध्ये अजंठासारखी चित्रेही असली पाहिजेत याचा पुरावा दिसतो.

भारत-अफगाण-सरकारांच्या सहाय्याने हे अवशेष सुरक्षित राहिले पाहिजेत म्हणून गेली काही वर्षे तज्ज्ञांच्यामार्फत प्रयत्न चालू आहेत.

भारतीय टीमचे श्री. सेन आमच्याबरोबर होते. त्यांनी त्याचा सारा तपशील सांगितला.

उद्या काही करारनाम्यावर सह्या करण्याचा समारंभ होईल. नंतर या शहरातील काही ऐतिहासिक स्थळे पाहून तेहरानसाठी प्रस्थान ठेवीन.

मोंगल साम्राज्याचे संस्थापक बाबर यांची कबर येथे आहे. ती पाहणार आहे. अफगाणिस्तानच्या उत्तरेकडील विभागात राहणाऱ्या एका जमातीचे (Tribe) लोक उत्तम घोडेस्वार आहेत. ते अनेक धाडसी प्रयोग करतात. त्यांची येथे उत्सव-स्पर्धा आहे. तीही पाहणार आहे.

बामियानच्या खोऱ्यात चेंगिझखानाच्या क्रौर्याचे काही अवशेष पाहिले. बुद्ध मूर्तीच्या खालच्या बाजूलाच एका उंच टेकडीवर ' श्केर गुल्गुल् ' म्हणून शहर होते.

चेंगिझखानाने त्या शहराचा संपूर्ण विध्वंस केला. स्त्री-पुरुष-मुले सर्वांचा संहार केला. आताही ते उद्ध्वस्त शहर या अमानुष क्रौर्याची साक्ष देत उभे आहे.

करुणेची मूर्ति भगवान बुद्धही उभे आहेत आणि चेंगिझखानचे क्रौर्यही शेजारीच उभे आहे. इतिहासात क्रौर्य आणि करुणा यांची जणू काही स्पर्धा चालू आहे. कुणाचा विजय होतो आहे ? करुणेचा की क्रौर्याचा ? मन कधी कधी साशंक होते. आजच्या जगाकडे पाहिले की हा प्रश्न भेडसावू लागतो.

मानवाची प्रगति होत आहे असा आमचा दावा आहे. हा खरा असेल तर करुणेचाच विजय होतो आहे असे मानावे लागेल. पण अण्वस्त्रांच्या रूपाने आधुनिक चेंगिझखानचे क्रौर्य उभे आहे. याची जाणीव झाली की मग पुन्हा मन अस्वस्थ आणि साशंक बनते.

अर्थात् पुरुषार्थ करणारांनी करुणेचाच मार्ग पत्करला पाहिजे. आणि याच श्रद्धेने मी बामियानहून आज परतलो.

❋

१ नोव्हेंबर, १९७५

काल लिहून पुरे केले परंतु आजचा दिवस मी माझ्या आयुष्यात महत्त्वाचा मानला आहे. आज येथे २५००–३००० वर्षांपूर्वीचे देवीचे दर्शन झाले. फक्त हे एकच हिंदू दैवत येथे उरले आहे.

इथले हिंदू या देवीला 'आसामाई' म्हणतात. काबूल शहरात 'आसामाईचा' डोंगर आहे. त्याच्या पायथ्याशी हे मंदिर आहे. मंदिर अलीकडचे असावे. परंतु आतली पूजेची वस्तु मला तरी निराकार दिसली. प्राचीन असावी असे वाटले. काबूल-कंदाहार ही भारतीय संस्कृतीची केंद्रे होती. तेव्हा 'आशामाई' चे हळूहळू रूपांतर 'आसामाई'त झाले असावे.

म्युझियम्स पाहिली. बुद्ध संस्कृतीचे अवशेष प्रामुख्याने आहेत. म्युझियमचा अफगाण संचालक तज्ज्ञ दिसला. मी गेल्या चार पाच दिवसांत येथील अनेकांना विचारलेला प्रश्न यांनाही विचारला. 'अफगाण' याचा निश्चित अर्थ काय ? ही काही विशेष 'ट्राइब' नाही. या देशात वेगवेगळ्या वंशगटांनी आक्रमणानिमित्त हजारो वर्षांच्या कालखंडात वास्तव्य केले आहे. मग याला 'अफगाणिस्तान' का म्हणतात वगैरे.

मला कोणी फारसे समाधानकारक उत्तर दिले नव्हते. या गृहस्थाने 'अश्ववाहन' चे अफगाण झाले आहे असे सांगितले. उत्तम घोडेस्वार या देशात आजही आहेत. घोडेस्वारीचे धाडसी खेळ हा राष्ट्रीय षोक आहे. भारतावर व इतरत्र आक्रमण करणारांनी आपली 'घोडदळे' येथे उभारली. म्हणून अश्ववाहकांचा म्हणजे घोडदळांचा देश असा त्याचा अर्थ. हा अर्थ भाषाशास्त्र आणि इतिहास यांच्या संदर्भात योग्य वाटतो.

मोंगल साम्राज्याचे संस्थापक बादशाह बाबर यांची कबर येथे आहे. ती पाहिली. ४० - ४५ वर्षांपूर्वी ती अगदीच वाईट स्थितीत होती. पण आज ती चांगल्या स्थितीत आहे. भोवतालचे वातावरण शांत – गंभीर आहे.

काबूलपासून औरंगाबादपर्यंत मोगल सम्राटांच्या कबरी इतस्ततः आहेत. एका षोकिन सम्राटाची पत्नी होऊन त्याच्या आधी मरण्याचे कर्तृत्व दाखविल्यामुळे मुमताजमहालचे जगविख्यात स्मारक ताजमहालच्या रूपाने उभे आहे. ते साम्राज्य उभे करणारा मात्र एका बाजूला, पण त्याच्या आवडत्या शहरात चिरंतन विसावा घेत आहे !

आज दिवाळी. तुम्हा सर्वांची फार आठवण झाली. गेल्या २५-३० वर्षांत ही पहिलीच दिवाळी मी तुझेपासून दूर आहे ! अगदी एकटा परदेशात आहे. सकाळी 'आसामाईचे' दर्शन घेताना तुम्हा सर्वांची आठवण झाली.

※

## ६९ न्यूयॉर्क

२ ऑक्टोबर, १९७५

आज म. गांधीजींचा जन्मदिवस. दुपारी यू. एन्. सेक्रेटरी श्री. वाल्डहाईम यांना आमच्यातर्फे दुपारचे जेवण दिले. २५-३० देशांचे प्रतिनिधि व आमचे काही प्रतिनिधि हजर होते.

मी माझ्या भाषणात महात्माजींच्या जन्मदिवसाची आठवण दिली. गांधीजींचे जीवनकार्य आणि राष्ट्रसंघाचे उद्दिष्ट कसे मिळते-जुळते आहे याचा उल्लेख केला.

सेक्रेटरी जनरलनी आपल्या उत्तराच्या भाषणात 'एक महान् मानव आणि सर्व मानवांचा नेता' या शब्दांत गांधीजींचा सन्मान केला. सर्व हजर देशांच्या प्रतिनिधींनी आनंदाने टाळ्यांच्या गजरात त्याला साथ दिली. हिंदुस्थानपासून हजारो मैल दूर गांधीजींचा जन्मदिवस आम्ही आज असा साजरा केला.

दुपारी शहरात चक्कर टाकण्यासाठी शरद काळेसह बाहेर पडलो. फिफ्थ अव्हेन्यू हा येथील ( मॅनहॅटनमधील ) अतिशय फॅशनेबल भाग मानला जातो.

काही आर्टस् सेंटर्स, बुक-शॉप्स् आणि ॲन्टिक् कलेक्शन्स प्रामुख्याने पहावयाची असे आम्ही ठरविले.

देशोदेशींच्या आजच्या कलाकारांची ही मोठी बाजारपेठ आहे. 'असोसिएशन ऑफ आर्टस्' या केंद्रावर गेलो. अनेकविध चित्रे पाहिली. २० डॉलर्सपासून १० हजार डॉलर्सपर्यंतच्या किंमतीची चित्रे येथे आहेत.

डोळे भरून पहाणे हा आमचा उद्देश. तास दीड तास तेथे काढला. पाय निघत नव्हता आणि खिसा रिकामा होता. अशी आमची परिस्थिति !

एका कलाकाराची चित्रे मला भारीच आवडली. सर्वांत स्वस्त १२० डॉलर्स म्हणजे सुमारे ११०० – १२०० रुपयांचे चित्र होते. बरे झाले त्या वेळी मजजवळ पैसे नव्हते. नाहीतर निदान ते तरी चित्र न्यूयॉर्कची आठवण म्हणून घेतले असते.

एका प्रसिद्ध ॲन्टिक्-केंद्राचे नाव ऐकून होतो म्हणून त्या पत्त्यावर गेलो तर दुकान बंद करून, 'भाड्याने देणे आहे' अशी पाटी लावून मालक मोकळा झालेला दिसला. दोन, चार दुकाने टाकून असेच दुसरे दुकान होते. तेथे गेलो तर तेथे तो दुकानाचा मालक चर्चेच्या ओघात भेटला. हे दुकान त्याच्या भावाचे म्हणून तेथे बसावयास आला होता. गिऱ्हाइक नाही म्हणून हळहळत होता.

काही वस्तूंवरून नजर हलत नव्हती. इतक्या सुंदर वस्तु होत्या. मी त्याला सांगितले, "मी फक्त नेत्रसुखासाठी आलो आहे." तो म्हणाला, "जरूर पहा. आता पैसे नसले तरी घेऊन जा. हिंदुस्थानमधून चेकने पैसे पाठवून द्या. माझा तुमच्यावर विश्वास आहे."

मी त्याचे आभार मानले. कधी मजजवळ इतके पैसे असले तर जरूर परत येईन असे म्हणून बाहेर पडलो. एकेक अनुभव व आनंद नमुना म्हणून लिहीत आहे.

शेवटी ' रिझोली ' बुक-शॉपमध्ये गेलो. चित्रे घेऊ शकलो नाही, ॲन्टिक् घेऊ शकलो नाही, निदान न्यूयॉर्कची आठवण म्हणून न्यूयॉर्क-मधील ५० वर्षांतील निवडक रेखाचित्रे, विशेष ग्रंथ रूपाने प्रसिद्ध केली आहेत ती घ्यावीत म्हणून १५ डॉलर्स खर्च करून तो ग्रंथ मिळविला.

तीन चार तासांच्या भटकंतीनंतर परतलो. काही मोटारीने परंतु जास्त पायी. असा हा भटकंतीचा प्रयोग असल्यामुळे न्यूयॉर्क पाहिल्या-सारखे वाटले.

संध्याकाळी, नॅशनल प्रेस क्लबसमोर द्यावयाच्या भाषणाच्या तयारीत बराच वेळ घालविला.

काल यू. एन्. मध्ये युगांडाचे अध्यक्ष ईडी अमीन दादा या वल्लीचे भाषण झाले. एक अवलिया आणि जबरदस्त दांडगेश्वर असा त्याचा लौकिक असल्यामुळे यू. एन्. चा हॉल फुलून गेला होता.

सभागृहामध्ये स्वारी जाहीर केल्यापेक्षा एक तास उशीरा आली. सेनानीचा युनिफॉर्म, सर्व तऱ्हेच्या मानचिन्हांच्या सुवर्णपदकांनी छाती भरून गेली होती.

बोलण्यासाठी उठले आणि दहा–वीस वाक्ये आपल्या आफ्रिकन भाषेत बोलले. तयार करून आणलेले भाषण आपल्या सेक्रेटरीला वाचा-वयास सांगितले. ते भाषण तो सेक्रेटरी अडखळत वाचत होता.

मी कसातरी तासभर थांबलो आणि हळूच एका बाजूने निघून आलो. नंतर समजले की ते भाषण आणखी अर्धा तास चालले होते.

दुपारच्या जेवणाच्या वेळी सेक्रेटरी जनरल त्यांच्या अनेक गंमती सांगत होते. आपली १९ वर्षांची ताजी बायको व पहिल्या बायकांपासून झालेली दोन मुले बरोबर घेऊन ते आले आहेत. हाही आठवणीकरता एक नमुना !

पुढच्या आठवड्यात बरचसे सरकारप्रमुख येथे येणार आहेत. परंतु मी येथे नसणार. वॉशिंग्टनमध्ये असणार. प्रिन्स सिहनाक, जपानचे सम्राट, प्रेसिडेंट सादत वगैरे. यांपैकी प्रिन्स सिहनाकला भेटण्याची इच्छा होती. परंतु ते शक्य नाही याची जरूर मनाला रुखरुख आहे.

उद्यापासून यू. एन्. च्या बैठकीलाही मी जाऊ शकणार नाही. हेड्स् ऑफ मिशनची बैठक उद्या व परवा आहे. रविवारी वॉशिंग्टनला प्रयाण. या खेपेला न्यूयॉर्क ते वॉशिंग्टन प्रवास रेल्वेने करणार आहे.

काय योगायोग आहे समजत नाही. पण असे काही काम हाती येत राहते की, ज्यामुळे घरापासून व जिवाभावाच्या माणसांपासून मी एकसारखे दूर रहावे ! हे काही आजचे नाही. माझ्या आयुष्याच्या सुरुवातीपासूनचेच हे सूत्र दिसते. तुझ्या ते चांगलेच ओळखीचे आहे. पण तू हे सर्व धीराने घेतेस – पण मला याची सारखी जाणीव येते आणि मग जेव्हा एकटा असतो तेव्हा मन हलून जाते.

पण हे उगीच लिहून गेलो. एवढ्यासाठीच की, मन काहीसे हलके होते.

❊

## ७० शिकॅगो

९ ऑक्टोबर, १९७५

वॉशिंग्टनहून सकाळी ८॥ वाजता निघून दोन तासांच्या प्रवासानंतर येथे पोहोचलो. हॉटेलवर गेलो तर तेथे डॉ. पोपट यांच्या पत्नी हार घेऊन उभ्या ! त्यांची कन्या येथे आहे आणि तिच्या बाळंतपणासाठी त्या आल्या आहेत. लेकीसह हजर होत्या. घरी याल का म्हणून आग्रह करीत होत्या. परंतु येथील दिवसभर आखलेले कार्यक्रम त्यांना दाखविल्यावर त्यांची समजूत पटली असावी.

सर्व दिवस आपल्याइकडे जसे दौऱ्यातील भाषणांचे कार्यक्रम असतात तसे कार्यक्रम झाले म्हटले तरी चालेल. चार भाषणे झाली. दोन ऑन रेकॉर्ड, दोन ऑफ दि रेकॉर्ड.

ऑन रेकॉर्ड सार्वजनिक भाषणे होती. त्यांचा येथील एक प्रसिद्ध 'स्पीकिंग हॉल' आहे. हॉल संपूर्ण भरला होता. हिंदुस्थानसंबंधी औत्सुक्य, काही जिव्हाळा आहे. समजून घेऊ इच्छितात. विशेषत: हल्लीच्या परिस्थितीबाबत.

येथील वर्तमानपत्रे, टेलिव्हिजन वगैरे मधून फारच विरोधी प्रचार झाला आहे. प्री-सेन्सॉरशिप व अटकसत्र वगैरेबाबत फार गैरसमज आहेत.

मी सामान्यपणे ३० मिनिटे बोलत असे. अर्धा तास प्रश्नांची उत्तरे देत होतो. गेली अडीच-तीन वर्षे अराजक बांधण्याचा प्रयत्न कसा होत गेला, छोटा राजकीय गट प्रचंड बहुसंख्येच्या पक्षाला आणि सरकारला पार्लमेंटमध्ये व बाहेर काम करणे कसे अवघड करीत होता, त्याचप्रमाणे संघटितरीत्या लोक-प्रतिनिधींची विधानसभा बरखास्त करण्याचा, हिंसेवर आधारलेला कार्यक्रम मी सांगत असे.

राजकीय स्थैर्य आणि राष्ट्रीय एकता ही कशी नवस्वतंत्र देशाला आवश्यक आहेत आणि या दोन मूलभूत गोष्टींशिवाय आर्थिक व सामाजिक प्रगति, ज्यांना खरे प्राधान्य आमच्या राष्ट्रीय जीवनात आहे, केवळ अशक्य आहे.

काही कठोर पावले उचलावी लागली आहेत परंतु ती तात्पुरती आहेत. लोकशाहीचे मूलभूत स्वरूप बदलणार नाही, बदललेही नाही हे मी स्पष्ट करीत असे.

अमेरिकन्स समजत असत, त्यांचे मतपरिवर्तन होत असे असा दावा मात्र करता येणार नाही. पण खरी अडचण होती ती येथे व्यवसायासाठी आलेल्या भारतीयांची. त्यांतले काही पक्के विरोधी होते. शेलके प्रश्न विचारीत असत. प्रश्नांचा भडिमार करण्याची त्यांची रीत असे.

पाच-दहा जण सभागृहाबाहेर 'इंदिरा-चव्हाण मुर्दाबाद' ची घोषणापत्रके घेऊन उभे होते !

संध्याकाळी आय्. आय्. टी. मध्ये तेथील हिंदी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन कार्यक्रम घेतला होता. सांस्कृतिक कार्यक्रम झाला.

सौ. अंजली आंबेगावकर आणि मिसेस् राजगोपालन यांचे नृत्याचे कार्यक्रम झाले. येथे राहिलेल्या भारतीय कुटुंबियांपैकी ते आहेत. फार

सुरेख कार्यक्रम झाले. श्रीमती आंबेगावकर कथ्थकच्या तज्ज्ञ पदवीधर आहेत. त्या स्वत: सुंदर नाचतात. व्यक्तित्व आकर्षक आहे. बोलतातही छान. येथील युनिव्हर्सिटीमध्ये नृत्य शिकवितात.

या कार्यक्रमात आर. एस्. एस्. वाले काही होते. त्यांच्या चाली-रीतीप्रमाणे त्यांनी काही खालच्या पातळीवरील प्रश्न विचारले आणि वातावरण काहीसे गरम केले. हिंदुस्थानमधील एखाद्या सभेमध्ये असल्या-सारखे वाटले.

'ऑफ दि रेकॉर्ड' ज्या दोन सभा झाल्या त्या फक्त अमेरिकन्सच्या होत्या. निवडक व प्रातिनिधिक लोक होते. उद्योगपति, बँकर्स, प्रोफेसर्स, संपादक असे मिश्रण होते.

त्यांचे प्रश्न मला तरी सद्भावनेतून विचारल्यासारखे वाटले. त्यामध्ये हिंदुस्थानसंबंधी आपुलकी होती.

त्यांच्या दृष्टीने काहीतरी नवीन घडत चालले आहे व ते चांगले नाही. वस्तुस्थिती काय आणि त्याची कारणे काय? ही प्रश्नांची दिशा होती.

आपल्या देशातील प्रथा व संस्था डोळ्यांपुढे ठेवून ते प्रश्न विचारीत होते. भारताची परंपरा– भूमिका व तेथील ज्वलंत प्रश्नांची प्राधान्यता यांचा संदर्भ लक्षात घ्यावयास ते तयार नव्हते. परंतु समजून दिल्यानंतर ते एवढे जरूर मान्य करीत होते की, हिंदुस्थानचे प्रश्न त्यांच्या मार्गाने त्यांनीच सोडविले पाहिजेत व त्यांच्या नेत्यांचा तो हक्क आहे.

एक हुषार तरुण कायद्याचा प्रोफेसर माझ्या डिनर-मीटिंगचा अध्यक्ष होता. त्याने मोठा अर्थपूर्ण आणि मजेदार खुलासा केला. "हिंदुस्थानबरोबर आमचा वैचारिक रोमान्स चालू होता. आणि त्यामुळे आमच्या काही अपेक्षा आम्ही तयार केल्या आहेत. त्या अपेक्षांचा भंग झाला की, प्रेमभंगाची तीव्रता जाणवेल." विदेशनीतिसंबंधानेही काही मूलभूत प्रश्न विचारीत असत.

दुपारी थोडा वेळ मिळाला तेव्हा येथे कित्येक वर्षे काम करीत असलेल्या रामकृष्ण मिशनला जाऊन आलो. येथे हल्ली प्रमुख असलेले स्वामी मराठी भाषिक आहेत. १९६०-६१ साली नागपूरला हे याच संस्थेचे तेथील प्रमुख होते.

उत्तम कार्य चालू आहे. शिकॅगो – रामकृष्ण मिशन – आणि विवेकानंद स्वामी ही त्रयी मनामध्ये लहानपणापासून घर करून बसलेली आहे. सर्वधर्मपरिषदेमध्यें स्वामी विवेकानंदांनी केलेल्या भाषणांची वर्णने पहिल्यापासून ऐकलेली आहेत. त्यामुळे दिवसभर स्वामीजींची मूर्ति डोळ्यांपुढे येत होती.

हे शहर ४० लाख वस्तीचे, व्यापार व उद्योग यांचे केंद्र आहे. रेल्वेचे मोठे केंद्र पूर्वी होते. (आजही असेल). मिचिगन लेकच्या (सरोवर) काठी बसले आहे. अशी अनेक (५) सरोवरे एकमेकांस जोडून आहेत. शेवटी सेंट लॉरेन्स नदीची व त्यांची गेल्या वीस वर्षांपूर्वी गाठ घालून दिली आहे.

त्यामुळे ॲटलांटिकमधून मोठमोठी जहाजे शिकॅगोपर्यंत येतात. आता ते एक महत्त्वाचे बंदर झाले आहे. धान्याची – विशेषतः गव्हाची – ही मोठी बाजारपेठ आहे. शेतकामाची आधुनिक यंत्रे निर्माण करणारे अनेक मोठमोठे कारखाने त्यामुळे येथे आहेत. उत्तम शेती व चांगल्या शेतजमीनीसाठी हा भाग प्रसिद्ध आहे. मिड्-वेस्ट म्हणतात तो हाच भाग किंवा त्याचा महत्त्वाचा हिस्सा असावा.

सकाळी ७ पासून रात्री १२ पर्यंत एकसारखा कामात होतो. आज सकाळी परत ५॥ ला उठून तयारीला लागलो आहे. ८॥ वाजता न्यूयॉर्कला जाणारे विमान गाठावयाचे आहे.

शिकॅगो नदीचे काठी हे सुंदर हॉटेल (Hyat Regency Chicago) आहे. २६ व्या मजल्याच्या, नदीकडेच्या खिडकीतून संथ वाहणारी शिकॅगो दिसते आहे. अतिदूर मिचिगेन सरोवर दिसते आहे. प्रसन्न दृश्य आहे.

सकाळचे ७ वाजलेत. पूर्वेकडे सूर्याचे लाल बिंब हळूहळू वर येत आहे. डोळ्यांपुढे स्वामी विवेकानंदांची तशीच तेजस्वी मूर्ति येत आहे. शिकॅगोची ही प्रतिमा मनात ठेवून प्रयाण करणार आहे.

१० ऑक्टोबर, १९७५

काल सकाळी ११ वाजता शिकॅगोहून येथे पोहोचलो. आज दुपारचे जेवण ( लंच ) ' न्यूयॉर्क टाइम्स ' या वृत्तपत्राचे संपादक व संचालक-मंडळातील प्रमुख सहा-सात लोकांबरोबर त्या वृत्तपत्राचे कचेरीत घ्यावयाचे होते.

दिल्लीहून आलेले कागदपत्र ' कार्लाइल ' मध्ये वाट पहात होते. ते संपविले आणि श्री. टी. के. कौल, श्री. केवलसिंग यांचेसह लंचसाठी गेलो. जेवण अमेरिकन स्टाइल, बिझिनेस लंच होते.

जेम्स रेस्टॉन, गोल्ड, ओकेज् सुल्झबर्ग, रोसेन् थॉन आणखीन दोघे-जण व आम्ही चौघे असे संभाषण होते. भारतीय परिस्थितीबाबत मुख्यतः चर्चा होती.

मी, इमर्जन्सी का जाहीर करावी लागली याची पार्श्वभूमी सांगितली. लोकशाहीचा त्याग केलेला नाही. अर्थात् पूर्वीचा बेजबाबदार प्रेस व परिस्थिती येऊ नये अशी काळजी घेतली जाईल असेही सांगितले. ही ' तात्पुरती परिस्थिती ' आहे हेही त्यांच्या निदर्शनास आणले.

त्यांच्या मते भारताने लोकशाहीचा त्याग केलेला आहे. आर्थिक व राजकीय परिस्थिती सुधारण्यासाठी जर तसे करणे आवश्यक असेल तर लोकशाहीचा तुम्ही त्याग केलेला आहे असे मान्य का करीत नाही ? अशी एकाची विचारसरणी होती. (प्रश्न विचारण्यापाठीमागे) अर्थात् रेस्टन किंवा सुल्झबर्ग समजून घेत होते. रोसेन्थॉन आणि ओकस् थोडे अग्रेसिव्ह वाटले.

Pre-censorship detention of politician with right to go to the court हे लोकशाही नसण्याचे खरे पुरावे ते मानतात.

मी काही परिस्थितीत या गोष्टीची आवश्यकता भासते आणि जोपर्यंत या गोष्टी पार्लमेंटच्या मान्यतेने व तात्पुरत्या केल्या जातात तोपर्यंत लोकशाही संपली हे निदान अन्यायाचे व पक्षपाती ठरेल. अमेरिकन

इतिहासामध्ये देशाचे ऐक्य आणि स्थैर्य संकटात आले तेव्हा अशा उपाय-योजना केल्याची कित्येक उदाहरणे आहेत, हेही मी त्यांना सांगितले.

विशाल भारतात स्वातंत्र्याच्या या पहिल्या २५ वर्षांच्या अनुभवावरून काही काळासाठी या उपाययोजना केल्या आहेत व त्याचा परिणाम होत आहे. जनतेचा त्याला पाठींबा आहे हे स्पष्ट केले.

संभाषण वादविवादाच्या स्वरूपाचे नव्हते. समजून घेण्यासाठी होते. हसत खेळत चर्चा झाली. स्पष्ट व स्वच्छपणे. कोणी कोणाचे मत-परिवर्तन करण्यासाठी बसले नव्हते. त्यामुळे मुद्दा कोणी जिंकला किंवा कोण हरला या दृष्टीने या संभाषणाकडे कोणीच पाहिले नाही.

जेवण संपवून उठताना जॉन रेस्टन म्हणाला, So, we have established detente between India and New York lines असे उद्गार काढले. संभाषणाचा हा सारांश व परिणाम त्यांनी एका वाक्यात सांगितला. " I don't know how eassy or uneassy this detente is going to be " ही माझी प्रतिक्रिया मी दिली.

दुपारी यू. एन्. मध्ये गेलो. आज जनरल डिबेट संपणार होते. शेवटचे भाषण श्री. बुटिफ्लिका करणार होते. मी मुद्दाम हजर राहून त्यांचे अभिनंदन केले. जनरल सेशनचे एक पर्व संपले. बहुतेक विदेश-मंत्रि या आठवडाअखेर जाऊ लागले आहेत.

रात्री Same time New year हे नाटक पाहिले. केवलसिंग, जयपाल पति-पत्नी आणि शरद काळे असे गेलो होतो. एक नमुनेदार अमेरिकन नाटक आहे.

पात्रे फक्त दोन. उत्कृष्ट कामे केली. २-२॥ तास फक्त दोन पात्रांनी नाटक असे रंगविले की सांगता सोय नाही. नाटकाचा विषय, मांडणी – कलाकारांनी जीव ओतून केलेला अभिनय, यामुळे नाटक फारच परिणामकारक होते. कॉमेडी आहे. विनोद भरपूर आहे. पण सर्व विनोद मूलतः जीवनातील गंभीर अनुभूतीतून निर्माण होतो.

एका जोडप्याची विवाहबाह्य मैत्री, अकस्मात, आपापल्या गावापासून दूरच्या शहरी होते. दरवर्षी याच महिन्यात एका week-end ला ते सतत २५ वर्षे भेटत राहिले. सहा सीनस् आहेत. दर पाच वर्षांनी

होणारी भेट प्रत्येक प्रवेशामध्ये दाखविली आहे. २५ वर्षांतले परिस्थितींत, वयांत, स्वभावांत, मनांत झालेले फरक दाखविले आहेत. पण मैत्री अतूट आहे.

शेवटी त्यांतले गृहस्थ वृद्धपणी लग्नाची इच्छा व्यक्त करतात. आणि स्त्री म्हणते ' I cannot ' कुटुंबाविषयीचा जिव्हाळा, नवऱ्याबद्दल आदर ही कारणे सांगते. आणि ती खरी असतात. तो रागावतो व निघून जातो. पण लगेच परततो आणि मैत्री संथपणे पुन्हा सुरू राहते. म्हटले तर मजा, म्हटले तर एका गंभीर प्रश्नाचे चित्रण होते.

आज सकाळी यू. एन्. मध्ये पुन्हा गेलो. नॉर्थ येमेन आणि व्हेनेझ्युएलाचे विदेशमंत्र्यांना भेटलो. यात दीड तास गेला. आज मी जाणार म्हणून डेलिगेशनच्या सर्व मेंबर्सना भेटलो. निरोप घेतला. सर्वजण आपापल्या कमिटयांच्या कामाशी चांगलेच परिचित झाले आहेत. प्रत्येकाने निदान एक-दोन भाषणे केली आहेत. मिसेस् रे, बॅ. विठ्ठलराव गाडगीळ आणि फादर मथाईस् हे उत्तम कार्य करीत आहेत. श्री. मथाईस् ही उत्तम व अशा परिषदेसाठी उपयोगी अशी व्यक्ति आहे.

या दोन आठवडयांमध्ये निदान ५० विदेशमंत्र्यांशी भेटून कमीत-कमी अर्धा तास चर्चा करता आली. लिमाचे स्पेशल सेशन व हे जनरल सेशन मिळून मी जगातील बहुतेक सर्व विदेशमंत्र्यांना भेटलो. ओळखी-पाळखी झाल्या.

व्यक्तिगत परिचयाला परराष्ट्रसंबंधाच्या क्षेत्रात फारच महत्त्व आहे. याचा परत अनुभव आला. अनुभवाच्या कक्षा वाढल्या. शिक्षणाची प्रक्रिया कधीच संपत नसते. ते नित्य चालूच राहील.

मात्र इतके दिवस दूर राहिल्यामुळे देशातील घटनांशी असलेला संबंध – जिवंत जिव्हाळयाचा संबंध, कमजोर होतो असे वाटते.

⁕

११ ऑक्टोबर, १९७५

खरे म्हणजे वॉशिंग्टनहूनच मी हे लिहावयास पाहिजे होते. पण जे अडीच दिवस आणि तीन रात्री वॉशिंग्टनमध्ये काढल्या त्या इतक्या गर्दीच्या आणि मनावरती ओझे असणाऱ्या होत्या की बसून चार ओळी लिहीन म्हटले असते तर ते शक्य झाले नसते.

जेव्हा थोडा वेळ मिळेल तेव्हा लिहावे असे योजले होते. म्हणून आता मध्यरात्री लिहिण्यास सुरुवात केली आहे.

एअर-इंडियाचे हे 'विक्रमादित्य' तीन तास उशीरा न्यूयॉर्कमधून निघाले. काही मिनिटांपूर्वी तारीख बदलली आहे. अर्थात् उद्या लंडनला तीन तास उशीरा पोहोचू. उद्याच्या लंडनच्या विश्रांतीचे असे तसेच झाले म्हणाना ! हल्ली-हल्ली एअर-इंडियाला काय झाले आहे कोण जाणे !

अमेरिकेच्या या भेटीतील हे महत्त्वाचे दिवस होते. इंडो–यू. एन्. जॉइन्ट कमिशनची लांबलेली – पुढे ढकललेली ही दुसरी बैठक गेल्या-मार्चमध्ये होणार होती. परंतु दरम्यान अमेरिकेने पाकला शस्त्र-पुरवठ्याचा निर्णय जाहीर केला व त्यामुळे ती होऊ शकली नाही.

मध्यंतरी बरीच शब्दाशब्दी झाली. संबंध संपले की काय असे वाटण्याजोगी परिस्थिति निर्माण झाली होती. परंतु माझ्या मताने आणि मला वाटते, पंतप्रधानांच्याही मताने, अमेरिकेचे संबंध दुरावू नयेत. यात भारताचे हित आहे. जशी भारताला अमेरिकेच्या मैत्रीची गरज आहे त्याचप्रमाणे अमेरिकाही भारताला दुर्लक्षू शकत नाही.

व्यापार, आर्थिक क्षेत्रातील सहकार्य, विज्ञान व टेक्नॉलॉजी वगैरे क्षेत्रांत विचार व अनुभव यांची देवघेव होणे आवश्यक आहे. बंद झालेली बोलणी पुन्हा सुरू केली पाहिजेत.

दैनंदिन राजकीय चढउतारांचा फारसा परिणाम होणार नाही अशी यंत्रणा सुरू करून तिच्यामार्फत हे सहकार्याचे कार्य सतत चालू राहील अशी व्यवस्था केली पाहिजे. या जॉइन्ट कमिशनची भूमिका ही आहे.

ही संस्थात्मक व्यवस्था कार्यशील राहिली तर भारत-अमेरिका-संबंध सुधारण्यात एक पाऊल पुढे पडेल यात शंका नाही. मात्र एक काळजी घ्यावी लागेल. याबाबत ढोल पिटण्याचे टाळले पाहिजे. 'लो-प्रोफाइल' ठेवले पाहिजे.

वॉशिंग्टनला जाण्यासाठी न्यूयॉर्कहून निघताना ( रेल्वेत पाऊल ठेवताना ) माझ्या मनात या विचारांनी गर्दी केली होती. मनावर एक प्रकारचे ओझे होते.

अमेरिकेतील माझा हा रेल्वेचा प्रवास पहिलाच होता. न्यूयॉर्क ते वॉशिंग्टन तीन तासांचा प्रवास आहे. पुणे ते मुंबई डेक्कनक्वीनसारखा. अर्थात् अंतर जास्त आहे. तुलनेने आजची ( १५ वर्षांपूर्वीची नव्हे ) डेक्कनक्वीन फारच मागे पडेल.

दुपारी १२॥ वाजता वॉशिंग्टनला पोहोचलो. दुपारचे लंच – बिझिनेस लंच – एम्बसीमध्ये होते. उपसमित्यांचे सर्व चेअरमेन, पार्थसारथी, एम्. जी. कौल, डॉ. नागचौधरी आणि आम्ही सर्वजण होतो. कमिशनच्या झालेल्या कामाची माहिती घेतली. उद्याच्या कामाची तयारी केली. तीन साडेतीनपर्यंत हे संपले.

बऱ्याच दिवसांनंतर दुपारची अर्ध्या तासाची विश्रांति प्रथम मिळाली. एक वर्षानंतर या घरी व याच खोलीत पुन्हा उतरलो होतो. गेले कित्येक वर्षे या शहरात – मी अमेरिकेत आलो म्हणजे – जास्त राहिलो आहे. इतर ठिकाणी एखादा दिवस किंवा एखादी रात्र काढावी अशी प्रथा होती.

आता उलट झाले आहे. न्यूयॉर्कमध्ये या खेपेला दोन आठवडे राहिलो. येथे मात्र दोन-तीन रात्री.

पाच तारखेच्या संध्याकाळचे जेवण श्री. शरद उपासनी यांचेकडे घेतले. घरगुति वातावरण होते. त्यांनी कुणालाच बोलाविले नव्हते. श्री. शरद काळे आणि मी एवढेच पाहुणे. त्यामुळे मनमोकळेपणाने जुन्या-नव्या गोष्टींच्या आठवणी निघाल्या. आपल्याजवळ काम करून गेलेली ही तरुण मंडळी आणि त्यांच्यातील जिव्हाळा पाहिला म्हणजे बरे वाटते. दुसऱ्या दिवशीच्या चर्चेची तयारी करावयाची होती म्हणून

जेवण संपवून ९॥-१० लाच परत आलो.

६ ला सकाळी येथील टी. व्ही. वर एक मुलाखत झाली. हिंदी पत्रकार ५ ला संध्याकाळीच भेटून गेले होते.

११ वाजता जॉइन्ट कमिशनचे काम सुरू झाले. ४५ मिनिटांत डॉ. किसिंजर व मी यांची भाषणे संपवून आम्ही आमच्या Aids सह Bi-lataral बोलणी करण्यासाठी डॉ. किसिंजरच्या ऑफिसमध्ये गेलो. तासाभराच्या चर्चेनंतर दुसऱ्या दिवशी भेटण्याचे ठरवून आम्ही उठलो.

डॉ. किसिंजर मला तरी मोकळा – स्पष्ट – आणि हिंदुस्थानशी चांगले संबंध रहावेत अशी खरीखुरी इच्छा असलेला गृहस्थ, त्याच्या बोलण्यावरून वाटला. मध्यंतरीच्या वादळामुळे त्याच्या मनात काही किंतु असेल अशी मला शंका होती. परंतु मला तसे जाणवले नाही.

स्टेट डिपार्टमेंटमधून थेट नॅशनल प्रेसक्लबपुढील भाषणासाठी गेलो. थोडा उशीरा पोहोचलो. या राजधानीच्या शहरातील हा एक वजनदार आणि प्रतिष्ठा पावलेला क्लब आहे. मी पूर्वी दोन वेळा या क्लबपुढे बोललो आहे. ही तिसरी वेळ. भाषणानंतर अनेकविध मुद्यांवर प्रश्नोत्तरे झाली.

एक अवघड उलट तपासणीच असते ही. परंतु आमच्या पार्लमेंटच्या प्रश्नोत्तरांच्या तासाची कसोटी ज्यांनी हसत - खेळत झेलली आहे त्यांना ही प्रश्नोत्तरे अवघड जाऊ नयेत. मला वाटते, आमचा हा एक तास उत्तम गेला.

तेथून परस्पर Agrsi se - Bulg ना भेटलो. परस्परांच्या पीकपाण्याची चौकशी झाली. गव्हाच्या किमतीचे स्वरूप काय राहील – रशिया, चीन यांची मागणी किती राहील, आमची गरज काय – बफरचा प्लॅन कसा आहे, या विषयांवर बोलणी झाली.

चार वाजता प्रेसिडेंट फोर्डशी भेट होती. त्यामुळे पाऊण तासातच येथून निघालो. बरोबर ४ वाजता व्हाइट हाउसवर पोहोचलो.

अमेरिकन प्रेसिडेंट जॉन्सनशी १९६४ साली भेट ठरली होती. परंतु एकाएकी परतावे लागले होते म्हणून ती भेट झाली नाही. प्रेसिडेंट

निक्सनची भेट १९७१ साली इतर फायनान्स मिनिस्टर्सबरोबर व्हाईट हाऊसमध्येच झाली होती. चर्चेसाठी होणारी ही पहिली भेट. तीस मिनिटे Oval office मध्ये चर्चा झाली.

बोलण्यात गंभीरता होती. काय बोलावयाचे ते पूर्वी ठरल्यासारखे बोलत होते. पण त्यांच्या पूर्वीच्या, १९६१ च्या हिंदुस्थानला दिलेल्या भेटीची आठवण येताच मोकळे झाले. आमच्या प्रधानमंत्र्यांविषयी आवर्जून चांगले बोलले. जबरदस्त सत्तेवरचा माणूस पण सत्तेवरचे तेज दिसले नाही. कशामुळे असे असावे असा मी विचार करीत होतो. निवडून आलेला – नेमणूक झालेला प्रेसिडेंट म्हणून तर असे नसेल ना ? शक्य आहे.

आसची चर्चा बरी झाली असे माहितगारांनी मत दिले. ५ वाजता एम्बसी-स्टॉफपुढे भाषण व तेथून १२ मैलांवर पोटॅमॅक नदीच्या पलीकडे असलेल्या टी. व्ही. स्टुडियोवर गेलो. Live cost-cost interview- दोन नामांकित पत्रकारांशी टेलिव्हिजनवर झालेले हे संभाषण होते. ७॥ ते ८.

भारत – वृत्तपत्रीय स्वातंत्र्य आणि लोकशाही – प्रेसिडेंट फोर्ड - व परराष्ट्र नीति हे संभाषणाचे विषय होते. अर्धा तास केव्हा गेला ते समजले नाही.

वृत्तपत्र-स्वातंत्र्य म्हणजेच लोकशाही असे समीकरण असलेला हा देश आहे. त्यांची समजूत घालणे-पटविणे – कठीण आहे. त्यांच्याशी वाद न घालता शांतपणे आजच्या परिस्थितीची पार्श्वभूमी सांगणे व तिची अपरिहार्यता नजरेस आणणे हा उपयुक्त मार्ग मी या बाबतीत स्वीकारला होता.

भारताच्या लोकशाहीची परीक्षा भारतीय वस्तुस्थितीच्या (Realities) संदर्भात केली पाहिजे हा माझा मुख्य मुद्दा असे. त्यामुळे वादळ टळत असे आणि शांतपणे विषय स्पष्ट करता येत असे. आमची प्रचाराची हीच स्ट्रॅटिजी या देशात ठेवली पाहिजे.

८॥ वाजता डॉ. किसिंजरला एम्बसीमध्ये आमचे रात्रीचे भोजन होते. म्हणून घाईघाईने ८-२० पर्यंत पोहोचलो. कपडे बदलून पाहुण्यांच्या स्वागतात सामील झालो.

बरेच प्रमुख लोक निमंत्रित होते. सिनेटर्स, काँग्रेसमेन, मिनिस्टर्सही होते. सिनेटर मॅक्गव्हर्न हजर होता. निक्सनविरोधी प्रेसिडेंटचे इलेक्शन ७२ साली लढला होता. त्याने इलेक्शन जिंकले असते तर कदाचित् अमेरिकेचे भारताशी संबंध अधिक जवळकीचे झाले असते अशी माझी भावना होती. त्यामुळे त्याच्या ओळखीने मला आनंद वाटला.

सकाळी ७ ला इंटरनॅशनल कमिटी ऑफ दि हाउसची चर्चा झाली नंतर पुन्हा एकदा टी. व्ही. वर इंटरव्ह्यू. जॉईंट कमिशनची दुसरी बैठक दीड वाजता संपली. आमच्या सन्मानार्थ डॉ. किसिंजरची लंच स्टेट डिपार्टमेंट मध्ये झाली. पुन्हा एकदा भाषणे झाली. जेवणानंतर डॉ. किसिंजरशी चर्चेची दुसरी बैठक तासभर झाली.

जॉइन्ट कमिशनने काही निश्चित निर्णय घेतले आहेत. गाडी रुळावर आहे. हळूहळू गति दिली तर प्रगति व्हावी अशी माझी धारणा आहे.

दुपारी ५ नंतर एका कमिटीशी चर्चा करून श्री. मॅक्नामारा यांना भेटण्यासाठी वर्ल्ड बँकेच्या कचेरीत गेलो. भेट ठरली होती. माझे तसे काम नव्हते. Old times sake courtesy visit चे स्वरूप होते. परंतु मी गेलो तो त्यांच्या एका बोर्डाच्या वादग्रस्त सभेत ते गुंतले होते. निरोप ठेवून मी एम्बसीमध्ये परतलो. कारण तेथे मोठ्या प्रमाणात रिसेप्शन होते.

श्री. मॅक्नामारा बिचारा सज्जन माणूस मीटिंग संपल्यानंतर माफी मागण्यासाठी एम्बसीवर आला.' कामात होता, मी समजू शकतो' असे मी सांगितले. तरी तो पुन्हा पुन्हा माफी – माफी असे म्हणत होता. पुढच्या खेपेला याल तेव्हा जेवायला या असा आग्रह धरून बसला. होकार दिला तेव्हा तो गेला. ही पुढची खेप केव्हा आहे कोण जाणे ?

रात्री गंजूकडे जेवण झाले. त्याच्याकडे नामवंत पत्रकार जमतात. १९७१ सालापासून आमचा हा वार्षिक कार्यक्रम झाला आहे. मध्यरात्र उलटून जाईपर्यंत चर्चा – वाद चालतात. परंतु त्यांत मैत्री असते.

दुसऱ्या दिवशी सात वाजता शिकॅगोसाठी निघालो. अशी ही वॉशिंग्टनची भेट झाली.

आज न्यूयॉर्कहून निघालो ते ११ तारीख सुरू झाली. बरोबर एक वर्षापूर्वी ११ ऑक्टोबरला मी विदेशमंत्रालयाची सूत्रे हाती घेतली.

वर्षपूर्तीचा प्रसंग विमानप्रवासात यावा ही विदेशमंत्र्याच्या दृष्टीने, म्हटले तर औचित्यपूर्ण अशीच गोष्ट आहे. पण हे वर्ष कसे गेले ते लक्षात आले नाही.

भारताच्या जीवनात मात्र हे वर्ष संकटाचे व कटकटीचे ठरले.

उद्याचा एक दिवस लंडनला राहीन आणि विजयादशमीला सकाळी घरी.

*

## ७३ लिमा ( पेरू )

१३ ऑक्टोबर, १९७५

सर्व दिवस कामाचा व गर्दीचा गेला. सकाळी ९ वाजता उद्योग-मंत्र्यांना भेटलो. काल रात्रीच्या आमच्या एम्बसीच्या चहापानाच्यावेळी भेटलो होतो. नेव्हल ऑफीसर होते.

येथील सर्वच मंत्रि सैन्याचे प्रतिनिधी आहेत. मोकळा माणूस वाटला. इंग्रजी उत्तम बोलतो. त्यामुळे भाषा-मध्यस्थाची गरज पडली नाही.

सर्वसामान्य सहकार्याची क्षेत्रे कोणती आहेत व काय काय करणे शक्य आहे यासंबंधी संभाषण झाले.

नंतर मध्यंतरात वेळ होता व जवळच समुद्रकाठ होता म्हणून बीचवर गेलो. हवेत खूपच गारठा होता म्हणून गाडीतून बीचवरच्या रस्त्यावरून भटकलो. समुद्रकाठाला नैसर्गिक अशी १५०-२०० फुटांची उंच अशी उंचवटयाची देणगी आहे. त्यामुळे शहर, समुद्रापासून सुरक्षित

उंचीवर आहे. दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यावरून पॅसिफिकचे प्रथम दर्शन झाले.

त्यानंतर व्यापारमंत्री यांना भेटलो. कहाणी तीच सांगावयाची होती. त्यामुळे अर्ध्या तासात भेट संपविली.

परिषदेत दीड तास काढला व नंतर प्रेसिडेंटना भेटण्यासाठी त्यांच्या प्रासादावर गेलो. लष्करी बंदोबस्त ठाकठीक होता. १०-१५ मिनिटे थांबल्यावर भेटीसाठी आत गेलो. सोबत श्री. केवलसिंग व डॉ. तेजा होते. ४५ मिनिटे काढली.

समारंभात आर्टिफिशल पाय होता – त्यामुळे ते उभे राहून बोलत होते. परंतु आता तो तुटका पाय घेऊन खुर्चीवर बसूनच त्यांनी आमचे स्वागत केले. हसतमुखाने. आमच्या पंतप्रधानांची चौकशी केली. हिंदुस्थानच्या परिस्थितीबाबत बोललो.

त्यांनी आमच्या ॲटमबॉम्बची तयारी कशी चालली आहे विचारले. मी त्यांना, आम्ही बॉम्ब तयार करणार नाही, तशी आमची नीति नाही. आर्थिक विकासासाठी अणुसंशोधन वापरावे या धोरणाने आम्ही वागतो आहोत वगैरे खुलासा केला.

मी त्यांना हे सर्व सांगितले खरे, परंतु त्यांच्या चेहऱ्यावरून त्यांनी ते खरे मानलेच आहे असे मला तरी वाटले नाही. हे लष्करी राजकारणी असल्या धोरणांना किती मानणार कोण जाणे ?

त्यांनी विषय बदलला व आपल्या देशातील गेल्या सात वर्षांत रेव्होल्यूशनने काय काय कार्य केले त्याची रसभरीत कहाणी सांगितली. पुढे आपण कोण-कोणती पुरोगामी धोरणे आखली आहेत ते सांगितले.

किंमत म्हणून आम्हाला योग्य वाटेल ती – परदेशी कंपन्या मागतील ती नव्हे – किंमत देतो. Confiscation करीत नाही. appropriation or acquisition करतो असे सूत्र सांगितले.

दिसतात तरी शांत, हसतमुख व निर्धास्त. त्यांनी भारताविषयी व जगातील पुरोगामी धोरणाविषयी असलेला जिव्हाळा व्यक्त केला. मग आम्ही निरोप घेतला.

दुपारचे जेवण बांगला देशच्या विदेशमंत्र्यांबरोबर त्यांच्या हॉटेलमध्ये, त्यांच्या खोलीवर घेतले. ते येथे येताच एकत्र खाजगी बसून बोलावयाचे आहे असे त्यांनी सुचविले होते. त्याप्रमाणे हा बेत पार पडला.

दीड तास एकत्र बसून बोललो, म्हणजे तेच जास्त बोलले. मी बरेचसे ऐकण्याचे काम केले. बिचारा आठ दिवसांपूर्वी जिनिव्हावरून कुटुंबीय तेथेच ठेवून चर्चेसाठी शेखसाहेबांनी बोलाविले म्हणून भेटावयास गेला. तेथे पोहोचताच शेखसाहेबांनी त्यांना 'शिपिंग' चे मंत्रि बनविले.

त्यांना मंत्रिपद नको होते. ते जिनिव्हामध्ये सुखी होते. एक वेळ बांगलादेशचे ते प्रेसिडेंट होते. आठ दिवसांनंतर शेखसाहेबांची हत्या झाली व सर्वच चित्र बदलले. अनिश्चिततेमुळे गोंधळून गेले. त्या दिवशी ४ वाजता कॅबिनेट सेक्रेटरीचे नव्या अध्यक्षांमार्फत निमंत्रण आले आणि पुन्हा मंत्रि झाले.

२०-२१ ला विदेशमंत्रि म्हणून नेमणूक जाहीर झाली व २२ तारखेला लिमाचे दौऱ्यावर बाहेर आले आहेत.

मी, पूर्वी ते प्रेसिडेंट म्हणून दिल्लीला आले होते तेव्हा भेटलो होतो. हिंदुस्थानशी मंत्री करण्याचे धोरण आपण चालविणार आहो असे त्यांनी सांगितले. पुष्कळ बोलले. त्यांच्याशी झालेल्या बोलण्याची मी एक स्वतंत्र टिप्पणीच करतो आहे.

तळमळीने बोलत होते परंतु मनाने थकलेला, काहीसा घाबरलेला वाटला. पूर्वी चीफ जस्टिस असल्यामुळे संस्कार राजकारणाचे नाहीत. त्यामुळे राजकारण किती स्थिर आहे त्याची त्यांना खात्री नाही.

बांगलादेशवर प्रेम आहे. तो चांगला चालावा व आपली त्याला मदत व्हावी असे त्यांना वाटते. पण आपले नक्की किती चालेल व मानले जाईल याची त्यांना निश्चिति वाटत नाही.

सत्ता खऱ्या अर्थाने अजून सैन्याचे हाती आहे. परंतु खोंडकर मुश्ताफ अहमद is managing them well so far वगैरे वगैरे.

या भेटीची आवश्यकता होती. वैयक्तिक संबंध निर्माण होणे परराष्ट्रसंबंधाच्या संदर्भात सहाय्यभूत होते या दृष्टीने.

४ नंतर प्लेनरी सेशनमध्ये परत गेलो. मिडल् ईस्टच्या प्रश्नावर अरब व आफ्रिकन यांचे कालपासून विवाद चालू होते. अरब व आफ्रिकन देश यांच्यामध्ये एक नवी तेढ दिसली. हे अरब दडपेगिरी करतात असे स्पष्टपणे आफ्रिकन बोलत होते. युगोस्लाव्हिया व आम्ही हा वाद वाढू नये असा प्रयत्न करीत होतो.

आज संध्याकाळी पुन्हा आमच्या चर्चा झाल्या. अरब कंपाला येथील ठरावाच्या धर्तीवरच येथे ठराव करावा हे एकमताने मान्य केले. एका टोकाचे धोरण न करता आपसांत एकी ठेवण्याचा हा एकच मार्ग होता. अशा गुंतागुंतीच्या व स्फोटक विषयांचे बाबतीत, politics is an art of possible हे अगदी सार्थ आहे.

परिषदेच्या अध्यक्षांना काही काम होते म्हणून, व्हाइस प्रेसिडेंट म्हणून तासभर अध्यक्षीय खुर्चीवर बसून भाषणे ऐकत राहिलो. ७॥ वाजता बाहेर पडलो.

येथे भारत-पेरू सांस्कृतिक स्नेहमंडळ आहे. तिच्या अध्यक्षा मादाम फर्दीदिनी म्हणून ६०-६५ वर्षांची एक धनिक वृद्धा आहे. तिने आपल्या घरी आमच्यासाठी स्वागत-समारंभ ठेवला होता. तेथे गेलो.

ही येथील प्रसिद्ध स्त्री आहे. या शहराची मेयॉर होती. भारतावर अतोनात प्रेम – प्राचीन देश व संस्कृति यामुळे एक आकर्षण आहे.

हिच्या मालकीच्या सोन्याच्या खाणी होत्या. आजही ती लक्षाधीश आहे. प्रासादतुल्य घरात राहते. विधवा आहे. दोन लग्ने झाली होती. दोन्ही लग्नाची मुले आहेत. तिची मोठी मुलगी ३५-४० वर्षांची असावी. पेरूमधील निवडक भारतीय व पेरूबियन हजर होते. तासभर आनंदात गेला.

रात्री पेरूच्या विदेशमंत्र्यांचा खाना होता. १० वाजता सुरू झाला व १२॥ ला संपला. पेरूनिवासी Black चा सुंदर नृत्य-संगीताचा कार्यक्रम झाला. हॉटेलवर येऊन झोपी जाईपर्यंत १॥ वाजला होता.

उद्या सकाळी ७ वाजता पुढच्या कार्यक्रमासाठी तयार झाले पाहिजे. घरून निघून आठ दिवस झाले.

❋

१९ डिसेंबर, १९७५

पाच दिवस पॅरिसमध्ये राहूनही लिहीन म्हटले तरी वेळ मिळाला नाही. काल सकाळी १०॥ वाजता सुरू झालेली मीटिंग आज पहाटे ५ वाजता संपली. (लंच-डिनरसाठी जो काही थोडा वेळ मिळाला तो सोडून).

दुपारी १ वाजता पॅरिस सोडले व येथे ३ वाजता पोहोचलो. उमेद आणि वेळापत्रक होते की, ६॥ वाजता आम्ही येथून मुंबईला निघू. परंतु आता रात्रीचे ११ वाजलेत, आम्ही येथून केव्हा निघणार हे मलाच माहिती नाही.

एअर-इंडियावाले कधी १२ तर कधी २ आणि ३ वाजता रात्री जाता येईल असे निरोप पाठवीत आहेत. यांचे विमान लंडनहून निघणार आहे म्हणे!

परदेशात विमानांच्या या अनियमित आणि अनिश्चितपणाचा एवढा मनःस्ताप होतो की सांगता सोय नाही. धड मी पॅरिसमध्ये नाही नि धड मुंबईच्या वाटेवर नाही. मधेच रोममध्ये हॉटेलमध्ये पडून आहे. येथे एअर-इंडियाचे काही पायलट्‌स् आहेत. चांगली माणसे आहेत. माझा वेळ जाईना म्हणून आग्रहाने जेवायला घेऊन गेले. पण माझे कशातच मन नाही. मुळात कार्यक्रम ठरविताना आम्ही शहाणपणा दाखविला नाही असेच म्हणावे लागेल.

पॅरिसची कॉन्फरन्स बऱ्याच ओढाताणीनंतर आज संपली. मुळातच अवघड होती. दोन्ही बाजूंमध्ये ( डेव्हलपिंग अ‍ॅण्ड डेव्हलप्ड) आर्थिक प्रश्नावर, प्रश्नांना उत्तरे शोधण्याच्या निर्धाराने संवाद सुरू झाला पाहिजे हा हेतू आहे. संवाद निदान सुरू तरी झाला पाहिजे पण तो सुरू होण्यातच बऱ्याच अडचणी आहेत. प्राथमिक अडचणी दूर झाल्यासारखे दिसते आहे.

चार कमिशन्स तयार झाली आहेत. हिंदुस्थानने यापैकी तीन कमिशन्सचे सदस्यपद मिळविले आहे. opec वाले खरी गडबड करीत

आहेत. लटपटी करून त्यांनी तीन को-चेअरमनशिप्स मिळविल्या आणि पुन्हा चर्चेत अडथळे निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहेच. पुढारलेल्या देशांना ही चर्चा टाळता आली तर टाळावयाची आहे. त्यांना त्याची घाई नाही. यू. एस्. ए. ला तर ती नकोच आहे. खरी गरज आहे ती लहान-मोठे आमच्यासारखे जे देश आहेत त्यांना ! अशी ही परिषद झाली.

परिषदेच्या निमित्ताने बरेच लोक भेटले. किसिंजर, ई. ई. सी.* चे प्रेसिडेंट ऑर्टोली, पाकिस्तानचे अझीझ अहमद, यू. के. चे कॅलहॅन, नायजेरिया, युगोस्लाव्हिया, झांबिया, झाएर, फ्रान्स वगैरे देशांचे परराष्ट्रमंत्रि भेटले. परिषदेव्यतिरिक्त इतर उपयुक्त चर्चा झाल्या.

डॉ. किसिंजर नेहमीप्रमाणेच मैत्रीपूर्ण व मोकळे होते. महत्त्वाच्या प्रश्नांबाबत मात्र साखरपेरणी करीत होते. या परिषदेपूर्वी ते आपल्या आई-वडिलांसह त्यांच्या जर्मनीमधील मूळ गावी जाऊन आले होते. त्यांचा तेथे मोठा सत्कार झाला. तेथील समारंभात आई-वडिलांसह काढलेले फोटो बरोबर होते. परिषदेमध्ये आम्ही शेजारी शेजारी होतो. तेव्हा अभिमानाने आपल्या वडिलांचा फोटो दाखवून म्हणाले, " पाहिलेत हे माझे वडील. ८८ वर्षांचे आहेत. ते उत्तम शिक्षक होते."

या खेपेला आमच्या डेलिगेशनमध्ये प्रो. पी. एन्. धर होते. एकत्र काम करण्यात्री आमची पहिलीच वेळ होती. छान मनुष्य वाटला. मला वाटते, माझे कोणाशीही कामाच्या बाबतीत जमून जाते.

पॅरिसला खूप थंडी होती. पण थंडी भासते बाहेर – रस्त्यावर – बाकी सर्वत्र सेंट्रल हीटिंग.

श्री. उदय अभ्यंकर – हा तरुण अधिकारी माझ्या साथीला होता. मी या मुलाला लहानपणापासून ओळखतो. त्याचे वडील मुंबईला कमिशनर होते. बुद्धिमान आहे. घरगुति जिव्हाळ्याने वागला. त्याची पत्नी म्हणजे श्री. केवलसिंग यांची कन्या. एका रात्री त्यांचेकडे जेवलो. पंजाबी व मराठी जेवणाचे पदार्थ करून पोटभर जेवू घातले.

---

* European Ecomomic Community ( E. E. C. )

श्री. विमल सन्याल हे उत्तम अधिकारी. आनंदी. कष्ट करण्याची तयारी. सर्वांशी चांगले संबंध. परिषदेच्या कामाचा सर्व बोजा त्यांनी सांभाळला. त्यांची मला अतिशय मदत झाली.

डेलिगेशन अकारण मोठे झाले होते. प्रत्यक्ष काम सुरू झाल्यानंतर हे स्पष्ट झाले. प्रत्येक मिनिस्ट्रीला आपला प्रतिनिधी असावा असे वाटते. त्या मानाने त्यांना काम कमी असते. अकारण खर्च. पुढे काळजी घेतली पाहिजे.

कुठे बाजार – दुकान ( पुस्तकाचेही ), नाटक, नृत्य वगैरे काही काही करता आले नाही. हॉटेल ते कॉन्फरन्स-हॉल असा प्रवास नित्य चालू होता. पॅरिसमध्ये कामात दिवस आणि वेळ कसा गेला समजलेही नाही.

आता येथे (रोममध्ये) वेळ जाता जात नाही. मुंबईला किती तास उशीरा पोहोचणार व केव्हा पोहोचणार हेच माहिती नाही. तेथील कार्यक्रमांची सर्वच गडबड होणार असे दिसते. त्यामुळे मी अस्वस्थ आहे. पण माझा काही इलाज नाही.

या खेपेला पॅरिसमध्ये मी जास्तीत जास्त दिवस राहिलो. पण विशेष काही पाहू शकलो नाही. पोहोचलो त्या संध्याकाळी अर्धा तास उदय अभ्यंकरबरोबर बाहेर मोटारीतून चक्कर टाकली. Nolvi Dam कॅथिड्रलजवळ खाली उतरून थोडा चाललो. चिक्कार थंडी होती. नाक-कान गारठून गेले.

रविवार होता. रात्रीचे ८ वाजले होते. तरी तरुण स्त्री-पुरुष कॅथिड्रलमध्ये जाताना दिसले म्हणून आम्हीही आत गेलो. ख्रिसमस आठवड्यावर आला आहे. कॅथिड्रल, तरुण व मध्यम वयाच्या स्त्री-पुरुषांनी भरून गेले होते. गंभीर आवाजात धर्मगुरु प्रार्थना वाचीत होते. वातावरण शांत व गंभीर होते.

इकडे धर्माबाबत उदासीनता असते – विशेषतः पॅरिसमध्ये – ते खरे नाही असे हे दृश्य पाहून वाटले. ख्रिसमसच्या खरेदीसाठी मात्र कोठे दुकानांतून गर्दी दिसली नाही. काही दुकानांत आरास वगैरे दिसली. पण गिऱ्हाइकांची गर्दी कोठेच आढळली नाही.

पॅरिसचे एक नवे आकर्षण या वेळी लक्षात आले. ( खरे म्हणजे जुनेच. मी प्रथम पाहिले म्हणून नवे.) दुपारच्या प्रवासात शहराच्या ऐन मध्यभागी एक दोन मैल लांब-रुंद असे विस्तीर्ण फॉरेस्ट पाहिले. हिवाळ्यामुळे झाडें निष्पर्ण होती. पण उंच झाडांचे हे वन पाहून मन हरखून गेले. गाडीतून उतरून चालण्याचा मोह झाला. पण थंडीमुळे तो मोह आवरावा लागला.

आता रात्रीचे १२। झालेत. अजूनही आमचे विमान लंडनहून निघालेले नाही.

Wait and watch-as we always do !

*

## ७५ अंकारा ( Turky )

१ एप्रिल, १९७६

ता. ३१ ला, पाडव्याच्या मुहूर्तावर, नव्या वर्षाची सुरुवात या प्रवासाने केली आहे. वर्षभर चालणाऱ्या भ्रमंतीचा श्रीगणेशाच होतो की काय कोण जाणे ! पॅन अमेरिकेने प्रवास बऱ्याच वर्षांनंतर केला. एअर इंडियाशी याची कसलीच तुलना होऊ शकत नाही.

सहा तास तेहरानमध्ये थांबलो. ॲम्बॅसडर श्री. राम साठे यांचे घरी सर्वजण गेलो. चर्चा-चहा यांत बराच वेळ गेल्याने हा रस्त्यात वाट पाहणीचा काळ तसा कंटाळवाणा गेला नाही.

श्री. राम साठे खिलाडू माणूस आहे. श्री. जगमोहन ' फॉरिन सेक्रेटरी झाले हे उत्तम झाले. योग्यतेचे गृहस्थ आहेत ते असे ' म्हणून दाखविले. त्यांच्या पदरात ही जागा आली होती. पण त्याची त्यांनी फार चर्चा केली. त्यांच्यासाठी सर्वजण कदाचित वाट पाहतील या भावनेने जून-जुलैमध्ये येण्याच्या गोष्टी केल्या. आणि त्यात ते हरले. त्यांनी

बोलण्यात खिलाडूपणा दाखविला पण मला वाटते, त्यांच्या मनाला ही गोष्ट कायमची लागून राहणार. I hope I am wrong.

तेहरानमध्ये अंतर्गत गडबडी खूपच चालू आहेत. मध्यंतरी मंत्रिमंडळात झालेले बदल व त्या संबंधीचे अनेक किस्से ऐकले. घरोघरी त्याच चुली !

तेथून १॥ वाजता (भारतीय वेळ ३॥) निघालो व ४। वाजता इस्तंबूलला पोहोचलो. जगाच्या पाठीवरील हे एक विलक्षण ठिकाण आहे. भूगोलाने त्याला एक अनोखे वैशिष्टच दिले आहे. त्यामुळे या शहराभोवती इतिहास फार खेळ खेळला आहे.

आटोमन साम्राज्याची राजधानी हे एक उदाहरण झाले. युरोप-आशिया यांना प्रत्यक्षतः आणि ऐतिहासिक दृष्टचाही जोडणारा हा सेतू आहे. अनेक राज्ये – वंश – भाषा यांचा हा ऐतिहासिक सेतू कित्येक शतके होता. त्याचे चिरंतन टिकणारे परिणाम आहेत.

कित्येक वर्षे स्वप्न होते की, हे शहर पाहीन. आज ते पाहिले. तीन तारखेला परत एक दिवसाच्या मुक्कामाला येथे राहीन तेव्हा बारकाईने किंवा सावकाशीने पाहीन.

तासभर चिनार हॉटेलमध्ये वेळ काढला. प्रवासाचा कंटाळा होता, परंतु झोप येत नव्हती. म्हणून सायंकाळच्या सूर्याच्या शीतल प्रकाशात Sea of Marmar कडे पहात चहाचे गरम घुटके घेत सर्व वेळ काढला.

संध्याकाळी ७ वाजता अंकाराला पोहोचलो. उत्तम स्वागत. टर्कीचे विदेशमंत्रि श्री. चलायांजिल आणि इतर डिग्नेटरीज् होते. अंकारा शहरातील भारतीय स्त्री–पुरुष अगत्याने आले होते. उशीरा पोहोचल्यामुळे सरकारी खाना ८ चा ९ वाजता केला होता. त्यामुळे सोय झाली.

विदेशमंत्र्यांच्या घरी जेवण होते. त्यांचे ज्येष्ठ सहकारी मंत्रि, रक्षामंत्रि, वित्तमंत्रि, ऊर्जामंत्रि वगैरे होते. जेवणाचे प्रकार आपल्या सारखेच होते. कबाब, पिलाऊ, मटर भाजी, इकडचा मासा – परंतु करण्याची पद्धत आपल्यासारखीच वाटली. स्वागतपर भाषणे झाली. चर्चावजा गोष्टी झाल्या.

बांगला देश, पाकिस्तान, आर्थिक स्थिती, हिंदी महासागर – भुत्तो, श्रीमति इंदिरा गांधी, महात्मा गांधी, कमाल अतातुर्क असे विषय होते.

मी इतकी विविध पण महत्त्वाची खाती गेल्या १४ वर्षांत सांभाळली, त्याची चर्चा त्यांनी काढली. हा प्रश्न मला नेहमीच विचारतात की, 'यांतले कोणते तुम्हाला आवडले वा कोणते महत्त्वाचे आहे ?' मला कधीच याचे समाधानकारक उत्तर देता आले नाही. मी विनोद करून प्रश्न निभावून नेतो एवढेच.

हॉटेलमध्ये परत आलो तेव्हा तेथील रात्रीचा एक वाजला होता; म्हणजे दिल्लीचे साडेतीन. आजचा दिवस, २१ तास एकसारखा जागून कामात – वाचनात – प्रवासात – जेवणात – चर्चेत गेला. फार थकून गेलो. सकाळी ७ वाजता उठल्याशिवाय वेळेवर काम सुरू होणार नाही ही चिंता करीत झोपी गेलो. पण सहा तास झोप चांगली मिळाली.

*

## ७६ अंकारा

१ एप्रिल, १९७६

राजदूत श्री. एन्. बी. मेनन सकाळी ८ वाजता आले. तासभर दोन दिवसांच्या चर्चेची धोरणे आखली. ९॥ वाजता अतातुर्कच्या स्मारकास अभिवादनास गेलो. आपल्याकडे जसे पाहुणे राजघाटावर गांधीजींना पुष्पचक्र वाहतात तसे. गंभीर समारंभ असतो. हे एक भव्य व विस्तीर्ण स्मारक आहे. खूप अंतर व बऱ्याचशा पायऱ्या चालाव्या, चढाव्या लागतात. तेथेच अतातुर्कच्या खाजगी वस्तूंचे वगैरे म्युझियम आहे.

१० वाजता विदेश-मंत्रालयात एक तासभर स्वतंत्र चर्चा. फक्त श्री. चलयांजिल व इंटरप्रिटर असे आम्ही तिघेच होतो. तो स्पष्ट

बोलला. यामध्ये आग्रहाने बोलविण्याच्या पाठीमागचे उद्देश समजले. काहीच अनपेक्षित नव्हते.

त्यांचे प्रमुख उद्देश नॉन-अलाइन समिटला गेस्ट म्हणून हजर राहावयाचे आहे. सायप्रसबाबत आम्ही रिझनेवल धोरण घेत आहोत असे ते मानतात. पण त्यांचा प्रश्न अधिक समजून घेऊन त्यांना पाठिंबा, शक्ती द्यावी.

नॉन-अलायनमेंटचे ते पहिल्यापासून मोठे विरोधक व टीकाकार पण आता ते त्याची सहानुभूती चाहतात. संबंध-सहयोग अधिक वाढावा ही इच्छा.

ते नुकतेच अमेरिकेची बंद झालेली शस्त्रास्त्र-मदत पुन्हा सुरू करण्याचे करार करून परतले आहेत. त्याची हकिगत सांगत होते. ज्या Geo-political frame work मध्ये ते आहेत, त्यामध्ये नाटो, यू. एस्. ए. यांचेशी असलेले करार चालू ठेवण्याखेरीज गत्यंतरच नाही. हेलेंसिकीला त्यांचा पाठिंबा आहे. यू. एस्. एस्. आर. Bilateral सहकार्य समजुतीने वाढविण्याचा ते प्रयत्न करीत आहेत.

> आजच्या जागतिक शक्तींचा तो चक्रव्यूह आहे त्यात एक सुपर पॉवरशी संबंध वा करार असणे ही राष्ट्रीय संरक्षणाची हमी ठरत नाही असे मात्र टर्कीला हल्ली वाटू लागले आहे. आणि म्हणून धोरणाची ही दिशा ठरत आहे असे त्यांचे समर्थन.

नकाशावर सायप्रसची स्थिती व महत्त्व त्यांच्या देशाला का आहे ते त्यांनी सांगितले. 'एजियन सी' मध्ये टर्कीच्या किनाऱ्याला लागून असलेल्या बेटासह सर्व बेटांवर ग्रीकची मालकी असून समुद्रात सर्वत्र त्यांची नाकेबंदी झाली आहे. सायप्रस हेच एक त्यांना भूमध्य समुद्रातील 'ओपनिंग' आहे.

नंतर आम्ही ऑफिशयल ग्रूपमध्ये गेलो. त्यांच्या प्राथमिक स्वागतानंतर मी आमच्या धोरणाची मूलतत्त्वे व आमची विदेशनीति तत्त्वप्रधान कशी आहे हे सांगितले. टर्कीची मैत्री वाढवावी अशी आमचीही इच्छा आहे. बिग् पॉवरशी आमचे संबंध कसे व का आहेत आणि आमच्या रिजनमध्ये सहकार्य व मैत्री हे ध्येय बायलॅटरियन मधूनच

आम्ही कसे वाढवू इच्छितो हे सांगितले. श्रीलंका, ब्रह्मदेश, नेपाळ, भूतान वगैरे देशांची उदाहरणे दिली.

पाकिस्तानसंबंधी विषय-प्रवेश केला आणि आजच्या चर्चेची वेळ संपली. (हेरकथेच्या निवेदनासारखे झाले. सर्व कथा सांगता सांगता गुन्हेगार सुरा घेऊन धावला आणि पुढची कथा पुढच्या प्रकरणात सुरू करू असे म्हणण्यासारखे झाले.) आता पाकिस्तानचे विश्लेषण उद्या असे मी म्हणताच सर्वजण मनापासून हसले.

दुपारचे जेवण राजदूतांचे घरी झाले. आपल्या मालकीचे घर म्हणजे भारतभूमीचा एक तुकडाच इथे आहे. फार सुरेख जागा निवडली आहे. घर सुद्धा फारच सुंदर आहे. सर्वांच्या नजरेत भरण्याजोगे. महत्त्वाच्या लोकवस्तीत व महत्त्वाच्या रस्त्यावर. ज्याने कुणी ही निवड केली व बांधकाम करून घेतले असेल त्या राजदूताची नित्य आठवण येत राहील.

या जेवणास फक्त भारतीय होते. दूतावासांतील जोडपी, त्याचप्रमाणे येथे विश्वविद्यालय, यू. एन्. संस्था, व्यापार वगैरेमध्ये काम करणारी मंडळी होती. घरच्यासारखे मोकळे वातावरण होते. हिंदुस्थानसंबंधी त्यांना पुष्कळ ऐकावयाचे होते. मी त्यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे देऊन एक छोटेसे भाषणही केले.

यावरून आठवण झाली. तुर्कस्थानचे सर्व वातावरण आधुनिक आहे. त्याचे उत्तम प्रतिक येथील स्त्री आहे. अतातुर्क केमालने देशच स्वतंत्र केला असे नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक नवे युगच आणले. फक्त पडदाच काढला एवढे नव्हे, तर पोषाख, शिक्षण, सरमिसळ हिंडणे, फिरणे सर्व काही अगदी युरोपीय वातावरण दिसते.

त्यांनी अरबी लिपी टाकून लॅटिन लिपी घेतली आहे. कुटुंबसंस्थेचे लागेबांधे–ओढ–जिव्हाळा हे जुने संस्कार आजही मजबूत आहेत. मिसेस् चलयांजिल जेवणाच्या वेळी तिच्या जुजबी इंग्रजीमध्ये सांगत होती की तिला एकच मुलगी आहे. तिला चार नातवंडे आहेत. सुट्टीच्या निमित्ताने तिच्याकडे आली आहेत. तिच्या चेहेऱ्यावर जो आनंद दिसत होता तो पाहून कुणाचेही मन भरून गेले असते. भाषा अपुरी होती

म्हणून की काय तिच्या चेहऱ्यावरील भाव – डोळ्यांतले वात्सल्य – हाताच्या खुणा हे सर्व काही सांगून गेले.

जेवण संपेपर्यंत या आमच्या चाललेल्या संभाषणातून एक गोष्ट पुन्हा पुन्हा माझ्या मनात येऊन गेली की, उत्तम भाषा जाणणारा, आपले विचार व भावना हुषारीने लपवू शकतो. एका अर्थाने भाषेचे ज्ञान, कौशल्य, अभिव्यक्तिसाठी की काही खुबीने राखून ठेवण्यासाठी ? साहित्यसंमेलनात चर्चेसाठी घेण्यासारखा विषय आहे.

दुपारी प्राईम मिनिस्टर डेमरेल यांना भेटलो. हुषार राजकारणी, Rightist आहे. करामती आहे. बोलण्याचा शोक आहे. ४५ मिनिटांच्या आमच्या बोलण्यात ३० मिनिटे तोच बोलत होता.

हिंदुस्थानमध्ये चालू असलेल्या इमर्जन्सीबाबत अनुकूल बोलत होता. कोर्टस् कशा अडचणी निर्माण करतात आणि त्यामुळे शिस्त, स्थैर्य राखणे कसे अवघड जाते वगैरे.

आर्थिक प्रगतीच्या पहिल्या दुसऱ्या टप्प्यावर असणाऱ्या देशांमध्ये लोकशाही संस्था टिकविणे हे महान् कठीण होत चालले आहे. त्यांच्या संविधानामध्ये इमर्जन्सी जाहीर करण्याची सोय नाही अशी बारीकशी तक्रारही केली. श्रीमती गांधींना मुक्तकंठाने पाठिंबा देत होता.

मी त्यांच्या काही गैरसमजुती दूर केल्या. संविधानाप्रमाणे आमची इमर्जन्सी तात्पुरती आहे. आम्ही फ्रेंच संविधानाच्या धर्तीवर जाण्याची शक्यता नाही. लोकशाही संस्था टिकविण्यासाठीच आम्हाला इमर्जन्सीचा वापर करावा लागला. अर्थात् त्याचा परिणाम अनेक क्षेत्रांत चांगला दिसून येत आहे.

लोकशाहीची गाडी बेफाट वेगाने धावू लागली आणि स्वयंनियंत्रणाची आशा दिसेनाशी होऊन गाडी भयानक अपघातात सापडून लोकशाहीच्या विनाशाखेरीज दुसरा मार्ग दिसत नाही, तेव्हा 'ब्रेक' म्हणून वापरण्यासाठी आमच्या घटनेने आम्हाला साधन दिले आहे. हा आत्मविश्वास या प्रसंगाने भारतीय जनतेला दिला आहे वगैरे.

नेहमीप्रमाणे पाकिस्तान आलेच. 'तुम्ही मित्र शस्त्रास्त्रे देऊन त्यांना बेफाम करू नका म्हणजे आमचा समझोता लवकर होईल.' असे

मी त्यांना हसत हसत पण स्पष्टपणे सांगून टाकले.

नंतर लगेच प्रेसिडेंटना भेटलो. सत्तरीच्या वरचे ज्येष्ठ गृहस्थ होते. आपण 'अर्ली-फिफ्टीज' मध्ये राजदूत म्हणून असताना श्री. के. पी. एस्. मेनन भारताचे प्रतिनिधी होते. त्यांची आपली ओळख कशी होती वगैरे, म्हातारी माणसे जुन्या गोष्टी सांगतात तशी सुरुवात करून आजचे तुर्कस्तानचे जे प्रश्न आहेत त्यासंबंधी बोलले.

आर्चबिशप मकॉरिएस हे त्यांच्या (म्हणजे सर्वांच्याच) टीकेचे निशाण होते. राजदूतांनी कसे काम करावे हे आपल्या अनुभवाचे काही विचार सांगितले. अगदी शिक्षकी थाटात. त्यामुळे थोडी मजा आली. टर्की व भारतीय, दोन्ही राजदूत हजर होते. मी मजेने म्हटले, 'प्रेसिडेंट-साहेब, आपला उपदेश दोघेही राजदूत मोठ्या लक्षपूर्वक ऐकत आहेत. मला आशा आहे की, ते आपल्या इतर सहकाऱ्यांशी याची देवाण-घेवाण करतील.'

चर्चेत फार खोली येऊ शकली नाही. पण गांभीर्य व उच्चपदाचा दर्जा त्यात होता. तेथून मी हॉटेलकडे परतलो.

दिवसभर गर्दी व धावपळ होती. ६॥ वाजून गेले होते. रात्री मी देणार असणाऱ्या जेवणाला चांगला दीड तास अवकाश होता. म्हणून बिछान्यावर पडून राहिलो.

हॉटेलमधल्या या राजेशाही सूटमध्ये माझी झोपण्याची खोली पश्चिमेकडे आहे. उजेड व्हावा म्हणून पडदे दूर करून लांब-रुंद काचेने बंदिस्त असलेल्या खिडकीतून पाहिले तर विलक्षण दृश्य दिसत होते.

खाली रस्त्यावरून मोटारींची रांग हळू हळू पुढे सरकत होती. अधून मधून दिवे लागत होते. पण पश्चिम क्षितिजावर सूर्याचे लाल बिंब स्वच्छ आकाशात एकाएकी लागलेल्या दिव्यासारखे भासले. पलंगावरून उठून खिडकीशी जाऊन किती तरी वेळ ते दृश्य नजरेत आणि काळजात साठवीत उभा राहिलो.

हळूहळू सूर्यबिंब डुबू लागले. पूर्ण बिंबाचे अर्धबिंब झाले आणि नंतर अधिक लहान होत होत शेवटी कुंकवाची एक लकेर रहावी असे राहिले. क्षणाभरात तेही लुप्त झाले. आणि सूर्य गेला– काहीतरी हरवले

असे वाटून मी खिडकीतून मागे फिरलो. उगीच एकाकी वाटू लागले.

काहीसा थकलोही होतो. स्नान करावयाचे ठरविले. गरम पाण्याचा टब भरून घेतला. त्यात पडून राहिलो– बराच वेळ– स्नानानंतर हलके वाटतेच. स्वच्छ नवे कपडे घातले आणि मघाशी उभा राहिलो होतो तेथे सहज चाळा म्हणून खिडकीपाशी गेलो. आणि काय आश्चर्य !

मघा जेथे सूर्याची लाल कोर बुडताना पाहिली त्याच्या बरोबर वर – क्षितिजापासून काहीशा उंचीवर चंद्राची बीजेची कोर मंद तेजाने उगवली होती. तिच्या बाजूला थोडया अंतरावर ( म्हणजे कित्येक कोटी मैल ) एकच एक चांदणी लुकलुकत होती. सगळे आकाश स्वच्छ होते. इतर चांदण्यांचा मागमूसही नव्हता.

खाली पाहिले तर – धावणाऱ्या मोटारींच्या प्रकाशझोतांची रांगच रांग. रस्ते प्रकाशमान होते. दिवसा तिथून दिसणारा डिफेन्स मिनिस्ट्रीच्या इमारतीचा आखीव-रेखीव समूह अंधारामुळे अस्पष्ट झाला होता. उजव्या बाजूला मशिदीचे मिनार काहीसे धूसर पण सरळ रेषेत उंच उभे होते.

मी मागे फिरलो. सर्व खोल्यांतील दिवे बंद केले आणि अंधारात, त्या दरबारी खोल्यातील सजावटीकडे पाठ करून चंद्राची ती कोर आणि साथीची ती चांदणी एकसारखा टक लावून डोळे भरून पहात राहिलो.

किती वेळ गेला कोण जाणे. दारावर थाप पडल्यासारखे वाटले. जेवणाची वेळ झाली होती. मी होस्ट होतो. कसेतरी जुलमाने तिथून पाय काढले आणि फॉरमॅलिटिज् सुरू झाल्या. जेवण अकरा वाजेपर्यंत चालले होते.

परत येऊन पहातो तो बीजेची ती कोर आणि चांदणी, या तिथे दिसत नव्हत्या. सृष्टीक्रमाने त्यांनाही मावळवले होते. आता मात्र आकाशात इतर बऱ्याच चांदण्या इतस्ततः चमकताना दिसत होत्या. खरे म्हणजे यात तसे काही नवीन नव्हते. पण आज तरी ही एकच गोष्ट परत परत मनात येत राहिली. याचाच विचार करीत झोपी गेलो.

❋

२ एप्रील, १९७६

सकाळी ९॥ वाजता बाहेर पडलो. ९॥ ते १२ करारावर सह्या आणि उभयपक्षी चर्चा झाल्या.

चर्चेला बसण्यापूर्वी श्री. चलियांजिलशी मी खाजगी भेटून पाकिस्तानला टर्कीकडून होणाऱ्या शस्त्र-सहाय्याबाबत तपशीलवार बोलून मैत्री वाढविण्याच्या इच्छेची कसोटी, ही गोष्ट ठरविणार आहे हे स्पष्ट केले.

त्यांनी आपली शस्त्रे आपण त्यांना देत नाही असे सांगितले. पण भविष्याबाबत आपल्या पंतप्रधानांशी, आमची भावना व हितसंबंध काय आहेत ते चर्चा करून स्पष्ट करू असे आश्वासन दिले.

फ्लेनरीमध्ये झालेल्या चर्चेत पूर्वी उल्लेख केलेले मुद्दे तपशीलाने मांडले. मी आमची धोरणे मागचा विचाराचा धागा धरून पुढे आणखीन तासाभराच्या बोलण्यात स्पष्ट केली.

दुपारनंतर म्युझियम पाहिले. अनातोलियाने अनेक संस्कृतींचा उदय – अंत पाहिला आहे. त्याचे अवशेष या म्युझियममध्ये आहेत. तास-दीडतास यामध्ये गेला.

संध्याकाळी श्री. एन्. बी. मेननच्या घरी रिसेप्शन होते. अंकारातील प्रसिद्ध पत्रकार, संपादक, लेखक आणि विश्वविद्यालयांतील आचार्य-मंडळी आणि विदेशमंत्रि व त्यांचे अधिकारी एवढेच बोलाविले होते. नेहमी दिसणारा 'डिप्लोमॅटिक-क्राऊड' बोलाविलाच नव्हता. त्यामुळे औपचारिकता कमी होती. स्थानिक मंडळींना भेटता-बोलता आले.

श्री. चलियांजिलनी आज पुन्हा रात्री जेवण दिले. हे अनौपचारिक होते. आमच्या डेलिगेशनचे लोक आणि त्यांचे निवडक अधिकारी असे फक्त १५-२० जण असू.

जेवणाला पार्श्वभूमी – पियानो, व्हायोलिनच्या वादनाची होती. प्रसिद्ध वादक निमंत्रिले होते. जेवणानंतर अंकारातील प्रसिद्ध गायिकेने

काही गाणी म्हटली. पश्चिमी संगीताचीही पकड तुर्कस्तानवर आहे याची जाणीव झाली.

त्यानंतर मात्र ऐन तुर्कस्तानी लोकनृत्याचा जो कार्यक्रम झाला तो अगदी संस्मरणीय झाला. चार तरुण मुले व मुली यांचा हा संच कुठेही गेला तरी नाव कमवील. त्यांच्या नृत्यात ग्रेस होती. कल्चर, व्हिगर, ऱ्हिदम सर्व काही होते.

त्यांच्या नृत्यातला माझ्यावर परिणाम करून गेला एक तीन-चार मिनिटांचा ॲटम् – शेख सलामची प्रार्थना असे काहीतरी नाव होते. त्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे म्हणे !

शेख सलाम हा त्यांचा आवडता योद्धा होता. तो रशियाशी ( झारच्या ) अनेकवार धैर्याने लढला, पण शेवटी हरला. लढाईत कामी आला.

त्यानंतर तुर्क जनतेने त्याच्यासाठी अखेरची प्रार्थना केली. हे नृत्य त्याचे प्रतिकात्मक आहे. चार मुली एका पाठोपाठ फार ग्रेसफुली येऊन प्रार्थनेसाठी ( नमाजीसाठी ) येऊन ज्या तऱ्हेने बसतात ते आणि त्याच वेळी त्यांची वाद्ये जे सूर साथीला देत होते त्यांतील आर्तता, मी क्वचितच अनुभवली होती.

या आर्ततेच्या मूडमध्येच मी निरोप घेतला. तुर्की अगत्य आणि आतिथ्य यांचा आज खरा अनुभव आला. मोठे षोकी लोक ! त्यात शालीनता होती आणि दर्जेदारपणाही.

सकाळी ७ वाजता काम सुरू करावयाचे असल्यामुळे ११ वाजताच दिवस संपविला. लिहिणे बरेच लांबले. पुढचे इस्तंबूलहून.

*

४ एप्रिल, १९७६

आणखीन एक तासाने घरी यावयाला येथून निघू. काल सकाळी १० वाजता अंकाराहून निघालो. फार लवकर उठून तयार होऊन श्री. एजिव्हिल यांना भेटण्यासाठी गेलो. ते विरोधी पक्षाचे आजचे नेते आहेत. ४७ - ४८ वर्षांचे तरुण गृहस्थ आहेत.

पुरोगामी विचाराचे विचारवंत असल्याचा लौकिक आहे. हिंदुस्थानबद्दल व विशेषतः टागोर आणि पं. नेहरू यांच्याबद्दल त्यांना फार आदर आहे.

मला, त्यांना भेटण्याची इच्छा आहे हे राजदूतांना कळविले होते. तेथील सरकारी धोरणामुळे अधिकृत सर्व कार्यक्रम संपेपर्यंत ते शक्य झाले नाही. म्हणून निघण्यापूर्वी सकाळी, ब्रेकफास्टसाठी त्यांनी निमंत्रित केले होते.

गावाच्या बाहेर १०-१२ मैलांवर नवीन लहानशी वस्ती बनत आहे. त्यातल्या एका छोटचा मध्यमवर्गीय अपार्टमेंट हाउसमध्ये त्यांच्या फ्लॅटवर दोन जिने चढून आम्ही गेलो.

नवरा-बायको दोघेही हसतमुख दाराशी होते. सबंध घर पुस्तकांनी भरून गेले आहे. ते तरुण विद्यार्थी असतांना बंगाली शिकून टागोरांच्या गीतांजलीचे (काही गीतांचे) टर्किशमध्ये भाषांतर त्यांनी प्रसिद्ध केले होते. त्याची एक प्रत त्यांनी मला दाखविली.

दोन अडीच वर्षांपूर्वी, प्रधानमंत्रि होण्यापूर्वी त्यांनी भगवद्गीतेचे भाषांतर करणे सुरू केले होते. त्यानंतर कामाच्या बोजामुळे ते बंद ठेवावे लागले होते. आता ते परत सुरू केले आहे असे ते म्हणाले.

मनुष्य मोठा उमदा वाटला. गंभीर स्वभाव – विवेचक बुद्धिवादी. प्रसंगी मनमोकळे हसणारा. एकंदरीत प्रसन्न व्यक्तिमत्त्व.

चर्चा सुरू झाली त्यांच्या लिबियाच्या भेटीपासून. तेथून ते नुकतेच परतले आहेत. पंतप्रधान जालोदबद्दल चांगले बोलले. साधनांचा

(ऑइलमनी) सामाजिक न्यायाच्या पायावरील समाज, उपयोग करणारा अरब देश असे त्यांनी लिबियाचे आशावादी वर्णन केले वा (इन्फर्मेशन) सांगितले.

नंतर ते बांगलादेशावर आले. फराकाची पार्श्वभूमी व आजचा प्रश्न आणि त्यासंबंधी एकांगी प्रचार कसा चालू आहे त्याचा तपशील मी दिला. आजही त्या देशात मूलभूत अस्थैर्याचे वातावरण का व कसे आहे यासंबंधी मी चर्चा केली.

नंतर तेहून टर्कीचा अंतर्गत प्रश्न, त्याचे आंतरराष्ट्रीय परिणाम वगैरेसंबंधी तपशीलाने बोलले. आजच्या टर्किश सरकारजवळ 'कोहिरंट' आर्थिक धोरण नाही. त्याने प्रश्न बिकट होत चालले आहेत. एक दीड वर्षांत निवडणुकी होतील आणि आपला पक्ष बहुमतात येईल असा आत्मविश्वास त्यांनी प्रकट केला.

हिंसेचे प्रकार – विशेषत: विद्यार्थ्यांमध्ये होत आहेत असे ते म्हणाले. परंतु त्यांचा विरोधीपक्ष, अशा प्रकारांना मुळीच उत्तेजन देत नाही. त्यावर त्यांचा विश्वास नाही. उलट आपला पक्ष यापासून दक्षतेने अलिप्त आहे. टर्कीचे जे दोन राष्ट्रीय महत्त्वाचे प्रश्न आहेत, (१) सायप्रस आणि (२) एजियन समुद्र, त्यांची उत्तरे गुंतागुंतीची होत चालली आहेत. यावर फक्त अमेरिका व पश्चिमी राष्ट्रे यांच्यावर अवलंबून राहून चालणार नाही. नाटो सोडणे अवघड असेल कदाचित, तरीही धीटपणे विकसनशील देशांशी अधिक जवळकीचे संबंध प्रस्थापित केले पाहिजेत. हे मूळ सूत्र ते सांगत होते.

त्यांचे ज्येष्ठ सहकारी – त्यांच्या सरकारमधील माजी रक्षामंत्रि व त्यांच्या पक्षाचे जनरल सेक्रेटरी हजर होते.

दोघेही पति-पत्नी अगत्यशील व प्रेमळ होते. राहणी साधी व नीटनेटकी आहे. माझा दीड तास केव्हा गेला ते समजले नाही.

परत हॉटेलवर आलो नि पाच मिनिटांत एअर-पोर्टवर जाण्यासाठी श्री. चलयांजिल आले. ४५ मिनिटांच्या एअरपोर्टच्या वाटेवर, महत्त्वाचे असे, काही आणखीन राजकीय विषय त्यांनी पूर्वी कबूल

केल्याप्रमाणे बोलून घेतले. श्री. एन्. बी. मेननला हा तपशील मी इस्तंबूलमध्ये पोहोचताच दिला.

एअर-पोर्टवर निरोप घेऊन निघताना अवघड वाटावे इतक्या प्रेमाने व अगत्याने सर्व लोक – विशेषतः विदेशमंत्रि वागले.

*

## ७९ अल्जीअर्स

२ जून, १९७६

बऱ्याच म्हणजे अगदी पुष्कळ वर्षांनंतर या दिवशी आपण एकत्र नाही आणि म्हणून अगदी चुकल्या-चुकल्यासारखे वाटते. येथे ३१ मे ला सकाळी झोपेतून जागा झालो तुझी हाक ऐकून – मला खरेच वाटले तू उठवते आहेस. तुझा आवाज काहीसा घाबरट वाटला – पण हे सर्व स्वप्न होते. त्यामुळे गेले दोन दिवस मनाला काहीशी हुरहूर आहे.

उद्या येथून पॅरिसला जायला निघेन. आज रात्री परिषद संपली. आमच्या मनासारखे सर्वच झाले नाही. पण मनाविरुद्धही झाले नाही.

तत्त्वाच्या भूमिकेवरून खूप खेचून धरले. एकाकी राहिलो तरी हरकत नाही असा काहीसा विचार केला. त्यामुळे या परिषदेमधून तरी सुखरूप निघालो.

आंतरराष्ट्रीय व्यवहारात एकाकी पडणे चांगले नसते. (खरे म्हणजे कुठल्याच व्यवहारात ते शहाणपणाचे नसते) पण या वेळी खेचून धरले नसते, लष्करी गटवाल्या राष्ट्रांचा चंचुप्रवेश झाला असता आणि नॉन-अलाइन्ड हे जागतिक आंदोलन संकटग्रस्त व दुर्बल झाले असते म्हणून हा सारा खटाटोप.

परिषदेचे महत्त्व होते, त्यामुळे दररोज पंतप्रधानांसाठी अहवाल पाठवीत होतो. ए. आय्. सी. सी. चुकली ही खंत मनात एकसारखी आहे.

१९४७ नंतर प्रथमच हे घडले. I am missing many dear things this year. Why ? Perhaps due to new pattern of life. Perhaps destiny wills it.

अल्जेरिया हे भूमध्य समुद्राच्या दक्षिण किनाऱ्यावरचे अरबराष्ट्र. अल्जिरिया ही राजधानी. १८–२० लाख वस्तीचे शहर. समुद्रकाठी विस्तृत पहाडी चढउतारावर वसलेले सुंदर शहर वाटते.

परिषद सोडून बाहेर फारसे जाताच आले नाही. फिपासा (Fpasa) म्हणून ४० मैलांवर एक ठिकाण आहे. तेथे मीटिंगमधल्या सुट्टीत – दोन-तीन तासांच्या – घाईघाईने जाऊन आलो. रोमन साम्राज्याधीन जेव्हा हा मुलुख पहिल्या दुसऱ्या शतकात केव्हातरी होता, त्या वेळचे अवशेष तेथे आहेत. रोमन्स – अरब – तुर्क – फ्रेंच आणि स्वराज्य असा काहीसा क्रम इतिहासाचा दिसतो. फ्रेंच भाषेचे प्रभुत्व फार. अरबी राष्ट्रभाषा आणि जनभाषाही आहे.

राष्ट्राध्यक्ष श्री. बूमेदिवेनला भेटलो. उंच, सडपातळ–गोरापान, आकर्षक व्यक्तिमत्त्व. लष्करी राजवट आहे. पण माणूस आत्मविश्वासू असल्यामुळे बोलण्या-वागण्यामध्ये अनौपचारिक व मोकळा वाटला.

अब्दुल अझिल बूटफ्लिका – परराष्ट्रमंत्रि – चलाख - महत्त्वाकांक्षी पण बुद्धिमान माणूस आहे. अशी माणसे अशा राजवटीत किती टिकतात हे सांगणे अवघड. पण तो मात्र गेली १३ वर्षे ओळीने परराष्ट्र-मंत्रि आहे.

आज रात्री, मला न सांगता, बरोबरच्या सर्व ऑफिसर्सनी लग्नाच्या वाढदिवसाचा केक आणून समारंभपूर्वक जेवण दिले. That was very sweet of them. मी त्यांचे मनापासून आभार मानले.

आल्यापासून क्षणाचीही फुरसत नाही. सर्व वेळ कामात, चर्चेत, भेटीत व परिषदेत जातो. किंबहुना वेळ पुरतच नाही म्हटले तरी चालेल.

डोळ्यांवर झोप आहे, पण लिहिणे पुरे केल्याशिवाय बिछान्यावर पडावयाचे नाही या निर्धाराने ते पुरे करीत आहे. प्रकृति सुदैवाने चांगली आहे.

– ता. क. – आजचा* दिवस तुझ्या स्नेहल, सुखद सोबतीच्या शुभारंभाचा दिवस, म्हणून मला त्याचे फार मोल आहे.

सुखदु:खांच्या ऊन-सावलीत, एकमेकांच्या मदतीने केलेला हा प्रवास तसा आनंददायी झालेला आहे. माझी तृप्ती आहे. अशीच अखेरपर्यंत सोबत दे.

*

## ८० जकार्ता (इंडोनेशिया)

२१ जुलै, १९७६

काल संध्याकाळी येथे पोहोचलो. मुंबईहून दीड तास विमान उशीरा निघाल्यामुळे चिंता होती की सिंगापूरचे एअर-लाईनचे कनेक्शन तर चुकणार नाही! पण १५ – २० मिनिटे वेळेत पोहोचलो व कसेतरी कनेक्शन मिळाले.

डॉ. आदम मलिक – येथील विदेशमंत्रि – इतर प्रमुख अधिकारी आणि हिंदी समाजाचे प्रमुख स्त्री-पुरुष हजर होते. तडक हॉटेलमध्ये व तेथून लगेच येथील राजदूत श्री. मेहबूब याच्या घरी जेवणासाठी गेलो.

जेवणापेक्षा येथे प्रथम आलेले आमचे अधिकारी आणि आमच्या दूतालयाच्या अधिकाऱ्यांशी मी येण्यापूर्वी चर्चेत घडले आहे काय काय आणि उद्याची चर्चा कोणत्या स्वरूपाची असावी याबाबत करावयाचे गुफ्तगूला अधिक महत्त्व होते. हॉटेल्सपेक्षा अशा ठिकाणी चर्चा अधिक स्पष्ट व सुरक्षितपणे करता येते. रात्री ११ वाजेपर्यंत यात वेळ गेला.

या देशाचे आमचे संबंध अनेकविध वळणांतून गेले आहेत. प्रथम स्वतंत्र होणारे हिंदी महासागरातील प्रमुख देश म्हणून आणि

* दि. २ जून हा दिवस यशवंतराव-वेणुताई यांच्या विवाहाचा वाढदिवस.

नॉन-अलाइन्ड विचारसरणीचे उद्गाते या नात्याने या देशाचे फार जवळचे संबंध आले.

प्रे. सुकार्नोंना तू ओळखतेस. मुंबईस आपले ते पाहुणे होते. सह्याद्रीवरचा खाना कदाचित् तुला आठवत असेल. विलक्षण कर्तृत्वाचा पण काहीसा कारस्थानी आणि अहंकारी गृहस्थ होता. स्वभाव पाऱ्याशी स्पर्धा करेल असा चंचल होता. त्यांच्या खाजगी जीवनासंबंधी आपणास काही कर्तव्य नाही; पण मी हे सर्व राजकीय नेता म्हणून तो कसा होता या संदर्भात लिहीत आहे.

नवीन राष्ट्र म्हणून इंडोनेशियाला घडविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. पण पुढे अहंकारामुळे त्या राष्ट्राच्या जीवनात अनेक संकटे त्यांनी निर्माण केली.

कम्युनिस्ट (चायनीज फॅक्शन) पक्षाचे महत्त्व वाढवून ठेवले.

सैन्याच्या सर्व शाखांत हे लोक सर्व थरांत घुसले होते. चायनाच्या मैत्रीला अवास्तव महत्त्व देऊन यू. एन्. सभासदत्वावर बहिष्कार टाकला.

१९६२ ते ६५ अखेर आमचे संबंध फारच दुरावले होते. १९६५ च्या संघर्षामध्ये पाकिस्तानला मदतीसाठी नेव्ही पाठविण्यापर्यंत मजल गेली होती.

आंतरराष्ट्रीय संबंधातल्या चुकीच्या निर्णयाची किंमत द्यावीच लागते. ६५ मध्ये अंतर्गत क्रांति झाली. कम्युनिस्टांशी हातमिळवणी केलेल्या अधिकाऱ्यांनी अवेळी उठाव केला आणि तो फसला. सुकार्नोंचा डाव हुकला आणि ते थोर राजकीय जीवन करुणास्पद झाले. संपले.

तेव्हा आजचे प्रेसिडेंट सुहार्तो यांनी बाजी मारली. हे नेतृत्व अधिकारावर आले. लक्षावधी कम्युनिस्ट अनुयायांची कत्तल झाली. देश दुसऱ्या टोकाला गेला. तेव्हापासून कठोर साम्यवाद, चीनविरोध हे परराष्ट्र-धोरणाचे सूत्र बनले. ते आजतागायत आहे.

स्वाभाविकच घड्याळाचा लंबक दुसऱ्या टोकाला गेला. कम्युनिझमविरोधी तत्त्वज्ञान व यू. एस्. ए. आदि पश्चिमी राष्ट्रांची मांडलिकी ( ? ) स्वरूपाची मैत्री या दिशेने वारे वाहत आहे.

१९६६ पासून सावकाशपणे आणि सावधानतेने आपल्या राष्ट्राशी त्यांचे संबंध सुधारू लागले. आज ते बऱ्या अवस्थेत आहेत. त्यांच्या आमच्यामध्ये संघर्षाचे प्रश्न नाहीत. कॉन्टिनेंटल सेल आणि सागरांतर्गत सीमांचा प्रश्नही तडजोडीने सुटल्यामुळे एक प्रकारचे मैत्रीचे व मोकळे-पणाचे वातावरण निर्माण झाले आहे.

इस्लामचे महत्त्व जास्त असले तरी तो कडवा नाही. बाली सारख्या एका बेटावर २० लाखांपेक्षा जास्त हिंदू आहेत. त्यांच्या संस्कृतीशी शासनाची सहानुभूती आहे. हे नवे संबंध अधिक मजबूत व अर्थपूर्ण करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत राहणे ही आमच्या विदेश-नीतीची दृष्टी राहील.

आग्नेय आशियामध्ये इंडोनेशियाचे प्रमुख स्थान आहे. पॅसिफिक-मधून हिंदीसागरामध्ये येण्याच्या मार्गावरील प्रवेशद्वार असल्यासारखे ते वसले आहे. अशा राष्ट्राशी दृढ मैत्रीचे व सहकाराचे संबंध असणे आमच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.

माझ्या भेटीमागे ही लांबवरची नजर आहे. हे सर्व काही एका-एकी घडणार नाही. जगातील अजब गुंतागुंतीची सावटे इथेही कधी कधी पडतात आणि संशयाची भुते या सावटात दिसू लागतात. म्हणून सावधानतेने, संयमाने, जपून पण प्रयत्नपूर्वक जाणिवेने हे संबंध वाढवा-वयाचे आहेत. भेटीची व चर्चेची ही पार्श्वभूमी आहे.

ता. २२ ला सकाळी प्रे. सुहार्तोंना भेटलो. ‘ ऑफिशियल प्लेस ’ हे अशा भेटीगाठी व सरकारी कामकाजासाठी वापरले जाते. ते राहतात दुसरीकडे कुठेतरी. विदेशमंत्र्यांच्या बाबतीतही तसेच आहे.

या भेटीच्या वेळी डॉ. मलिक हजर होते. प्रेसिडेंटची प्रकृति उत्तम दिसली. वागण्यात मोकळेपणा व स्नेह होता. इंदिराजींच्या प्रकृतीची चौकशी प्रथम क्षणीच त्यांनी करून जिव्हाळा दाखविला.

मी तीन मुद्दे स्पष्ट केले. १) अंतर्गत परिस्थिति,

2) Nuances of our foreign policy as reflected in our initiatives regarding Pakistan and China. याच वेळी बांगलादेश-तपशील—विशेषतः फराक्काबद्दल.

३) Non-alligned summit कोलंबो येथे भरणारे – त्यातील प्रश्न– ऐक्याची गरज – मूलभूत तत्त्वांना चिकटून राहण्याची व परस्पर सहकार्याची आवश्यकता.

या संदर्भात इंडोनेशियाशी आर्थिक, तांत्रिक ( टेक्निकल ) क्षेत्रांतील सहकार्य कसे वाढेल याबाबत. याशिवाय एशियन व इंडो-चायना यांचाही चर्चेत उल्लेख आला.

प्रेसिडेंटशी मी जवळ-जवळ २५ मिनिटे बोललो. त्यानंतर २०-२२ मिनिटे प्रेसिडेंट बोलले.

निर्गुट परिषदेच्या सभासदत्वाच्या तत्त्वाबाबत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी, मतभेद वाढतील अशा प्रश्नांची चर्चा टाळावी असे आपले मत व्यक्त करून आमच्याशी एकमत दाखविले. ( परंतु त्यांच्या मनात Timor ची चर्चा टाळावी असे असावे ). फिलिपाइन्स, थायलंडसारखे देश आपल्या धोरणात बदल करू इच्छितात. त्यांनी तसे बदलावे असे आपण प्रयत्न करीत आहोत असेही ते म्हणाले. तेव्हा अशा देशांना निदान आब्झर्वर म्हणून येऊ देणे इष्ट आहे. त्यात Non-alligned चा फायदा आहे. एशियन भाई भाई ही भावना या विचाराच्या मागे दिसली.

त्यानंतर खरी तपशीलवार चर्चा १० ते १ डॉ. मलिक यांचेशी केली.

I projected our foreign policy in it's broader perspective.

त्यांच्या मनात नाही म्हटले तरी खालील तीन गोष्टींच्या शंका स्पर्श करून जात असतील.

१) सोव्हिएट मैत्री, २) व्हिएटनाम वगैरे इंडो-चायनीज सोशॅलिस्ट स्टेटशी आमचे असलेले संबंध, ३) चीनशी संबंध सुधारण्यासाठी सुरू झालेल्या नव्या प्रयत्नांचा अर्थ व संदर्भ.

त्यासंबंधी खूप तपशीलाने बोललो. आमच्या विदेशनीतीच्या रचनेत 'बाय-लॅटरलियन अॅण्ड सेल्फ रिलायन्ट नॅशनॅलिझम' यांचे किती महत्त्वाचे स्थान आहे ही तत्त्वसूत्री स्पष्ट केली. एशियन देशांनी म्हणून नव्हे, तर यातील प्रत्येक देशाने आशियातील या समाजवादी देशांशी

मैत्रीचे–विश्वासाचे बंध निर्माण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे असे प्रतिपादिले.

अंतर्गत परिस्थिति – पाकिस्तान – बांगलादेश, यू. एस्. ए., यू. एस्. एस्. आर. हे सर्व ओघाने आलेच. Emphasized the common task of working out a frame work of economic and technical co-operation. दीड तासांपेक्षा जास्त बोललो.

डॉ. मलिक यांनी या सूत्रबद्ध परंतु सर्वस्पर्शी मांडणीबद्दल आनंद व्यक्त करून त्यांचे निवेदन केले. विशेषतः अमेरिका, पाकिस्तान व काबूल येथील भेटीच्या तपशीलाच्या संदर्भात त्यांनी विषय मांडला.

मी त्यांना विचारले होते की, श्री. भूत्तोचे चीनबाबत काय निदान आहे. मलिकांच्या मते चायनाबाबत भूत्तोची 'असेसमेंट' काहीशी बदलली आहे. अंतर्गत वादामुळे चीनची प्रगति काहीशी मंदावली आहे. त्यामुळे ते आक्रमक राजकीय पवित्रे टाकणार नाहीत आणि साऊथ-ईस्ट एशियनने चीनची भीति धरू नये.

अशी काहीशी चीनची वकिली केली परंतु माओनंतर आर्मी आणि पक्ष यांचे मिश्र सामुदायिक नेतृत्व चीनमध्ये येईल व ते रशियाशी जुळते घेण्याचा प्रयत्न करील अशी भूत्तोची 'असेसमेंट' आहे.

डॉ. मलिकच्या मते या 'असेसमेंट'च्या संदर्भात आशियामध्ये संपूर्ण चीनवर आधारलेली, भूत्तोचे धोरणाला, तो आता नवे 'ऑप्शन्स' शोधण्याच्या मार्गात असला पाहिजे. या सूत्राला धरूनच, अफगाणिस्तानशी संबंध सुधारण्याच्या धोरणाला अधिक अर्थ प्राप्त होतो असेही ते म्हणाले.

चीनशी आपले संबंध सुधारण्याची आपणाला घाई नाही असे ते वारंवार बजावून सांगत होते.

अमेरिकन फोर्सेस्ची साऊथ आशिया आणि हिंदी महासागरातील हजेरी राष्ट्रीय हिताला विरोधी आहे अशी आपली भूमिका त्यांनी मांडली.

चीन-अमेरिका एकमत असेल, पण ते स्वतःचे हितसंबंध लक्षात घेऊन विचार करतात म्हणून हे एकमत आहे असे आपण डॉ. किसिंजरला सांगितल्याचे ते बोलले. अर्थात् याची अंमलबजावणी करताना यू. एस्. ए. शी. 'कॅन्फ्रॉन्ट्रेशन' करावयाचे नाही. पण आपली विचारदृष्टि या

बाबतीत स्वच्छ आहे असे ते आग्रहपूर्वक सांगत होते.

या चर्चेनंतर 'फॉर्मल' चर्चा बंद केल्या व पुढील दोन-तीन दिवस आम्ही एकत्रच प्रवास करणार आहोत, तेव्हा बाकीचे विषय वा राहिलेला तपशील 'इन्फॉर्मली' या प्रवासात बोलू असे ठरले.

मोठा हुषार माणूस आहे. बऱ्याच वर्षांचा अनुभवी आहे. वागणूक फार मैत्रीची व अगत्याची होती. दुपारी त्यांचेकडे जेवण झाले. त्यानंतर आम्ही डेलिगेशनमध्ये तपशील बोललो. थोडी विश्रांति मिळाली.

उद्या सकाळी हिंदी समाजाचे कर्ते लोक व शाळा यांना भेट द्यावयाची आहे. नंतर दुपारी बालीस प्रयाण, पुढचे बालीमधून लिहीन.

*

## ८१ बाली (इंडोनेशिया)

२२ जुलै, १९७६

वर्षानुवर्षे ज्यासंबंधी वाचले – ऐकले ते बाली बेट आज पाहिले. दुपारी ११। (१–३०) जकर्ताहून निघालो. ३ वाजता पोहोचलो. दुपारचे जेवण विमानातच घेतले. विदेशमंत्रि डॉ. आदम मलिक आज त्यांचा वाढदिवस असतानाही या ट्रिपवर आमच्याबरोबर आलेले आहेत. मी बाली बेटावरील हिंदु-संस्कृति पहावी असा त्यांचा आग्रह गेल्या वर्षापासून होता.

विमानतळावर उतरताना आज अगदी बाली हिंदु-पद्धतीप्रमाणे स्वागत झाले.

दोन तरुण, महाभारतकालीन हिंदूंचा पेहेराव असावा तसा, अंगावर धारण करून राजस्वागत करण्यासाठी हातात छत्र-चामरे घेऊन आले होते.

त्याचप्रमाणे दोन प्रौढ कुमारी पुष्पमाला हाती धरून सामोऱ्या आल्या. कपाळावर कुंकू, गौरवर्णाकडे झुकणारी कांति, हिंदू विनम्रता – क्षणभर सर्व काही अगदी महाभारतकालीन वातावरणात असल्यासारखे वाटले.

या बाली स्टाइल स्वागतानंतर ' बाली-बीच ' हॉटेलमध्ये आलो. सुरेख बीच आहे. माझ्या खोलीच्या गच्चीत गेल्यावर पूर्व दिशेला, पसरलेला जावा समुद्र दिसला. क्षितिजावर अंधुकसे एक बेट व त्याच्यावरचे डोंगररांगांचे आकार दिसत होते. समुद्राचे पाणी शांत व स्वच्छ दिसले.

उद्या सकाळी सूर्योदयाचे आत या समुद्रकाठच्या चौपाटीवर अनवाणी चालण्याचा विचार आहे. बाली बेटावरची समुद्राची रेती उघड्या पायतळाला लागावी अशी इच्छा आहे. या भूमीवर नम्रतापूर्वक असेच चालले पाहिजे. हा हिंदूंचा मुलुख आहे. मी हे हिंदुत्ववादाच्या भावनेने नाही म्हणत – पण अजूनही येथे लाखो हिंदू परंपरागत कथांच्या आधारे चालत आलेली हिंदू संस्कृति जपत आहेत हे मी पाहिले.

चारच्या सुमाराला बाहेर पडून एका हिंदु कुटुंबाने चालविलेले हॅण्डिक्राफ्ट्स्चे केन्द्र पाहिले. त्याने आपल्या घराची आखणी दाखविली. ही परंपरागत आहे. घराला दरवाजा आहे. आत जाताच मोकळे अंगण, ईशान्येच्या बाजूला एक मंदिर. सामान्यतः सुखवस्तु हिंदू असेच आहेत. हिंदू संस्कृति आपला जातपातीचा वारसा येथेही घेऊन आली आहे.

पण बेट फार सुंदर आहे. केरळ – कोकणामध्ये असावी अशी गर्द झाडे, जमीन उत्तम म्हणून शेती उत्तम. इंडोनेशियाच्या स्टँडर्डच्या तुलनेने हे लोक अतिशय उद्योगी आहेत. नटलेला निसर्ग इतका विपुल आहे की, येथे नृत्य, चित्रकला, यांसारख्या कला शतकानुशतके पोसल्या गेल्या त्यात काय आश्चर्य !

डच, अमेरिकन ऑस्ट्रेलियन अनेक चित्रकार येथे येऊन महिनोमहिने राहतात. एक दोन तर येथेच लग्न करून राहिलेत. एक विविधतेने फुललेली आर्टस् गॅलरी संध्याकाळी आम्ही पाहिली.

रात्रीचे जेवण येथील गव्हर्नरचे घरी होते. ऑफिसियल 'रेसिडन्स' बाली घराचे धर्तीवर आहे. तेथे साधे जेवण दिल्यावर नृत्याचा कार्यक्रम झाला.

तीस लोक वेगवेगळी वाद्ये एकमेळाने वाजवितात. वाद्यवृंदाची ही बालीतील कल्पना काही शतकांची जुनी आहे. गव्हर्नरने मला एक प्रेझेंट दिले. गरुडावर आरूढ झालेले श्री विष्णू यांचे बालीतील रूप ! लाकडात कोरलेले आहे.

उद्या सकाळी आणखी एक कला-केंद्र पाहून जोगी-अकार्तासाठी निघणार आहोत.

एखाद्या रात्रीचा मुक्काम आणि चार सहा तासांची भटकंती एवढे बालीसाठी अपुरे आहे. काही दिवस राहून निवांतपणे पाहिले पाहिजे. पण केव्हा आणि कसे ?

येथील प्रवासात मी आणि डॉ. मलिक एकाच गाडीतून हिंडत असतो. तेव्हा औपचारिक जे बोलणे होत नाही अशा चर्चा निघतात.

कंबोडियाच्या प्रिन्स सिहनाकची गोष्ट निघाली. अंतर्गत परिस्थितीचा त्यांना काही अंदाज आहे का ? असे मी विचारले. तेव्हा फारसा नाही असे म्हणाले. व्हिएटनामचे डे. मिनिस्टर नुकतेच येथे येऊन गेले. त्यांनाही काही अधिक माहिती आहे असे दिसले नाही असेही ते म्हणाले.

मात्र एक मोठे मजेदार निवेदन त्यांनी केले. ते म्हणाले की, "प्रिन्स सिहनाकने पेकिंग लवकर सोडून दिले असते आणि पॅरिस किंवा असे कोठे तरी राहिले असते तर त्यांची आज जी दशा झाली आहे ती झाली नसती."

मी म्हटले, " परंतु त्यांच्याशी ज्यांनी दगलबाजी केली त्यांचेशी लढून, त्यांना पराजित करून, परत आपल्या भूमीत जनतेचा मित्र-सेवक, या नात्याने त्यांनी परत जाणे भूषणावह नाही का ?"

मलिक म्हणतात, " कोण जाणे ? असेल कदाचित्. पण आता ते संन्यास ( Monk ) घेणार आहेत. माझ्या कल्पनेप्रमाणे आजच्या राजवटीविरुद्ध निषेध (प्रोटेस्ट) व्यक्त करण्याचा तो एक मार्ग नाही का ?"

एशियन आणि इंडो चीन समाजवादी राष्ट्रांतील नेते एकमेकांकडे आतल्या मनातून कसे बघतात त्याचा हा एक नमुना आहे एवढेच म्हणता येईल.

*

## ८२ जोगीअकार्ता
( YOGYAKARTA )

२३ जुलै, १९७६

आताच डॉ. मलिक यांना आम्ही दिलेले रात्रीचे भोजन संपवून परत आलो. हॉटेलच्या वरच्या व शेवटच्या मजल्यावर स्वतंत्र व्यवस्था होती. जावा बेटावरील संगीताची पार्श्वभूमी होती.

आम्ही दोघांनीही अनौपचारिक भाषणे केली. गेले दोन दिवस, इंडोनेशियाचा हा सर्व सुप्रसिद्ध भाग मला आपल्या बरोबर नेऊन दाखवावा अशी त्यांची इच्छा होती. म्हणून ते माझ्या साथीला आहेत. मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानले.

सकाळी बालीहून निघण्यापूर्वी एक कला-केंद्र पाहिले. नानाविध लाकडांच्या कोरलेल्या मूर्ति होत्या. पारंपरिक आणि आधुनिक यांचे मिश्रण या संग्रहात आहे.

उभ्या, नाचणाऱ्या श्रीगणेशाची मूर्ति ही मला नवीन वाटली. मूर्ति आकर्षक होती. आणखीन एक नवेपण या मूर्तिमध्ये मी पाहिले. शंकराच्या गळ्यात जसा सर्प असतो तसा सर्प या गणेशाच्या कमरेला वेटाळून होता.

बाली हिंदूंमध्ये त्याच कथा – रामायणातल्या आणि महाभारतातील काहीशा फरकाने सांगतात. कर्मसिद्धांतावर आणि गीतेवर फार विश्वास. बालीतील हिंदू कर्मयोगाचे तत्त्व आचरणात आणतो असे एक हिंदू

वरिष्ठ अधिकारी सांगत होता. लोक उद्योगी आणि आनंदी आहेत त्याचे रहस्य त्यात आहे असे त्याचे मत.

गायीचे स्थान येथील हिंदूंच्या विचार-आचारात काय आहे हे मी मुद्दाम समजून घेण्यासाठी विचारले. ( विनोबाजींच्या उपोषणाचे संकट डोळ्यासमोर नव्हतेच असे नाही ). त्या गृहस्थाने सांगितले की आम्ही गायी पाळतो पण ते त्यांच्या दुभत्यासाठी आणि बैलासाठी. Priest-class (ब्राह्मण) सोडून बाकी सर्व हिंदू गोमांसभक्षक आहेत. आणि त्यात काही गैर व अधार्मिक आहे असे ते मुळीच मानीत नाहीत.

दुपारी ११-३० ला या शहरात (जोगी – अकर्ता) पोहोचलो. दोन नंतर येथून तीस मैलांवर बोरोबुडुर (Boro budar) हे विश्वविख्यात बुद्धमंदिर आहे ते पहाण्यासाठी गेलो.

हे मंदिर जगातील सर्वांत मोठे बुद्धमंदिर आहे. ९ व्या शतकात म्हणजे १००० वर्षांपूर्वी हे मंदिर बांधले. मंदिराची रचना, शिल्प म्हणून व बुद्ध तत्त्वज्ञानाचे प्रतिक म्हणूनसुद्धा अपूर्व आहे.

१२० गज लांब, रुंद व तितकेच उंच. ही लांबी-रुंदी पायाशी आहे. पण पुढे ती निमुळती होत जाते. शिखराचे जागी मोठा गोल स्तूप आहे. पूर्वेकडील प्रवेशद्वार हे प्रमुख आहे. त्यातून प्रवेश करावयाचा. जसजसे आपण वर जातो तसे प्रदक्षिणा घालता येईल अशी व्यवस्था वेगवेगळ्या उंचीच्या स्तरांवर केलेली आहे असे आढळून येते.

जशी जशी मंदिराची उंची चढत जाते, तसे तसे आध्यात्मिक अनुभवाचीही उंची वाढते असे दिग्दर्शित केले आहे. हे व्यक्त करण्यासाठी भगवान बुद्धांच्या मूर्तीच्या मुद्रांचा उपयोग केला आहे.

प्रथम 'रूपधातु'चे स्तरावर भगवान बुद्धांची मुद्रा भूमिस्पर्शाची आहे. अधिक वर जातो तशी ती 'धम्मचक्र' मुद्रा बनते आणि 'अरूपधातु' स्तरावर ती अभयदानाची, आशीर्वादाची, कदाचित् निर्वाणाची मुद्रा बनते.

अशा तऱ्हेने बुद्धांच्या ५६० मूर्ति सर्व मंदिरावर प्रतिष्ठित केल्या आहेत. मूर्तीच्या ओठांवरील नित्य ओळखीचे ते सौम्य हास्य व ज्ञानी

पुरुषाचे शालीन डोळे, आजही अगदी तसेच दिसतात. मनाला कसल्यातरी तृप्तीचा आनंद होतो.

शंभराच्या वर ओबड-धोबड उंच पायऱ्या चढून मी वर गेलो आणि स्तूपाच्या पायथ्याशी थांबलो. शरीर बोजड म्हणून त्रास झाला. पण हजारो मैल दूरवर असणारे हे आमच्याच जीवनाचे प्रतीक पहात असताना मन कसे हलके आणि आनंदित होते.

या मंदिराच्या नावाचा संस्कृत भाषेशी काही संबंध आहे काय ? आणि मंदिर बांधण्यासाठी जी जागा निवडली आहे ती मोठी अजब आहे. तीच जागा का निवडली असावी ? डॉ. मलिक बरोबर होते. त्यांचे हे दोन प्रश्न.

मंदिराचे आसमंत जागृत ज्वालामुखी – डोंगररांगांचे आहे. अशी जागा का निवडावी हे त्यांचे कोडे, त्यांना बरेच दिवस सुटलेले नाही. आम्ही तेथे गेल्यावर तिथल्या गाइड्च्या बोलण्यातून एक धागा मिळाला आणि त्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर मिळाले.

बोरो (Boro) हे ' विहार ' ' बिहार ' याचे स्थानीय भाषेतील रूप आहे. आणि बुडुर हे डोंगराचे नाव. Borobudar म्हणजे Monastry in the mountainry हा अर्थ स्पष्ट होतो. दुसऱ्या प्रश्नाचे निश्चित उत्तर नाही पण खुलासा होतो की, बुद्ध भिक्षु हे प्रार्थनेसाठी – तपासाठी डोंगराळ एकांत भागच सामान्यतः निवडतात. तसेच हेही असेल.

१९०७ साली हे मंदिर सापडले. तोपर्यंत ते ज्वालामुखीच्या लाव्हाची रक्षा, माती व दगड यांनी झाकून गेले होते. एका अर्थाने ज्वालामुखीने मंदिराचे शतकानुशतके रक्षण केले. हाही एक योगायोगच म्हटला पाहिजे.

आजही त्याच्या जीर्णोद्धाराचा आणि रक्षणाचा आंतरराष्ट्रीय प्रयत्न चालू आहे. यूनेस्कोमार्फत बरीचशी धनराशी आणि तज्ज्ञ यांची मदत मिळते. आपल्या सरकारनेही यात आपला हिस्सा उचललेला आहे.

मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कामात कॉम्प्युटरायझेशनचीही मदत घेतल्याचे पहिले उदाहरण मी येथे पाहिले. लक्षावधि दगड खाली उतरवून

ते सुरक्षित करून, परत बसविण्याच्या या प्रक्रियेत या शास्त्राची उत्तम मदत होत आहे. एक हिंदी तरुण तज्ज्ञ हे काम गेले वर्षभर येथे करीत आहे. अभिमान वाटला.

आज दिवसभर मी या मंदिराने भारून गेलो आहे. आशिया-खंडातील पुरातन संस्कृतीचे हे अवशेष पाहिले म्हणजे माणूस भारून गेला नाही तरच आश्चर्य ! वेरूळ-अजिंठ्याची आठवण झाली. तेथील रूपसंपन्न चित्रकला व शिल्प आणि विविध भाव दाखविणारी बुद्धाची अविस्मरणीय मूर्ति यांच्या संगतीला आता बोडो-बुडुरची जोड मिळाली.

प्रवासात क्वचित् येणाऱ्या अनुभूतीची शब्दांने बांधणी करावी म्हणून हे प्रदीर्घ लेखन केले आहे.

*

## ८३ कोलंबो

१२ ऑगस्ट, १९७६

ही नॉन-अलॉइन्ड शिखर-परिषद आशियातील पहिली म्हणून आम्हाला याचे फार अप्रूप. ही परिषद ऐतिहासिक व्हावी अशी आमची सर्वांची इच्छा. परिषद करणे हा इतिहासच आहे. त्या अर्थाने नव्हे तर यांतील निर्णय आजच्या आंतरराष्ट्रीय संदर्भात नवी दिशा दाखविणारे, मार्गदर्शन करणारे, परिस्थितीचा अचूक वेध घेणारे व्हावेत ही इच्छा आहे.

असे काही घडले की नाही याचा मागोवा घेण्यासाठी मी पाहिलेल्या, भाग घेतलेल्या आणि काही ऐकलेल्या घटनांची तारीखवार नोंद या लेखनात ठेवणार आहे.

१० ऑगस्ट

दुपारी १-३० वाजता पोहोचलो. मद्रासमध्ये राजभवनच्या बेड-रूममध्ये तीन तास कंटाळवाणे काढले. Felix भंडारनायके स्वागतास हजर

होते. बरेच विदेशमंत्रि दोन दिवसांपूर्वीच येथे पोहोचले आहेत असे त्याने सांगितले. औपचारिकतेत वेळ न घालविता आम्ही गावाकडे निघालो.

रस्ते सुधारलेले – ट्रॅफिक-व्यवस्था काहीशी सुधारलेली दिसली. एक आर्मी मेजर लिविझाँ ऑफिसर म्हणून आहे. सुस्वभावी व शांत (मंद) वाटला. श्री. गुरुबचन – आमचे हायकमिशनर साथीला होते. वाटेत त्यांनी येथील तयारी व घटनांची पार्श्वभूमी सांगितली. त्याचप्रमाणे आजचा कार्यक्रम सांगितला.

५ ते ६ क्यूबा–विदेशमंत्रि.

६ ते ७ व्हिएतनाम–विदेशमंत्रि.

८॥ हायकमिशनरचे जेवण.

Felix ही पाहुणा म्हणून येणार आहे. तेव्हा जेवणानंतर त्याची चर्चा. त्याचेबरोबर परिषदेच्या तयारीसाठी व यशासाठी राबणारे सर्व प्रमुख अधिकारीही येणार आहेत.

हॉटेलमध्ये पोहोचल्यावर घाईघाईने ' लंच ' घेतले. ३-३० वाजून गेले होते. थोडी विश्रांति घेतली आणि ५ वाजता परिषदेच्या चक्रव्यूहात शिरलो.

क्यूबा-विदेशमंत्री, हॅवाना, सभेपासून ओळखीचे. त्यांना आणि व्हिएतनामचे मंत्र्यांना परिषदेपुढे येणाऱ्या प्रश्नांबाबत आमची मते व ' असेसमेन्ट्स् ' हव्या होत्या.

दोघांना मी जे सांगितले त्याचा गोषवारा असा :–

१) परिषदेपुढे येणारे प्रश्न दोन स्वरूपाचे आहेत.

अ) संघटनात्मक प्रश्न –

१) Criteria आणि तदंगभूत प्रश्न म्हणजे Guest observer या संबंधीचा, २) नव्या Co-ordination ब्यूरोच्या रचनेचा प्रश्न.

ब) वैचारिक स्वरूपाचे महत्त्वाचे प्रश्न.

१) या बाबत आमची तात्त्विक बैठक अल्जेरियामध्ये जी मांडली होती तीच आहे. पण मार्शल टिटोंनी आपल्या आग्रहात बदल करून रुमानियादि देशांना Observer's States देण्याचा विचार बदलला आहे.

हे व इतर विभागांतील बऱ्याच देशांची मते यांचा विचार करता या तीन देशांनाच गेस्ट स्टेटस् या परिषदेपुरते देण्याचा विचार उभारून आला. तर ऐक्याच्या दृष्टीने हे डोळ्यापुढे ठेवून आम्ही खळखळ न करता हे स्वीकारू. ( We will go along with the conscious if it emerges as a result of discussions.)

२) या बाबत आज रात्री श्रीलंकेच्या बाबतीतील काही नव्या कल्पना आहेत त्या समजावून घेणार आहोत मगच आमचे मत बनवू. उमेदवार ४० चे वर आहेत. तेव्हा वैयक्तिक देशांच्या इच्छेचा वा मनाचा प्रश्न नाही. हे समजुतीने व एकमताने कसे घडवून आणावयाचे हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. बरीच वर्षे ब्यूरोवर असणाऱ्या देशांबाबत विरोधी हवा आहे.

Geographic प्रतिनिधित्व Continuity and rotation ही तत्त्वे, संख्येत काही प्रमाणात वाढ ही तत्त्वे अल्जेर्स परिषदेने मान्य केली आहेत. त्यांना रूप कसे द्यावयाचे हा प्रश्न आहे.

ब) १) वैचारिक स्वरूपाचे प्रश्न हे पोलिटिकल ॲण्ड इकॉनॉमिक कमिटीमधून जी डॉक्युमेन्ट्स् तयार होतील व सभेपुढे येतील तेव्हाच त्यांचे स्वरूप समजून येणार आहे. लेबनॉनबाबत, उदाहरणार्थ, शेवटी अरब लीग काही तरी निर्णय घेईल. वेस्टर्न सहाय्याचा प्रश्न असाच गुंतागुंतीचा आहे.

२) महत्त्वाचा मुद्दा मी जो आग्रहपूर्वक मांडला तो ' बाय-लॅटरल ' आणि अंतर्गत स्वरूपाचे जे प्रश्न असतील त्यांची चर्चा येथे झाली तर वातावरणात कटुता निर्माण होईल आणि युनिटी – ऐक्य – हे परिषदेचे मूलसूत्र ठेवावयाचे असेल तर हे जाणीवपूर्वक टाळले पाहिजे.

३) आर्थिक सहकार्याच्या क्षेत्रात ' निश्चित स्वरूपाचा कार्यक्रम ' या परिषदेने आखणे अत्यंत आवश्यक आहे. हिंदी महासागर आणि शांतता, विशेषतः दिगो गार्शियासारखे परकीय आणि आण्विक तळांचा धोका, मध्यपूर्व, आफ्रिकाखंडाचा दक्षिण विभाग हे महत्त्वाचे प्रश्न आहेत.

४) या परिषदेचे सदस्य-राष्ट्रांमधील उभयपक्षी काही प्रश्न असतील तर ते वादासाठी येथे पुढे आणू नयेत. हा संयम व शिस्त पाळली गेली

तर ऐक्याची तसबीर अधिक मजबूत होईल.

हेच विचार सामान्यपणे, ज्या परराष्ट्रमंत्र्यांशी माझ्या चर्चा झाल्या त्यांच्यापुढे मांडल्या. क्यूबा आणि व्हिएतनामखेरीज तसा मी अल्जेरिया, युगोस्लाव्हिया, श्रीलंका, गियाना, घाना, नॉर्थ कोरिया, अफगाणिस्तान, नेपाळ, मॉरिटानिया या प्रमुखांशी पहिल्या दोन दिवसांत चर्चा केल्या.

रात्रीचे जेवण खूपच जमले. ( इंडियन हायकमिशनर) जेवणाच्या वेळी आय्. एम्. एफ्. वरील पूर्वीचे माझ्या वेळचे प्रतिनिधि श्री. नारायण प्रसाद दोन वर्षांनंतर भेटले.

ते मूळचे भारतीय – त्यांच्या कुटुंबातील बरेचजण भारतात आहेत. परंतु त्यांच्या मनात श्रीलंकेत 'सेटल' व्हावयाचे होते. त्याप्रमाणे ते या देशात कँडी येथे राहतात. जेवणासाठी मुद्दाम दोन अडीच तासांचा प्रवास करून आले होते.

मी तारीख १५ रोजी कँडी येथे जाणार आहे. लगेच संध्याकाळी परत येणार आहे. तेथे दोन-तीन तास असेन, गव्हर्नरकडे राहण्यापेक्षा मी श्री. प्रसादकडे थांबण्याचे निमंत्रण स्वीकारले आहे. मला घरच्या-सारखे वाटेल म्हणून. एक जुना बुद्धिमान्, प्रेमळ सहकारी हे त्यांचे आमचे खरे नाते. मंत्रि, अधिकारी हेच केवळ आमचे संबंध नव्हते.

फेलिक्सशी जेवणानंतर भारतीय भूमिकेवर तपशीलवार बोलणे झाले. १) लिमाची लिस्ट वाढवावयाची नाही. २) गेस्ट म्हणूनही मर्यादित लिस्ट आम्ही ऐक्याच्या दृष्टीने मान्य करू. ३) ऑब्झर्वर स्टेट्स्‌साठी त्यांनी आग्रह करावयाचा नाही. ४) नव्या को-ऑर्डिनेशन ब्यूरोची संख्या २७-२९ पर्यंत न्यावयास हरकत नाही. परंतु रचना करताना आजचे सदस्य पुढील 'टर्म' साठी चालू द्यावेत. ॲडिशनल सदस्यांची वाटणी आजच्याप्रमाणेच भौगोलिक तत्त्वावर व्हावी व एक तृतियांश सदस्य पुढच्या 'समिट' वेळी 'रिटायर' करावे – म्हणजे 'रोटेशन आणि कंटिन्युइटि' कायम राहातात. ही श्रीलंकेची कल्पना त्यांनी मांडली. आम्ही तत्त्वतः मान्यता दिली. दुसरे दिवशी एन्. कृष्णन्‌ने ही संमत सूत्रे कागदावर उतरून श्री. फेलिक्सला दिली.

श्रीलंकेशी झालेली त्या रात्रीची व दुसऱ्या दिवशी युगोस्लाव्हिया व अल्जेरिया यांच्याशी झालेली चर्चा ही fatalic Agent ठरली म्हटले तरी हरकत नाही. कोणत्या दिशेने जावयाचे याचे वातावरण बनण्यास सुरुवात झालेली आहे. त्याचा पुरावा काल व आजही मिळाला.

नव्या व्हिएतनामचे नवे परराष्ट्रमंत्रि म्हणजे प्रसन्न चेहऱ्याचे प्रौढ व्यक्तिमत्व आहे. बोलणे किती सौम्य पण स्पष्ट! Criteria चे प्रश्नावर मूलभूत भूमिका सरळ व स्पष्ट होती. परंतु कोणत्याही देशाला अकारण दुखविण्याची (या प्रश्नावर) तयारी नव्हती. इंडोनेशियाचे बाबतीत विरोधी बोलले. 'टेमोर' बाबत तर अगदी उघड विरोध होता.

व्हिएतनामी भाषा मूलतःच सौम्य भासते पण सूत्रमयही आहे की काय न कळे. भाषांतरे ऐकताना असे मला तरी वाटले. ते पाच दहा शब्द बोलत आणि त्यांचे भाषांतर पाच चार वाक्यांत ऐकावे लागे. तसेच उलट सुलट.

दहा तारखेस सकाळी ५ वाजता उठलो. एकसारखा प्रवास व येथे आल्यानंतर गाठीभेटी. रात्रीची हाय-कमिशनरची मेजवानी. (यात खाण्यापेक्षा बोलणेच फार झाले). परत यावयास १२ वाजले. हा ताण बरा नाही. पण दुसरा मार्ग काय?

*

८४

## कोलंबो

१९ ऑगस्ट, १९७६

सकाळी ९ वाजता युगोस्लाव्हियाचे विदेशमंत्रि आले. तासभर होते. अल्जीअर्समध्ये आम्ही रुमानिया वगैरे राष्ट्रांबाबत त्यांनी घेतलेल्या भूमिकेस विरोध केला असल्यामुळे इतर बाबतीत चर्चा सुरू झाली.

प्रमुख प्रश्नाला ते हातच लावत नव्हते. शेवटी मार्शल टिटोंच्या मुलाखतीचा मी उल्लेख केला. 'ऑब्झर्वर्स स्टेटस् चा आग्रह न धरण्याच्या त्यांच्या नव्या धोरणाचे स्वागत केले आणि ज्या दिशेने ते काही पावले पुढे चालून आले आहेत त्या दिशेने आम्ही सहकार्याची भूमिका जरूर घेऊ असे म्हणताच खुलले. पुढे पुष्कळ मनमोकळी चर्चा झाली.

भूतानचे विदेशमंत्रि आले. त्यांच्या राज्याच्या भाषणाचा 'ड्राफ्ट' घेऊन आले होते. उपयोगी चर्चा झाली.

महमद युनुसने, दरम्यान श्री. बुटिप्लिकांना फोन करून आम्ही भेटावयास येतो असे कळविले. ते परिषदेचे सध्याचे अध्यक्ष. तेव्हा मी त्यांच्याकडे जाणे बरे असे ठरविले.

परंतु तो मोठा खानदानी माणूस आहे. फोन पोहोचताच तेहून आमच्याकडे तातडीने आले. तुम्ही कामाने व वयाने ज्येष्ठ आहात, आणि आमच्या संस्कृतिप्रमाणे मी तुमचेकडे येणे युक्त होते म्हणून आलो असे सांगून जवळ जवळ दीड तास बसले होते. परिषदेच्या कामासंबंधी व वेस्टर्न सहाराबाबत विशेष बोललो.

रुमानिया, फिलिपाइन्सबाबत आम्ही गेस्टचे स्टेटस् मान्य करणार आहोत हे त्यांच्यापर्यंत पोहोचले होते. त्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. फ्रेंच जाणणारे माझे शेजारी होते. ते त्यांच्या 'फ्रेंच'चीच फार स्तुती करीत होते.

दुपारी ४ वाजता विदेशमंत्र्यांची परिषद सुरू झाली. श्री. फेलिक्सचे नाव श्री. बुटिप्लिकाने सुचविले व काम सुरू झाले. औपचारिक काम होऊन त्या दिवसाचे काम संपले.

रात्री आशियायी विदेशमंत्र्यांना 'गॅलेफेस'मध्ये खाना दिला. १६–१७ विदेशमंत्रि आले होते. औपचारिक चर्चा झाल्यानंतर श्री. फेलिक्स भंडारनायके खुषीत होते. व्हिएतनाम, लाओस व कंबोज विदेशमंत्र्यांच्या हजेरीमुळे मी खूष झालो होतो. आजच्या जेवणाला बांगलादेशचे जनरल झिया आले होते. आजपर्यंत जे जे लोक–सरकारी व निमसरकारी–त्यांच्याबाबत भेटले होते त्यांनी त्यांचे हिंदुस्थानचा मित्र व एक सज्जन गृहस्थ असे वर्णन केले होते. मी त्यांनाही सन्मानाने

वागविले व माझ्याजवळ जेवणासाठी बसवून घेतले.

हवापाण्याच्या, श्रीलंकेच्या गोष्टी झाल्या. राजकीय प्रश्नाच्या जवळपासही यावयास तयार नव्हते. मीही प्रयत्न केला नाही. शेवटी त्यांनी इंडो-पाकिस्तान संबंध कसे आहेत व राहतील असा सरळ प्रश्न केला.

मी सूत्ररूपाने सांगितले की, "कॉशस ऑप्टिमिझम्." सावधानता अशासाठी, की आजपर्यंतचा अनुभव. बऱ्याच वर्षांनंतर संबंध सुरू झाले आहेत. त्यामुळे एकदम काही चमत्कार घडणार आहेत, असे आम्ही अपेक्षित नाही. सावकाश व निश्चयाने संबंध सुधारण्याची आमची नीति आहे. 'ऑप्टिमिझम्' अशासाठी की या 'रीजन्' मधील सर्व देशांना दुसरा मार्गच नाही. जनतेचे गरीबीचे व इतर कठीण प्रश्न सोडवावयाचे असतील तर आशावाद ठेवून प्रयत्नशील राहणे हा एकच मार्ग उरतो. तुमच्या आमच्या देशासंबंधीही आम्ही असेच आशावादी आहोत."

गंभीरपणे व लक्षपूर्वक ऐकून घेतले. परंतु चर्चा पुढे गेली नाही. दोन तासांत त्या माणसाला मी हसताना पाहिले नाही. एक ऐटबाज, अक्कडबाज म्हटले तरी चालेल – पण सत्तेमध्ये आलेला छोटा माणूस आहे. मी त्याला हिंदुस्थानचा मित्र म्हणणार नाही.

माझे हे मत त्यानंतरच्या ता. १२-१३ च्या त्यांच्या परिषदेतील बडबडीने व इतर हालचालींनी कायम झाले आहे. 'अँन्टी इंडिया पॉलिसी' ही त्यांनी त्यांची 'स्ट्रॅटिजी' बनविलेली आहे. थोडक्यात सत्य असे आहे.

कंबोजामधील क्रांतिनंतरच्या परिस्थितीबाबत बरीच उत्सुकता होती. त्यासाठी पुन्हा भेटावयाचे ठरले. ही मुलाखत ता. १८ रोजी झाली.

परिषदेचे वातावरण आता बनले आहे. दिवस कसे जातील हे समजणार सुद्धा नाही.

## ८५ उलानबाटर ( मंगोलिया )

४ सप्टेंबर, १९७६

दिल्लीहून विमान वक्तशीर २॥ वाजता निघाले. पावणे नऊ तासांच्या एकसारख्या उड्डाणानंतर सकाळी, युरोपच्या ७ वाजता फ्रँकफर्टला पोहोचलो. त्यानंतर प्रवास चालूच राहिला. दिल्ली सोडल्यानंतर ३२ तासांनी आज दुपारी एक वाजता येथे पोहोचलो.

मॉस्को ते उलानबाटरचा प्रवास १२ तासांचा आहे. इतका एकसारखा प्रवास – झोपेशिवाय थकविणारा प्रवास, मी बऱ्याच दिवसांनी केला. पण येथील आगत-स्वागत व या शहराचा आसमंत पाहून थकवा एकदम हलका झाला.

चार हजार फूट उंच असलेल्या एका पठारावरील हे दुपारच्या उन्हात न्हाऊन निघालेले आसमंत पाहून बऱ्याच वर्षांची इच्छा सफल झाली असे वाटले. डिसेंबरच्या सुरुवातीला असे, अशी थंडी आहे. गेल्या दोन-तीन दिवसांत हा फरक पडला आहे. यापूर्वी येथे बरेच गरम होत असे.

त्यांचा विदेशमंत्रि श्री. मॅगॉलिन दुगर सुरेन, हा मोठा अनुभवी मुत्सद्दी आहे. ( गेल्या वर्षी आपल्याकडे आलेले यांचे विदेशमंत्रि खातेपालटामुळे कृषिमंत्रि झाले आहेत ).

दिल्लीला ते १९६०-६१ साली राजदूत होते. त्या वेळी मी मुंबईला होतो. नंतर चार-पाच वर्षांची एक टर्म त्यांनी विदेशमंत्रि म्हणूनही पार पाडली. नंतर जिनिव्हा व न्यूयॉर्क येथे पी. आर्. म्हणून काम केल्यानंतर ते पुन्हा गेल्याच महिन्यात विदेशमंत्रि झाले.

श्री. सुख बाट(त )र मंगोलियन क्रांतीचे प्रमुख नेते– त्यांचा हा नातजावई. परंतु नात्यापेक्षाही त्याच्या अंगी असणाऱ्या गुणांमुळेही त्याचे स्थान कायम आहे असे निःसंकोचकपणे म्हणता येईल.

सत्तेच्या रचनेत त्यांचे नेमके स्थान सांगणे अवघड आहे. नंबर १ त्सिबनबाल ( चिबनबाल ) Chairman of Presidiam of Peoples

Great House ( लोकसभा ), नंबर २ Chairman and council of minister. नं. ३, ४, ५ कोण हे लवकर समजत नाही.

सर्व काही लिहिणे अशक्य आहे. तरीपण स्मृति म्हणून काही उल्लेख करून ठेवतो.

८६ ५ सप्टेंबर

Bai laterial चर्चा साडेतीन तास झाली. तपशीलाने आम्ही आमची विदेशी धोरणे व अंतर्गत धोरणे मांडली. श्री. दुगर सुरेन यांनी "Masterly presentation" असा उद्गार खाजगी बोलण्यात काढला. रात्रीच्या व दुपारच्या जेवणाच्या वेळी त्यांचे प्रमुख मंत्रि भेटले.

मंगोलिया-भारत मैत्री संघामध्ये गेलो. संस्कृत, वाङ्मय, व्याकरण, इतिहास यावर सखोल माहितीने बोलणारे दोन-तीन विद्वान भेटले. पाणिनीच्या व्याकरणाचे मंगोलियन भाषांतर पूर्वीच झालेले आहे. कालिदासाच्या 'मेघदूताची' दोन भाषांतरे आहेत. त्यांपैकी एक १५ व्या शतकातील आहे. प्रो. लोकेशचंद्राचा येथे लौकिक आहे. त्यांचे पिताजी डॉ. रघुवीर यांनाही येथे मानतात.

" चेंगिझखान हे यांचे थोर ऐतिहासिक पुरुष ! बाराव्या-तेराव्या शतकातील, मंगोलियाचे ऐक्य याने घडवून ते एकछत्राखाली आणले. तो धर्माने बुद्ध किंवा मुसलमान असा काहीच नव्हता. आदिम होता. निर्दय पण शूर होता. 'क्रायसेस्' मध्ये असाच नेता लागतो."
( इति मंगोलियन्स् )

८७ ७ सप्टेंबर

सेंट्रल व आर्टस् म्यूझियम्स पाहिली. लक्षात येण्यासारखी गोष्ट म्हणजे कित्येक हजार वर्षांपूर्वी दगडावर कोरलेली काही चित्रे.

पंतप्रधानांची एक तास भेट झाली, पण विशेष काही नाही. संध्याकाळी रिसेप्शनला रशियन–चायनीज राजदूत व इतरही होते. थोड्याफार गप्पागोष्टी झाल्या.

नंतर स्थानिक मिशनचे कर्मचारी भेटले. येथील हिवाळा भयंकर अवघड असतो. बर्फ तसा नसतो. पण 'उणे पस्तीस-चाळीस' असे हवामान असते. डाळ हा पदार्थ खायला मिळत नाही. औषधोपचाराची फार गैरसोय. हिंदी डॉक्टर हवा – येथे मुलेबाळे कोणीच ठेवलेली नाहीत – इथे काम करणारांच्या अडचणी फार आहेत. वगैरे तक्रारींची आम्ही नोंद घेतली आहे. असलेच काही लिहावे लागत आहे.

*

## ८८ दारखान

६ सप्टेंबर, १९७६

हे शहर ३० हजार वस्तीचे आहे. आणखी पाच वर्षांनी ५० हजारांचे होईल. पूर्वी हे एक हज़ार वस्तीचे खेडेगाव होते.

उलानबाटर, वायव्येकडे सोव्हिएट सरहद्दीपासून १०० किलो-मीटरवर आहे. सोव्हिएट सरहद्दीकडे जाणारी रेल्वे येथून जाते. आसपास मिनरल पाणी वगैरे साधने आहेत म्हणून १९६१ साली मंगोलियाच्या १४ व्या पार्टी कॉंग्रेसने हे नवे शहर बांधावयाचे ठरविले. उलानबाटर नंतर हेच एक शहर आहे.

शहर नवे बांधण्याचे काम चालले आहे म्हणजे विटांवर विटा रचून घरे बांधण्याचे काम चालू नाही. Pastoral civilisation पासून समाजवादाकडे चाललेला हा प्रवास आहे. एक नवा समाज जन्म घेत आहे – वाढत आहे. दारखान – व हिंदीत वापरत असलेला शब्द 'तारखान' यांच्यात समान अर्थ आहे. तारखान म्हणजे आर्टीझान. हे शहर म्हणजे City of Skills म्हणून बांधले जात आहे.

आम्ही त्यांचे sheep leather work वगैरे पाहिले. गेल्या तीन-चार वर्षांत हे सर्व नवे कारखाने उभे राहिले आहेत. सर्व समाजवादी देश व

विशेषतः सोव्हिएट रशिया यांची मदत आहे. या पाच वर्षांत या शहरासाठी उद्योग-घरे व नव्या संस्था मिळून १०० कोटींची इन्व्हेस्टमेंट झाली आहे. कदाचित् पुढेही चालू राहील.

देशाची लोकसंख्या १४ लाखांची. अशी एक-दोन शहरे झाली म्हणजे त्यांची गरज पुरी होणार आहे.

शहराची व उद्योगधंद्यांची बांधणी करण्यासाठी बाहेरच्या देशांतून (समाजवादी) तज्ज्ञ व कुशल कामगार आले आहेत. आजच्या तीस हजार वस्तीत त्यांची संख्या आठ आहे. मंगोलियाचे जीवन बदलण्याचा एक मोठा उपक्रम यशस्वी वाटचाल करीत आहे असे वाटते.

आम्ही काल रात्री स्पेशल ट्रेनने उलानबाटर येथून निघालो. व्यवस्था उत्तम होती. मी १० वाजता झोपी गेलो. ४ वाजता जागा झालो. गाडी चालू होती. खिडक्यांवरचे पडदे दूर करून बाहेर पाहिले. काहीसा अंधार होता. आकाश स्वच्छ होते. उत्तरेकडे पाहिले तर क्षितिजावर (अगदी हाताशी असल्यासारख्या) सप्तर्षींच्या चांदण्या दिसत होत्या. ध्रुवतारा अगदी क्षितिजाशी होता. कितीतरी वेळ मी हेच दृश्य पहात राहिलो. मंगोलियाच्या उत्तरेकडे आम्ही होतो. याचा अर्थच उत्तर ध्रुवाशी आमची जवळीक झाली होती.

अंधार कमी होत गेला आणि दोन्ही बाजूंचे 'लॅण्डस्केप' नजरेखाली आले. छोटचा टेकडयांच्या रांगा दोन्हीकडे होत्या. त्यांना भिडेतो, नजर टाकील तिथपर्यंत गवताळ जमीन दिसत होती. गवत काढलेले दिसले. झुडुपांचे झापे ठिकठिकाणी होते. परंतु वृक्षराजी म्हणू असे काही नव्हते. डोंगर बोडकेच वाटले. सकाळ झाली पण पक्षांची किलबिल नाही, की कोठे त्यांचे थवे नाहीत. एकाकी पाखरू उडताना दिसे. पाणी भरपूर दिसले. त्यामुळे वैराण माळ याला म्हणता येणार नाही.

दुपारी को-ऑपरेटिव्ह फार्म पाहून झाले. 'कल्टिव्हेशन' या अर्थाने येथे शेतीचा विकास नाही. ॲनिमल हज्बंड्री हा व्यवसाय. पास्टोरल सोसायटीचा शेती करण्याचा आता जोराचा प्रयत्न आहे. ३२ स्टेट फार्म्स आहेत. तांत्रिकतेवर भर. मनुष्यबळ कमी. सर्व वस्तीच मुळी १४ लाख.

चीनवरचा अविश्वास खोलवर रुजलेला आहे. रशियाचे वर्चस्व संपूर्ण. तरुण पिढीत नाराजी. त्यांच्या परिस्थितीत देशाला आज त्यांनी स्वीकारलेला मार्गच उपयुक्त व व्यवहार्य आहे. काही प्रमाणात का होईना स्वत्व आहे.

*

## ८९ न्यूयॉर्क

२८ सप्टेंबर, १९७६

सतत २४ तास प्रवास करून येथे ता. २६ ला तिसऱ्या प्रहरी पोहोचलो. असा प्रवास पुन्हा करणार नाही असे स्वतःसच बजावले. विमानाच्या प्रवासाची थकावट म्हणजे काय असते, हे परवा मंगोलियाच्या व आता या थेट न्यूयॉर्कच्या प्रवासाने चांगलेच अनुभविले. दोन दिवस नियमित झोप मिळाल्यावर आता पुष्कळच उत्साह आहे.

निघताना मन कष्टी होते. प्रवास सुरू होण्यापूर्वीचे मुंबईतले चार-सहा तास काही सुचतच नव्हते. या खेपेला तू फारच मनाला लावून घेतले होतेस. पण हे माझे म्हणणेही बरोबर नाही. मी तुझ्या मनःस्थितीत जाऊन विचार करीत नाही. माझे लागोपाठ लांबचे प्रवास, त्यामुळे एकाकी जीवन काढण्याचे प्रसंग आल्याशिवाय इतरांना आणि मला तुझी भावना समजणार नाही हे खरे. तू म्हणालीस की, ' तुम्ही म्हणाल फारच दुबळी झाली आहेस. ' ते वाक्य मी विसरू शकत नाही.

मी तुला दुबळी कसा म्हणेन ! वर्षानुवर्ष तू जे सहन केले आहेस आणि तरीही हसतमुखाने व दर्जेदार खानदानी वागणुकीने, ते मी कसा विसरेन. असहाय्यताही सहन करण्याची मर्यादा आहेच की. तेव्हा मनाला आवरणे अशक्य होते. तसे झाले त्या दिवशी.

तुझे अश्रू पाहिले आणि माझे मी लपविले. खरं सांगू, अगदी ओक्साबोक्शी रडून घ्यावं असे वाटत होते आणि ते घडत नव्हते. त्यामुळे त्या मनावरच्या ओझ्यानेच हा सर्व लांबलचक प्रवास केला. तुझ्याशी टेलिफोनवर बोललो आणि मन हलकं झालं. या खोलीत एकटाच पुष्कळ वेळ बसून अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

तू कशी दुबळी ? खरं म्हणजे मीच फार दुबळा आहे. इतरांना दिसत नाही. दाखवायचं नसतं. मोठेपण – वडीलधारेपण हे सर्व काही आहे ना ? त्याच्यासाठी समर्थपणाचे मुखवटे चढवायचे आणि वागायचे. या दुबळेपणाची जाण मनाला शक्ती देते. कुणासाठी तरी दुबळेपण यावे अशी जवळची माणसे आयुष्यात असणं हेच जीवनातलं सर्वस्व आहे.

पुन्हा एकदा तूच ते सर्वस्व आहेस या अनुभूतीतून गेलो – आणि नंतर मनाला ताकद आली.

तू म्हणशील की हे सर्व का लिहिता आहात ? गरज आहे का याची ? कोण जाणे ? पण हे सर्व लिहिल्यामुळे माझे मन पुष्कळच मोकळे झाले. तुला हे सर्व सांगितले यातही आनंद आहे.

माझे काम नेहमीप्रमाणे उत्तम चालले आहे. पण त्या बाबतीत स्वतंत्र लिहीन. इथे त्याची गर्दी नको.

*

९०

**न्यूयॉर्क**

६ ऑक्टोबर, १९७६

या पूर्वी लिहिले त्याला आठ दिवस झाले. मागे वळून पाहिले तर वाटते की, बाहेर येऊन काही महिने झाले आहेत. कामात मन गुंतले असले म्हणजे त्यात रमून जातो. परंतु The Garlyle या ऐषारामी, सुरेख व निवांत हॉटेलमध्ये परत आले की, एकलेपण खावयास उठते.

वाचावयाचा प्रयत्न करतो परंतु कामकाजाचे इतके वाचावे लागते की, दुसऱ्या वाचनाकडे लक्षच लागत नाही. औषधे वेळेवर घेत असतो, त्यामुळे सुदैवाने अजून तक्रार नाही. श्री. श्रीपाद डोंगरे आणि श्री. शरद काळे दोघेही खूपच काळजी घेतात.

तुझी आठवण झाली की मात्र केविलवाणा होतो. कामाच्या व मोठेपणाच्या (?) घाईगर्दीत अगदी निकटच्या माणसाच्या भावना किती ताणलेल्या असतात याची दादही आम्ही लोक घेत नाही. काही गोष्टी गृहित धरण्याची सवय लागून जाते. तसे माझे काहीसे झाले आहे काय नकळे. परवा दिल्लीहून निघताना मी खाडकन् जागा झालो आहे. इतके दिवस तुला एकटे टाकून दूर जाण्याची गोष्ट यापुढे बंद !

यू. एन्. मध्ये रोज दोन ते पाच विदेशमंत्र्यांना स्वतंत्रपणे भेटतो. ही फार चांगली प्रथा आहे. संबंध ताजे होतात. नवीन अद्ययावत माहिती मिळते.

ता. ४ ला माझे निवेदन झाले.* माझ्याही मताने उत्तम झाले. एशिया सोसायटीचे भाषणाला बरेच बुद्धिवंत व उद्योगवंत आले होते. दुपारी व रात्री बाहेर जेवण घ्यावे लागते. नकार देण्याची सोय नाही. पण जपून घेत असतो.

प्रेसिडेंटच्या निवडणुकीची धामधूम आहे. पण ती सर्व टेलिव्हिजन-वर ! इतरत्र सर्व सामसूम असते. आपले निवडणुकीचे दिवस कसे गजबजलेले असतात तसे येथे नाही.

प्रे. फोर्ड की कार्टर ? महिन्यापूर्वी कार्टर निवडून आले अशी परिस्थिती होती. आज तसे नाही. गेल्या आठवड्यात जे काही अमेरिकन्स भेटले त्यांनी कार्टरच्या मोहिमेची शक्ति कमी होत चालली आहे असे सांगितले. पण कार्टरने पुन्हा याच आठवड्यापासून जोम धरला आहे, असेही काही लोकांचे म्हणणे आहे. सारांश आज कोणाबद्दलच हमखास बोलत नाहीत.

---

* Key note speech at the thirty-first session of the U. N. General assembly on Octber 4,1976 at New York. (परिशिष्ट पहा.)

एक नाटक, 'कॅलिफोर्निका सूट' व एक सिनेमा 'पेपर टायगर' पाहिले. सामान्य !

एक दिवस ( २ ऑक्टोबरला ) वॉशिंग्टनला जाऊन आलो. येथे पाऊस पडत असतो. पाऊस पडला म्हणजे न्यूयॉर्क गंभीर व उदास दिसते. वॉशिंग्टन अगदी विरुद्ध. मोकळ्या बागा, झाडे, मैदाने यामुळे वातावरण उल्हसित वाटते.

गांधी-सेंटरवर गांधींच्या जीवनावर बोललो. खूप गर्दीचा दिवस गेला. शटल् सर्व्हिसने सकाळी जाऊन रात्री न्यूयॉर्कला परत आलो. श्री. डोंगरे यांना बरोबर नेले होते. कारण त्यांची ही पहिलीच भेट आहे.

बांगला देशने विरोधी प्रचाराची फळीच उघडली आहे. सर्वत्र भेटून टीका-टिपणी चालू आहे. त्यामुळे बहुतेक सर्व प्रतिनिधींना मी भेटलो तेव्हा हा विषय हटकून निघतोच. मग सर्व तपशील पुन्हा पुन्हा सांगावा लागतो.

उद्या त्यांचे निवेदन आहे. काय काय पाजळतात ते दिसेलच. पण उत्तर द्यावे लागले तर त्याची तयारी असावी म्हणून मी उद्याच्या ऐवजी परवा म्हणजे ८ तारखेला रात्री येथून निघून या देशातील इतर शहरांचा दौरा सुरू करीन.

पाकिस्तानच्या विदेशमंत्र्यांनी काश्मीरचा उल्लेख स्वयंनिर्णयाच्या संदर्भात करून एक बलून उडविला. आम्ही आमच्या निवेदनात आपली भूमिका स्वच्छ करून काश्मीर भारताचे अंतर्गत क्षेत्र आहे असे पुन्हा एकदा मांडले. त्यानंतर त्यांचे उत्तर. त्याला आमचे उत्तर. असा चेंडू उडविण्याचा थोडा खेळ होऊन तूर्त जनरल असेंब्लीपुरते तरी हे प्रकरण स्थगित झाले आहे.

चीनने आपल्या निवेदनात बांगलादेशच्या फरक्का तक्रारीला राजकीय पाठिंबा उघडउघड दिला. चीनचे या संबंधीचे तर्कशास्त्र समजावून घेण्याची गरज आहे. मूळ राजकीय विरोधाचा पिंड बदललेला नाही. भारताच्या चारही बाजूच्या चारही शेजाऱ्यांना त्यांनी आपला पाठिंबा मुद्दाम जाहीर केला. This is typical of China.

५ ऑक्टोबरला 'वंशभेद विरोधी यू. एन्. स्पेशल कमिटी 'ची खास बैठक घेऊन त्यापुढे मला बोलण्यासाठी निमंत्रित केले होते. माझ्या भाषणापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे आफ्रिकेतील या वंशभेदाविरुद्ध पहिला आवाज भारताने उठविला ( १९४४ ). त्यासाठी भारताविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ही बैठक मुद्दाम बोलाविली होती. त्यासाठी प्रत्येक भौगोलिक विभागांचे प्रतिनिधि बोलले. त्यांची भाषणे ऐकताना मन गहिवरून गेले. महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू यांच्यासंबंधी आदराने ओथंबलेली भावना त्यांनी व्यक्त केली. या खेपेच्या यू. एन्. मीटिंग्ज् अविस्मरणीय अनुभव म्हणून माझ्या लक्षात राहतील.

आज रात्री श्री. साद हाशमी यांच्या घरून जेवून आलो. रात्री ९॥ वाजता अध्यक्षीय उमेदवारांची जाहीर जुगलबंदी टेलिव्हिजनवर होती. ती ऐकून आलो. अमेरिकन मतदारांवर काय परिणाम झाला असेल तोच महत्त्वाचा हे कबूल पण मी तरी निराश झालो.

आर्थिक प्रतिगामी व अनुदार धोरण कोण घेतो त्याचीच स्पर्धा होती म्हटले तरी चालेल. श्री. कार्टर बोलताना हसतमुख होते. श्री. फोर्ड गंभीर होते. त्यांनी आंतरराष्ट्रीय धोरणांची चर्चा केली. शांतता शब्द वारंवार उच्चारला पण शस्त्रशक्ती वाढविण्यावर भर होता.

इस्राएलला दोघेही स्पर्धेने शस्त्रास्त्र-शक्ती पुरविण्याची भाषा बोलत होते. विकसनशील राष्ट्रांची कुणालाच आठवण झाली नाही ! फूड सप्लायचा नाही म्हणायला ओझरता उल्लेख आला. दोन्ही व्यक्तित्वांचे स्वरूप काय होते ? निदान मला तरी कार्टर चलाख म्हणून धोकादायक वाटतो. फोर्ड गंभीर पण प्रामाणिक व्यक्ति वाटली.

मी त्यांचा मतदार नसल्यामुळे माझ्या या मताने कुणाचा फायदा वा तोटा होणार नाही. अमेरिकन जनता कुणाला निवडते ते पहावयाचे. म्हणजे त्यांची पारख करण्याची दृष्टी व शक्ती समजून येईल.

येथील आमचे प्रतिनिधी श्री. रिखी जयपाल यांचेसंबंधी लिहिल्याशिवाय हे लेखन पुरे होऊ शकणार नाही. मला हा अधिकारी आवडतो म्हणण्यापेक्षा मला त्यांचेबद्दल आदर वाटतो हे म्हणणे अधिक सार्थ होईल. त्यांच्याबद्दल सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींमध्ये आपुलकी आहे. गोडवा

स्वभाव, गंभीर व्यक्तिमत्व व तीक्ष्ण बुद्धी यामुळे त्यांचे येथील काम फारच चांगले चालले आहे. क्वचितच कुणाबद्दल मनापासून इतके चांगले लिहावे असे मला वाटले असेल. Good luck to him.

उद्या सकाळी मेट्रॉपॉलिटिन म्युझियम ऑफ फाइन आर्ट येथे जाऊन तासभर खर्च करणार आहे. पुस्तके पुष्कळच खरेदी केली आहेत. Buck minster Fuller ची पुस्तके हिंदुस्थानमध्ये मिळत नाहीत. येथे पाहिली. सहजासहजी मिळाली नाहीत. प्रयत्नपूर्वक मिळविली.

*

## ९१ सॅनफ्रॅन्सिस्को

१० ऑक्टोबर, १९७६

न्यूयॉर्कहून निघण्यापूर्वी लिहीन म्हटले पण शेवटच्या दिवशीच्या कार्यक्रमाची न कळत इतकी गर्दी झाली की निवांतपण मिळालेच नाही.

८ तारखेला बांगला देशचे 'लंच' चे आमंत्रण मी व श्री. रिखी जयपाल, दोघांनीही स्वीकारले होते. त्यांचा आग्रहही फार होता. गेलो ते बरे झाले.

त्यांची दृष्टि कितीही दूषित असली तरी आम्ही खिलाडू वृत्तीने जिथे वागायला पाहिजे तिथे वागणारच हे त्यांना समजणे जरूर होते. आदमखान व्यवहाराला धरून वागला. मी मुद्दामहून त्यांच्याशी त्यांचे नवे धोरण, कसे निष्फळ मूलतःच आहे हे सांगण्यासाठी बोलणे काढले. ऐकून घेतले. पण गंगेचे पाणी तुमच्या हातात आहे. आम्ही प्रयत्न करून पहावयास पाहिजेत ना ? अशी सबबवजा बाजू मांडली.

या जेवणाच्या वेळी कैसर, त्यांचा पी. आर. पुष्कळच बोलत होता. तो आपली व आपल्या घराण्याची हकिगत सांगत होता. तरुणपणी तो आय. पी. एस्. ( पोलिस अधिकारी ) होता हे त्यांने सांगितले.

मला हे माहीत आहे असे सांगताच चपापला. " माझा बायो-डेटा तुम्ही पाहिला आहे तर " असे विचारू लागला. मी म्हटले, " तू इतका प्रसिद्ध गृहस्थ आहेस की, तुझी ही सामान्य माहिती माझ्याप्रमाणे अनेकांना आहे. " पुष्कळच बोलत होता. " आमच्या मिनिस्टरशी ( आदमखान ) बोला व तुमचे म्हणणे पटवा " अशीही गळ घालीत होता. मी म्हटले, " मी बोलेन पण त्याला किती पटवू शकेन हे सांगता येणार नाही."

या सर्व बांगलादेशी डेलिगेट्स्‌मध्ये त्यांच्या विदेश-मंत्रालयाचा प्रतिनिधि असलेला एक ऑफिसर मला मुद्दाम बाजूला घेऊन आपले मनोगत मोकळेपणाने बोलला. गेल्या महिन्यात दिल्लीला आलेल्या त्यांच्या डेलिगेशनमध्ये तो होता. आदमखान इंदिराजींना भेटला त्या वेळी तो बरोबर होता. त्या भेटीत इंदिराजींनी जी भावना व्यक्त केली ती माझ्या हृदयाला भिडली. आमच्याकडून त्यांच्या हृदयापर्यंत भिडण्याचा प्रयत्नच झाला नाही. आमच्या मिनिस्टरने मीटिंग फारच ' ॲब्रप्टली ' संपविली वगैरे. विचार करणारी माणसे अजूनही त्यांच्यामध्ये आहेत एवढाच तूर्त त्याचा चांगला अर्थ मी काढतो.

८ ला दुपारी दोन टेलिव्हिजन मुलाखती आणि येथील एका भारतीयाने चालविलेल्या पत्राला लांबलचक मुलाखत यांत दोन-अडीच तास गेले. ' हूस्टन ' ला जाण्याची वेळ झाली आणि १४-१५ दिवसांनी Cartyle सोडले. हूस्टन व न्यूयॉर्क एक तासाचे अंतर आहे. तीन साडेतीन तासांचा प्रवास करून आम्ही ११-११॥ पर्यंत तेथे पोहोचलो. सामान घेऊन हॉटेलमध्ये (रिजंट) पोहोचायला सव्वा-दीड झाला.

*

९ ऑक्टोबर, १९७६

थोडा उशीरा उठून सावकाश तयार झालो. सकाळी शहरापासून २०-२५ मैलांवर असलेला नासा-स्पेस-सेंटर पाहाण्यासाठी गेलो. जगाचे आज आकर्षण असलेले हे केंद्र आहे. सर्व अंतराळवीरांचे शिक्षण येथे होते.

चंद्रावर गेलेली सर्व यंत्रे – याने, येथेच बनली. अंतराळातील सर्व प्रयोगांचे नियंत्रण येथूनच होते. हजारो वैज्ञानिक या केंद्रात काम करतात. यांत काही भारतीय वैज्ञानिकही आहेत.

आज – वर्षात ते एक दिवस केंद्र बंद ठेवतात – तो दिवस होता. तरीही केंद्रातील सर्व ठिकाणे फिरून दाखविण्याबाबत त्यांनी खास व्यवस्था केली होती.

दोन वैज्ञानिकवजा अंतराळवीर मुद्दाम हजर होते. हे केंद्र पाहण्याची माझी फार वर्षांची हौस होती ती आज पुरी झाली.

१९६१ साली प्रे. केनेडीने दहा वर्षांच्या आत मानव चंद्रावर उतरेल अशी घोषणा केली आणि ते आवाहन वैज्ञानिकांनी स्वीकारून पुरे केले. अशी विश्वाची नवी दालने खोलण्याचा पराक्रम करणारे हे कार्यक्षेत्र पाहून मन प्रसन्न झाले.

एकदोन वर्षांत आणखीन काही नवी पावले टाकण्याचा त्यांचा कार्यक्रम आहे. त्याची तयारी चालू आहे. अंतराळामध्ये लॅबॉरेटरी कायमची क्रियाशील ठेवावयाचा त्यांचा व रशियनांचा काही संयुक्त प्रयत्न होण्याची शक्यता त्यांनी बोलून दाखविली.

सूर्यप्रकाशापासून मानवी उपयोगासाठी एनर्जी – शक्ती मिळविण्याच्या प्रयत्नासाठी अंतराळाच्या क्षेत्रात विशेष करण्यासारखे आहे असे येथे मत दिसले. त्यांचेही प्रयोग करण्याचे प्रयत्न आहेत. त्यांच्या कामासंबंधी अनेक तांत्रिक बाबी त्यांनी सांगितल्या. अर्थात् त्या सर्वच आम्हाला समजल्या असा त्याचा अर्थ नव्हे. परंतु प्रत्यक्ष यान कसे असते, आत यंत्र-सज्जता कशी असते, तेथे कसे राहावयाचे, खाणे-पिणे व इतर

नैमित्तिकांची अंतराळात असताना काय व्यवस्था असते हे सर्व त्यांनी समजाविले.

अंतराळ-प्रवास सुरू असताना पृथ्वीवरून ज्या ठिकाणाहून त्याच्या तपशीलाचे व इतर सर्व नियंत्रण होते तेथे आम्ही पुष्कळ वेळ काढला. विज्ञानाची प्रगति या देशात फार आहे. हे सर्व बऱ्याच तपशीलात पाहिल्यानंतर समाधान वाटले.

दुपारचे जेवण नासा केंद्रात केले. अर्धा तास विश्रांति घेऊन येथील युनिव्हर्सिटी कँपस् मध्ये गेलो. तेथे हिंदी समाजाची सभा होती.

सभेत मी २०–२५ मिनिटे बोललो. एक तासभर तेथे हिंदुस्थानच्या आजच्या परिस्थितीबाबत माझी उलट तपासणी, प्रश्नोत्तरांच्या रूपाने झाली. पाच चार चळवळे त्यात होते. हातवारे, आरडाओरडा करण्याचा त्यांचा स्वभाव दिसला. काही चमत्कारिक प्रश्नही त्यांनी विचारले.

मी शांतपणे उत्तरे देत होतो. वर उल्लेखिलेल्या लोकांखेरीज ५०० ६०० लोक उत्तम सहकार्य देत होते. माझ्या उत्तरांना टाळ्या वाजवून संमति व समाधान व्यक्त करीत होते. रात्री फॉरिन अफेअर्स इन्स्टिटयूशनपुढे बोललो. फक्त निवडक अमेरिकन्स होते. सर्व तऱ्हेचे वेचक प्रश्न विचारले. यशस्वी बैठक.

हूस्टन शहर व आसमंतात तीन हजारांवर भारतीय कुटुंबे आहेत. डॉक्टर्स, इंजिनिअर्स, प्रोफेसर्स याशिवाय स्वतःचे उद्योगधंदे करणारेही बरेच आहेत. त्यांत महाराष्ट्रीय कुटुंबेही आहेत. बरेचजण सभेच्या ठिकाणी आग्रहाने भेटले.

सकाळी हूस्टन सोडून निघालो. वाटेत येथील भारतीयांनी येथे एक मंदिर म्हणून बांधलेली जागा घेतली आहे. तेथे अर्धा तास काढला. इतक्या दूर अंतरावर आपल्या चालीरीति व संस्कार यांची किती ओढ असते त्याची कल्पना आली.

अजून खरे मंदिर व्हावयाचे आहे. पण एका हॉलमध्ये धार्मिक तसबिरी – प्रमुख ठिकाजी राम-सीता, ॐ, गणेश या होत्या. आदबीने पूजास्थानी मांडल्या होत्या. आरती झाली. 'सुखकर्ता दुःखहर्ता' ही गणेशाची

आरतीही झाली व 'घालीन लोटांगण वंदीन चरण' हेही झाले. सर्वांमध्ये घरगुती जिव्हाळा होता.

पूजा-आरती सर्व झाले नि मी सर्वांचा निरोप घेण्यासाठी गेलो. सर्वांनी एकच प्रश्न केला, "वेणुताई कशा आहेत? त्यांना बरोबर का आणले नाहीत?"

इतक्या दूर राहणारी माणसेही तुझी इतक्या आपुलकीने चौकशी करतात या विचारानेच मी तृप्त झालो. त्यांचे मनापासून आभार मानून निरोप घेतला.

*

## ९३ ह्यूस्टन

११ ऑक्टोबर, १९७६

आज बरोबर दोन वर्षे झाली. मी विदेश मंत्रालयाची सूत्रे घेतली त्याला. सकाळी श्री. जानकी गंजूनी मला आठवण करून दिली याची. योगायोगाने श्री. केवलसिंग बरोबर होते. ते आताच, म्हणजे ८ तारखेला ॲम्बॅसिडर म्हणून येथे आले आहेत. मग, श्रीपाद डोंगरे, शरद काळे दोघेहीजण एकत्र बसून अनेक जुन्या आठवणी निघाल्या. काळ किती झपाट्याने जातो नाही?

आज रात्री मी येथून निघून लॉस् एंजेल्स्ला जाईन. मी उतरलो आहे हे अमेरिकेतील उत्तम हॉटेल आहे. (Faiomont Hotel and Tower.) ७२ साली आलो असताना, मला वाटते, मी येथेच उतरलो होतो. निदान मी ज्या खोलीत उतरलो आहे ती उत्कृष्ट आहे. (ती मात्र जुनी नाही) एकदम मन प्रसन्न करणाऱ्या (cheerful-open yet private) दोन्ही बाजूंनी Bay of S. F. चे उत्कृष्ट दर्शन होत आहे.

विसाव्या मजल्यावरून बे काठच्या शहराचा भाग गोल्डन ब्रिज-पर्यंत विस्तारलेला, छान दिसतो. काल-आज दोन्ही दिवस स्वच्छ सूर्य-प्रकाश असल्यामुळे, विविध रचनेची व उंचीची शुभ्र रंगाची घरे व इमारती मोहून टाकतात.

आता दुपारी बे वर पॅसिफिकवरून धुके घुसले आहे. तेवढाच तो धुक्याचा पट्टा बे वर पसरतो आहे. हे मी उगीच पहात बसलो आहे. कितीही वेळ ते पहात बसले तरी ते अपुरे वाटते.

काल दुपारी पोहोचल्यावर 'रेड-वुड' – (ब्रिजच्या पलीकडे १५ च मैलांवर असावे) पहावयास गेलो. पूर्वी मी येथे आलो असता पाहिले होते. मला ते अतिशय आवडले होते. पुन्हा पुन्हा पहाण्यासारखे आहे. ४०-५० मिनिटे तेथे भटकलो. २४० फूट उंचीचे व १२००-१३०० वर्षांचे एक झाड आहे. ही झाडे कॅलिफोर्नियामध्येच आणि तीही समुद्र-किनाऱ्यालगतच्या प्रदेशातच येतात. वन-संरक्षणाची अमेरिकेची ही अनुकरणीय परंपरा आहे. हे राष्ट्रीय उद्यान आहे. दरवर्षी १० लाख माणसे येथे भेट देतात.

परत येऊन शहर मेमोरियलमध्ये गेलो. तेथे लायब्ररीचे उद्घाटन माझे हस्ते केले. ५०० भारतीय वृद्ध-तरुण जमले होते. नंतर रिसेप्शन झाले. अनेक नवी माणसे भेटली. काही ओळखीची निघाली.

के. के. शहा यांची मुलगी शिक्षणासाठी येथे आहे. ती मुद्दाम आली होती.

रात्री 'गेलॉर्ड' या हिंदी रेस्टॉरॉंमध्ये उत्तम जेवण घेतले. सॅनफ्रॉन्सिस्कोमध्ये दिल्ली !

सकाळी या शहराच्या मेयॉरतर्फे या शहराची की (Key) सन्मान-दर्शक दिली. स्टेट डिपार्टमेंटचे व मेयॉरचे प्रतिनिधि हजर होते.

आज सोमवार असून या शहरामध्ये आज सुट्टी आहे 'कोलंबस डे'. हिंदुस्थान शोधण्याकरिता निघालेल्या कोलंबसला आज अमेरिका साप-डली. (बऱ्याच शतकांपूर्वी) म्हणून हा दिवस अमेरिकेत आणि विशेषत: येथे मोठ्या प्रमाणात साजरा होतो.

कालपासून येथे मिरवणुका (परेड्स्) निघत आहेत. ह्या मिरवणुकांचे स्वरूप म्हणजे २६ जानेवारीला सैनिक-संचलनानंतर चित्रविचित्र रंगांचे फलक व निशाणे घेऊन निघणारी पथके असतात ना तशी. मजेदार अनुभव.

दुपारी प्रेस-क्लबचे जेवण. नंतर भाषण व प्रश्नोत्तरे झाली. आपले मतभेद प्रश्न विचारताना दाखवितात, परंतु उत्तर शांतपणे ऐकतात. पटले तर तसे सांगतातही. प्रेसवरील निबंध व चौकशीशिवाय कैद हे या देशातील कुणालाच आम्ही शंभर टक्के पटवून देऊ शकत नाही. पार्श्वभूमी तपशीलाने सांगितली म्हणजे निदान शांत होतात.

आता दुपारी ५॥ वाजता 'वर्ल्ड अफेअर्स' पुढे भाषण व पुन्हा प्रश्नोत्तरे. तेच प्रश्न – तीच उत्तरे. पण हे करण्याची गरज आहे. अनेकांना भेटून होते. काही संभाषणे होतात. आपला आवाज तितकाच पसरतो. देशाची धोरणे स्पष्ट करण्याची ही संधि मी पुरेपूर वापरतो आहे.

रात्री कौन्सल जनरल श्री. लखन मलहोत्रा यांचे घरी जेवण व तेथून परस्पर विमानतळ. श्री. डोंगरे सामानाची आवराआवर करीत आहेत. आणि मी दुपारचा उत्तम चहा पीत पीत हे लिहीत आहे.

❋

## ९४ लंडन

१५ ऑक्टोबर, १९७६

आत्ताच Yahoo हे प्रसिद्ध ब्रिटिश लेखक श्री. स्विफ्ट यांच्या जीवनाचे नाटक पाहून आलो. दोन सव्वादोन तासांचे गंभीर नाटक. अनेकविध नवीन तंत्रे वापरली आहेत. प्रसिद्ध ब्रिटिश नट श्री. अलेक गिनेज याने प्रमुख भूमिका केली आहे.

काल सकाळी ८॥ वाजता एअर-पोर्टवर आलो. या हॉटेलमध्ये (दि हॉवर्ड हॉटेल) पोहोचण्यास तासाचे वर वेळ गेला.

इंग्लंडची आर्थिक परिस्थिती अडचणीची आहे असे दररोज वाचतो – ऐकतो आहे. पौंड एकसारखा घसरतो आहे. पण या शहरात आल्यानंतर हे काही व्यवहारात दिसत नाही. हॉटेल्समध्ये जागा मिळत नाहीत. दुकानांत विविध तऱ्हेच्या वस्तूंची व त्यांच्या गिऱ्हाइकांची रेलचेल. नाटयगृहे – पाय ठेवायला जागा नाही अशी हाऊस फुल्ल असतात. आम्ही या हॉटेलमध्ये उतरलो कारण सेव्हॉयमध्ये जागा नाही.

काल लॉस एंजेलिस ते न्यूयॉर्क आणि लगेच लंडन असा प्रवास झाला. त्यामुळे अगदी थकून गेलो. परंतु विश्रांतीची सोय नव्हती. वेळ नव्हता. दुपारी कसे तरी दोन घास पोटात ढकलले आणि कामाला लागलो.

१९६४ नंतर प्रथमच लंडनमध्ये प्राइम मिनिस्टर व इतर कॅबिनेट मिनिस्टरना आज भेटणार होतो. महत्त्वाचे कागद चाळले. जेवणासाठी बरोबर श्री. नटवरसिंग व श्री. वेलोदी यांना निमंत्रिले होते. त्यांच्याशी चर्चेची सूत्रे बोलून घेतली.

प्रधान मंत्रि श्री. कॅलहॅन व विदेशमंत्रि श्री. क्रॉसलंड यांना भेटलो. Race Relations, South Africa's issue and conference of Zimbabe – दोन देशांमधील व्यापार हे प्रमुख विषय होते. दोघांशीही चर्चा मनमोकळी झाली. प्रधान मंत्रि अधिक Relaxed and warm होते. मिसेस् थॅचरशीही भेट झाली. टेलिव्हिजनवर मुलाखत करून परत आलो. कॉमनवेल्थचे मुख्य सचिव श्री. सनी रामफल नंतर आले. अर्धाएक तास होते.

दुपारी ना. मायकेल फूट यांचे जेवण होते. त्यापूर्वीची सकाळ इंडिया-हाऊसची पाहणी करण्यात, स्टाफशी बोलण्यात आणि प्रेस-कॉन्फरन्स मध्ये गेली.

आज नाटकाला जाण्यापूर्वी महाराष्ट्र मंडळाचे सदस्य भेटले. काहीजण सहकुटुंब होते. एवढ्या खुर्च्या नव्हत्या. स्त्रियांना खुर्च्या दिल्या आणि बाकीचे सर्वजण ( माझ्याशिवाय ) घरच्यासारखे खाली बैठकीवर बसले. मनमुराद चर्चा व गप्पा झाल्या.

उद्या सकाळी १०। वाजता विमान आहे. त्यासाठी ८।। ला निघावे लागेल. आज थकवा नाही पण उद्याच्या प्रवासापूर्वी पाच-सहा तासांची विश्रांति लागेल म्हणून हे आवरते घेतो.

लॉस एंजेलिसमध्ये लिहू शकलो नाही. दोन रात्री आणि एक दिवस होतो. १९६४ साली ज्या हॉटेलमध्ये होतो तेथेच यावेळीही होतो. कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्सनी व्यवस्था उत्तम केली होती.

व्याख्यानासाठी भारतीय व अमेरिकन मिळून पाचशे लोक लंच-साठी आले होते. प्रश्नोत्तरे चांगलीच झाली. दिवस कसा गेला ते समजले नाही. पाच मिनिटांचीही फुरसद मिळाली नाही. रात्री एका मेक्सिकन रेस्टॉरॉंमध्ये मला डिनर व मेक्सिकन संगीताची मेजवानी झाली. अविस्मरणीय संध्याकाळ !

*

## ९५ फ्रँकफर्ट

१५ जानेवारी, १९७७

सकाळी ६।। वाजता येथे पोहोचलो. रोमला न थांबणारी ही फ्लाइट असल्यामुळे आमच्या अंदाजापेक्षा दोन-अडीच तास आधी पोहोचलो. त्यामुळे मोकळा वेळ बराचसा मिळाला. दिल्ली ते फ्रँकफर्ट ११ तास लागले. सात तास झोप झाली. तीन तासांचा वेळ सरकारी कागदपत्र वाचण्यात गेला. सकाळी उतरलो तेव्हा ताजातवाना होतो.

येथें थंडी अधिक २ डिग्री म्हणजे दिल्लीपेक्षा थोडी जास्त. मात्र सर्व एअर-पोर्ट बर्फमय होते. थंड वारा चांगलाच झोंबत होता.

आता सव्वादहा वाजता फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी या देशाचे विदेशमंत्रि श्री. गेनचर (Hans Dietrich Genscher) हे मुद्दाम बॉनवरून

भेटण्यासाठी येणार आहेत. गेल्या खेपेला म्हणजे १९७५ सालीही असेच ते एकवेळ आले होते. तीही भेट विमानतळावरच होती. तशी त्यांची खास व्यवस्था असते.

या खेपेला मोठी गंमत आहे. पश्चिम जर्मनीचे आणि पूर्व जर्मनीचे ( FDR आणि GDR ) विदेशमंत्र्यांची भेट व चर्चा त्यांच्या त्यांच्या विमानतळावरच होणार आहे. काही प्रश्न दोघांनाही विचारण्यासारखे आहेत. परंतु त्यांची येणारी उत्तरे किती व कशी वेगवेगळी येतील ते पहाणे मोठे उपयोगी आणि मनोरंजक ठरणार आहे.

श्री. गेनचरना मार्चमध्ये हिंदुस्थानला भेट देण्याची इच्छा आहे. परंतु या आठवड्यात जर आपल्या पार्लमेंटच्या निवडणुकी जाहीर झाल्या तर मार्चचा पहिला आठवडा सोयीस्कर होणार नाही. पण त्याला काय सांगावे हा पेच आहे.

मी त्यांना पूर्वीच निमंत्रण दिलेले आहे. या कामात अशी लहानशी पण धर्मसंकटे असतात.

थोड्या तासांसाठी हॉटेलमध्ये थांबलो आहे. १० ते १२ श्री. गेनचरना भेटून लगेच निघणाऱ्या विमानाने बुखारेस्टला प्रयाण करीन. मधेच वेळ मिळाला म्हणून लिहावयाला मिळाले.

*

## ९६ बुखारेस्ट

१८ जानेवारी, १९७७

सर्व बेत बदलून उद्या सकाळी रोमहून दिल्लीला परतण्यासाठी निघणार आहे. झेकोस्लोव्हाकियाच्या विदेशमंत्र्यांना आपल्या राजदूता-मार्फत संदेश पाठवून मी येऊ शकत नसल्याबद्दल माफी मागितली आहे. कृपा ही की, माझा इथला सर्व कार्यक्रम संपला आहे.

फक्त आज संध्याकाळचे माझे रात्रीचे भोजन, 'माकोव्हिस्की' ( विदेशमंत्रि ) यांचेसाठी आहे. हा इथला शेवटचा कार्यक्रम. तो संपला की उद्या परतण्यास मोकळा आहे.

ही नाटचमय हालचाल आज दुपारी अडीचच्या सुमारास झाली. मी ॲम्बॅसिडर कौलचे घरी दुपारचे जेवणासाठी गेलो होतो. येथील जेवणे खाऊन उबगलो होतो. तेव्हा आपली डाळ-रोटी खावी म्हणून हा बेत आम्ही योजला होता.

एकाएकी टेलिफोन वाजला. राजदूत श्री. कौल यांना बेलग्रेडचा फोन आहे असे सांगितले. तो घेण्यासाठी ते गेले. मी तोपर्यंत माझे जेवण संपविले. निवांत हात धूत होतो. राजदूत घाईघाईने माझेकडे आले व म्हणाले "तो बेलग्रेडचा कौन्सल मला काही सांगत नाही. तुमचेशीच प्रत्यक्ष बोलायचे म्हणतो. तुमचेसाठी काही मेसेज आहे."

मी गेलो तेव्हा त्या कौन्सलने आपले नाव सांगितले व पी. एम्. चा मेसेज आहे, सतरा तारखेचा, तो मी वाचून दाखवितो असे म्हणून हिंदीत असलेला संदेश वाचून दाखविला.

सारांश असा होता की "जो महत्त्वाचा निर्णय आपण घेणार होतो तो उद्या घेणार आहे. तुमच्याशी मी, तुम्ही जाण्यापूर्वीच बोलणार पण तुम्ही व मीही कामाच्या गर्दीत, त्यामुळे राहून गेले. तुम्हास निर्णय रेडिओवर समजू नये, आधी माहीत व्हावा म्हणून कळवीत आहे. शक्य असेल तर ( हो सके तो ) कार्यक्रम संपण्यापूर्वी परत या."

मी दिल्ली सोडण्यापूर्वी वातावरणात निवडणूक खच्चून भरली होती. तेव्हा तो महत्त्वाचा निर्णय कोणता ते अगदी स्पष्ट होते. पार्लमेंट लोकसभा बरखास्त करून मार्चमध्ये निवडणुका घेणे !

राजदूताला मी विश्वासात घेतले व सांगितले की, पहिल्या परतीच्या प्लेनने मी दिल्लीस जाऊ इच्छितो. झेकोस्लोव्हाकियाचा कार्यक्रम रद्द. निर्णय प्रत्यक्ष जाहीर होईतो कारण कुणाला सांगू नका. परंतु परत जाण्याचा माझा निर्णय पक्का.

तोही योग्य ते उमजला व योग्य ती कार्यवाही त्यांनी सुरू केली. निर्णय संध्याकाळी ६ वाजता बी. बी. सी. ( येथील ) वरून येथे सर्वांनाच समजला.

निवडणुका होणार ! I am happy. गेल्या वर्षीच त्या घ्याव्यात असे मला वाटले होते. पी. एम्. ला तसे बोललोही होतो. पण त्यांचा मूड वेगळा होता. इमर्जन्सी राहील पण बहुतेक सर्व राजबंदी सुटतील आणि निवडणुकीचे वातावरण प्रस्थापित होईल. This is a gain.

हवा मोकळी होईल. आज मी आनंदात आहे. परतल्यानंतर दीड-दोन महिने याच कामात एकसारखा गुंतलेला राहीन. २० तारखेस पहाटे दिल्लीस २॥-३ वाजता येईन. तसा संदेश पी. एम्. ला पाठविला आहे.

इथली भेट छोटी होती पण ती उत्तम प्रकारे पार पडली. आलो तेव्हा उणे २ हवा होती. पण रस्त्यावर वगैरे बर्फ दिसले नाही. ता. १६ ची रात्र येथे काढून दुसरे दिवशी सकाळी ' ब्रशॉव्ह ' म्हणून येथून ९० ते १०० मैलांवर असलेल्या शहरी, मोटारने गेलो. कार्पेथियनच्या रांगा ओलांडून जावे लागते.

६० कि.मी. चा घाट हिवाळी शुभ्र सौंदर्याने नटलेला होता. डोंगर व डोंगरावरील झाडे, आसपासची राने बर्फाने माखली होती. निसर्ग-सौंदर्याचा हा हिवाळी थाट मी प्रथमच पहात होतो.

तो संपूर्ण दिवस, ते शहर पाहिले. दोन लाख वस्तीचे, डोंगररांगांनी वेढलेले प्राचीन शहर आहे. एक येथील जर्मन लोकांनी पण ६०१ वर्षे चालविलेले प्रार्थनामंदिर – ब्लॅक चर्च – पाहिले. रोमानियन भाषेची पहिली शाळा पाहिली. (काही शतकांपूर्वीची). कारखान्यांना वगैरे भेट होती पण मी खुबीने त्यातून बाहेर पडलो.

१७ तारखेला सकाळी ब्रशॉव्हहून निघून ३०-३५ कि.मी. अंतरा-वरील घाटातील Predent येथे आलो. प्रेसिडेंट चाऊशेस्की या दिवसांत येथे राहतात. १० ते १२ सकाळचे दोन तास त्यांच्याशी भेटून चर्चा केली. मी त्यांना प्रथमच भेटत होतो. या देशाचे ते एकमेव सत्ताधिकारी आहेत. अत्यंत हुषार गृहस्थ म्हणूनही त्यांचा लौकिक आहे. सी. डी. देशमुखांसारखे व्यक्तिमत्व चेहेऱ्यात, उंची व अंगलटीत आहे.

दुपारी बुखारेस्टला चार वाजता पोहोचलो. विदेशमंत्र्याना ५ ते ६ भेटलो. त्यानंतर काल व आज त्यांना परत दोन वेळा भेटलो. प्राइम-मिनिस्टरनाही सकाळी भेटलो.

दोन सव्वादोन कोटींचा हा देश. पण विदेशनीति अशी चपखल ठेवली आहे की, आश्चर्य वाटावे. वॉर्सा-कराराचे सभासद आहेत. अमेरिका आणि चीन यांच्याशीही आर्थिक, व्यापारविषयक उत्तम संबंध आहेत. अरबांचे मित्र आहेत, तसेच इस्राएलचेही दोस्त. कापेकॉनचे सदस्य तर ई. सी. सी. शीही सहकार्य. आर्थिक प्रगतीही उत्तम केली आहे. १९४४ साली पर कॅपिटा ८० डॉलर्स उत्पन्न होते. आता ते एक हजार डॉलर्स झाले आहे.

प्रखर राष्ट्रवादी देश आहे. माझे असे मत झाले आहे की, कुठल्याही देशाची विदेशनीति समजावयाची असेल तर त्या देशांतील आवडत्या विनोदी कथा (जोक्स) काय आहेत ते समजावून घेतल्या पाहिजेत. सर्व विनोदाचा विषय रशियाची थट्टा करण्याच्या उद्योगात असतो. त्यांच्या गटात आहेत, परंतु स्वत्त्व घालविले नाही. अंतर्गत समाजवादी राजवट कडक आहे व कार्यक्षमही आहे.

असा हा छोटेखानी पण महत्त्वाचा सुंदर देश मी पाहिला. येथील नेत्यांशी मनमुराद मोकळेपणाने बोलता आले या आनंदाने मी परत येत आहे.

*

## ९७ रोम

१९ जानेवारी, १९७७

लवकर दिल्लीला पोहोचावे म्हणून बुखारेस्टवरून निघणारे पहिले विमान गाठून आम्ही सकाळी ११ वाजता आलो. अडीच वाजता एअर इंडियाची फ्लाइट होती. आता संध्याकाळचे ७ वाजलेत पण अजून विमान केव्हा येणार ते निश्चित असे कुणालाच माहीत नाही.

प्रत्येक एक तासानंतर वेळ वाढवून सांगत आहेत. आताच्या माहितीनुसार रात्री ९॥ वाजता विमान येईल आणि १०॥ वाजता निघेल. कोण जाणे !

दुसरी दिल्लीला जाणारी सर्व्हिस नाही. प्रागची भेट, दिल्लीला लवकर जाता यावे म्हणून टाळली. आणि येथे अकारण १२ तास फुकट गेले. एअर इंडियाचे बाबतीत हे नेहमी घडते. उगाच मनःस्ताप !

मी यापूर्वी रुमनियाच्या भेटीचे सारांशरूपाने लिहिले आहे. तेथे झालेल्या चर्चा फार उपयोगी व महत्त्वाच्या आहेत. पुढे त्या स्मरणातूनही जातात. ( सरकारी अहवाल असतात ही वेगळी गोष्ट. ) म्हणून त्यांचा महत्त्वाचा गोषवारा नमूद करीत आहे.

माझ्या दोन महत्त्वाच्या चर्चा झाल्या. एक प्रेसिडेंट चाऊ शेस्कू यांच्याशी व दुसरी विदेशमंत्रि माकोव्हेस्कीशी. पहिली दोन तास व दुसरी तीन हप्त्यात पाच तास.

त्या दोघांनीही आपल्या देशांचे प्रश्न मूलतः मांडले आणि त्या संदर्भात त्यांनी काही मूलभूत गोष्टीही सांगितल्या.

चाऊ शेस्कू साठी, त्यांनी अधिक बोलावे म्हणून माझ्या प्राथमिक संभाषणात तीन प्रश्न त्यांच्यापुढे उभे केले होते.

१) हेलेंसिकी नंतरच्या युरोपचे स्वरूप. २) युरोपमधील आजचे कम्युनिस्ट व नॉन कम्युनिस्ट आंदोलनाचे स्वरूप, त्यातील नव्या प्रवृत्ति व कल्पना आणि ३) चीनमधील अंतर्गत परिस्थिती व भावी धोरणाची दिशा.

त्यांची उत्तरात्मक चर्चा अशी –

१) हेलेंसिकी ही युरोपच्या दृष्टीनेच नव्हे तर जगाच्या दृष्टीनेही घडलेली महत्त्वाची घटना आहे. लष्करी तयारी व शस्त्रास्त्राची मर्यादा या बाबतीत तेथे व्यक्त झालेले विचार हे मूलगामी म्हणून महत्त्वाचे, परंतु या बाबतीत हेलेंसिकीनंतर काहीच प्रगति दोन्ही बाजूंनी झाली नाही. आणि हे घडले नाही तर हेलेंसिकी फुकट आहे. १० टक्के लष्करावरील खर्च कमी झाला पाहिजे. पश्चिमी देश नंबर ३ चे बास्केट धरून बसले

आहेत. त्यालाही महत्त्व आहे पण ते इतके महत्त्वाचे नाही की ज्यामुळे त्यालाच प्राधान्य मिळावे.

२) युरोपमध्ये फॅसिस्ट जुन्या राजवटी होत्या त्या गेल्या. पोर्तुगाल व स्पेनमध्ये लोकशाही राजवटी आल्या आहेत किंवा येऊ घातल्या आहेत. सोशल चेंजवर भर देऊन या लोकशाहीची वाटचाल होईल अशा प्रकृति दिसत आहेत. पश्चिमेकडील प्रगत राष्ट्रांच्या राज्यव्यवस्थेमध्ये plurality of political parties हे एक महत्त्वाचे अंग आहे. ( आफ्रिकन विकसनशील देशांमध्ये याचे उलट चित्र आहे. ) त्यात कम्युनिस्ट पक्षाला आपली भूमिका वटवावयाची आहे. त्यामुळे त्यांचे कार्यनीतीचे स्वरूप बदलते. पूर्व युरोपचे त्यांना अनुकरण करण्याची गरज नाही. सोशल चेंजला पायाभूत मानून प्रगत पक्षाची एकजूट वा सहकार्याची भूमिका ही त्यांना महत्त्वाची आहे. त्या दृष्टीने पश्चिम युरोपमध्ये कम्युनिस्ट मुव्हमेंटमध्ये नव्या कल्पनांचा उदय झाला आहे.

जागतिक कम्युनिस्ट चळवळीला मार्गदर्शक असे कुठे एक केंद्र असू शकत नाही. ( हा त्यांचा टोला रशियाला होता. ) पश्चिम युरोपचे बाबतीत नव्हे तर पूर्व युरोपचे दृष्टीनेही.

३) चीनमध्ये अंतर्गत झगडे आहेत. परंतु It is China's business झगडे आहेत याचाच अर्थ आपली अंतर्गत स्थिति व भावी धोरणाची दिशा बळकट करण्याच्या प्रयत्नात चीन गुंतला आहे, रशिया व चीन यांचे संबंध सुधारतील. हिंदुस्थानचे व चीनचे संबंध सुधारण्याच्या मार्गावर आहेत. गति कदाचित मंद राहील. परंतु दोन्ही देशएकमेकांकडे दुर्लक्ष करूच शकत नाहीत इतका त्यांचा शेजार निकटचा आहे व त्यांची प्रत्यक्ष वा सुप्त सामर्थ्ये (पोटेन्शिअल) इतकी जबरदस्त आहेत.

माकोव्हेस्कीने आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेच्या आधुनिकीकरणा-वर सरकारी धोरणाचा कसा भर आहे; किंबहुना चालू योजनेचा काळ त्या दृष्टीने क्रांतिकारक कसा आहे ते सांगितले." शेती, उद्योग व शिक्षण यांचे आधुनिकीकरण व विस्तार हा या कामाचा पाया आहे. मार्क्सने दास कॅपिटलमध्ये सांगितलेल्या गोष्टी तशाच या नव्या काळात लागू

पडत नाहीत. काळ व परिस्थिती यांच्याबरोबर इतिहास पुढे गेला आहे. ते ध्यानात घेऊन आमचा देश वागत आहे."

हे सर्व क्लिष्ट लिहिणे आहे. पण महत्त्वाच्या जागी काम करीत असलेल्या लोकांच्या विचारांची, हे लिहिताना उजळणी होते व नोंदही राहते. एवढेच हे सर्व लिहिण्याचा उद्देश!

# परिशिष्ट

श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या विदेश-सफरीत त्यांच्या समवेत, त्यांच्या दिल्ली येथील कार्यालयातील ज्येष्ठ अधिकारी असावयाचे. त्या सर्वांचा त्यांनी त्यांच्या लेखनात कृतज्ञापूर्वक उल्लेख, विविध घटनांच्या संदर्भात केलेला आहे. त्या काळात –

श्री. **राम प्रधान** ( सध्याचे अरुणाचलमचे राज्यपाल ) हे जिनिव्हा येथे टेक्निकल असिस्टंट एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर ऑफ इंटरनॅशनल मॉनेटरी फंड ( I.M.F. ) या पदावर होते. युनायटेड नेशन्स फॉर ट्रेड ॲण्ड डेव्हलपमेंट ( UNCTAD ) याच्याशी संबंधित ते होते.

श्री. **माधव गोडबोले** हे गृह आणि नंतर अर्थमंत्र्यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी होते.

श्री. **शरद उपासनी** हे विदेशमंत्र्यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी-विशेष सहाय्यक व सल्लागार होते.

श्री. **शरद काळे** हे विदेशमंत्र्यांचे स्पेशल असिस्टंट ( प्रा. सेक्रेटरी ) होते.

श्री. **श्रीपाद डोंगरे** हे त्यांचें स्वीय सहाय्यक असून विदेश-मंत्र्यांचे ॲडिशनल प्रायव्हेट सेक्रेटरी होते.

# C 20-Committee of Twenty

The Committee on Reform of the International Monetary System and Related issues ( popularly known as the Committee of Twenty ) was appointed by the Board of Governors of the International Monetary Fund ( I. M. F. ) in July, 1972 to make proposals for reform of the world monetory system. The Committee of Twenty was appointed as a sequel to the highly unsettled conditions which prevailed in the foreign exchange markets in the wake of the suspension, in August 1971, by the U. S. A., of the convertibility of U. S. dollar into gold. The widespread resort to floating exchange rates which followed this event marked the end of an era of fixed exchange rates which were a basic feature of the international monetary system evolved at Bretton Woods. In December 1971, major Western countries agreed among themselves upon a new alignment of currencies with a view to the restoration of the system of fixed par values. The resulting exchange instability convinced members of the I. M. F. that there was need for a fundamental reform of the international monetary system so as to make it more responsive to the evolving needs of the international economy. It is this conviction which led to the setting up of the Committee of Twenty.

The Committee of Twenty consisted of Finance Ministers/ Governors of Central Banks representing the twenty constituencies into which the members of the I. M. F. are divided for purposes of appointing / electing an Executive Director. The Committee was assisted in its work by a Group of Deputies consisting of senior officials dealing with monetary and financial matters. The constituency consisting of India, Bangladesh and Sri Lanka was represented on the Committee of Twenty by the Finance Minister of India, Shri. Y. B. Chavan. In all, the Committee held six meetings. Its final meeting was held in Washington D. C. on June 12-13, 1974. The Deputies held in all twelve meetings, and Dr. Manmohan Singh, Chief Economic Adviser, functioned as India's Deputy at most of these meetings. Dr. P. S. N. Prasad also attended these meetings as Executive Director of the I. M. F. representing India, Bangladesh and Sri Lanka.

## List of Member of the Committee of Twenty

| Sl. No. Member | Appointed by |
|---|---|
| 1. Japan . . . . . | Japan |
| 2 U. K. . . . . . | U. K. |
| 3. India . . . . . | Bangladesh, India, Sri Lanka |
| 4. Australia . . . | Australia, New Zealand, South Africa, Swaziland, Western Samoa |
| 5. Belgium/Austria . . | Austria, Belgium, Luxembourg, Turkey |
| 6. Brazil . . . . | Brazil, Colombia, Dominican Republic, Guyana, Haiti, Panama, Peru |
| 7. Sweden . . . . . | Denmark, Finland, Iceland, Norway, Sweden |
| 8. France . . . . | France |
| 9 Morocco . . . | Algeria, Ghana, Greece, Iran, Morocco, Tunisia, People's Democratic Republic of Yemen |
| 10. Ethiopia . . . | Botswana, Burundi, Ethiopia, The Gambia, Guinea, Kenya, Lesotho, Liberia, Malawi, Nigeria, Sierra Leone, Sudan, Tanzania Trinidad and Tobago, Uganda, Zambia |
| 11. Italy . . . . | Itely, Malta, Portugal, Spain |
| 12. Venezuela/Mexico . . | Costa Rica, El Salvador, Guatemala, Honduras, Mexico, Nicaragua, Venezuela |
| 13. Netherlands | Cyprus, Israel, Netherlands, Yugoslavia |
| 14. Zaire/Ivory Coast | Cameroon, Central African Republic, Chad, People's Republic of fhe Congo, Dahomey, Equatorial Guinea, Gabon, Ivory Coast, Malagasy Republic, Mali, Mauritania, Mauritius, Niger, Rwanda Senegal, Togo, Uppar Volta, Zaire |
| 15. Tha Federal Republic of Germany . . . | The Federal Republic of Germany |
| 16. United States of America . | United States of America |
| 17. Canada/Jamaica . . | Barbados, Canada, Ireland, Jamaica |
| 18. Indonesia . . . . | Burma, Fiji Indonesia, Khmer Republic, Korea, Laos, Malaysia, Nepal, Philippines, Singapore, Thailand, Viet-Nam |
| 19. Argentina . . . . | Argentina, Bolivia, Chile, Ecuador, Paraguay, Uruguay |
| 20. Iraq . . . . . | Afghanistan, Bahrain, Egypt, Iraq. Jordan, Kuwait, Labanon, Libyan Arab Rebublic, Oman, Pakistan, Qatar, Saudi Arabia, Somalia, Syrian Arab Republic, United Arab Emirates, Yemen Arab Republic |

Names of Participants on behalf of India at the Meetings of the Committee of Twenty and of the Deputies of Committee of Twenty.

1. Shri Y. B. Chavan, Minister of Finance – Member.

2. Shri S. Jagannathan, Governor, Reserve Bank of India. – Associate / Adviser.

3. Dr. I. G. Patel, Secretary, Department of Economic Affairs, Ministry of Finance – Deputy.

4. Shri M. G. Kaul, Secretary, Department of Economic Affairs, Ministry of Finance – Deputy.

5. Dr. Manmohan Singh, Chief Economic Adviser, Department of Economic Affairs, Ministry of Finance – Deputy / Adviser.

6. Dr. P. S. N. Prasad, Executive Director, IMF.

7. Shri V. B. Kadam, Director Division of International Finance, Reserve Bank of India — Deputy / Adviser.

8. Shri G. V. Ramakrishna, Eonomic Minister, Embassy of India, Washington – Adviser.

9. Shri S. P. Upasani, Private Secretary to Minister of Finance, India — Adviser.

10. Shri R. H. Patil, Deaputy Director, Economic Department, Reserve Bank of India — Adviser.

*

# Chavan's Comments on IMF and World Bank

The following is the text of the speech by the Finance Minister, Shri Y. B. Chavan, at the Commonwealth Finance Ministers' annual meeting at Nassau, Bahamas, delivered on September 23, 1971.

" Mr. Chairman,

we are meeting this year at a time when the machinery for international economic co-operation that we have built up so patiently over the past 25 years or so is under considerable stress and strain. There is talk of revising the IMF charter and even of holding another Bretton Woods Conference. The third replenishment of IDA is heading for the same fate as the second one. The third UNCTAD Conference will take place soon without any tangible evidence that the objectives of the second UNCTAD have been achieved to any significant extent. In the field of trade, recent events have cast a shadow on the effectiveness of the GATT and on the prospects for the general scheme of preferences. Within our own family of the Commonwealth, the United Kingdom seems to be all but set for membership of the European Economic Community.

If ever there was any purpose in a meeting of the Commonwealth Finance Ministers, it is on this occasion when so many decisions in the international economic field are imminent. I would like, Mr. Chairman, therefore to devote my remarks even at this stage to some aspects of the machinery for international economic co-operation about which we, in India, and I am sure in most other developing countries, feel seriously concerned. I will

add towards the end, a few remarks on the current economic situation in India. We have before us excellent reviews of the world economic situation as it affects the developed and the developing countries respectively, and I do not wish to comment on what is admirably stated in these papers. But There are overriding issues concerning the relationship between the two groups of countries which deserve to be noted at the outset.

## Realignment of Exchange Rates

